


# उमलले संवाद

भाग - २


उमलले संवाद
भाग - २



# उमलले संवाद

## भाग - २

संपादन

**आनंद गुप्ते**

साहाय्य

**ज्ञानेश्वर शेंडे**

प्रकाशक

**भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन**
**मल्टीपर्पज फाऊंडेशन**
करुणा.. कल्पना.. कष्ट!

**उमलले संवाद भाग–२**

पहिली आवृत्ती – ३० मे, २०१२

संपादन
आनंद गुप्ते

साहाय्य
ज्ञानेश्वर शेंडे

प्रकाशक
भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन मल्टीपर्पज फाऊंडेशन, जळगाव

अधिकृत वितरक
मैत्र प्रकाशन, जळगाव. सुसंवाद : 09325682084

मुद्रक
जॅक प्रिंटर्स प्रा. लि., जॅक कम्पाऊंड,
दादोजी कोंडदेव क्रॉस लेन, भायखला (प.) मुंबई – ४०० ०२७.

मुखपृष्ठ व सजावट
वासुदेव कामत, आनंद गुप्ते, विकास मल्हारा

छायाचित्रे
ईश्वर राणा, राजेंद्र माळी, राजू हरिमकर

अक्षरजुळवणी
प्रशांत शिंदे, विजय भोंगे, विजय तिवारी

ISBN : 978-81-89502-06-5

**मूल्य** : ₹ १५०

प्रस्तुत पुस्तकाची किंमत ₹ १५०
असली तरी वाचकांना पुस्तक सवलतीच्या
दरात उपलब्ध करून दिले आहे.
**विशेष सवलतीचा दर ₹ १००**

जागतिक हक्क भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन मल्टीपर्पज फाऊंडेशन, जैन पाइप पार्क, जैन पाइपनगर, निमखेडी रोड, जळगाव – ४२५ ००१. यांचे स्वाधीन व सुरक्षित.

भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन मल्टीपर्पज फाऊंडेशनची लेखी पूर्वसंमती असल्याखेरीज या पुस्तकाचे वा त्यामधील कोणत्याही भागाचे पुनर्मुद्रण करणे, कोणत्याही प्रकारे, कोणत्याही पद्धतीने साठवण करणे, कशाही प्रकारे प्रक्षेपण करणे, इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल व अन्य कोणत्याही पद्धतीने वापरणे हे बेकायदेशीर आहे.

# अनुक्रमणिका


- दोन शब्द–दुसऱ्यांदा............. आनंद गुप्ते
- प्रस्तावना.......................... मधु मंगेश कर्णिक

| शीर्षक | मुलाखतकार | मुलाखत | दिनांक | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|
| एका यशस्वी माणसाची दूरदृष्टी | धों.ज. गुरव, मुकुंद एडके | लोकमत | ११.१२.१९९७ | ०१ |
| अंतरीचा कळवळा जगाच्या वेशीवर | सतीश पप्पू, स्मिता दीक्षित | जळगाव आकाशवाणी | १०.०२.२००० | ११ |
| व्यावसायिकतेची तात्त्विक बैठक | | लोकमत | ०५.०४.२००२ | १५ |
| ‘खान्देशरत्न’ची देशव्यापी प्रभा | वैशाली देशमुख, सतीश देशमुख | सह्याद्री वाहिनी | २१.०९.२००२ | २५ |
| स्वार्थात मुरले पाणी | संतोष सोनवणे | ई–टीव्ही | ०३.०७.२००६ | ३५ |
| रुतला पाय मातीत | बुद्धभूषण गायकवाड | दूरदर्शन–मुंबई | २४.०९.२००६ | ३९ |
| सन्मानाचा खरा अन्वय व अर्थ | सतीश पप्पू | जळगाव आकाशवाणी | १४.०५.२००७ | ४७ |
| सामाजिक ऋणमोचनाची अनुभूती व साधनशुचिता | मंगेश पाठक मुंबई | अद्वैत फीचर्स | १२.१०.२००७ | ५५ |
| पाटबंधाऱ्यांच्या कामी नवी वीट | अनिल पाटील | पुण्यनगरी | १०.११.२००७ | ६५ |
| केळीच्या गोडव्यातून ग्रामविकासाच्या घडाकडे | हेमंत अलोने | देशदूत | ०८.१२.२००७ | ६९ |

| शीर्षक | मुलाखतकार | मुलाखत | दिनांक | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|
| पाण्यातला स्वार्थ अन् कडू परमार्थ | सतीश पप्पू | जळगाव आकाशवाणी | ११.१२.२००७ | ८१ |
| रम्य ते बालपण | सुधीर गाडगीळ | आकाशवाणी | १७.१२.२००७ | ९१ |
| जमिनीची वैचारिक नांगरट | अनिल पाटील | पुण्यनगरी | २३.०१.२००८ | ११३ |
| 'पद्मश्री' सन्मानाच्या सावलीत | विकास भदाणे | झी टीव्ही | २५.०१.२००८ | १२९ |
| एकविसाव्या शतकातील भारतीय शेतीवरचे आत्म चिंतन | सतीश पप्पू | जळगाव आकाशवाणी | ०२.०२.२००८ | १३३ |
| आयुष्याची वाटचाल आणि वाटचालीवरचं आयुष्य! | स्वामी रेणापूरकर | सा. मधु-विचार | २६.०४.२००८ | १४३ |
| सन्मानाच्या हिम खंडातला अदृश्य भाग | सुरेश उज्जैनवाल | सकाळ | ०८.०६.२००८ | १५३ |
| व्यावसायिकतेचे तत्त्वचिंतन | प्रवीण जाखड | दै. राजस्थान पत्रिका | २३.०९.२००८ | १५९ |
| एका मित्राला यथोचित श्रद्धांजली | सतीश पप्पू | जळगाव आकाशवाणी | १९.११.२००८ | १६९ |
| उद्योगचक्रातील कंगोरे | सुसंवाद | डोंबिवलीचे उद्योजक | २०.१२.२००८ | १७५ |

| शीर्षक | मुलाखतकार | मुलाखत | दिनांक | पृ.क्र. |
| --- | --- | --- | --- | --- |
| ध्येय-उद्दिष्टे झाडाच्या बुंध्यासारखी घट्ट असावीत | सुसंवाद | बी.ए.एम्.एस्.चे सहपाठी डॉक्टर | ०४.०१.२००९ | २०७ |
| थोर सांस्कृतिक परंपरेची अनुभूती | सुकदेव शिरसाळे | लोकसत्ता | १७.०२.२००९ | २२१ |
| कर्जमाफीचा धोंडा स्वतःच्याच पायावर | मिलिंद वानखेडे | साम-टीव्ही | २०.०५.२००९ | २३१ |
| वाहत्या पाण्यानं काठावर पडणारं गदळ! | श्रीमंत माने | ॲग्रोवनची व्हिडिओ - कॉन्फरन्स | ०१.०७.२००९ | २३९ |
| शिक्षणाला अग्रस्थान म्हणजेच पुढच्या पिढ्यांचा विचार | चंद्रशेखर नेवे | स्टार-माझा | ०६.०७.२००९ | २६७ |
| महिलांमुळे संस्कृती जिवंत राहिली | सुसंवाद | साम टीव्ही | १३.०८.२००९ | २७३ |

• या पुस्तकात पूर्वप्रकाशित/प्रसारित मुलाखती अंतर्भूत करण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार.

# दोन शब्द ... दुसऱ्यांदा....

पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन यांच्या मुलाखतींवर आधारित 'उमलले संवाद' याचाच, हे पुस्तक म्हणजे पुढचा अथवा दुसरा भाग. हा भाग आवर्जून प्रकाशित करावा लागला, याचं कारण एकच अन् ते म्हणजे पहिल्या भागापेक्षाही वेगवेगळ्या ताज्या अशा मुलाखतींमधून उपलब्ध झालेली साधनसामग्री. अर्थात, या सामग्रीमधून निवड करताना जे विषय यापूर्वी येऊन गेले ते टाळण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि, काही विषयांची द्विरुक्त थोड्याफार प्रमाणात आढळण्याची शक्यता आहे. मुलाखतीच्या ओघात तसं होतं आणि रसभंग होऊ नये वा मुलाखत तुकडे-तुकडे जोडून घेतल्यासारखी वाटू नये म्हणून तो भाग वगळला नाही इतकंच.

मुलाखतीमध्ये वापरली जाते ती बोलीभाषा असते. बऱ्याचदा या मुलाखती ध्वनिमुद्रित केलेल्या असतात. मागाहून सवडीनं त्यांचं शब्दांकन लिखित स्वरूपात अवतरतं. अशा वेळी त्या लिखित मजकुरावर संपादकीय संस्कार करण्याची नितांत गरज असते म्हणून ते तसे केलेही जातात. या कामात भाऊंची मदतही घ्यावी लागली आणि घेतली गेलीही.

या मुलाखती घेणाऱ्यांत सर्व प्रकारचे लोक आहेत. लेखक, पत्रकार यासारखी मुलाखतींचा अनुभव असणारी मंडळी जशी आहेत तशीच इतर काही जिज्ञासू माणसंही. काही होतकरू आहेत, तर काही शाळकरी मुलंही. त्यामुळं त्यांनी विचारलेले प्रश्न कित्येकदा फारच बाळबोध स्वरूपाचे वाटतात. ते असे असतातही. तथापि, विचारलेल्या अशा एवढंच नव्हे; न विचारलेल्या अशा प्रश्नांनाही भाऊंनी अत्यंत

मुरब्बीपणानं जी उत्तर दिली ती मुळातून वाचावी अशी आहेत. भाऊंना ही जाणीव सतत राहते व प्रश्नकर्त्यांच्या भावनांनाही ते जपतात.

काही मुलाखतींमधून भाऊंच्या व्यापक दृष्टिकोनाचाही परिचय होतो. मुळातच भाऊ हे काही राजकीय नेते नाहीत. त्यामुळे पक्षीय दृष्टिकोनातून विचार करण्याची त्यांना काहीच गरज नाही. तसा ते करीतही नाहीत. म्हणून लोकानुरंजन करण्याची त्यांना सवय नाही. शासनाने नेमक्या लोकानुरंजन हेतूने घेतलेल्या कर्जमाफी योजनेची लक्तरं त्यांनी काढली. यामुळे खरंतर शेतकऱ्यांचा तोटाच होणार आहे, हेही ते निर्भिडपणानं बजावतात. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या खऱ्या गरजा कितीतरी अधिक असल्याचं सांगून त्यासाठी कर्जमाफीच्या रकमेच्या पटीत तरतूद करण्याची अपेक्षाही ते व्यक्त करतात. ही मदत कशा स्वरूपात केल्यास शेतीस तिचा खरा फायदा होईल, ते मार्गही ते विशद करतात.

यातील काही मुलाखती यापूर्वीच प्रसिद्ध झाल्या आहेत. तथापि, ज्या संस्थेने–प्रकाशनाने त्या घेण्याची तसदी घेतली होती, त्यांच्याच प्रकाशनात, माध्यमात ती मुलाखत तेव्हा लगेचच प्रसिद्ध झाली होती. अर्थातच त्यांना त्या वेळी उपलब्ध असणारी जागा, वेळ अथवा त्यांना असलेला त्या विषयातला रस यामुळे त्यांना त्यावर संपादकीय संस्कार करणे अगत्याचे होते. तसे ते केले गेले होते; पण त्याच मुलाखतीचे चित्र/ध्वनिमुद्रण आमच्याकडे उपलब्ध असल्याने तीच मुलाखत आम्ही येथे पूर्णपणे देऊ शकत आहोत याचा आम्हाला आनंद होतो.

'ॲग्रोवन' दैनिकाने आयोजित केलेल्या भाऊंच्या 'व्हिडिओ कॉन्फरन्सिंग' पद्धतीच्या मुलाखतीचा येथे आवर्जून उल्लेख करावसा वाटतो. संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेल्या ८–१० शहरांतून एकंदर २०–२५ शेतकऱ्यांनी या नवमाध्यमाद्वारे थेट भाऊंशी संवाद साधला. त्यांची प्रश्नोत्तरे मुळातूनच वाचण्यासारखी आहेत. त्यातील निर्भिडता, शोधक व प्रामाणिक वृत्ती, पारदर्शकता वाखाणण्यासारखी आहे. असे प्रयत्न वाढायला हवेत.

सैद्धांतिक चर्चेतच गुंतून राहण्यापेक्षा वस्तुनिष्ठ उपाययोजना सुचवून त्यांच्या यशापयशाची कारणमीमांसा करणारा हा हाडाचा व्यवहारी माणूस विचारवंत म्हणून श्रेष्ठ त्यामुळंच होतो आणि हेच त्यांच्या मोठेपणाचं गमक होय.

– आनंद गुप्ते

## प्रस्तावना

जळगाव आणि तेथील परिसर यामध्ये 'जैन इरिगेशन सिस्टीम्स्' तर्फे, देशातील शेतकऱ्यांना वरदान वाटावा असा जलसिंचनासाठी उभारण्यात आलेला उद्योग समूह कार्यरत आहे. आणि त्याचे प्रेरणास्त्रोत असलेले पद्मश्री डॉ. भवरलाल जैन हे अहोरात्र देशाच्या संपन्नतेसाठी, समाजाच्या निकोप आचरणासाठी, कृषिक्षेत्राच्या उन्नतीसाठी झटत असतात, हे ऐकून होतो. परंतु काही दिवसांपूर्वी एका वाङ्मयीन कार्यक्रमाच्या निमित्ताने खुद्द जळगावी जाण्याचा आणि आदरणीय भवरलालजींची भेट घेण्याचा, जैन हिल्स परिसरातील त्यांचे अतुलनीय कार्य प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला आणि धन्यता वाटली ती त्यांचे औद्योगिक क्षेत्रातील डोंगराएवढे (टेकडीवर राहूनही!) काम पाहून आणि त्यामागे असलेली विधायक, म. गांधीप्रणीत विचारांची बैठक

पाहून! त्यांच्या कार्यालयामध्ये उद्योगपती जेआरडी टाटा, पं. जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी या त्यांच्या आदर्शांची छायाचित्रे प्रेरणादायी दर्शनासाठी भिंतीवर लावलेली पाहिली. आणि प्रत्यक्ष संभाषणामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये या तिन्ही लोकोत्तर चरित्रांचे प्रतिबिंब कसे उमटले आहे, त्याचा अचंबित करणारा प्रत्यय आला. उद्योगपती म्हणून जमशेद टाटा, लोकशाहीवरील निष्ठेसाठी जवाहरलालजी आणि शुचिर्भूत व्यक्तिगत चारित्र्यासाठी महात्माजी, अशी त्यांनी आपल्या मनाशी आदर्शांची मांडणी केलेली आढळली आणि आपले सर्वच व्यक्तिमत्त्व या तीन आदर्शांशी जोडून घेतले. त्यामुळे त्यांच्याशी संभाषण करणे हा एक उद्‌बोधक अनुभव होता. एकविसाव्या शतकातील जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण यांच्या एकत्रित प्रक्रियेमुळे भारतासारख्या ग्रामप्रधान, कृषिप्रधान संस्कृतीच्या विकसनशील देशामध्ये घडून येत असलेल्या बऱ्यावाईट परिवर्तनाबद्दलचे त्यांचे सुस्पष्ट, परखड आणि पारदर्शक व्यवहारी विचार ऐकताना त्यांच्यातील उद्योजकाचे, समाजसेवकाचे, देशभक्ताचे मनोज्ञ दर्शन घडून आले.

त्याच उद्‌बोधक विचारदर्शनाचा लिखित, मौखिक आलेख प्रस्तुतच्या ‘उमलले संवाद’ या पुस्तकामध्ये रेखाटण्यात आलेला आहे. डॉ. भवरलालजींना त्यांच्या कुटुंबामध्येच नव्हे तर सर्व उद्योगसमूहामध्ये, परिचितांमध्ये ‘भाऊ’ या प्रेमळ नावाने संबोधतात. त्यामुळे त्यांच्याप्रतीची औपचारिकता संपलेली असते. तर आदरणीय भाऊंच्या विविध विषयांवरील सखोल चिंतनाचे, प्रगल्भ विचारांचे बृहद्‌दर्शन या पुस्तकामध्ये घडून येते. कृषिविकास मृदसंधारण, जलसंधारण, उद्योजगता, शिक्षण, समाजोन्नती आणि आर्थिक शिस्तपालन हे त्यांच्या चिंतनाचे विषय. भारतीय समाज केवळ भौतिक दृष्ट्या संपन्न होऊन चालणार नाही. (ती तर मूलभूत गरज आहे, हे सांगायला ते विसरत नाहीत, पण) तर त्याची आध्यात्मिक, वैचारिक, चारित्र्यविषयक उन्नतीही झाली पाहिजे हे त्यांचे साऱ्यामागील विचारसूत्र असते. नैतिकतेला ते सर्वात प्राधान्य देतात. ही विचारधारा त्यांनी महात्माजींच्या चरित्रातून घेतली. ‘जैन’ या आपल्या समाजाबद्दल ते अत्यंत समर्पकपणे लिहीतात – ‘‘ज्याने दुसऱ्यांवर विजय मिळवला तो ‘वीर’, स्वतःवर विजय मिळवला तो ‘महावीर’ आणि ज्याने स्वतः च्या इंद्रियांवर विजय मिळविला तो ‘जैन’. जैन ही एक जीवनपद्धत आहे.’’ या निष्कलंक जीवनपद्धतीचे, जीवनमार्गाचे ते पाईक आहेत. त्यामुळेच कोट्यावधि

रुपयांचे उद्योगसाम्राज्य उभारूनही ते ‘उपभोगशून्य स्वामी’ म्हणून वावरत आहेत. सगळ्यांकडे त्याच भावनेने पाहत आहेत. ही निर्मम वृत्ती दुर्मिळ म्हटली पाहिजे.

आदरणीय भाऊंच्या या पुस्तकामध्ये सुभाषिताप्रमाणे त्यांची अनेक विचारमौक्तिके उद्धृत केलेली आढळतात. ‘ध्येयाचा ध्यास लागला म्हणजे कामाचा त्रास वाटत नाही. मी जगभर फिरलो, पण भारतीय व्यक्ती इतका बुद्धिमान माणूस मी कुठेच पाहिला नाही. स्वतःला जो फसवतो, तो चारित्र्यहीन. माझ्या आयुष्यामध्ये मी ९५ टक्के घाम गाळणे आणि ५ टक्के नशिबावर भरवसा ठेवत आलो आहे. Unearned income न मिळवलेले बरे. स्वप्नात रंगून जाण्यापेक्षा कामात गुंतून घेणे जास्त योग्य मानलं. कठोर परिश्रम, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सकारात्मक मानसिकता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब अडवून तो भूगर्भात जिरवला पाहिजे. जगातील सर्वात श्रीमंत लोकांच्या यादीत माझं नाव येण्यापेक्षा जगातल्या सर्वात सुखी लोकांच्या यादीत माझ नाव आल पाहिजे. नीतीमूल्यांच्या कार्यसंस्कृतीशी मी कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही.’

आदरणीय भाऊंच्या या संवादात्मक चिंतनाचा विशेषतः तरुण पिढीला उपयोग होईल. हे विचारांचे, संवादाचे उमलणे, तरुणाईसाठी आहे. या देशाचे भवितव्य ज्या पिढीच्या हाती आहे, तिच्यासाठी एका कर्मयोग्याने दिलेला हा प्रसाद आहे असे मानून तरुणांनी त्याचा स्वीकार केला पाहिजे. तरुणांबरोबर शेतकरी, उद्योजक आर्थिक क्षेत्रात काम करणारे, विज्ञाननिष्ठ नागरिक, महिला, शासनातील राज्यकर्ते व सनदी अधिकारी या सर्वांनी भाऊंच्या या विचारधनाचा स्वतःसाठी सढळपणे उपयोग करावा. बँकेतील धन फक्त या आयुष्यात उपयोगी पडेल, विचारधन शाश्वत असल्याने ते कित्येक भावी आयुष्यांसाठी प्रेरक, मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरेल. भाऊंनी म. गांधी, पं. जवाहरलालजी आणि जे.आर.डी. टाटा यांच्याकडून हे विचार–आचारधन घेतले व त्याचा आयुष्यभर सदुपयोग केला. भाऊंच्या या कृतिशील विचारधनाचा नव्या पिढीने लाभ घ्यावा.

मानवी जीवनात श्रेयस आणि प्रेयस या मूल्यांचे द्वैत नेहमी आपल्याला द्विधा करीत असते. प्रेयसचा म्हणजे सर्व प्रिय वस्तूंचा, सुखोपभोगाचा, पदवी, पगार, पैसा आणि सत्ता यांचा मोह अटळ असतो. आदरणीय भाऊंनी या सर्व गोष्टी स्वकर्तृत्त्वाने संपादन करूनही अंतिमतः ‘श्रेयस्’ चा मार्ग स्वीकारला. म्हणूनच

त्यांच्या संकल्पनेतील ‘गांधीतीर्थ’ साकार झाले. त्यांच्या श्रेयस्कर, शुभंकर, प्रेरक शिकवणूकीचा निरंतर लाभ होण्यासाठी त्यांना निरामय दीर्घायुरारोग्य लाभो आणि त्यांच्या हातून देशाची अशीच सेवा घडून येवो, अशी सदिच्छा व्यक्त करून ही प्रस्तावना संपवतो.

दिनांक – २१ एप्रिल, २०१२

– मधु मंगेश कर्णिक
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
४०१, मार्व्हल, शास्त्रीनगर, अंधेरी (प.),
मुंबई – ४०० ०५३



# एका यशस्वी माणसाची दूरदृष्टी

दैनिक 'लोकमत'– धों.ज. गुरव आणि मुकुंद एडके – १.१२.१९९७

*आपला देश मोठा खंडप्राय आहे. इथं गेली ६० वर्षे लोकशाही नांदते आहे. तरीही इथले सर्व प्रश्न, समस्या सुटल्या आहेत असे नव्हे! देशाचं भवितव्य उज्ज्वल होण्यासाठी विविध दिशांनी चिंतन करण्याच्या दृष्टिकोनातून व्यावहारिक मार्गदर्शन करताहेत भवरलालजी. शेवटी ते व्यक्तीच्या देशप्रेमावर, व्यक्तीच्या निष्ठेवर येतात. कष्टांना महत्त्व देतात. व्यक्ती म्हणून जगाच्या पटलावर असाम न्य ठरणारा भारतीय माणूस देशाच्या एकत्रित वा सामूहिक क्षमतेत रसातळात का जातो याचंच हे खरं चिंतन आहे. सत्य आहे म्हणूनच कटूही आहे. ते वाचकांना अंतर्मुख करून कार्यप्रवृत्त करायला लावतं, हेच त्यांच यश म्हणायचं!*

**श्री. गुरव –** जागतिक स्तरावर व्यापार–उद्योगांमध्ये मंदीची परिस्थिती कशी निर्माण झाली, त्याबद्दल आपले मत काय?

**भाऊ –** माझे वैयक्तिक मत असे आहे, की अनेक देशांचा विकास त्यांच्या

स्वत:च्या पायावर झाला आहे, अशा देशांमध्ये ही समस्या असते. आपल्या भारताला मंदीची झळ फार मोठ्या प्रमाणावर लागलेली नाही. जेव्हा स्वत:च्या पायावर व्यवसाय केला जातो, तेव्हा व्याज हा विषय लागू होतो. आज भारत सरकारचा अर्थसंकल्प जवळपास २ लाख कोटी रुपयांच्या घरात आहे. त्यात ६८ हजार कोटी रुपये व्याजाचे होतात, ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक संरक्षणासाठी खर्च होतात, तसेच नोकरशाहीवर ३० हजार कोटी रुपये खर्च होतात. असा प्रमुख खर्च वजा जाता ही रक्कम जवळपास १ लाख कोटी शिल्लक राहते. भारत सरकारला विकास करायचा असेल तर परत कर्ज घ्यावे लागेल. १९६२ मध्ये रुपयाचा भाव डॉलरच्या हिशेबाने ६ रुपये होता आणि आता ३५ वर्षांनंतर ४० रुपये झाला आहे. २ टक्के जरी व्याज असले आणि ३५ वर्षांपूर्वीचे कर्ज असले तरी आज ते भरावे लागते. ६ रुपयांना २ टक्के व्याज भरत होतो. आता ४० रुपयांवर दोन टक्के व्याज भरावे लागेल.

व्याज एवढे जास्त होऊन जाते, की सगळे मुद्दलच फस्त करते. मुद्दल, व्याज, नोकरशाही आणि संरक्षण





यातच भारत सरकारचे गणित संपते. महसुली आवक त्यातच संपते. विकास करायचा तरी कसा? कर्ज घेऊन किती विकास करणार? त्यात पुन्हा भ्रष्टाचार हा आलाच. कर्ज घेतले आणि त्यात काही शिल्लक राहिले त्यात पुन्हा भ्रष्टाचार. असा पैसा या व्यवहारातून निघून जातो, अशा परिस्थितीमध्ये भारताचा विकास हा खऱ्या अर्थाने एक भ्रम आहे आणि ती भ्रमनिराशा कधीतरी होणार होतीच. त्याची ही सुरवात आहे, असं समजा.

जैन समूहाने गेल्या २ वर्षांत २४० कोटी रुपयांची गुंतवणूक केली, जी आधीच्या १७ वर्षांत केली नाही. १७ वर्षात करता आली नाही, तेवढी दोन वर्षात केली – किती तर २४० कोटी रुपये! वाटत होते, की परतफेड आठ-दहा महिन्यांत होऊन जाईल; परंतु अनेक कारणांमुळे त्यातही दीड वर्षाचा विलंब झाला. त्यामुळे या २४० कोटी रुपयांचे व्याज देण्याचे बळ आमच्यात राहिलं नाही. व्याज देणे वेळेवर सुरू झाले असते, तर सगळे बरोबर होऊन गेले असते; पण तसे झाले नाही. कारण, सगळ्याच नवीन उत्पादनांच्या बाजारात दाखल होण्याचा अपेक्षित कालावधी ठरल्यापेक्षा लांबत गेला. आमच्यासमोर समस्या उभी राहिली, आम्ही व्याजाच्या भाराखाली दबले गेलो, तीच गत भारत सरकारची झाली. कर्ज किती घ्यावे यावर भारताच्या संसदेने निर्बंध लावणे अगदी गरजेचे आहे. आपला देश नाही तर पूर्ण रसातळाला जाईल आणि आपण स्वतंत्र असूनसुद्धा पारतंत्री ठरू.

भारताला जेवढा विकास साधण्यासारखा आहे तेवढाच जर आपण साधत राहिलो तरी ही समस्या आपल्यावर येणार नाही. चीनचे उदाहरण घ्या. त्यांनी ३०-३५ वर्षांपर्यंत आयात करणे बंद केले. आपल्याजवळ जे आहे त्यातच ते भागवायचे. तब्बल ३५ वर्षांनंतर चीनने आयात करणे सुरू केले. आपण मात्र पहिल्या दिवसापासून आयातीसाठी स्वागतशील आहोत. आपल्यावर निर्बंध होते; परंतु निर्बंध शिथिल झाल्यामुळे आयात वाढली. त्या तुलनेनं निर्यात वाढली नाही. त्यामुळे त्यातील तोटा फार मोठा झाला. तो भरून काढण्यासाठी भारताला डॉलर्स मोजावे लागतील. म्हणूनच मला या मंदीच्या लाटेचे आश्चर्य वाटत नाही. जे कधीतरी घडणार होते ते आता घडले. त्यात या विकसनशील देशांची परिस्थिती फार हालाखीची होणार आहे. कारण, त्या देशांकडून माल घेणाऱ्या लहान देशांचीही स्थिती खूप विरूद्ध होणार आहे.

**श्री. एडके –** याला काही राजकीय परिस्थिती कारणीभूत आहे का?

**भाऊ –** खऱ्या अर्थाने हे सगळे घडायला आपले चारित्र्य जबाबदार आहे. कारण, राजकीय लोकांना निवडून कोण देतो? आपले प्रतिनिधी आपलेच एक प्रतिबिंब! त्यांना दोष द्यायचा असेल तर त्याआधी स्वतःला दोष द्यावा लागतो. राष्ट्र म्हणून आपले ध्येय उद्दिष्ट काय? याचा विचार केला पाहिजे. ज्या राष्ट्रांनी आपलं ध्येय आणि उद्दिष्ट नक्की केलं नाही ती राष्ट्रं आपला विकास कसा काय साधू शकतील? विकास करायचा आहे म्हणजे काय करायचे आहे? समजा, आपल्या राष्ट्राला एक औद्योगिक शक्ती म्हणून प्रगतीपथावर आणायचे आहे. त्यासाठी देशातल्या प्रत्येक नागरिकाला मी कामाला लावेन. त्याला शिस्तबद्ध करेन आणि त्यातून राष्ट्रीय संपत्ती निर्माण होईल, असे आपल्या लोक प्रतिनिधींनी ठरविले तर देशासाठी ती बाब अतिशय सकारात्मक ठरेल.

भारतीय इतर देशात आपली कर्तबगारी सिद्ध करून अग्रस्थानी असतात. अमेरिकेत सगळ्यात जास्त कमाई भारतातील नागरिक करीत असतो. अमेरिकेत हे शक्य आहे, भारतात शक्य नाही का? 'शक्य नाही' हे उत्तर येते. कारण, त्याला संधी उपलब्ध करून दिल्या जात नाहीत आणि ही संधी कोण उपलब्ध करून देऊ शकतो तर राजकीय व्यक्ती, हे मात्र सत्य आहे. परदेशात राहणाऱ्या मूळ भारतीयांत जर खरोखरच देशप्रेम असेल तर त्यांनी त्यांचे सगळे पैसे भारतात ठेवावेत. तसे झाल्यास आपल्यावर एक पैसाही कर्ज राहणार नाही, एवढी संपत्ती भारतीय लोकांजवळ आहे; पण हे देशप्रेम, ही ज्वलंत भावना, राष्ट्रभक्ती आपल्या अंगी नाही. 'राजकीय गुलामी संपली आणि आर्थिक गुलामी सुरू झाली.' असे म्हणण्याची वेळ येऊ नये एवढेच.

आता जर हे खऱ्या अर्थाने घडवून आणायचे असेल, तर आपल्याला प्रेसिडेंशनल फॉर्म ऑफ गव्हर्न्मेंट घडवून आणावे लागेल. त्यामुळे काय होईल? एम. पी. आणि एम. एल. ए. लोकांना मंत्री होता येणार नाही. मंत्रीच होता येत नाही म्हणून वेगळ्या उद्देशाने काही लोक तेथे जाणार नाहीत, बहुतांश चांगलेच लोक तेथे जातील. या लोकांनी काय काम करायचे? राज्यकारभार ज्यांच्या हाती आहे, त्यांच्यावर वॉच डॉग म्हणून काम करायचे, अमेरिकेत तशी पद्धत आहे. लोकांच्या स्वातंत्र्यावर कोणतीही गदा येणार नाही अशी शपथ त्यांनी घ्यावी. एवढ्या दोन

गोष्टी त्यांनी सांभाळल्या पाहिजे. कायदा हा लोकांच्या भल्यासाठी आहे शासनाच्या भल्यासाठी नाही. कारण, शासन आणि लोक एक नाहीत.

शासन वेगळे आहे आणि लोक किंवा देश ही वेगळी संकल्पना आहे. प्रत्येक कायद्याचा कालावधी पाच वर्षांसाठी केला पाहिजे, पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर परत तो संसदेमध्ये जाईल आणि योग्य अंमलबजावणी होऊन परत येईल. या देशासाठी कणखर असे नेतृत्व हवे की त्याच्या मार्गदर्शनाने आपण प्रगतीपथावर जावू.

**श्री. एडके –** यामध्ये आपल्याला लोकशाही मान्य आहे?

**भाऊ –** शंभर टक्के मान्य आहे; पण त्यासाठी संसदेत बदल करण्याची मात्र गरज आहे. कारण, त्या ठिकाणी सर्व चांगले लोक जातील. आपला देश व्यक्तिनिष्ठ आहे. त्यामुळे तेथे एक माणूस पाहिजे. राम हा एक होता, श्रीकृष्ण हा एक होता. आपला सगळा इतिहास रामायण-महाभारताभोवती बांधला गेला आहे. त्यासाठी आपण तसा प्रतिनिधी संपूर्ण भारतातून निवडून द्यायचा. संसदेला जेवढे अधिकार असतील तेवढेच त्या माणसाला असतील. अशी ती एकूण जडणघडण आहे.

श्रमसंस्कृती जोपासणारे प्रामाणिक नागरिक निर्माण करण्याचे आणि घडवण्याचे कारखाने कोणते? शाळा आणि विद्यापीठे! त्यांच्यात आमूलाग्र बदल घडवून आणल्याशिवाय काहीही होणे नाही. शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल केला पाहिजे. कार्यसंस्कृतीत बदल घडवून आणला पाहिजे. संपत्तीनिर्मितीसाठी परिश्रम हाच पाया आहे, त्याला दुसरा पायाच नाही. कठोर परिश्रम केल्याशिवाय पर्याय नाही. ही कार्यसंस्कृती लोकांच्या मनात रुजत नाही, तोपर्यंत या देशाला चांगले नेतृत्व मिळणार नाही. भक्कम पाया शिक्षणपद्धतीतून रचला पाहिजे. आजची जी शिक्षित विद्यार्थिनी आहे ती मोठी झाल्यानंतर ती आईच मुलाला जन्म देते. त्याला शिकवते. हे शिक्षणचक्र आहे. योग्य पद्धतीने स्त्रियांचे शिक्षण हा त्या शिक्षणपद्धतीचा पाया असला पाहिजे. नोकर निर्माण करणाऱ्या शिक्षणपद्धती ऐवजी नोकऱ्या देणाऱ्या उद्योजकांची शिक्षणपद्धत भारतात निर्माण व्हायला हवी.

मला एक प्रश्न नेहमी विचारला जातो, ''तुमच्या यशाचे गमक काय?'' एकाने तर ''तीन शब्दात हे गमक सांगा'' असं म्हटलं. ३५ वर्षांच्या यशाचे गमक तीन शब्दात कसं मांडता येईल? मी त्यांना दोनच शब्दात सांगितलं – 'कठोर परिश्रम!' कठोर परिश्रमानंतरच यश, खरं यश! शालेय विद्यार्थ्यांवर, तरुणांवर या विचारांचा

खोलवर संस्कार होण्याची गरज आहे. दहावीनंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या कलानुसार, आवडीनुसार कोर्स करू दिला पाहिजे. डॉक्टर हो, वकीलच हो, इंजिनीअरींगलाच जा – असे आग्रह कशासाठी? त्यांच्या गुणवत्तेची – क्षमतेची त्यांची त्यांनांच ओळख होऊ द्या. घरची २०–२५ एकर शेती असूनही नोकऱ्या मागणारे अनेक तरुण आहेत. स्वतःच स्वतःचे हात दोनदा कलम करून घेण्याचाच हा प्रकार. एकदा हात कलम होतात नोकरी मागताना – दुसऱ्यांदा कलम होतात कष्टाचं काम करताना! 'मी बी.कॉम. आहे – मी का म्हणून झाडूकाम करू?' असा विचार हा तरुण करतो. झाडू मारण्याच्याही लायकीचा तो राहत नाही. श्रमसंस्कृतीच्या विरोधात असणारे हे वास्तवचित्र. अशाने देशाचं भवितव्य काय? हाच प्रश्न मनाला सतावत राहतो.

**श्री. गुरव –** तुमच्या ३५ वर्षांच्या काळातील स्थितीत आता बदल झाला आहे का?

**भाऊ –** काही बदल झालेला नाही. मला त्यासाठी महत्त्वाची बाब सांगावीशी वाटते ती म्हणजे व्यक्तिगत चारित्र्य! चारित्र्य नितळ पाण्यासारखे स्वच्छ असले पाहिजे. ते जर तसे असेल तर यशापासून कुणीच थांबवू शकत नाही. दुसऱ्याला जो फसवितो त्याला मी चारित्र्यहीन मानायला तयार नाही; पण जो स्वत:ला फसवितो त्याला मी चारित्र्यहीन मानायला तयार आहे. जर दुसऱ्याला फसवणे आवश्यकच असेल तो एक प्रकारचा समझोता असतो, असे मला वाटते. सरकारला फसविणे हा जणू काही सामाजिक धर्म झाला आहे. कारण, कायदेच असे करतात, की त्यातून मार्ग काढणारे काढतात. चूक मान्य करायला हवी; पण तेही कुणी करीत नाही आणि म्हणून ही सगळी मूल्यांची घसरण चालू आहे.

माणूस स्वत:ला फसवायला लागला, जे आपल्याजवळ नाही ते दाखवायला लागला. जे सत्य आहे तेच मांडा. मी सात हजार रुपयांपासून सुरवात केली होती. आज जैन इरिगेशन जे काही आहे ते सर्वांसमोर आहे. मी त्या वेळी जसा होतो तसाच आजही आहे. गरजा सीमित आणि उद्दिष्ट उच्च ठेवले, त्यासोबतच स्वत:ची फसवणूक न करता पुढे चालत राहिलो तर ते खऱ्या अर्थाने यशस्वी जीवन आहे. ह्या यशाला कुणीही पैशात मोजू शकत नाही, नफा–तोट्यात सांगू शकत नाही. लोक काय म्हणतील यावर जीवनाचे मूल्यमापन होत नाही. यासंदर्भात मला एक घटना आठवते.

एकदा मी माझ्या गावाला गेलो होतो. तिथल्या गावकऱ्याने एक किस्सा मला सांगितला. त्या ठिकाणी काही लोक गप्पा मारीत बसले होते. त्यांचा चर्चेचा विषय असा होता, की जैन उद्योगसमूहात आता वेळेवर पगार होत नाही. दोन-तीन वर्षांपूर्वी असे होत नव्हते आणि जर झालेच तर एक-दोन दिवसांचा उशीर होत होता; पण आता तसे न होता फारच उशिरा पगार होतो. त्यामुळे या कंपनीचे काही खरे नाही. त्या ठिकाणी एक मुख्याध्यापक बसलेले होते. त्यांनी त्या लोकांना सांगितले, ''वेड्यांनो, सगळ्यात उंच प्राणी उंट असतो. तो जर खाली बसला तरीसुद्धा तो सगळ्यांपेक्षा उंचच असतो! तसे या जैन उद्योगसमूहाचे आहे, ती कंपनी जरी खाली बसली तरी ती सगळ्यांपेक्षा उंचच असणार आहे. तुम्ही त्यांच्याबद्दल वायफळ चर्चा करू नका.'' आपल्या समाजाला ही सवयच लागली आहे. क्षेत्र कोणतेही असो वायफळ चर्चा जास्त आणि मौलिक कमी असे चाललेले असते. पूर्वी लेखक, कवी, पत्रकार यांना समाजात खूप मान होता. कारण, ते विचारांचे कारखानदार होते; पण आता त्यातील बहुतांश जर विकावू झाले असतील तर त्यांच्याकडून काय अपेक्षा ठेवणार? आमच्या कारखानदारीतही ही बाब लागू आहे.

माझ्याजवळ दोन पैसे जास्त आहेत म्हणून मी चांगला माणूस असे गृहीत धरूनच अनेक माणसं माझ्याशी बोलतात. समाजामध्ये पैसा हाच दंडक मानला गेला आहे, पैसा यशाचे गमक, केंद्रबिंदू. पैसा केवळ प्रतिष्ठाच मिळवून देतो, असे नव्हे, तर सामाजिक प्रतिमाही मिळवून देतो. तिही विक्री होऊ शकते अशी ती परिस्थिती असते. मी असे म्हणत नाही, की समाजात वाईट माणसं नाहीत; परंतु बहुतांश लोक त्यांना प्रतिष्ठा देतात. त्यांच्याकडे मुलगी द्यायची नाही असे कुणी म्हणतो का? खानदानापेक्षा व्यक्तीला जास्त महत्त्व देतात. सौंदर्याला महत्त्व देणारे बुद्धीला देत नाही, शरीराला महत्त्व देणारे डोक्याला काय देणार?

**श्री. गुरव –** या ६० वर्षांच्या काळातील चित्रण आपण अनुभवाने उभे केले आहे. आता समाजाने त्यासाठी काय केले पाहिजे? यासाठी आपण काही संदेश देऊ इच्छितात का?

**भाऊ –** संदेश असा आहे की, चारित्र्य घडवा. देशाला स्वत:च्या पायावर कसे बलवान करता येईल याचा विचार करायला शिका. कठोर परिश्रम करा. संस्कारित जीवन जगा. केवळ औपचारिक शैक्षणिक जीवन जगण्यापेक्षा या तीन

गोष्टी जर तुम्ही शिकलात तर आपल्या देशाला काहीच अडचण येणार नाही. या देशात काय कमी आहे? सूर्यप्रकाश इतका लाभला आहे, की पृथ्वीच्या पाठीवर कुठल्याच देशाला तेवढ्या प्रमाणात लाभलेला नाही, भारतासारखी भूमी कुठेच नाही. भारतातलं वातावरण अद्वितीय आहे.

उद्योजगता ज्यांच्या रक्तातच आहे, अशा पृथ्वीच्या पाठीवरील तीन कम्युनिटीज आहेत त्यापैकी जी एक 'व्यापारी' आहे, ती आपल्या देशात आहे, त्यांच्या रक्तातच तो गुण आहे. असे सगळे उद्योजक या देशात असताना, सगळी साधने आपल्या या देशात असताना आपल्याला इकडेतिकडे जाण्याची का आवश्यकता वाटावी? आपण काय करू शकत नाही? फक्त आपल्याला आपली हाव कुठेतरी सोडली पाहिजे.

प्रत्येकाला टी. व्ही. पाहिजे. गाडी पाहिजे. कशासाठी पाहिजे? प्रत्येक ठिकाणी दहा-दहा मिनिटांनी बसची सोय करा. ते सहज जमेल, न जमायला काय झाले? प्रत्येकाला गाडी पाहिजे म्हणून डिझेल आणि पेट्रोल ५० टक्के आयात करावे लागते. गुरांचे शेण आपण व्यवस्थित ठेवत नाही, त्याचा उपयोग करीत नाही, जमिनीतून जे तण निघतात त्याचा उपयोग आपण करीत नाही म्हणून आपल्याला केमिकल फर्टिलायझरचा उपयोग करावा लागतो. का आपण असे सांगू शकत नाही, की तुम्हाला आम्ही शेण आणि लाकूड जाळू देणार नाही. त्यासाठी इतर काही पर्यायी व्यवस्था करून देऊ. मी तर म्हणतो सगळ्या लोकांना सोलरचे दिवे फुकट देऊन टाका. कमीत कमी लाकूड आणि शेण या दोन गोष्टी जरी वाचल्यात तरी आपल्याला दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याची गरज नाही; पण या आयातीतच ५० टक्के जातात. प्रत्येक गोष्ट आपल्याला शासनातर्फे फुकट मिळाली पाहिजे असा आपला राष्ट्रीय स्वभाव झाला आहे. हा स्वभाव आपण बदलला पाहिजे. आपण किती उलटी कामं करतो, की लाकूड जाळतो, शेण जाळतो. त्यामुळे पर्यावरण धोक्यात येते.

मी जगभर फिरलो; पण भारतीय व्यक्ती इतका बुद्धिमान माणूस मी कुठेच पाहिला नाही. अजूनही भारतीय माणसाला हाताने काम करण्याची सवय आहे. बे-दुणे चार हा पाढा अजून तो पटापट म्हणू शकतो; पण विदेशात दोन आणि दोन-चार हे सुद्धा कॅल्क्युलेटरवर करावे लागते. बुद्धिमत्ता अशी वाया जायला नको. या गोष्टीचा आपण काहीतरी विचार केला पाहिजे. नवीन दिशा देणे किंवा वळण देणे हे साधारण माणसाचे कामच नाही आणि जोपर्यंत असे घडत नाही तोपर्यंत

सरकार काय बोलते, त्याचा परिणाम होत नाही. आपल्या देशातल्या काही चांगल्या लोकांमुळे – त्यांच्या कामामुळे आपण प्रगतीच्या टप्प्यावर आज आहोत.

**श्री. एडके –** आपल्या सुरवातीपासूनच्या तर आतापर्यंतच्या यशस्वी उद्योगात कुणाची प्रेरणा आहे का?

**भाऊ –** 'ध्येयाचा ध्यास लागला म्हणजे कामाचा त्रास वाटत नाही' हीच प्रेरणा! जे काही काम करायचे असेल ते एवढे अद्वितीय करायचे, की जर तुलनाच करायची असेल तर देशातील सगळ्यात चांगल्या किंवा जगातील सगळ्यात मोठ्या अशा गोष्टींशी व्हावी! कोणतेही काम करायचे ते मोठे – चांगले करायचे आणि त्यासाठी अतोनात काबाडकष्ट, कठोर परिश्रम नशिबी येतात. ते जर प्रामाणिकपणे करायची तयारी असेल तर तुम्हाला या प्रयत्नाला जास्त जोर द्यावा लागतो. अशी किंमत आम्ही प्रत्येक वेळा मोजली. मला चहा, कॉफी, दारू, सिगारेट असले कोणत्याही प्रकारचे व्यसन नाही. तरीही मला तीन हृदयविकाराचे झटके येऊन गेले.

साधं राहायचं, निकोप जगायचं ही सवय, वाचनाचा व्यासंग, गुणवंतांचा सहवास, सतत कामाचाच ध्यास हीच माझी दैनंदिनी आहे. कार्यसंस्कृतीत अहोरात्र बुडल्यामुळे खूप गोष्टी चांगल्या घडल्या. तशा इतरही काही बाबी आपोआप घडत गेल्या. मला जेव्हा पहिला हृदयविकाराचा झटका आला तेव्हा जळगावातील लोकांसाठी तर तो फार मोठा आश्चर्याचा धक्काच होता. ते लोक म्हणायला लागले, की 'भाऊंना जर हृदयविकाराचा झटका आला तर आपण कसे राहायचे, काय खायचे आणि काय प्यायचे? निर्व्यसनी असूनही भाऊंना हृदयविकाराचा झटका आला तर त्यांच्यापुढे आपली काय गोष्ट आहे?'

खूप मोठी माणसं सगळ्या जाती–धर्मात होऊन गेली, त्यांच्या जगण्यातून तत्त्वातून जे आचरणात आणण्यासारखे वाटते ते आपल्या व्यक्तिगत जीवनात, व्यवसायात आणि आपण जे चांगले काम करीत असू त्यात उतरवण्याचा प्रयत्न करतो. हीच माझी प्रेरणा. प्रत्येक क्षेत्रात माझ्यासमोर अशा एक–दोन प्रेरणादायी व्यक्ती असतात. आता तुम्ही जर मला विचारले, की 'तुम्हाला कुणासारखे व्हावेसे वाटते?' तर मी म्हणेन की, 'मला टाटांसारखे व्हावेसे वाटते!' प्रत्येकाची वेगवेगळी संस्कृती असते. देशासाठी राजकारण जवाहरलाल नेहरूंनी केले, महात्मा गांधीजींनी केले

तसे करावे, असे मला वाटते. माणसाने ध्येयवादी, आशावादी असावेच आणि ध्येय ठेवायचे असेल तर उच्चच ठेवा, लहान लहान अपेक्षा ठेवण्यात काहीच अर्थ नाही.

**श्री. गुरव –** आपण विद्यार्थ्यांना काय सल्ला देऊ इच्छितात?

**भाऊ –** त्यांच्यासमोर माझे सगळे जीवनच आहे. अनेकांनी मला सांगितले, की तुम्ही तुमच्या जीवनानुभवावर पुस्तक लिहायला हवे. ज्या वेळी त्याविषयीचे लेखन पूर्ण होईल त्या वेळी तुम्ही ते वाचा. घर, मुली, मुलं या सगळ्यांना एवढ्या व्यापात खूप वेळ देता येतो असं नाही. उद्योगाबाबत म्हणायचं तर सतत प्रामाणिकपणे काम केले तर त्यात यश नक्कीच मिळते.

**श्री. एडके –** 'जैन' नावाचे विद्यापीठ असावे, 'जैन' नावाचे इरिगेशन असावे, तुम्हाला 'जैन' नावाची बँक असावी असे का वाटते?

**भाऊ –** 'जैन' या नावाचा अर्थ विस्तृत स्वरूपात सांगतो म्हणजे त्याची कल्पना येईल. ज्याने दुसऱ्यांवर विजय मिळविला त्याला वीर म्हणायचे, ज्याने स्वत:वर विजय मिळविला त्याला 'महावीर' म्हणायचे! आणि ज्याने स्वत:च्या इंद्रियांवर विजय मिळविला त्याला 'जैन' म्हणायचे. जैन हा धर्म नव्हे; तर ती एक जीवनपद्धत आहे. जर या नावाच्या माध्यमातून आपण हा संदेश सगळ्यांना देऊ शकलो तर ती माझ्यासाठी अभिमानास्पद अशी बाब आहे आणि आजच्या परिस्थितीत 'हे उत्पादन जैन इरिगेशनचे म्हणजे चांगलेच!' असे एक समीकरण आम्ही निर्माण केले आहे. त्यामागे जी तपश्चर्या आहे ती कायमस्वरूपी अशा पद्धतीने चालत राहिली पाहिजे, असाच माझा प्रयत्न आहे. आपण येथे आलात याबद्दल मला खूप आनंद वाटला.

धन्यवाद.



# अंतरीचा कळवळा जगाच्या वेशीवर

सिंचन परिषदेच्या निमित्ताने 'आकाशवाणी' मुलाखत – सतीश पप्पू, स्मिता दीक्षित – १०.०२.२०००

*आंतरराष्ट्रीय स्तरावरील सिंचन परिषद ही जळगावसारख्या आडबाजूच्या मध्यम आकाराच्या शहरात व्हावी, हेच मुळात नवल. पण याच सिंचनक्षेत्रात असामान्य कामगिरी करून दाखवलेल्या जैन इरिगेशनची म्हणजेच पर्यायाने श्री. भवरलालभाऊ यांची व त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेणं जागतिक स्तरावरच्या संस्थांना भागच पडलं. अशा प्रकारचं व्यासपीठ मिळाल्यावर एक प्रकारचा सुखी–समाधानी आनंद मिळावा, हे ओघानंच आलं; परंतु स्वयंधारित जबाबदारीची जाणीव त्यांनी हाती घेतलेल्या कार्याचा अथांग आवाका व त्या आवाक्यासमोर असणाऱ्या मर्यादा यातला महासागर दाखवते. साहजिकच त्यांचं विचारमंथन हे आतल्या आवाजाचं आहे म्हणूनच ते इतकं स्पष्ट आहे.*

**निवेदिका** – आकाशवाणीच्या जळगाव केंद्रावरून जळगाव येथे दिनांक ०८ ते १० फेब्रुवारी २००० दरम्यान झालेल्या आंतरराष्ट्रीय सिंचन परिषदेचा

वृत्तांत सादर झाला. या परिषदेत आपले मत जैन उद्योगसमूहाचे संस्थापक अध्यक्ष श्री. भवरलालजी जैन यांनी अशा प्रकारे मांडले.

**भाऊ –** जेव्हा पृथ्वीची उत्पत्ती झाली, तेव्हा पृथ्वीवर जेवढे पाणी होते, तेवढेच पाणी आजही उपलब्ध आहे. पाण्याचा वापर करणारे मात्र वाढले आहेत. पाण्याची सर्वांना गरज असते. आजची परिस्थिती लक्षात घेता पूर्वी जर शेतीसाठी शंभर लिटर पाणी उपलब्ध असेल तर आज तेच प्रमाण जवळजवळ साठ लिटरवर आलेले आहे.

कारखानदारी आणि शहरीकरण त्याचबरोबर पशू-प्राण्यांची संख्या तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. हे चक्र कुठे थांबलेले नाही. पाणी आहे तेवढेच आहे आणि जगाची लोकसंख्या मात्र दिवसेंदिवस वाढतेच आहे. पाण्यावरील ताण सुतराम कमी होण्याची शक्यता नाही. उपलब्ध पाण्याचा विनियोग चांगल्या रीतीने, जास्त कार्यक्षम पद्धतीने करीत जाणे एवढे माणसाच्या नक्कीच हातात आहे. तशी जाणीव जगभरात प्रत्येक क्षेत्रात होते आहे.

आज आपल्या भारतात शेतीची परिस्थिती फारच बिकट आहे. बारा वर्षे झाली. आपल्याला खूप चांगला प्रतिसाद



निसर्गाकडून मिळाला. ही निसर्गाची देणगीच! चांगला पाऊस आपल्या भागात पडलेला आहे. फारतर एक-दोन वर्षे वाईट गेली असतील, तरीही शेतीच्या बिकट परिस्थितीवर मात कशी करायची हा गंभीर प्रश्न आपल्या मनात कायम आहे. पाण्याचे नियोजन करण्याच्या दृष्टीने 'ठिबक सिंचन' हे तंत्रज्ञान इतर देशांसाठी नुसते महत्त्वाचे असेल, पण भारतासाठी अनिवार्य आहे, असे माझे व्यक्तिगत मत आहे. त्यादृष्टीने गेल्या दहा वर्षांपासून सर्वांचे प्रयत्न चालू आहेत.

मला सांगायला आनंद वाटतो, की अमेरिकेनंतर भारताचा ठिबक सिंचन अवलंब करण्यात दुसरा क्रमांक आहे. संपूर्ण भारतात दहा लाख एकरावर ठिबक सिंचनाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. दहा वर्षांत हे प्रमाण मात्र, पुढच्या दोन वर्षातच दहा लाख एकरावर ठिबक सिंचन करण्याचे उद्दिष्ट आम्ही उराशी बाळगून आहोत. या एकूण विषयाला मोठ्या प्रमाणात चालना देऊन भारताचे उदाहरण जे विकसनशील देश या दृष्टीने आहेत, त्यांच्यासमोर वेगळ्या पद्धतीने ते पोहचावे म्हणून या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन आम्ही जळगावात करण्याचे ठरविले. मला सांगायला आनंद वाटतो, की त्याला फार चांगला प्रतिसाद सर्वच देशांकडून मिळाला. त्यात अमेरिका, युनायटेड किंगडम (यू. के.) त्याचप्रमाणे इतर जे विकसनशील देश आहेत, त्यांचेही प्रतिनिधी आलेले आहेत. पाण्याशी संबधित आपल्या देशातील ज्या संस्था आहेत त्यांचेही प्रतिनिधी इथे आलेले आहेत. आपण त्या सगळ्यांची मते ऐकलेलीच आहेत. याप्रसंगी आपण माझे विचार जाणून घेतल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

**निवेदिका –** शेतीत असलेला आपला सहभाग मोठा आहे, मोलाचा आहे. जसा आपण घरात गोबर गॅस असावा म्हणून एकच ध्यास आपल्या घरधन्याकडे केला होता तसाच निर्णय आपल्या कुटुंबात घ्या, एकच विचार असावा ठिबक आणि तुषार!

धन्यवाद!





# व्यावसायिकतेची तात्त्विक बैठक

दैनिक लोकमतने घेतलेली मुलाखत
– ०५.०४.२००२

*व्यापारी म्हटला, की त्याचं पहिलं आणि अंतिम लक्ष्य हे नफाच असतं. त्यात काही चुकीचं आहे असं मानलंही जात नाही. मारवाडी–कच्छी–गुजराती अशा जाती–जमाती व्यापारात नेहमीच अग्रेसर असल्यानं ही नफेखोरी वृत्ती आपोआपच व्यक्तिसापेक्षतेतून सहजच जाती–जमाती सापेक्ष होऊन जाते. त्यामुळंच एखादा मारवाडी–कच्छी माणूस व्यवसाय–धंद्यातही नीति अनीति, समाजहित–अहित अशी तात्त्विक बैठक ठेवून तो स्वीकारतो, नव्हे तरीही उच्च कोटीचं यश मिळवतो, हे सत्य सहजासहजी स्वीकारण्यास सामान्य माणूस धजतच नाही. भवरलालजी हे व्यक्तिमत्त्व तशा अर्थानं खरोखर अपवादात्मक का, हे या मुलाखतीतून समजेल.*

**प्रश्न** – ज्याला आयुष्याचा टर्निंग पॉइन्ट म्हटला जातो, जेथून आपल्याला नवीन वळण मिळणार असतं. जेव्हा आपली परिस्थिती जवळपास बेताची होती. आपल्याला राजपत्रित

अधिकाऱ्याची नोकरी मिळत होती, तेव्हा तिला नकार देण्याचे धाडस आपण कसं केलं? त्या वेळी आपल्या मनात भव्य असे व्हीजन होतं का? जे आज सर्व दिसते आहे ते तुम्हाला दिसते होते का?

**भाऊ** – नाही !

**प्रश्न** – म्हणजे असे व्हीजन नव्हते.

**भाऊ** – असे व्हीजन नव्हते हे नक्की आहे. परवा मी काही कामानिमित्ताने जुने रेकॉर्ड पाहत होतो तर त्यात माझ्या प्राथमिक शाळेचा दाखला पाहिला. त्या दाखल्यावर लिहिलेले आहे की अभ्यास बरा. वर्तणूक चांगली. याचा अर्थ असा, की शाळेत अभ्यास बरा होता. त्याचा दुसरा अर्थ असा, की ज्याला तुम्ही परंपरा म्हणता किंवा आपण ठेवा म्हणतो, तसा तो ज्ञानाचा ठेवाही आमच्याकडे नव्हता. संपत्तीचा तर नव्हताच नव्हता. याचा अर्थ उदाहरण देऊन अधिक स्पष्ट होईल.

डॉक्टर सुभाष चौधरी *(डॉ. सुभाष चौधरी हे भाऊंचे मित्र आहेत.)* त्यांचे वडील त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत कायम फर्स्ट क्लास फस्ट गोल्ड मेडॅलिस्ट टॉपवर राहिले आणि मेडिकललाही महाराष्ट्रात पहिले आले. सुभाष चौधरी महाराष्ट्रात दुसरे आले. सुभाष चौधरींचा मुलगा क्षितिज आता महाराष्ट्रात पहिला आला. ज्ञानाचाही वारसा असावा लागतो,



ठेवा असावा लागतो. वारसा असला की परंपरा होते. शिक्षण क्षेत्रातली परंपरा डॉ. चौधरींकडे ज्याप्रमाणे होती, तशी परंपरा आमच्याकडे नव्हती, ज्ञानाची आणि संपत्तीची तर नव्हतीच नव्हती. त्या दोन्ही परंपरा किंवा वारसा नसताना मार्ग काढला, वाट शोधली, काही वेळा नव्या वाटा निर्माण कराव्या लागल्या. त्या दृष्टीने पहाल तर व्हीजन किंवा दूरदृष्टी होती का? नव्हती हे खरे आहे.

**प्रश्न** – आणि ॲटिट्यूड!

**भाऊ** – ॲटिट्यूड मला पहिल्यापासून होता. दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे. एक तर ॲटिट्यूड आणि दुसऱ्या भाषेवरचे प्रभुत्व. भाषेचे प्रभुत्व कसे मदत करते? ज्ञानाचा वारसा नसला तरी ज्ञान संपादन करता येते. सरस्वती प्रसन्न असे आपण म्हणतो. ही सरस्वती साधना उपलब्धच असते. १९५६ मध्ये दहावीला मला एकाच विषयात प्रावीण्य म्हणजे ७३ टक्के मिळाले. इंग्रजीत ७३ टक्के आणि मराठीत ६७ टक्के. भाषेच्या गुणांमध्ये आज फार घसरण झाली आहे! मी बीजगणित विषय घेतला होता. त्यात होते फक्त ३५! मी मोठ्या कष्टाने त्या विषयात काठावर पास झालो होतो.

**प्रश्न** – पण मारवाडी म्हटले म्हणजे गणित पक्कंच पाहिजे ना!

**भाऊ** – पाहिजे ना! पण इथे सर्व उलट होते. वारसाही नव्हता आणि जे काही असायला पाहिजे तेही नव्हते. पुढेही ते खरंच झाले! म्हणजे मी म्हणून जी मारवाडी प्रतिमा अनेकांच्या मनात असते, त्याप्रमाणे वागूच शकलो नाही, वावरूच शकलो नाही. 'सामाजिक बांधिलकी' ह्या सद्गुणाने माझे आयुष्य सुगंधित झाले.

**प्रश्न** – व्यापारवाढ, भरपूर नफा हे कसे साध्य झाले?

**भाऊ** – आयुष्यात अनेक वेगळे क्षण आणि काही वेगळे लोक संपर्कात आले. त्यांच्याकडून मी विशिष्ट अशा महत्त्वाच्या गोष्टी शिकलो. एकदा मी लुधियानाला गेलो होतो. लुधियानात हॉटेलमधून खाली उतरलो आणि पाय पुढे ठेवून बूटपॉलिश करायला उभा राहिलो. आता उभेच राहायचे होते १० मिनिटे. म्हणून विचारले 'क्यो भाई क्या चल रहा है?' 'क्या बोलू साब! मरने का गम नही, जिने का सुख नही!' अशी भूमिका त्याने मांडली.

'देखीये साहब, मेरे पिताजी भी यही काम करते थे, मै भी कर रहा हूँ। सबेरे उठता हूँ बिबी बच्चो का पेट पालने के लिए जितने पैसे मिलते है वो लेके घर जाता

हूँ। उसमे जो कर सकता हूँ कर रहा हूँ। पर जिंदगी ऐसी ही जीने की है। समझो मै मर गया तो क्या कम पडनेवाला है? मैं ऐसा ही जी रहा हूँ मेरे जीवन मे और दुसरा क्या होनेवाला है? यही मेरा जीवन है। जो है उसमे आनंद है।

तसा तो मजेत होता. त्याच्या चेहऱ्यावर दु:खाचा भाव नव्हता. एक फिलॉसॉफिकल विधान त्याने केले, की आयुष्य आहे तसे त्याला स्वीकारा. त्याबद्दल विशेष असे दु:ख किंवा आनंद बाळगण्याचे काही कारण नाही. एका पॉलिश करणाऱ्या माणसाकडून त्या दिवशी मला तत्त्वज्ञान शिकायला मिळाले.

**प्रश्न** – नशीब नावाचा काही प्रकार असतो का ?

**भाऊ** – नशीब नावाच्या प्रकाराचा माझ्या आयुष्यात तसा काही अनुभव आला नाही. मी प्रत्येक वेळा प्रयत्नांचा भक्त राहिलो. कठोर परिश्रम हेच माझं ब्रीद आहे. अनंत प्रयत्नांनंतर नशिबाची साथ मला मिळाली आहे. ईश्वराने जर मदत केली असेल तर मी स्वत:ला आधी मदत केली, स्वतःला सिद्ध केले म्हणून असे झाले. नशिबामुळे असे घडले असा फार फार विरळा अनुभव कधी-कधी आला असेलही; पण माझ्या आयुष्यामध्ये मी ९५ टक्के घाम गाळणे आणि ५ टक्के नशिबावर भरवसा/मदार ठेवत आलो आहे.

**प्रश्न** – सोसायटीमध्ये इंडियन सिनेमा आहे किंवा इंडियन फिचर आहे किंवा वर्ल्ड वाइड फिचर आहे तसेच मारिओचे एक नॉव्हेल ‘गॉडफादर’ नावाचे होते, त्यावर जगभरातील चित्रपट तयार झाले आहेत.

**भाऊ** – नाही, त्याच्याही पुढचे एक वाक्य आहे. ग्रेटर द सक्सेस बिगर द क्राइम. याचा अर्थ जेवढे मोठे यश दिसत असेल, तेवढाच मोठा त्यामागे अपराध आहे. जेवढी जास्त संपत्ती मिळवली असेल तर तेवढी शक्यताही ही आहेच, की तेवढी पापं करावी लागली असतील, तेवढे जास्त अपराध घडले असतील, तरच तेवढी संपत्ती अशा पद्धतीने मिळवू शकता. नाहीतर संपत्ती प्राप्त करणे फार कठीण आहे, असा त्याचा मथितार्थ आहे. यशाची व्याख्या म्हणजे गडगंज संपत्ती गोळा करणे याबद्दल मात्र माझे दुमत आहे. अशी व्याख्या स्वीकारायला मी तयार नाही.

मी स्वत:ला यशस्वी म्हणत असेल तर माझ्याजवळ संपत्ती आहे म्हणून मी यशस्वी आहे किंवा यशस्वी होतो असे माझे मत कधीच नव्हते आणि आजही नाही. पैशाआधी हजार गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्याची लोकांना काही किंमत आहे की

नाही मला माहिती नाही. लोकांनी त्या पाहिल्या आहेत की नाही? मला माहीत नाही. पण जर मी स्वत:ला मोठा समजत असेल, भाग्यवान समजत असेल तर मी पैशामुळे तसा समजला जातो अशी काही जणांचीच कल्पना असू शकेल; पण माझी नाही. तुम्ही म्हणाल की 'भाऊ तुम्ही असे असे आहात, कशावरून तुम्ही असे म्हणतात?' मी मात्र असं म्हणेन, की चांगला माणूस म्हणून मला जगता आलं तर मी ते माझं भाग्य समजतो. मूल्यवर्धित जीवन हीच खरी संपत्ती!

**प्रश्न –** माणूस वृद्धावस्थेत, अध्यात्माकडे वळतो हा अपरिग्रह हे तुमचं मत आहे की हे त्यांचे रिफ्लेक्शन आहे का? ते आज तुम्हाला कळले?

**भाऊ –** आज नाही. २० वर्षांपूर्वी मी मुलाखत दिलेली आहे. माझ्या सर्व मुलाखती प्रसिद्ध आहेत. 'उमलले संवाद' या पुस्तकात संकलित केलेल्या आहेत. त्या वेळीही असे प्रश्न विचारले गेले. तू शोध त्यात, संशोधन कर, तुला नक्कीच कळेल हा विचार. एक घटना सांगतो. मी औद्योगिक वसाहतीत एक भूखंड ७००० रुपये देऊन खरेदी केला होता. ५०० रुपये ॲडव्हान्स दिले. सहा महिन्यांची मुदत होती. सहा महिने जवळपास पूर्ण होण्यात आले; पण मी जर ६,५०० रुपये देऊ शकलो नसतो तर ५०० रुपये बुडणार होते.

मी त्या वेळी पैसे देणं राहिलेल्यांपैकी निम्म्या लोकांचे प्लॉटस् मीच खरेदी करून टाकले. मला तो भूखंड निम्म्यातच पडला. सहा महिन्यांच्या आत पैसे अशा पद्धतीने दुप्पट होऊ शकतात १९६५ मध्येच माझ्या हे लक्षात आलं. पण भूखंडच मी खरेदी करीत गेलो असतो, विकत गेलो असतो आणि पैसे पटीने वाढवत गेलो असतो तर कोट्यधीश हा शब्दच कमी पडला असता. जळगावातील निम्मी स्थावर मिळकत माझ्याजवळ आली असती. पण मी निर्णय घेतला की अशी संपत्ती विकत घेणार नाही. अशा प्रॉपर्टीचा व्यवसाय मी करणार नाही. त्या वेळेला तरी अध्यात्माचा काही संबंध नव्हता.

माझे केवळ २८ वय होते. मी त्या तशा विचारापर्यंत का पोहोचलो? त्या वेळी जळगावात खुबचंद सागरमल नावाची एक पेढी होती. बाबूशेट तिचे मालक. दुसरी सुगनचंद के राका, तिसरी राजमल लखीचंद आणि सागरमल नथमल लुंकड. मारवाडी समाजातील अशा चारच पेढ्या होत्या. ही सगळी मालदार लोकं होती. गडगंज पैसा होता त्यांच्याकडे! आमचे आदर्श असे असायला हवे होते! समाजाला आपण जवळून बघतो.

काही न करताना सहा महिन्यांत पैसे डबल झालेले होते. त्याचा जर मी गुणाकार केला असता तर खूप गडगंज संपत्ती मला मिळाली असती; परंतु त्याही वेळी माझ्या मनामध्ये काय विचार आला की ज्यामुळे मी या निर्णयाप्रत पोहोचलो की, हे करायचे नाही?

मी घरातला पहिलाच पदवीधर होतो. त्यामुळे घरात शैक्षणिक आदर्शाचा प्रश्नच नव्हता. एक घटना आठवते आहे.

एक प्लॉट घेतला, तो पडला आहे सात रुपयांत. आता त्याचे ५०० रुपये झाले आहेत. त्याच्यासाठी मी काहीही प्रयत्न केले नाहीत. माझे काही कसब लागलेले नाही. माझं त्यात कोणत्याही प्रकारचे योगदान नाही. अशा गोष्टीला मी Unearned Income म्हणतो. असा पैसा ज्या कुटुंबाच्या हातात आला त्या सगळ्या लोकांच्या पापांचा धनी कोण होणार? अशा पैशाच्या लोभातून काय होते, दुसऱ्याच पिढीत किंबहुना त्यांच्या स्वतःच्याच आयुष्यात रसातळाला जाण्याची वेळ येते.

Unearned Income - मिळवणाऱ्यांची मुलं मांसाहार करायला लागतात, दारू प्यायला लागतात, त्यांच्या सुना रस्त्यावर येतात, ते स्वत: आधी व्यसनाधीन होतात, चंगळवाद घरात घुसतो, बेफिकिरी वाढते आणि ती पिढी फार वाईट स्थितीत संपते. मी माझ्या डोळ्यांनी हे बघत होतो. असली संपत्ती मिळवून सुख घेण्यापेक्षा ती न मिळवलेली बरी. हे तत्त्व मी आयुष्यात पाळले, तशा मिळकतीचा मोह धरला नाही.

आज तर तसा विचार केला तर सर्वांत जास्त जमीन माझ्याकडेच आहे, ती माझ्या शेतीसाठी, माझ्या 'आर.ॲण्ड डी.'साठी मला सरकारने रीतसर परवानगी देऊन स्वतःच्या नावाने म्हणजे कंपनीच्या नावाने घेऊन त्यावर हे सगळे उभे केलेले आहे. मोहाडी आणि शिरसोलीच्या मधल्या रस्त्यावर लुटालूट झाली होती. एक एस. टी. आणि १६ बैलगाड्यांवर दरोडा पडला होता.

जैन हिल्स साकार झाले. कारखाने उभे राहिले. ३००० लोकांना रोजगार मिळाला. आमराई निर्माण झाली. कोणी 'स्वर्गभूमी' म्हणायला लागले, तर कोणी 'नंदनवन'! अनेक विशेषणं दिली गेली, दृष्ट लागावी अशी विशेषणं! हेच जर मी भूखंड घेण्यासाठी केले असते तर जमले असते का? नाही. पैसे कदाचित मिळालेही असते. पण तसा हेतूच नव्हता, पैसे मिळवावे हा या कामामागील हेतूच नव्हता. ही आध्यात्मिक दृष्टी आहे किंवा विचार आहे. हा विचार 'विचार'च आहे आणि तीच मोठी संपत्ती आहे, असे मी मानतो.

**प्रश्न –** नैसर्गिक न्याय तत्त्व जे आहे त्याला सामाजिक न्याय असंही म्हणू हवं तर की आपण जर असेच केले तर त्याचा तसाच परिणाम पुढच्या पिढीवर होतो.

**भाऊ –** होतो म्हणजे काय? होतोच! त्याचं कारणही नैसर्गिक आहे. पैशांच्या बाबतीत एक लक्षात घ्यायला पाहिजे. एक फार मजेशीर तत्त्वं सांगितलेलं आहे, की 'Money trickles in like drops of water and goes with the wind.' पैसा हा थेंबाथेंबाने येतो आणि वाऱ्यासारखा जातो. पैशांचे विशिष्ट स्वरूप आहे. असे जर तुम्हाला टाळायचे असेल तर तुम्हाला मेहनत केली पाहिजे.

*'unearned income'* घ्यायचे, दोन नंबरचा पैसा तयार करायचा, दुसऱ्याच्या नावांवर प्रॉपर्टी घ्यायची, दोन नंबरच्या पैशांवर इन्कम टॅक्स भरायचा नाही. हे सगळे केल्याशिवाय काही संपत्ती गोळा होत नाही. असा विचार आणि कृती करायची. त्यालाच पाप आणि गुन्हा म्हणतात.

**प्रश्न –** भाऊ, जैन हिल्सच्या प्रगतीविषयी काही सांगा. यासाठी काही पूर्वतयारी?

**भाऊ –** जैन हिल्स कोणत्या दिशेने, कोणत्या स्वरूपात विकसित होणार आहे, याची कोठलीही ब्लू प्रिंट कधीही नव्हती. कागदावर काही आरेखन आहे आणि त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने सगळे घडते आहे, असे काही नव्हते. प्रगती हळूहळू होत गेली. नवनवीन रचनात्मक बदल होत गेले.

'ऑफिस' हा एक विषय बघा. मी इथे बसायचो. म्हटलं, इथेच एक ऑफिस तयार करून घेऊ. झाले ऑफिस! या प्रमाणेच दुसरे करू या – असेही काही मनात नव्हते. तरीही एकेक बाब आकाराला येत गेली. एक मात्र निश्चित प्रत्येक कृतीमागे काही विचार आहे, दृष्टी आहे. कुठे लाल रंग, तर कुठे हिरवा, तिसरीकडे पिवळा रंग – असं काही आढळणार नाही. एकच रंग सर्वत्र दिसतो स्टँडर्ड – पांढरा शुभ्रधवल – साधनशुचितेचा प्रतीक असलेला रंग!

**प्रश्न –** आपलं जेव्हा शिक्षण आटोपलं तेव्हा काहीतरी व्यवसाय सुरू करवा वाटले का? आपल्या मनात नेमकं काय होतं की आपण असे करायला पाहिजे?

**भाऊ –** नाही! मला स्वत:लाच आठवत नाही म्हणून मी स्वत: काही लिहून ठेवलेले नाही. मी जे काम हाती घेतले ते पूर्ण एकाग्रतेने पार पाडले. त्यातून उत्तम निर्मिती झाली. अपेक्षेहून अधिक बलवत्तर! कुणाला त्यात व्हीजन दिसते, हा भाग

वेगळा; पण त्यात खरंच एक थीम दिसते आहेच. पैशाची काही काळजी त्यात दिसत नाही. दिसते एक उदात्तता! सृजनशील विचार करणाऱ्याच्या मनात येते काय व्हीजन असेल या माणसाकडं? मला स्वत:ला मात्र तसे आठवत नाही.

मी स्वप्न पाहतो; पण ती स्वप्नं पाहत असताना ती एवढ्या लवकर साकार होतात की स्वप्नांमुळे ते घडले असे म्हणायलाही पंचाईत निर्माण होते! आज मनात आले, की येथे आपल्याला गोशाळा बांधायची आहे, तर १० दिवसांत ती ही होऊन जाते. याला तुम्ही व्हीजन म्हणणार काय? व्हीजन फार दूरवरची बाब आहे; पण इथे तर १० दिवसांत अंमलबजावणी होऊन गेली. स्वप्न पाहिल्याशिवाय तर काहीच निर्मिती होत नाही, स्वप्न तर लागतेच. स्वप्न उराशी बाळगून ठेवायचे आणि १० वर्षांनी नंतर कार्यान्वित करायचे, असे स्वप्न बघत राहण्याच्या अवस्थेला जर तुम्ही व्हीजन म्हणत असाल, तर ते योग्य तरी आहे का? मी स्वप्नात रंगून जाण्यापेक्षा कामात गुंतवून घेणं जास्त योग्य मानलं.

जे काही करायचे होते, ते एवढ्या जलदगतीने झाले, एवढ्या एकाग्रतेने झाले, प्रत्यक्षातच उतरले, त्याला स्वप्नाचे असे स्वरूप मिळालेच नाही. मी तर नेहमीच म्हणतो की काम करणे म्हणजे जिथे माणसाचे शरीर, मन आणि आत्मा एकत्र येतात. त्यातून ज्या गोष्टींची निर्मिती होईल त्याला काम म्हणायचे, ते अद्वितीय होणारच! मग ते कोणतेही असू द्या. रस्ता झाडून काढायला सांगा. सर्वसाधारण माणसे जशी झाडून काढतील त्यापेक्षा एकाग्रतेने, जीव ओतून झाडणारा उत्तम प्रकारे झाडून दाखवेल.

**प्रश्न** – मी 'कामाची मालकी' ही पुस्तिका वाचली. मला ती खूप आवडली. त्यात झाडू मारणाऱ्या बाईचे समर्पक उदाहरण दिले आहे.

**भाऊ** – आहे ना!

**प्रश्न** – भाऊ, आपली जी इंडस्ट्री आहे ती कृषी निगडित, कृषिक्षेत्राशी संबंधित आहे. तुम्ही जेव्हा उद्योग करायचे ठरवले तेव्हा काही विचार नक्कीच केले असतील ना?

**भाऊ** – त्या संदर्भात मी आधी सांगितले आहेच. याबाबतीत 'लोकसत्ते'त एक बातमी आली होती, तुम्ही वाचली असेलच! 'प्रोफेशन वीथ फ्युचर' सारखी अनेक प्रेरणादायी वचने माझ्या आयुष्यात आली, त्यांनी क्रांती केली! महात्मा गांधींचे एक वाक्य आहे. There is more to life than speed. म्हणजेच आजच्या

जीवनात वेगाला प्रमाणाच्या बाहेर खूप महत्त्व आहे. आजकाल तंत्रज्ञानाची गती तुम्ही बघा, नंतर स्वत:कडे पाहा. कित्येक उदाहरणे अशी सांगता येतील, की मला अनेक व्यक्तींनी आणि प्रसंगांनी भारावून टाकले. त्यामुळे खरोखरच खूप परिवर्तन घडलं माझ्या आयुष्यात.

गांधींच्या कार्यात भव्यता आणि विचारांची प्रगल्भता होती, त्यांनी जिथे जिथे काम केले तिथे तिथे ते सुंदरच केले. त्यांनी जे काही करायचे असेल ते मन लावून केले.

There is more to life than speed हे वाक्य जेव्हा मी वाचले, १९७४ मध्ये, तेव्हाच मी ठरवले, मला ॲग्रीकल्चरमध्ये चांगले असे काही करणे आवश्यक आहे. हा व्यापार, व्यापार, व्यापार, स्पीड, स्पीड, स्पीड! ऑर्डिनरी कॉल लागत नाही म्हणून अर्जंट लावायचा. अर्जंट लागत नाही म्हणून डिमांड लावायचा, डिमांड लागत नाही म्हणून लाइटनिंग लावायचा. असे मी करीत होतो. त्या वेळी ऑर्डिनरी, त्यानंतर अर्जंट, त्यानंतर डिमांड, त्यानंतर लाइटनिंग असे कॉल लागत होते. थांबायचे तरी कुठे?

कुठेतरी थांबायलाही शिकले पाहिजे! काही गोष्टी मात्र अगदी वेगळ्याच आहेत, नेचर आणि ॲग्रीकल्चर! ॲग्रीकल्चर ही बाब अशी आहे की जगण्यातला वेग कमी करते किंवा माणसाला स्वतःची जागा दाखवते. तीनशे पासष्ट दिवस मेहनत करून जे उभे केले, वीस वर्षे मेहनत करून जे उभे केले, ते एका झटक्यात संपवून टाकू शकते, मिटवून टाकू शकते आणि त्यावेळी माणसाला स्वतःच्या मर्यादेची तीव्रतेने जाणीव होते. माणसाने काय करायला हवं, कसं करायला हवं याची खोलवर जाणीव त्यामुळे होते. पैशाने माणूस कितीही मोठा झाला तरी निसर्गाच्या समोर चालत नाही, म्हणून माणसाला जर जीवनाचा खरा आनंद मिळवायचा असेल, निर्मितीचा आनंद हवा असेल आणि खऱ्या अर्थाने स्वत:चं लहानपण किंवा मोठेपण जाणून घ्यायचं असेल तर शेतीशी त्याचं नातं हवचं!

निसर्गाच्या सहवासात राहिल्यावरच माणसाला या शब्दांची प्रचीती घेता येईल. प्रत्येक ठिकाणी कोठेतरी अशी भूमिका दिसते किंवा असे एक तत्त्वज्ञान दिसते ते ओव्हर एज म्हणून नाही. एक अनुभव सांगतो. 'कामाची मालकी आणि रूपरेषा' भाषणांमधून डी.टी.पी.तील माझ्या एका सहकाऱ्याने १०० सुविचार शोधून काढले.

ते सुविचार मी सुविचार म्हणून बोललो नव्हतो, तर वाचन आणि भाषेची आवड दोन गोष्टी जर आपल्यात रुजलेल्या असतील तर हे आपोआपच फुलून येते.


**प्रश्न –** आपल्या आयुष्यात मुख्य बदल कोणता आणि कधी जाणवला का?

**भाऊ –** पाच वर्षे कंपनीला फार वाईट गेली. कंपनीला खूप तोटा सहन करावा लागला. ती एक वेगळी ओळख, म्हणजे जगण्यात पैसा या गोष्टीला महत्त्व असते आणि त्याला योग्य ते महत्त्व जर आपण दिले नाही तर व्यावहारिकदृष्ट्या तुम्ही यशस्वी झालात असे म्हणणे कठीण आहे आणि चुकीचे आहे. ही जाणीव मला प्रकर्षाने या पाच वर्षांत झाली. मी या गोष्टीचा कधी विचारच केला नाही. पैसा आणि यश यांचा काहीतरी संबंध आहे हा विचारच माझ्या डोक्याला कधी शिवला नाही. मी आपले कामच करीत राहिलो, निर्मितीच करीत राहिलो आणि त्यामुळे मला त्यातूनच खूप आनंद मिळत राहिला. त्या वेळी मात्र खऱ्या अर्थाने पैशांची किंमत मला कळाली. हा आयुष्यातला बराच मोठा बदल आहे हे माझ्या लक्षात आले. त्यामुळे मी काही बदललो नाही; पण माझा जो विचार होता त्यात ही भर मात्र पडली. व्यवसाय करायचाच असेल तर त्याकडे लक्ष दिले पाहिजे. व्यवसाय करायचा आणि नुकसान करायचे हे चालणार नाही. त्यापेक्षा न केलेला बरा! समाजसेवा करा किंवा दुसरे काही करायचे असेल तर ते करा; पण व्यवसाय करायचा असेल तर व्यवस्थितरित्या सर्व हाताळावे लागते.

**प्रश्न –** आजची यंग जनरेशन आहे त्यांच्यासाठी काही?

**भाऊ –** कठोर परिश्रम, सतत प्रयत्न, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सर्वांत महत्त्वाचं कितीही अपयश आले तरी सकारात्मक मानसिकता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. माझ्या अनुभवानुसार सांगतो कठोर परिश्रमाशिवाय निश्चितच यश नाही. मी गेल्यानंतर माझ्या स्मरणशिळेवर काय लिहायचे हे मी अशोकला सांगून ठेवले आहे. ते वाक्य असे आहे Here lives the man, for whom, the work was life. येथे अशी व्यक्ती विश्रांती घेते आहे, सतत काम करीत राहण्याचाच ध्यास ज्या व्यक्तीने धरला होता. कामाशिवाय जीवनाचा दुसरा अर्थच मला गवसला नाही.

धन्यवाद!



# ‘खानदेशरत्न’ची देशव्यापी प्रभा

दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील मुलाखत
– वैशाली देशमुख, सतीश देशमुख–२१.०९.२००२

*‘खानदेशरत्न’ म्हणून श्री. भवरलालजींचे विचार जाणून घेणारी ही मुलाखत खानदेशच्या चौकटीबाहेर केव्हा पडते तेही कळत नाही. शेती, शेतकरी, नवतंत्र आणि शेती उत्पादनांची गुणवत्तापूर्ण निर्यात अशा विषयांमध्ये मन मोकळं करताना संपूर्ण देशाचाच विचार करण्याचा संस्कार जडलेल्या भवरलालजींना यात प्रादेशिक अथवा उत्पादन केंद्रित असा विचार करताच येत नाही, हे खरंय!*

*नैसर्गिक शेती, शेतीचं भवितव्य, मृद्संधारण, पाण्याचा वापर व त्यामधलं शहाणपण यावरून ते थेट शेतमालाच्या निर्यातीमधला व्यवहार मांडतात आणि त्याबाबतचा अनुभवसिद्ध सल्लाही देतात, त्यांच लक्ष आता भविष्यावर केंद्रित झालेय. समाजाच्या ऋणातून मुक्त व्हायची त्यांची धडपडही दिसतेय. तेच आता त्यांचं ध्येय आहे.*

*सह्याद्री वाहिनीवरील या उपक्रमात प्रत्यक्ष मुलाखतीसारखे थेट प्रश्न विचारले*

*जात नाहीत. निवेदक/निवेदिका त्या-त्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याविषयी माहिती देत जातात. ज्यांच्याविषयी कार्यक्रम असतो, त्यांचे मनोगत प्रेक्षकांना दर्शविले जाते. प्रस्तुत मुलाखत त्या स्वरूपाची आहे.*

**सतीश देशमुख –** प्रत्येक भूभागाला आपल वेगळं एक अस्तित्व असतं. एक आगळं महत्त्व असतं. तसंच ते या खानदेशच्या भूमीलाही आहे. सर्वार्थानं समृद्ध असलेल्या खानदेशच्या या भूमीला विचारधनाचा वारसा आहे. कलासंस्कृतीनं ही भूमी अलंकृत आहे. कृषिप्रधानतेची परंपरा असलेल्या या भूमीत अनेक प्राचीन तीर्थक्षेत्रे आहेत. त्यापैकीच एक जळगाव जिल्ह्यातल्या भुसावळजवळचं वेल्हाळा. इथलं ८०० वर्षे प्राचीन असलेलं हेमाडपंथी कपिलेश्वर मंदिर. अजोड शिल्पकलेनं नटलेलं हे शिवमंदिर खूपच देखणं आहे. शंकराचं स्वयंभू स्थान असलेल हे मंदिर आहे. इथली पिंड ही श्री यंत्रावर वसलेली आहे.

खानदेशच्या भाविकांना जसं स्वयंभू शंकराचं वरदान मिळाल्याचं समाधान लाभतं, तसंच या भूमीतल्या शेतकऱ्यांना, त्यांच्या शेतीचा कायापालट घडवून त्यांना सुखसमाधान मिळवून देण्याचा



वसा घेतलेल्या एका स्वयंभू कर्तृत्ववान पुरुषाचं योगदानही लाभलेलं आहे. त्या गौरवशाली पुरुषाचं नाव आहे भवरलालजी जैन.

भवरलालजी जैन या माणसाला घडवणारी दुसरी एक व्यक्ती म्हणजे स्वत: भवरलालजी जैनच! म्हणूनच त्यांना स्वयंभू म्हणायचं. प्रतिभाशाली आणि विलक्षण कल्पनाशक्ती असलेल्या भवरलालजींनी जळगाव आणि एकूणच खानदेशचं नाव आपल्या अजोड कर्तृत्वानं जगाच्या नकाशावर आणलं. त्या, भवरलालजींना भेटायला, त्यांचं बोलणं ऐकायला, महत्त्वाचं म्हणजे त्यांची कर्तृत्वगाथा त्यांच्याच शब्दात ऐकायला कुणाला आवडणार नाही? आपण त्यांना प्रत्यक्षच भेटूया ''खानदेशरत्न'' या मालिकेत.

**वैशाली देशमुख –** खानदेश आणि मराठवाड्याच्या सीमेवर असलेलं छोटसं खेडं म्हणजे वाकोद. १२ डिसेंबर १९३७ ला भवरलालजींचा जन्म या खेड्यात एका साधारण परिस्थिती असलेल्या शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती जेमतेमच; पण शिक्षणाची ओढ आणि कष्ट उपसण्याची जिद्द अंगी असल्यानं भवरलालजींनी प्रतिकूल परिस्थितीतही आपलं उच्चशिक्षण पूर्ण केलं. आकर्षक अशा राज्यपातळीतील नोकरीकडे पाठ फिरवली. पाळंमुळं खेड्यात रुजलेली असल्यानं, मातीची ओढ त्यांना स्वस्थ बसू देईना.

भवरलालजींचा पिंड घडवला त्यांच्या मातोश्रींनी. त्या माउलीनंच मातीचं ऋण त्यांच्या मनात रुजवलं आणि ते ऋण फेडण्यासाठी प्रत्यक्षात इथली माती, शेती, शेतकरी आणि पाणी असं एक सूत्र आकाराला आलं. आज आपल्याला भवरलालजी जैन एक मनस्वी उद्योगपती म्हणून सुपरिचित आहेत. याबरोबरच इथल्या पर्यावरणाला अनुकूल असं कृषितंत्र, कृषिपद्धत भारतात विकसित करणारे आधुनिक सिंचन तंत्राचे प्रणेते म्हणूनही ते ओळखले जातात. जैन इरिगेशनच्या रूपानं त्यांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांच्या मुळाशी, त्यांच्या मनात खोलवर शेती आणि शेतकरी यांच्याविषयी कमालीची आस्था एकवटली आहे, अगदी आईच्या मायेसारखी!

**भाऊ –** ''आम्ही या खेड्यात जन्मलो दु:खांची गाथा
या खेड्याचे पांग फेडण्या उन्नत हा माथा।
दु:ख, दैन्य आणि दारिद्र्यातील शेतकरी माझा
जुन्या पुराण्या शेतीमधला रुतलेला हा फासा,
जुन्या पुराण्या शेतीमधला रुतलेला हा फासा।।''

या जुन्या पुराण्या शेतीमधला रुतलेला फासा कसा सोडवता येईल म्हणजे सर्वसाधारणपणे ७० टक्के लोकसंख्या ज्या शेतीशी निगडित आहे, त्या शेतीला आधुनिक स्वरूप कसं देता येईल, हा माझ्या आयुष्याच्या वाटचालीचा एक मूळ हेतू राहिला. तो मूळ हेतू पूर्ण करण्यासाठी म्हणून जे जे करणं आवश्यक होतं ते ते मी केलं. असं वाटलं कितीही केलं तरी या सर्व गोष्टींचे ऋण आपण फेडू शकणार नाही.

मनात खूप संभ्रम निर्माण झाला. आईला जाऊन विचारलं, 'आई काय करायला पाहिजे?' तेव्हा आईने उत्तर दिलं, 'बघ, तू एखादा कारखाना टाकशील तर असं होऊ शकतं की तू स्वतःचं पोट भरशील. तुझ्याबरोबर चारचौघांचं आणखी पोट भरशील. एखादा उद्योग-व्यवसाय करशील तर कदाचित तेवढा रोजगार उपलब्ध होणार नाही; परंतु तुला दोन पैसे जास्तीही मिळू शकतील. मला तू विचारलंस म्हणून सांगते, मी निरक्षर आहे. मी शाळेत गेलेली नाही.

मला फक्त तुला एवढंच सांगायचं आहे, की तू असं काही काम कर, जेणेकरून केवळ तुझं आणि तुझ्या अवतीभवती असणाऱ्यांचं पोट भरेल असं नव्हे, तर जे मूकेप्राणी आहेत, पक्षी आहेत ज्यांचा कोणी कर्ताधर्ता नाही, त्यांचंसुद्धा आपल्याला संरक्षण करता येईल, त्यांनासुद्धा आपल्याला सांभाळता येईल असा उद्योग-व्यवसाय कर.' माझ्या जीवनात तीच खरी प्रेरणा ठरली. आपण शेती आणि शेतकरी यांच्या जर जवळ गेलो तरच हे आपण साध्य करू शकू, नाहीतर आईचं स्वप्न पूर्ण करू शकणार नाही. त्यासाठी पुढील आयुष्य शेतीला समर्पित करायचं मी ठरवलं.

**वैशाली देशमुख –** भारतीय पारंपरिक कृषितंत्राच्या जोडीला आता आधुनिक कृषितंत्राचा वापरही शेतकरी सर्रासपणे करू लागला आहे. त्याच तंत्राचा एक भाग म्हणून बायोटेक्नॉलॉजीचा विचारही  भवरलालजींच्या मनात घोळत होता. त्यांनी याबाबतीत आपली एक दिशा ठरवून त्याची उपयोगिता प्रत्यक्ष दाखवूनच दिली.

**भाऊ –** आपल्याला अगदी सोपं उदाहरण द्यायचं असेल तर व्हर्मीकंपोस्ट. जे शेतकऱ्याला आता परिचित आहे किंवा ऑर्ग्यानिक मॅन्यूअर विथ कल्चर्स किंवा स्प्रे करून ग्रोथ हार्मोन्स तसेच दुसरे कल्चर्स स्प्रे करून आपण ऑर्ग्यानिक मॅन्यूअर तयार केले. निसर्गशेतीचा ऑर्ग्यानिक मॅन्यूअर आणि गो-संरक्षण हा कणाच आहे.

**वैशाली देशमुख –** आधुनिक शेतीतंत्र विकसित झालं असलं, तरी पारंपरिक कृषितंत्राचा एक भाग म्हणून निसर्गशेतीची आवश्यकताही कृषितज्ज्ञ नमूद करतात.

भवरलालजी मात्र निसर्गशेतीसंबंधी आणि एकूणच शेतीच्या भवितव्याबाबत आपले विचार परखडपणे मांडतात आणि कृतीतही आणताना दिसतात.

**भाऊ –** एकविसाव्या शतकात होणाऱ्या शेतीचं खरोखरच काही आव्हान असेल तर 'निसर्ग शेती' हेच आहे! केमिकल आधारित शेती आपण गेली ५० वर्षे सातत्याने करतो आहोत. त्यामुळे उत्पादनात वाढ झाली, जेवढे फायदे, शेत उत्पादनापासून घ्यायला पाहिजे, त्यापेक्षा नुकसानच जास्त होणार असेल तर आपल्या आरोग्यरक्षणासाठी हॉस्पिटलवर आपला जास्त खर्च होणार असेल तर ते करण्यापेक्षा निसर्गशेतीत जास्त लक्ष घातलं पाहिजे, आगामी काळात त्याशिवाय पर्यायच नाही. प्रगत देश तस करणारच आहेत. त्याचं कारण असं आहे, की त्यांच्याकडे एकूण केमिकल वापरण्याचं प्रमाण एवढं जास्त आहे, की त्यामुळे त्यांच्या जीवालाच धोका निर्माण झाला आहे आणि म्हणून २५ टक्के किंमत जास्त देऊनसुद्धा निसर्गशेती करायची आणि निसर्गशेतीतून निर्मित झालेली फळं आणि भाजीपाला घ्यायचा, स्वीकारायचा हे त्यांनी नुसतेच मान्य केलं आहे असे नव्हे; तर त्याची अंमलबजावणीच ते करीत आहेत.

आपल्या देशात त्याची जागरूकता अजून आलेली नाही. जागतिक बाजारपेठेत माल विकायचा असेल आणि उत्पादकता मुळातच कमी आहे, अशा परिस्थितीत जर निसर्गशेतीवर आधारित शेती आपण केली, तो माल जर आपण निर्यातीकडे ओढला, तर माझ्यामते जास्त स्कोप आहे. आपल्याला त्यात जास्त काम करता येईल. दोन पैसे त्यातून मिळवता येतील. आता हा जो एक प्रश्न अधूनमधून कोणत्या ना कोणत्या शहरी माणसाच्या मनात येऊन जातो, की या देशात शेतीला भवितव्य आहे काय?

सगळे उद्योगाबद्दल, व्यवसायाबद्दल, शहरीकरणाबद्दल बोलत आहेत. ग्रामीण जीवनाची घडी विस्कळीत घडी होत असताना, आपल्या शेतीला भवितव्य काय? असाही प्रश्न त्यांच्या मनात येतो. पण माझ्या मनात वीजेसारखा चमकून जाणारा प्रश्न आहे की या देशाला शेतीशिवाय भवितव्य आहे काय? शेतीला भवितव्य आहे काय हा प्रश्न नव्हे.

**वैशाली देशमुख –** आज 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या घोषणेला प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. लोकसंख्यावाढीचे सर्वत्र

दुष्परिणाम दिसत आहेत. आपण केलेला जंगलांचा विध्वंस अनेक प्रश्न घेऊन 'आ'वासून उभा आहे. त्यातूनच मृद्‌संधारण आणि जलसंधारणासंबंधीचे प्रश्नही होतेच, त्या दिशेने भवरलालजींची कृतिशील पावलं पडत गेली आणि या प्रश्नांची उत्तरे त्यांनी त्यांच्या पद्धतीने शोधली.

**भाऊ –** मृद्‌संधारण हा विषय माझ्या मनात प्रकर्षाने घोळला गेला. तो विचार असा आहे 'The nation that destroys its soil, destroys itself'. ज्या देशाची जमीन वाहून जाते तो देशच वाहून गेला, असं समजायला हरकत नाही. हा विचार मनात ज्या दिवशी बळावला, त्या दिवशी त्यासंदर्भात आपण काहीतरी करायला पाहिजे ही भावना माझ्या मनामध्ये जागृत झाली. तेव्हापासून मी या कामाला लागलो. जमीनच नसली तर पीक कसं येणार? पीक जर नाही आलं तर दारिद्र्य कसं निवारण होणार? हा प्रश्न होता. केवळ जमीन असून चालत नाही, जमिनीला पाण्याची जोड लागते.

पाण्याचं जर आपण नियोजन करायचं म्हटलं तर किती कालवे बांधणार? किती धरणं बांधणार? या धरणांचं तसेच कालव्यांचं जे जाळं आहे हे भौगोलिक परिस्थितीवर विशेषत: अवलंबून आहे. महाराष्ट्राचं जर बोलायचं झाल तर कोणत्याही परिस्थितीत आपल्याला हे जाळं फक्त १०-१२ टक्के शेतकऱ्यांसाठीच उभारावं लागेल. राहिलेल्या बहुसंख्य त्या शेतकरीवर्गाला दुसरा पर्याय काय? पाणी आणण्यासाठी त्यांनी काय करावं? पाइप हे पाण्याला इकडून तिकडे वाहून नेण्याचे काम करू शकतील; पण मुळात पाणी असलं पाहिजे. पाणी अडवल, जिरवलं गेलं पाहिजे. त्या पाण्याचा उपयोग शेतीमध्ये करता आला पाहिजे.

**वैशाली देशमुख –** कृषी उद्योगात फळप्रक्रियेचा उद्योग हा अनंत अडचणींचा असा आहे; पण आपल्या कल्पकतेने आणि अविरत कष्टाने समोर येणाऱ्या अडचणींवर मात करीत भवरलालजींनी फळप्रक्रिया उद्योग सुरू केला. त्यात त्यांची विचारांची पक्की बैठक आणि दूरदृष्टी सदैव कामात आली.

**भाऊ –** आपला सर्वसाधारण जो पक्का विचार आहे, तो असा, की आपल्याजवळ जे आहे ते ग्राहकाने, परदेशी लोकांनी जसेच्या तसे स्वीकारले पाहिजे; पण तसा हट्ट धरून चालत नाही. त्यांना उत्पादन ज्या स्वरूपात आणि ज्या पद्धतीने

हवं आहे तसं निर्माण करून दिले पाहिजे. त्यांच्या आवडीनिवडी, चव या सर्वांची दखल उत्पादकाने घेतली पाहिजे.

आपली उत्पादकताही त्यात कमी होणार नाही, हेही बघावे लागेल. त्यासाठी त्यांच्याकडून चांगल्या गुणवत्तेचे प्लान्टिंग मटेरिअल किंवा प्लान्टस् मागवता आले पाहिजे. असला माल आपण जर प्रमाणित करू शकलो तरच आपण निर्यातीत यशस्वी होऊ. मुळात प्रश्न असा आहे निर्यातीला वाव आहे का? मी असं म्हणतो की निर्यातीला फार मोठा वाव आहे.

सर्वसाधारणपणे जे कृषिप्रधान देश आहेत आणि जे प्रगत देश आहेत त्या देशात आतासुद्धा फळं आणि भाजीपाल्याच्या उत्पादनातील ४० टक्क्यांवर प्रक्रिया केली जाते आणि त्याची निर्यात होत असते. आपल्या देशात हे प्रमाण एक टक्क्यापेक्षाही कमी आहे. वस्तुत: फळ आणि भाजीपाल्यामध्ये सगळ्यात जास्त उत्पादन करणारे किंवा पहिल्या-दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर असलेलं असं आपलं राष्ट्र जरी असलं तरी आपली उत्पादकता दर एकरी मात्र फार कमी आहे. ती वाढायला हवी, आणि ती वाढल्या नंतर जे उत्पादन होईल, त्यावर जर आपण प्रक्रिया केली नाही तर इथे त्याला बाजारपेठ उपलब्ध नाही.

आपला मध्यम वर्ग जर सोडला तर खालच्या वर्गाला अजूनसुद्धा फळं किंवा भाजीपाला हा विषय फावत नाही. त्यांच्या खिशाला तो भावत नाही. अशा परिस्थितीत निर्यातीला दुसरा काहीच पर्याय नाही. निर्यातीतून आपण जर मूल्यवृद्धी करू शकलो नाही तर या उद्योग-व्यवसायाला भवितव्य नाही. या उद्योगाला भवितव्य नसेल तर शेतीलाही भवितव्य राहणार नाही.

**वैशाली देशमुख** - भवरलालजी जैन, कृषितंत्र विकसित करणाऱ्या नवीन वाटा कष्टानं, जिद्दीनं शोधणारा चिकित्सक उद्योगपती. स्वप्नांच्या असंख्य भराऱ्या घेऊन सामान्यातून असामान्याकडे वाटचाल करीत राहणारा एक अवलिया आहे. जगाच्या पाठीवर मिळवलेल्या यशाची, स्वकर्तृत्वाची चंद्रकोर भाळी मिरवणारा एक प्रसन्न श्रमसाधक. सततच्या पाठशिवणीच्या संकटांना न डगमगता शांतपणे अपयशाचं जहर प्राशन करणारा आणि नव्या युगाकडे, भविष्याकडे आपल्या तिसऱ्या नेत्राने पाहणारा एक योगी - भवरलालजी जैन! खरंच स्वयंभू आहे. त्यामुळेच राष्ट्रीय

आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले; पण त्यांना मिळणारा 'क्रॉफर्ड मेमोरिअल अॅवॉर्ड' हा एक वेगळा आहे.

**भाऊ –** जीवनातला सगळ्यात मोठा आनंद म्हणजे उभ्या आयुष्यात हे सगळं काम करण्याची संधी मिळणे. त्यानंतरचा आनंद ज्यांच्यासाठी काम करायचं त्यांचा हसरा चेहरा! माझ्या जीवनाचं उद्दिष्ट किंवा ध्येय मी ठरवलं होतं. माझ्या शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर आपण काही हास्य आणू शकलो, त्यांच्या रोजच्या जगण्यात जर काही आपण परिवर्तन घडवू शकलो तर तो सगळ्यात मोठा आनंद!

लौकिकदृष्ट्या जर बोलायचं झालं, तर आंतरदेशीय पातळीवर 'क्रॉफर्ड मेमोरियल अॅवॉर्ड' मिळालं ते सर्वसाधारणपणे जागतिक पातळीवर ठिबक सिंचनाच्या क्षेत्रात जी कामगिरी घडली, माझ्या हजारो सहकाऱ्यांनी ती घडवून आणली, त्याचं नेतृत्व करता आलं म्हणून ते अॅवॉर्ड मिळालं. हा मान जागतिक पातळीचा असल्यामुळे अनेक बांधवांना जास्त महत्त्वाचा असा वाटतो.

**वैशाली देशमुख –** भवरलालजी एक संवेदनशील माणूस! म्हणूनच समाजातील अनेक बऱ्या-वाईट गोष्टी या माणसाच्या मनाला भेदून जातात आणि त्यांच्यातील माणूस पुस्तकरूपाने आपली मनोव्यथा प्रकट करतो. एका जिज्ञासू, शिस्तप्रिय, तटस्थ भावनेनं समाजव्यवस्थेचं भाऊंनी केलेलं विश्लेषण वाचण्यासारखं आहे. दुष्ट प्रवृत्तींवर, समाजावर, राजकारण्यांवर, प्रसंगी स्वत:वरसुद्धा टीकेचे आसूड ओढण्यात या विचारवंताचे मन मागेपुढे पाहत नाही. अनेक प्रश्नांवर चर्चा आणि त्यांची उत्तरे यांचा ऊहापोह वाचकांना भावणारा असा आहे. कुठून आलेत हे विचार? शब्दात आपल्या भावना व्यक्त कराव्याशा का वाटल्या?

**भाऊ –** जगणं जगलो ते जिवंत मनाने जगलो. काही गोष्टी माझ्या मनाच्या विरुद्ध घडत आहेत, मला न पटणाऱ्या घडत आहेत याची नोंद माझ्या आंतरमनाने घेतली आणि त्यावर सतत विचार करून कुठेतरी माझ्या आत्म्याचा आविष्कार होईल अशा पद्धतीने सातत्याने माझ्या विचारवंत मित्रांशी बोलत राहिलो.

सभांमध्ये, समाजात या विविध विषयांवर चर्चा करीत राहिलो. मी माझं विद्यार्थीपण टिकवून सगळ्यांपासूनच खूप शिकलेलो आहे. 'एवढं मोठं वाङ्मय या विषयावर आणि इतर विषयांवर असताना मी आणखी त्यात एक शंभर पानांची

भर घालून नवीन असं काय करणार आहे?' असाही विचार मी मित्रांजवळ बोलून दाखवला. परंतु ज्या वेळी माझ्या मित्रमंडळींनी या आग्रहाला समर्पक उत्तर दिलं की हे असं नाही. तुम्ही यात अशा काही सूचना केलेल्या आहेत किंवा पुनर्बांधणीसाठी नवीन काही उपाय सांगितलेले आहेत जे आतापर्यंत समाजापुढे आलेले आम्हीतरी पाहिलेले नाहीत.

आम्ही पाहिलेले नसतील तर इतरांनी ते पाहिले असे गृहीत धरण्याचे काहीच कारण नाही, म्हणून तुम्ही हे विचार पुस्तकाच्या माध्यमातून तुमच्या पद्धतीने मांडायलाच हवेत. या आग्रहापोटी आणि माझ्या स्वतःच्या आत्म्यावर, मनावर, अंतर्मनावर जे आतापर्यंत संचित झालेलं होतं त्याचा आविष्कार म्हणून 'आजची समाजरचना' हे पुस्तक लिहिण्याचा मी प्रयत्न केला.

**वैशाली देशमुख –** खऱ्या उद्योगपतींना न शोभणारं अतिसंवेदनशील मन भाऊंच्या वाट्याला आलेलं आहे. तरीसुद्धा आनुवंशिकतेतील गुण, घेतलेले शिक्षण, जीवनातले असंख्य बरे-वाईट धडे आणि निवडक - चांगले मित्रजन यामुळेच अनेक संकटांमधून, प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर पडल्याची किमया करू शकणारे भवरलालजी जैन. जीवनाचा आनंद, इतिश्री कशात आहे? आणि पुन्हा असंच जीवन आवडेल का? याबद्दल आमचे भाऊ सहजपणे सांगून जातात ते हे –

**भाऊ –** कष्टाळू सुखी-समाधानी कुटुंब, दूरदृष्टी ठेवणारी आई, प्रामाणिकपणे जीवन जगलेले वडील यांचा वारसा मिळाला. त्यानंतर विविध क्षेत्रांतील मित्रपरिवार मिळाला. ज्याचं वर्णन 'मेरी भावना' या कवितेत कवीने फार चांगल्याप्रकारे केलं आहे –

> ''गुणी जनों को देख हृदय में मेरे प्रेम उमड़ आवे।
> बने जहां तक उनकी सेवा, करके यह मन सुख पावे।।''

जगताना दोन गोष्टींची आवश्यकता असते. असे साथी पाहिजेत, मित्र पाहिजेत ज्यांच्याकडून तुम्हाला काही शिकता येईल. अशी एक संधी पाहिजे, ज्यांच्यासाठी काही केल्याने केवळ त्यांच भलं होईल असं नव्हे, तर तुमच्याही जगण्यात वैशिष्ट्यपूर्ण ठरेल असा आनंद तुम्हाला लुटता येईल! मला असे वाटते या दोन्ही गोष्टी माझ्या आयुष्यात झालेल्या असल्यामुळे जर मला पुढचाही जन्म

लाभला तर हीच कार्यसंस्कृती जोपासायला आवडेल, सामाजिक बांधिलकी मानून जेही चांगले कार्य करणे शक्य आहे ते मी फार मोठ्या आनंदाने करीन.

**वैशाली देशमुख –** शिक्षणाचा वारसा नाही, संपत्तीचा वारसा नाही असा हा विनम्र साधा योगी की ज्यानं केवळ श्रमदेवीची अहोरात्र आराधना केली. त्यामुळेच लक्ष्मी माळ घेऊन त्यांच्याजवळ उभी आहे आणि सरस्वतीचं वास्तव्य त्यांच्या ठायी आहे. नव्या पिढीला त्यांचे विचार मोलाचे ठरावेत असेच आहेत.

**भाऊ –** येणाऱ्या पिढीसाठी फक्त एवढंच सांगावसं वाटतं, की पायाकडे बघून चालू नका, उंच अशी लांब दृष्टी ठेवून चालत राहा. कठोर परिश्रमाला पर्याय नाही आणि कष्टाशिवाय जगण्याला अर्थसुद्धा नाही, हे माझ्या अनुभवाचे बोल आहेत. परिस्थिती अनुकूल असो किंवा प्रतिकूल; कठोर परिश्रम हे सतत सुरूच ठेवले पाहिजेत. जर येत्या पिढीनेही असेच परिश्रम घेतले तर मला असे वाटते आपल्याला अभिप्रेत असलेला भारत आपण घडवू शकू.

**वैशाली देशमुख –** आपले नाते जमिनीशी आहे हे पक्के ओळखून जमिनीवर पाय घट्ट रोवून उभा असलेला हा भूमिपुत्र भवरलालजी जैन खानदेशातील शेतकऱ्यांचे, स्वजनांचे भाऊ. सतत ध्येयाची आणि श्रमाची सांगड घालत वाटचाल करणारे. आज वयाची पासष्टी ओलांडल्यावरही नव्या दिवसाची, सूर्योदयाची, नव्या कामाचे अधिष्ठान पुढे ठेवून वाट पाहणारे हे कर्मयोगी सगळ्यांनाच नवी दृष्टी देतात.

**भाऊ –** आज वाटते आहे, की अजून पुष्कळ असे काही करण्याचे बाकी आहे, शिल्लक आहे. आता शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रात काहीतरी नवीन स्वप्नं, खूप मोठी स्वप्नं बघायचं काम, फक्त स्वप्न बघायचं काम सुरू आहे. म्हणजेच नियोजनाचं काम चालू आहे. पुढे त्यांना कार्यान्वित करायचं आहे.

संस्कृती आणि संस्कारयुक्त शिक्षण याबाबत काही करता आलं, आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची होऊ शकेल अशी संस्था निर्माण करता आली किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर तिला आपण पोहोचवू शकू तर असे काही करण्यासाठी जीवनातली किमान पुढची पाच वर्षे आपण द्यावीत, असा निश्चय करण्याच्या मन:स्थितीत मी सध्या आहे.

धन्यवाद!



# स्वार्थात मुरले पाणी!

ई-टीव्हीसाठी मुलाखत
- संतोष सोनवणे -०३.०७.२००६

*कोणत्याही पातळीवर पाण्याचा विषय निघाला, की एकमेकांकडे अंगुलीनिर्देश करण्याची जणू स्पर्धाच लागते. गावकरी ग्रामपंचायतीकडे, ग्राम पंचायती जिल्हा परिषदेकडे, जिल्हा परिषदा राज्य व केंद्र शासनाकडे आणि शासन न पडलेल्या वा जास्त पडलेल्या पावसाकडे बोट दाखवून मोकळे होते. त्यामुळं परिस्थितीत कोणताच फरक पडत नाही. फरक पडतो तो जेव्हा भवरलालजींसारखी माणसं जिद्दीनं हा प्रश्न प्रत्यक्षात सोडवूनच दाखवतात, तेव्हा वैराण माळरानं, टेकड्या, हिरव्यागार होतात.*

*बांधलेल्या बंधाऱ्यातून पाणी कसं काय साठतं? त्यांचं मृदूसंधारण, जलसंधारण सरळ सरळ दिसतं कसं? त्यांनी खणलेले चर बुजत का नाहीत? असे असंख्य प्रश्न उद्भवतात. उत्तरं मात्र साधी सरळ सोपी असतात. पाणी त्यांना मिळवायचंच असतं. तेच अंतिम ध्येय असतं. त्याचा हा डोळस आलेख...*

**श्री. सोनवणे –** आज पाणी ही जागतिक समस्या 'आ'वासून उभी राहिलेली आहे. महाराष्ट्र बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पाण्याच्या थेंबा-थेंबाला आपण कसे जपून वापरू शकतो? अशा प्रकारचा गंभीरपणे विचार करायला शेतकऱ्यांनी शिकायला पाहिजे.

महाराष्ट्राची जलसंधारणासाठी पाणलोट ही संकल्पना राळेगणसिद्धी, कच्चीघाटी, हिवरेबाजार या गावांवर पोहोचली. याच धर्तीवर पाणलोटाचे आदर्श उदाहरण जळगावच्या जैन हिल्स या ठिकाणी उभे आहे. जळगावच्या केळी उत्पादनाला सतत पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते. असे असतानाही उपलब्ध पाण्याचा उपयोग होण्यासाठी श्री. भवरलाल जैन यांनी ठिबकचे गमक शेतकऱ्यांपर्यंत पोहचवले तसेच त्यांनी पाणलोटाचे विविध उपक्रम राबविले. पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा एक-एक थेंब अडवून तो भूगर्भात जिरवला जाऊ शकतो हे दाखवून दिले. या भागातील सध्याचे चित्र पाहता १५ ते २० वर्षांपूर्वीपासून सुमारे सहा किलोमीटरवरून 'गिरणा'चे पाणी येथे आणावे लागले यावर विश्वास बसत नाही. या नापीक अरण्याचे हिरव्या सृष्टीत रूपांतर करण्यासाठी पाण्याची कोणती कामे केली ते ऐकूया.



**भाऊ –** शेतीसाठी मुबलक पाणी आपल्याला दुसरा पर्यायच नाही, पडणारा पाऊस आपल्या कामांसाठी कसा वळवता येईल, याचा आपण सर्वप्रथम विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणत्याही तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याआधी जलसंधारण योजना, 'पाणी अडवा पाणी जिरवा' या तत्त्वांचा सर्वप्रथम अवलंब केला पाहिजे. ज्या वेळी १९८८ ते १९८९ मध्ये मी इथे या जैन हिल्सवर आलो, त्या वेळी इथं एक लिटरसुद्धा पाणी नव्हते. इतकेच नव्हे तर प्यायलासुद्धा पाणी नव्हते. चालण्यासाठी रस्तेही नव्हते. सर्व भाग हा उंच–सखल असल्यामुळे टेकडीवर सहजरीत्या जाता येत नव्हते.

आज आपल्याला जैन हिल्सवर सर्व ठिकाणी हिरवेगार दिसते, केवळ जलसंधारणामुळे! मी तेवढ्यावरच थांबलो नाही, तर पाण्याचा साठा केला, निर्जल तलाव निर्माण केले आणि त्यामध्ये बंडिंग केले. इथे साठलेले पाणी पुन्हा कसे रिकव्हर करता येईल याचा विचार केला. विहिरीही खोदल्या. ज्या विहिरी खोदण्यात आल्या, त्यापैकी १० टक्के विहिरींनाही मुबलक पाणी लागले नाही. आपल्याजवळ असलेल्या ५०० एकर जमिनीसाठी निसर्गापासून मिळणाऱ्या पाण्यातून जवळपास ३० लाख लिटर जलसाठा निर्माण करू शकलो.

गेल्या दोन वर्षांपासून आपल्या भागात पाहिजे तसा पाऊस होत नसूनसुद्धा आम्हाला तशी पाण्याची तीव्र टंचाई जाणवलेली नाही. याचे कारण असे आहे, की आम्ही जे जलसंधारणाचे काम केले आहे त्याचा काटकसरीने उपयोग केला. कोणत्या जमिनीतून आपल्याला पाणी मिळू शकेल याचे संशोधन केले. या सर्व गोष्टींचा अभ्यास करून त्या विहिरींवर परत ठिबक सिंचन बसवून पुन्हा सिंचनाच्या पुनर्भरणाचा उपयोग आणखी नवनवीन पद्धतीने आपल्याला काही करता येईल का, यावर विचार केला. शेताला पाणी द्यायचे नाही, आपण उसाला पाणी द्यायचे नाही. आपल्याला फक्त झाडांच्या मुळाला पाणी द्यायचे आहे यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो, म्हणूनच तुम्हाला या ठिकाणी हिरवेगार रान दिसते आहे. आपण जलसंधारणामुळेच शेतीचा विकास करू शकलो.

**श्री. सोनवणे –** जलसंधारणाची कामे शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतावर कशी राबवावीत याबाबत मोठ्याभाऊंनी काही सांगावं.

**भाऊ –** प्रत्येक शेतात छोटे–छोटे बांध बांधले गेले पाहिजे, जसे आपण

पूर्वी सॉइल बंडिंग उतारावर करीत होतो, तसे करायला हवे. जिथे पाणी जिरवणे आवश्यक आहे. पाच-दहा शेतकरी जर एकत्र आले तर तिथल्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करून आपण त्यांच्यासाठी एक विहीर खोदू शकतो. त्या विहिरीमध्ये साचवलेल्या पाण्याचे संकलन करून त्यावरच ठिबक सिंचनाचा वापर करू शकलो, तर तिथे असलेले जलसिंचनाचे प्रमाण आपण निदानपक्षी १० ते १५ टक्क्यांनी वाढवू शकतो.

जलसंधारणाची कामे ही लोकसहभागावर निश्चितपणे अवलंबून आहेत. शासनाने पाण्याच्या साठ्यासाठी ज्या मध्यम प्रकल्पांच्या योजना राबविल्या, त्यासाठी शासन त्यांचे पैसे खर्च करून त्या तयार करते. खरे म्हणजे तो पैसादेखील जनतेचा आहे; परंतु जनतेच्या पैशांचा उपयोग धरण बांधण्यासाठी किंवा मोठमोठे साठे निर्माण करण्यासाठी ते करतात. जास्तीत जास्त १५ ते २० टक्क्यांपर्यंत लोकांनाच त्याचा फायदा मिळू शकतो. त्यामुळे या सर्व १५-२० टक्के जनतेकडे लक्ष न देता, जर शासनाने कोरडवाहू शेतीसाठी ते जे जे काही करू शकतात याकडे लक्ष वळवले, तर धरणाचे नियोजन करण्याच्या अगोदर वरच्या भागात आपण शक्य असतील तेवढी जलसंधारणाची कामे केली पाहिजेत.

धरणांच्या कामाकडे त्यानंतरच लक्ष दिले पाहिजे असे माझे मत आहे. जलसंधारणाच्या देखभालीचा जो प्रश्न आहे त्यासाठी जनजागृतीची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात ठिकठिकाणी हा विषय शेतकऱ्यांना समजावून सांगायचा. त्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर टाकायला हवी. या सर्व गोष्टी करण्याची गरज आहे असं लोकांनाही आता पटू लागलं आहे, प्रबोधन मात्र गरजेचे आहे. आणि महत्त्वाचं म्हणजे आपल्या जलसिंचनपद्धतीच्या नियोजनात मूलभूत बदल करण्याची मात्र आवश्यकता आहे.

धन्यवाद!




# रुतला पाय मातीत!

'दूरदर्शन' - मुंबईसाठी मुलाखत

- बुद्धभूषण गायकवाड - २४.०९.२००६

*स्वत:च्या कर्तृत्वाची सुरवात शेतीतच करून मोठे झालेले भवरलालजी वैचारिक बैठकीत कसे पक्के व मजबूत आहेत याचे प्रत्यंतर इथे येते. व्यवसायात आलेल्या नवनवीन संधी ओळखणे, त्या पकडण्यासाठी मेहनत घेणे म्हणजे नक्की काय हेच त्यांच्या या मुलाखतीतून कळते. व्यवसायात धोका पत्करावाच लागतो; पण जर त्याचीही मोजदाद करता आली तर यशाचं गणित लवकर सुटू शकतं.*

*व्यवसायातला चाणाक्षपणा प्रत्यक्ष कृतीत कसा उतरावा लागतो तेच इथं स्पष्टपणे दिसतं. तथापि, असा व्यावसायिक मुत्सद्दीपणा बऱ्याच यशस्वी उद्योजकांमध्येही दिसतो. भवरलालजींचं वेगळेपण हे त्यांच्या सामाजिक बांधिलकीत दिसतं. व्यवसायाचं आधुनिकीकरण करीत असतानाच शेतीचं, शेतकऱ्यांचं, देशाचं हित पाहण्यातच स्वत:चं हित आहे ही समज फारच दुर्मीळ. ती भवरलालजींमध्ये पुरेपूर दिसते. ते वेगळेपण आपण नीट पाहावं, पारखावं. त्यांचं मोठेपण त्यातच आहे आणि व्यावसायिकांमध्ये असे व्यक्तिमत्त्व तर अपवादात्मकच आहे.*

**बुद्धभूषण गायकवाड –** आपले आजचे पाहुणे आहेत जैन इरिगेशन सिस्टिम्स् लिमिटेडचे संस्थापक अध्यक्ष आणि एक प्रगतिशील शेतकरी, उद्योजक म्हणून संपूर्ण भारताला सुपरिचित असलेले श्री. भवरलाल जैन.

**श्री. गायकवाड –** तुम्ही वाकोदसारख्या एका छोट्या गावातून आलात, सात हजार रुपयांपासून आपण व्यवसायाला सुरवात केली आणि आज कोट्यवधी रुपयांची धुरा आपण सांभाळत आहात, पाच खंडांमध्ये आपला व्यवसाय पसरला आहे, हे सर्व कसे काय साध्य झाले?

**भाऊ –** कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा, स्पष्टवक्तेपणा आणि भाषेवरील प्रेम या बाबींमुळे हे सहज शक्य आहे असे मला नेहमीच वाटते. त्यासाठी फार मोठी अशी अभियंत्याची पदवीच आवश्यक आहे, तांत्रिक पार्श्वभूमी असलीच पाहिजे, विज्ञानाची पदवी अपेक्षितच आहे असे नाही. शिक्षण आणि संस्कार या दोन गोष्टी मात्र त्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. ज्या व्यवसायात मी स्वत:ला गुरफटून घेतलंय, तो मला आनुवांशिकतेने मिळाला आहे. माझे आई-वडीलसुद्धा शेती करीत होते. शेती



हा कणा. त्यांच्या संस्कारातूनच मी शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसायाकडे वळलो.

**श्री. गायकवाड –** शेती हा व्यवसाय तुमच्या कुटुंबाचा मूळ व्यवसाय असला तरी त्या पार्श्वभूमीतून आपण आज इतका मोठा व्याप वाढवला, एक व्यवसाय म्हणून आपण शेतीकडे पाहिलेले आहे आणि त्यातून प्रचंड प्रगती केलेली आहे, शेतीकडे मुळातच व्यवसाय म्हणून पहावे तुम्हाला का वाटले? आपण या व्यवसायाकडे कसे आलात?

**भाऊ –** शेतीची सुरवात अशी झाली, की प्रथम मी शेतीला लागणारी सर्व मूलभूत साधने उदा. खते, बी-बियाणे, ट्रॅक्टर आदी विक्रीचे काम केले. कारण, सुरवातीला कारखानदारी सुरू करणे मला पैशाअभावी शक्य नव्हते. आयुष्याची पंधरा वर्षे खर्ची घातली आणि ती केवळ शेती व्यवसायाला धरूनच खर्ची घातली. त्यामुळे मार्केटिंगचा आणि विक्रीचा खूप चांगला अनुभव मला प्राप्त झाला. त्या अनुभवाच्या बळावर माझ्या व्यवसायाचा पुढील प्रवास सुरू झाला. व्यवसायातून पैसे मिळत होते. त्या पैशांचा उपयोग करून एक लहानशी कारखानदारी सुरू केली. त्या वेळी माझ्या नजरेसमोर असलेल्या एका सहकारी संस्थेचा आजारी कारखाना विक्रीस निघाला होता. त्या कारखान्यात केळीची पावडर तयार करण्याची यंत्रसामग्री होती. तो आम्ही विकत घेतला आणि तेथून पपेनच्या व्यवसायाला सुरवात केली.

**श्री. गायकवाड –** पपेन या व्यवसायाला जेव्हा सुरवात केली आणि त्या व्यवसायात तुम्ही प्रयोगशीलता आणलीत, ही प्रयोगशीलता नेमकी कशी आणली?

**भाऊ –** पपेनच्या व्यवसायाची मला तांत्रिक माहिती नव्हती; पण मला एवढे मात्र समजत होते, की आतापर्यंत आपल्या देशातून जो माल विकला जातो तो कच्चा माल म्हणूनच बाहेर पाठविला जातो. आपण पक्का माल तयार करीत नाही. पक्का माल तयार केला तरीही तो तपासण्यासाठी अमेरिकेतच पाठविला जातो, हे त्रांगडे आहे. जो अमेरिकन ग्राहक मिळत असेल तो आपल्याला स्वीकारावाच लागतो. त्यापेक्षा त्या मालावर जर आपल्या देशातच प्रक्रिया करून त्याला रिफाइन केले पाहिजे.

पपेनच्या मालाला जर आपण रिफाइन करू शकलो तर आपल्याला तेवढी

व्हॅल्यूसुद्धा आहे. त्यातून दोन पैसे आपल्याला मिळाले तर आपण शेतकऱ्यालाही जास्त पैसे देऊ शकतो. शेतकऱ्याला जर त्या उत्पादनात या मार्गाने जास्त पैसे मिळाले, तर तो जास्त मोठ्या प्रमाणात पपई लावेल. अशा पद्धतीने ते गणित बसविले गेले. त्यात शेतकऱ्यांचाही फायदा झाला, आमचाही झाला. महत्त्वाचं म्हणजे आपल्या देशाचाही फायदा झाला. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या काळी परकीय चलनाचा फार मोठ्या प्रमाणात तुटवडा होता.

कोट्यवधी रुपयांचे चलन या मालामुळे आपल्या देशाला मिळू शकले आणि याच व्यावहारिक दृष्टिकोनामुळे पपेनच्या उत्पादनात संशोधन करायची माझी धडपड होती. लॅन्ड ॲण्ड लॅबोरटरी हे दोन विषय माझ्या आयुष्याच्या वाटचालीत फार महत्त्वाचे ठरले. त्यामुळे मी पपेनला रिफाइन करून जगात पहिल्या क्रमांकाच्या गुणवत्तेचा माल आपल्या देशातून प्रथमत: निर्यात केला आणि त्यातलं अग्रेसर स्थान आम्ही वीस ते पंचवीस वर्षे जागतिक पातळीवर सतत जपलं आणि कायम टिकवू शकलो. त्याचे कारण हे आहे.

**श्री. गायकवाड –** जागतिक दर्जामध्ये आपण पपेनच्या उत्पादनात लीडरशिप जोपासली. आता जैन उद्योगसमूह म्हटले, की पीव्हीसी पाइप हे समीकरण संपूर्ण भारताच्या कानाकोपऱ्यात पोहचले आहे. त्याकडे आपण कसे काय वळला? ज्यामुळे एक औद्योगिक क्रांती शेती व्यवसायात झाली, ठिबक सिंचनामध्ये झाली, त्याबद्दल तुम्ही थोडे विस्ताराने सांगा.

**भाऊ –** मी आधी पाइप विक्रेता होतोच. माझ्या आधी पाइप बनवणाऱ्या दोन-तीन मोठ्या कंपन्याही होत्या; पण तो व्यवसाय काही नावारूपाला किंवा भरभराटीला आलेला नव्हता. शेतकऱ्यांच्या घरात जाऊन आपल्या कंपनीच्या मालाची विक्री करायला पाहिजे. आपण एखादा वितरक नेमून त्याला पुण्याला किंवा मद्रासला ठेवून संपूर्ण महाराष्ट्रभर आपला माल विक्री करायचा, त्याला आपण आदेश द्यायचे ही पद्धत जुनी झाली, म्हणून मी पहिल्यांदा त्यात बदल केला.

प्रत्येक गावात, प्रत्येक तालुकास्तरावर वितरक नेमले. जाहिरातच अशी केली होती, की वीस किलोमीटरच्या आत जर तुम्हाला जैन कंपनीचे पाइप मिळत नसतील, तरच तुम्ही खुशाल दुसऱ्या कंपनीचे पाइप घ्यावेत. हे तंत्र लोकांच्या मनाला भिडलं! कारण, ते सुंदर आणि वास्तव असे चित्र होते. या जाहिरातीमुळे जैन पाइप म्हणजे

पीव्हीसी पाइप असे समीकरण महाराष्ट्रात रुजले.

आजही मला आठवते जैन पाइपचा हा जो उत्कर्ष आहे, तो त्यामुळे झाला आणि ठिबक सिंचन हा विषय जैन पाइपच्या नंतर बऱ्याच वर्षांनी आला. जैन पाइप हा १९८० मध्ये आला आणि ठिबक सिंचन १९८७-८८ मध्ये आले. जैन पाइप हा ठिबक सिंचनाचाच एक भाग आहे. सर्वसाधारणपणे शेतात विहिरीपासून दांड्यापर्यंत पाणी न्यायला पाइप लागतात; पण दांड्यापासून रोपट्यापर्यंत नेण्यास किंवा रोपट्याच्या मुळापर्यंत पाणी पोहचवण्यासाठी मात्र ठिबक सिंचनच लागते.

**श्री. गायकवाड –** ती पद्धत आपणच विकसित केली का?

**भाऊ –** होय, एक आंतरराष्ट्रीय अमेरिकन प्रदर्शन झाले होते. त्या प्रदर्शनात मी सहभागी झालो होतो. मी त्यावर खूप अभ्यास केला. त्यानंतर एका अमेरिकन-ऑस्ट्रेलियन कंपनीशी कोलाब्रेशन केले. त्याद्वारे आपल्या देशात ती पद्धत आम्हीच सुरू केली आणि ती पायाभूत ठरली.

**श्री. गायकवाड –** तुमचा पीव्हीसी पाइपचा जो व्यापार आहे तो जगभर पसरलेला आहे. त्याबद्दल तुम्ही काय सांगू शकाल?

**भाऊ –** ठिबक सिंचन आणि पीव्हीसी पाइप ही दोन उत्पादने देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेली आहेत याबद्दल काही प्रश्नच नाही. आमच्या स्वत:ची ठरविलेली जी उद्दिष्टे आहेत त्यात आता असे काही व्यवसाय करायचे, की आपण संपूर्ण देशात पहिल्या किंवा दुसऱ्या क्रमांकावर राहिलो पाहिजे. जगात सर्वश्रेष्ठ पहिल्या पाच क्रमांकावर ज्या उद्योजकांची नावे अग्रेसर आहेत त्यात आमचे नाव असले पाहिजे, असा आम्ही निश्चय केला. ज्या वेळी उदारीकरण आणि जागतिकीकरण झाले, त्या वेळी आम्ही आमच्या मनाशी हा चंग बांधला, की आपल्याला उच्च प्रतीचा व्यवसाय करायचा, त्यासाठी अशाच व्यवसायांना आपण जागतिक पातळीवर नेले पाहिजे.

मी नवनवीन कंपन्या घ्यायला सुरवात केली. आताच अमेरिकेत दोन कंपन्या घेतल्या. आणखीही काही चांगल्या कंपन्यांशी भागीदारी केली. काही कंपन्या विकत घेण्याचा विचार सुरू आहे, असे केल्याशिवाय आम्हाला जागतिक पातळीवर जाता येणार नाही आणि महाराष्ट्रासारख्या सुपीक आणि चांगल्या प्रदेशात असल्यानंतरसुद्धा आम्ही अशी नीती ठेवली नाही तर आम्ही खूप मोठी चूक केल्यासारखे आहे असे

म्हटले जाईल.

**श्री. गायकवाड –** ग्रामीण भागात शेती व्यवसायातून एका प्रयोगशिलतेद्वारे तुम्ही उद्योजकीय वाटचालीस सुरवात केली. केवळ भारतभर नाही, तर जगभर हातपाय पसरले आहेत; पण तुमच्या सुरवातीच्या व्यावसायिक प्रवासात तुमचे आणि शेतकऱ्यांचे संबंध, तुमचा व्यवसायाकडे बघण्याचा जो एकूण दृष्टिकोन होता त्यात तुम्हाला कडू-गोड असे अनुभव आले असतील, तर त्याबद्दल काही सांगू शकाल का?

**भाऊ –** माझ्या व्यवसायात मला तसे गोडच अनुभव जास्त आले आहेत. आमच्या कंपनीने ज्या वेळी पहिला पीव्हीसी पाइप विक्रीस काढला, त्या वेळी शेतकऱ्यांनी एकच अट घातली, की 'आम्हाला पीव्हीसी पाइप वगैरे काही कळत नाही. पण भाऊ, तुम्ही जर आमच्या घरी जेवायला येणार असाल तर आम्ही पीव्हीसी पाइप खरेदी करतो.' असे अनेक शेतकरी मला म्हणत असत. मी चक्क त्या-त्या शेतकऱ्यांच्या घरी गेलो, त्यांच्या घरी जेवलो, नंतरच त्यांनी पीव्हीसी पाइप आपल्या शेतात लावले.

ड्रिप इरिगेशनची म्हणजे ठिबक सिंचनाची सुरवात झाली होती त्या वेळी मी सुरू केलेली ठिबक सिंचन ही संकल्पनाच कोणाला माहिती नव्हती, ती आम्ही प्रथमच प्रकाशात आणली. समाजातील जे इतर गट होते, त्यांनाही त्याबाबत कोणतीही माहिती नव्हती, फार कमी शेतकऱ्यांना त्याबद्दल ज्ञान होते आणि त्याचे आम्हाला प्रात्यक्षिक करावे लागत असे. अशा पद्धतीने पिकांना जेवढे आवश्यक आहे तेवढेच पाणी मिळते. मोजकेच पाणी शेतीला देऊन पाण्याची बचत कशी होते हे शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितले. ठिबक सिंचनाचा या पद्धतीने प्रचार आणि प्रसार केला. हे करीत असताना अर्थातच मला काही वाईट-चांगले असे सर्वच प्रकारचे अनुभव आले. कठोर परिश्रमातून जे फळ मिळते ते गोडच मिळत असते. माणसाला कडकडून भूक लागलेली असताना समोर जशी भाकरी येईल ती कशीही असली तरी गोडच वाटते. त्यामुळे आम्हालाही भूक होती आणि हे सर्व जे काही अनुभव आहेत ते सर्व गोडच आहेत. त्यात कुठे कटुता आहे असे मला वाटत नाही. प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम हे तत्त्व मी नेहमीच पाळतो.

**श्री. गायकवाड –** आपले जगणे महाराष्ट्रातीलच नव्हे; तर भारतातीलसुद्धा

एका प्रगतीशील शेतकऱ्याचे जीवन आहे. यादृष्टीने आपल्या आयुष्याकडे शेतकरी एक आदर्श जीवन जगणारी आदर्श व्यक्ती म्हणून पाहतात. आपल्या कार्यकर्तृत्वावर अनेक लोकांनी पुस्तकेही लिहिलेली आहेत. त्यात 'सुजलाम्-सुफलाम', 'वाकोदचा वटवृक्ष', 'वाघूरचे पाणी', 'पाषाणातून पाझर' अशी अनेक पुस्तके तसेच 'वात्सल्यपूर्ती' विशेषांकही आपल्या आयुष्याच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारा आहे. 'उमलले संवाद' या पुस्तकात आपल्या मुलाखती समाविष्ट आहेत. तुम्ही स्वत:देखील आजच्या समाजरचनेविषयी एक आणि 'कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटांची' असं दुसरं एक पुस्तक लिहिलेले आहे. प्रगतीशील, भ्रष्टाचारमुक्त, निकोप समाज या संकल्पनेबद्दल काय वाटते?

**भाऊ –** मला निश्चितच असे वाटते, की 'शेतकऱ्यांचा तणावविरहित दिवस' उगवायला अजून तरी अवकाश आहे. त्याचे कारण, की ज्या पद्धतीने माझा स्वत:चा विकास झालेला मी बघतो, तसा विकास शेतकऱ्यांचा झाला असे मला दिसत नाही. माझ्यापेक्षा एक दशांश, एक शतांशही शेतकऱ्यांचा विकास झाला तरी मला खूप आनंद होईल किंवा तसा विकास झाल्याचा आनंद झाला असता. पण माझीच तुलना तुम्ही करता तर मला असे म्हणावे लागेल, की एक शतांशसुद्धा शेतकऱ्यांचा विकास झालेला नाही. थोडक्यात मी शेती व्यवसायात पडलो, त्यानंतर शेती उद्योगात पडलो ते फार चांगलं झालं असं म्हणण्यास काहीच हरकत नाही.

मी केलेला व्यवसाय हा शेती विकसित करण्याचा व्यवसाय आहे. अर्थात, त्यासाठी मला खूप कठोर परिश्रम घ्यावे लागले हा भाग वेगळा आहे. कदाचित मी टी.व्ही. बनविण्याचा, साबण तयार करण्याचा किंवा लॉलीपॉप तयार करण्याचा व्यवसाय सुरू केला असता तर मला खूप गडगंज पैसा मिळाला असता. तसा पैसा शेतीत मिळवता आला नाही; परंतु माझ्या जगण्याचे जसे सार्थक झाले, तसे सर्व शेतकऱ्यांचे झाले नाही याची मला खूप खंत वाटते.

**श्री. गायकवाड –** शेतकऱ्यांचा असा सर्वांगीण विकास व्हावा यावर काही पर्याय आहे काय?

**भाऊ –** मला असे वाटते, की कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी आपण 'पाणी अडवा-पाणी जिरवा' या पद्धतीने प्रत्येक खेड्यातून जे नदी-नाले वाहतात त्यांना गावाजवळच अडविले पाहिजे. त्या गावाच्या परिसरातील शेतीची आणि त्या गावाची

गरज भागल्यानंतर, त्या पाण्याला पुढे जाऊ दिले पाहिजे आणि त्यापुढच्या गावातही असेच केले पाहिजे. अशा पद्धतीने केटी वेअर पद्धतीने जसे आपण ठिकठिकाणी बांध टाकतो तसे नियोजन केले पाहिजे. कारण, पाण्याशिवाय शेती होणे अशक्य. पर्यायाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येवर रामबाण इलाज सापडेल. ग्रामीण भागातील शेतीला आणि तेथील ग्रामस्थांना आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध करून देणे हे सर्वात महत्त्वाचे काम आहे.

महाराष्ट्रात नियमित असा फक्त पाऊस कोकणात पडतो; पण कोकणात फेब्रुवारी, मार्च, एप्रिलमध्ये आपण जर गेलो तर प्यायलासुद्धा पाणी मिळत नाही. इतकी कठीण परिस्थिती आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे. कोकणात पडणाऱ्या पावसाचे पाणी महाराष्ट्रात इतर ठिकाणी कसे जाऊ शकेल? त्या पाण्याचा उपयोग कसा होऊ शकेल? यासाठी किती खर्च लागेल, त्यासाठी काय काय करता येईल किंवा नियोजन कसे करावे लागेल? इत्यादींचा विचार करून पाण्याचे नियोजन झाल्याशिवाय शेतकऱ्यांच्या भरघोस पिकाचा किंवा उत्पादनाचा प्रश्न सुटणार नाही. त्याचबरोबर बी–बियाणांमध्येही सुधारणा करणे आवश्यक आहे.

शेतात केवळ रासायनिक खतांचा वापर करून शेतीचा पोत बिघडवण्यापेक्षा जर सेंद्रिय खतांचा वापर शेतीसाठी केला, तर मला असे वाटते की कोरडवाहू शेतकऱ्यांनासुद्धा त्यामुळे दिलासा दिल्यासारखे होईल. दुसरी गोष्ट माझ्या मनात कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी अशी येते, की जसे आपण शेतकऱ्याला सांगतो, की तुम्ही ज्वारी, गहू आणि बाजरी लावा. कारण, ती आपल्या आहारातील दैनंदिन गरज आहे; पण शेतकऱ्यालाही समजायला लागले, की तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ज्वारी उगवल्यानंतर त्यातून डिझेलसुद्धा निर्माण करता येते, त्यातून इथेनॉल निर्माण करता येते. या पद्धतीने जर त्याचा विकास जर झाला नाही तर मात्र परिस्थिती सुधारणार नाही.

धन्यवाद!



# सन्मानाचा खरा अन्वय व अर्थ

कंपनीच्या सन्मानार्थ ‘आकाशवाणी’ मुलाखत

– सतीश पप्पू – १४.०५.२००७

*भांडवलशाही विचारसरणीमध्ये श्रीमंत हे अतिश्रीमंत आणि गरीब हे अतिगरीब झाले तरी तो दोष मानलाच जात नसतो. मुळातच सामाजिक बांधिलकी हा विषय त्या विचारसरणीत बसतच नाही. तथापि, भारतासारख्या गरीब देशात समाजवादाचा खरा अर्थ धन वा श्रीमंतीचं समान वाटप नसून गरिबीचंच वाटप असा होतो.*

*कसंही असलं तरी महात्मा गांधींजींच्या विचारसरणीचा प्रभाव भारतातल्या सर्वसामान्यावर जसा आहे तसाच तो इथल्या भांडवलदारांवरही असणं नैसर्गिकच आहे. अमेरिकेतल्या एखाद्या संस्थेनं उदो उदो केल्यानं हुरळून जाण्याइतके भाऊ भाबडे नव्हते. उलट स्वतःचे विचार मांडण्याची संधी ते या पार्श्वभूमीवर कशी घेतात ते पाहण्यासारखंच आहे.*

न्यूयॉर्कच्या ‘स्टॅन्डर्ड अ‍ॅण्ड पुअर’ने जागतिक सर्वेक्षणात जुन्या जाणत्या प्रस्थापित कंपन्यांना आव्हान देऊ पाहणाऱ्या पहिल्या ३०० जागतिक

कंपन्यांमध्ये भारतीय ८ कंपन्यांचा समावेश केला आहे. त्यात जैन इरिगेशन कंपनीला स्थान प्राप्त झाले आहे! जागतिक पातळीवर प्रस्थापित कंपन्यांना आव्हान देऊ शकणाऱ्या कंपन्यांमध्ये उल्लेख ही बाब खानदेशलाच नव्हे; तर भारतासाठी भूषणावह ठरलेली आहे. या गोष्टींचे औचित्य साधून जळगाव आकाशवाणी केंद्रावर सतीश पप्पू यांनी दि. १४/०५/२००७ रोजी घेतलेली आठवड्याची विशेष मुलाखत या सदरात भाऊंची मुलाखत प्रसारित करण्यात आली.

**सतीश पप्पू** – न्यूयॉर्कची एस अॅण्ड पी या कंपनी २००१ पासून जगभरातल्या कंपन्यांचं सर्वेक्षण करते. नुकताच जागतिक पातळीवर प्रस्थापित कंपन्यांना आव्हान देऊ शकणाऱ्या जगातील सर्वोत्तम ३०० मध्यम आकाराच्या कंपन्यांमध्ये भारतातील आठ कंपन्यांचा समावेश झालेला आहे. त्या आठ कंपन्यांमध्ये जळगावच्या जैन इरिगेशनचा समावेश त्यांनी केला आहे. ही घटना आपल्या सगळ्यांच्या दृष्टीने भूषणावह आहे. १२१० कोटींची उलाढाल करणारी जैन इरिगेशन कंपनी अनेक मानांकित पुरस्कार प्राप्त करणारी नामांकित अशी कंपनी आहे!



श्रोत्यांच्या वतीनं आपलं सर्वप्रथम अभिनंदन! या कामगिरीचं एकंदरीत उद्योगक्षेत्रात काय महत्त्व आहे? असं जर आपणास विचारलं तर काय सांगाल?

**भाऊ –** एक गोष्ट आहे, की ते (एस ॲण्ड पी) दरवर्षी ३०० कंपन्यांना निवडतात. यावर्षी जैन इरिगेशनचं नाव या यादीत आलं. म्हणजे पुढच्याही वर्षी येईल असं सांगता येत नाही. जे त्यांनी काही मापदंड ठरविलेले आहेत ते एवढे मोठे आहेत, की सर्वसाधारणपणे सबंध जगातल्या एवढ्या लाखो, हजारो कंपन्यांचा अभ्यास करून गेल्या सहा वर्षांचा त्यांचा आलेख बघून, चढउतारांचा अभ्यास करून केवळ पैसा मिळविणाऱ्या कंपन्यांना यात समाविष्ट करतात असे नाही. हे खरं आहे, की उलाढाल हा निकष आहे; परंतु त्याच बरोबर कंपनीच्या व्यक्तिमत्त्वाचा निकष लावला आहे.

आपल्या देशाच्या दृष्टीने तो फार महत्त्वाचा आहे, तो म्हणजे नोकरीत सहकारी किती वाढले! आपल्या देशात आवश्यकता आहे ती वाढत्या रोजगाराची. समाजात जी दरी वाढते आहे, श्रीमंत आणि गरिबांमध्ये, ती कशी मिटेल? ती जर मिटवायची असेल तर रोजगार वाढला पाहिजे. हा जो मूलभूत विचार गांधीजींनी मांडला तो आज मागे पडल्यासारखा झाला आहे. त्या विचाराला या गोष्टींमुळे चालना मिळते. एखाद्या ग्रामीण भागात राहून रोजगारावर आधारित आणि रोजगारावर लक्ष केंद्रित करून असली कामं केली तर त्याचं महत्त्व केवळ आपल्याच देशाच्या दृष्टीनं नव्हे; तर जगाच्या दृष्टीनेसुद्धा आहे.

आज जगाची शांतता ही त्याच्या देशांतर्गत शांततेवर अवलंबून नसून संपूर्ण जागतिक शांतता प्रस्थापित केल्याशिवाय जमणार नाही. हे जर करायचं असेल तर प्रत्येक सामाजिक बांधिलकी बाळगणाऱ्या संस्थेने त्यांच्या उलाढालीच्या बरोबर तळागाळातल्या किती लोकांना आपण रोजगार देत आहोत याचा विचार केला पाहिजे. अशी सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कंपन्यांच्या यादीत बघितलं तर त्यात एकाही सॉफ्टवेअर बनविणाऱ्या कंपनीचा समोवश नाही. त्याचं कारण असं आहे, की पन्नास हजार लोकांना ते काम देतात. कोट्यवधी रुपये ते कमवितात. त्या लोकांनादेखील ते प्रचंड श्रीमंत करतात; परंतु समाजाचा जो खालचा वर्ग आहे, त्याच्याशी त्यांचा कधीच संबंध जुळत नाही. ही तार जुळत नसल्यामुळे समाजातील दरी वाढते आहे.

मला असं म्हणायचं आहे, की या गोष्टीचा असाही एक अर्थ आहे जो आतापर्यंत बऱ्याच लोकांच्या लक्षात आलेला नाही. सामाजिक बांधिलकीचा जो मोठा निकष त्यांनी लावलेला आहे. त्यावरच कदाचित जैन इरिगेशनची निवड झाली असेल. केवळ मोठी उलाढाल करणारा, खूप पैसा कमविणारा उद्योग अशा समूहास त्यांनी फारसं महत्त्व दिलेलं नाही. पाश्चात्त्य संस्कृतीचं हेच द्योतक आहे, की तुम्हाला पैसे, नफा कमावला पाहिजे. तुम्ही उद्योग वाढविलाच पाहिजे. कारण, तो वाढल्याशिवाय रोजगार तरी कसा वाढणार आहे? रोजगार देताना जैन इरिगेशननं उद्योग वाढविला आहेच; परंतु तो जगभर वाढवून या तीनशे कंपन्या जगातल्या प्रस्थापित कंपन्यांना भंडावून सोडतील, इतकी मोठी झेप त्यांची आहे, असं त्यांनी आम्हाला सांगितलं आहे.

आपल्या शासनाला किंवा आपल्या देशातील लोकांना किंवा अर्थतज्ज्ञांना यातले विशेष लक्षात आले नाही. विशेष म्हणजे आमच्या स्वत:च्याही लक्षात आले नाही; जागतिक पातळीवर ज्या वेळी एखादी संस्था त्यांचे रेटिंग करते ते महत्त्वाचे आहे. जोपर्यंत स्टँडर्ड अ‍ॅण्ड पुअरने भारताचं रेटिंग सुधरविलं नाही, तोपर्यंत भारतात येणारी परकीय गुंतवणूकही फार कमी होती. ज्यादिवशी आपल्या देशाला त्यांनी गुंतवणुकीचा वरचा दर्जा (इन्व्हेस्टमेंट ग्रेड) दिला, त्याद्वारे भारतात आता कंपन्या निर्धास्तपणे गुंतवणूक करू शकतात हे जाहीर झाले, त्यानंतर तो वेग जवळजवळ नऊ पटीनं वाढला. एवढं मोठं त्या संस्थेच्या रेटिंगचं महत्त्व आहे. जागतिक पातळीवर जे घडलं त्याच्याबद्दल मला असं वाटतं की सामाजिक बांधिलकी, समाजाच्या देण्या-घेण्याबद्दल जी जबाबदारी आपण स्वीकारतो, त्याचा हा एकत्रित परिणाम आहे. यात माझ्या सहकाऱ्यांचेही फार मोठे कठोर परिश्रम आहेत.

**श्री. पप्पू –** तोच प्रश्न विचारत होतो भाऊ, की कठीण परिस्थितीत सगळ्या सहकाऱ्यांना तुम्ही एकत्र ठेवलं, कुटुंब म्हणून तुम्ही सगळ्यांशी बोललात. एकाही व्यक्तीला कमी केलं नाही. व्यवस्थापन कौशल्यासोबतच ही एक कल्याणकारी भूमिकादेखील आहे. त्यासंदर्भात आज आपण येथे सांगावे असे वाटते.

**भाऊ –** त्याला तुम्ही कौशल्य म्हणूच नका. ती आत्मिक भावना आहे. सहकाऱ्यांशी आमची नाळ जोडली गेलेली आहेत. माझे सहकारी आमच्या परिवारापेक्षा वेगळे नाहीत. कंपनी आर्थिक संकटात असताना मी माझ्या सगळ्या

सहकाऱ्यांसमोर जो विषय ठेवला होता तो असा, की तुम्ही तीन हजार लोक आहात, त्यापैकी पंचवीस टक्के लोक आपण कमी केले. तरी आपलं उत्पादन कमी होणार नाही. पंचवीस टक्के माणसं कमी केली तर तुमचे सगळ्यांचे पगार २० टक्के वाढणं शक्य आहे. तुम्हाला आता असं ठरवायचं आहे, की आपण सगळ्यांनी मिळून सारखं दुःखी व्हायचं, सारखं सुखात राहायचं आहे, की २५ टक्के लोकांना कमी करून ७५ टक्के लोकांसारखं सुखात ठेवायचं आहे? पर्याय तुम्ही निवडायचा आहे. मी इतकं तुम्हाला सांगू शकतो, की जोपर्यंत तुमचा पगार वाढत नाही तोपर्यंत माझ्या घरचा जो खर्च आहे तोसुद्धा वाढू देणार नाही. परंतु माणसं कमी करायची की नाही, केव्हा करायची ते तुम्ही ठरवायचं आहे. त्यादिवशी माझ्या सर्व सहकाऱ्यांनी एकमुखानं निर्णय दिला होता, आम्ही सगळेजणं बिना पगारवाढीने देखील काम करू, पण आहे त्यांना कमी करू नये.

**श्री. पप्पू –** नंतर त्या सगळ्यांना भरघोस बक्षिसंदेखील आपणं दिली.

**भाऊ –** मी कोण बक्षीस देणारा? मी असं म्हणतो, की त्यांचा तो हक्क आहे. तो त्यांना देणं हे माझं कर्तव्य आहे. ज्याप्रमाणे घरात वडील स्वतःच्या पोटाला चिमटा देऊन मुलांसाठी, कुटुंबासाठी सगळं काम करीत असतात ही भारतीय संस्कृती आहे. वडिलकीच्या नात्यानं मी हे माझे कर्तव्य समजतो आणि माझ्या सहकाऱ्यांचा तो अधिकार आहे असं मी समजतो. मी देणारा कुणी नाही, देणारा वर आहे. आपण आपलं कर्तव्य करावं हीच माझी मुख्य धारणा आहे.

**श्री. पप्पू –** भाऊ, आपण वाकोदपासून सुरवात केली त्या वेळची आर्थिक स्थिती त्याबद्दल आज यानिमित्ताने काही सांगाल?

**भाऊ –** वाकोदला आमच्या कुटुंबातले आम्ही सगळे जण मिळून बारा जण होतो. आमचं संपूर्ण शेतीचं उत्पादन, त्या वेळी अकरा हजार रुपये होते. अकरा हजार रुपयांपैकी आठ हजार रुपये खर्च होऊन, तीन हजार रुपये आम्ही मागे टाकत होतो. वाचवत होतो – ते कधी कुणी आजारी पडलं, लग्नकार्य असलं, बाळंतपण आलं, आकस्मिक काही घडलं तर अशा वेळी ती वाचवलेली रक्कम उपयोगी पडत असे. माझ्या वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत अशी परिस्थिती होती. त्यानंतर माझे चुलते दलूभाऊ घरात पहिल्यांदा डिप्लोमा करून आले होते.

मुंबईला दलूभाऊंनी नोकरी धरली. माझ्या वडिलांनी दलूभाऊंचं जसं शिक्षण केलं होतं, तसं मला शिकवायचं काम दलूभाऊंनी केलं. त्यानंतर हा इतिहास घडला. आज १२१० कोटी रुपयांचा टर्नओव्हर, सर्वसाधारण ९९ कोटी रुपयांचा नफा अशा पद्धतीने वाटचाल सुरू आहे. केवळ जैन इरिगेशनच नव्हे; तर अमेरिकेत आपले लोक पैसे कमावू लागले आहेत. पाश्चिमात्यांनी कधीकाळी व्यापाराच्या माध्यमातून आपल्या भारतातून पैसे नेले. तेथून आपणसुद्धा पैसे आणू हे स्वप्न नव्हे, तर वस्तुस्थिती होईल. पुढच्या वर्षापासून हे होईल. आपल्या सगळ्यांना अशा शुभेच्छा देतो. हा सन्मान माझाच नाही तर आपल्या सगळ्यांचा सन्मान आहे!

**श्री. पप्पू –** आपण असं सांगितलं, की ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून आपल्याकडून पाश्चिमात्यांनी जसे पैसे आपल्यासोबत नेले, तसे काही दिवसांनी आपण तेथून पैसे खेचून आणू.

**भाऊ –** होय, पैसा तर आणूच आणू, पण केवळ पैसाच नाहीतर आपली माणसं तिथं स्थिर झाली आहेत त्यांनासुद्धा पुन्हा भारतात आणू.

**श्री. पप्पू –** माझा पुढचा प्रश्न असा आहे, की जगातल्या मोजक्या श्रीमंतांमध्ये भारतातील लक्ष्मी मित्तल यांच्यासारख्यांची नावे आहेत. या यादीमध्येसुद्धा आपल्या नावाचा समावेश होईल?

**भाऊ –** जगातील सर्वांत श्रीमंत लोकांच्या यादीत माझं नाव येण्यापेक्षा जगातल्या सर्वात सुखी लोकांच्या यादीत माझं नाव आलं पाहिजे! जर मी माझं गाव, माझी कर्मभूमी, माझी जन्मभूमी, माझं कुटुंब, माझा समाज आणि माझा देश यांच्याशी इमानदार राहून वागणार नसेल, तर कितीही वैभव असले तरी मला त्याचं अप्रूप वाटणार नाही, वाटण्याचं काहीच कारण नाही. मला जर समतोल राखून दोन्ही साधता आले तरच मला ते साधायचे आहेत; परंतु वन ॲट द एक्सपेंस ऑफ अदर असं मी करणार नाही.

नीतिमूल्यांची जोपासना करणाऱ्या कार्यसंस्कृतीशी मी कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही. जोपर्यंत आपल्या संस्कृतीला आणि तत्त्वांना धरून जे करता येणं शक्य आहे तेच मी करीन. त्या बंधनात राहून मला नाही वाटत माझं नाव अतिश्रीमंतांच्या त्या यादीत समाविष्ट होईल. यादीत नाव न आल्यामुळे मला दुःख होईल असेही नाही. याउलट मी माझी तत्त्वं जोपासू शकलो तर मला जास्त आनंद

होईल! माझं नाव चांगली वर्तणूक असणाऱ्या लोकांच्या यादीत मला हवे आहे! वेगळ्या मार्गाने श्रीमंत झालेल्या, शॉर्टकटमधून पैसा मिळवलेल्या लोकांच्या यादीत नाही आलं तरी चालेल.

**श्री. पप्पू –** थांबण्याआधी एकच प्रश्न विचारतो, करंट मुद्दा आहे त्यावर आपलं मत आपण व्यक्त करावं असं मला वाटतं. एसईझेडपेक्षा सहकार तत्त्वावर शेती करावी, गावं दत्तक घेऊन शेतकऱ्यांच्या मागे उभं राहावं, असं तुम्हाला आज वाटतं का?

**भाऊ –** एसईझेडचं असं आहे, की शासनानं जी काही योजना राबवायची ठरविली किंवा जे नियम केले त्यात आता बदल केले आहेत, म्हणजे पूर्वी जी योजना होती त्यात आमूलाग्र बदल केले, त्यांनी आता शेतकऱ्यांमध्ये मध्यस्थी करून किंवा त्यांच्या जमिनी वगैरे अधिग्रहित करणं बंद केलं आहे. त्यामुळे तुम्ही जर ताजा अभ्यास करणार असाल तर आपण या विषयावर स्वतंत्र बोलू. मी त्यावर खूप लिहिलंही आहे, प्रकाशितही करणार आहे. मला एक सांगा, एका गावात, एका घरात असणारी चार मुलं किंवा सख्खे चार भाऊ, दहा एकराच्या शेतीचे चार तुकडे करून अडीच एकर जमीन कसतात. चार सख्खे भाऊसुद्धा एकत्र शेती करीत नाहीत. आता आपण आपल्या गावाकडचं बोललो ते जमण्यासारखं आहे का? एक आदर्शवाद म्हणून आपण त्याकडे बघायचं आणि त्यातील वस्तुस्थितीला धरून जे आहे ते मात्र विसरायचं! आज तरी ही गोष्ट होणे शक्य दिसत नाही.

आपण या एसईझेड योजनेला कसं सुधारता येईल, त्याबद्दल विचार करून त्यातून मार्ग कसा काढला येईल, त्याला जास्त समाजाभिमुख कसं करता येईल याचा विचार केला पाहिजे. मला हे म्हणायचे आहे, की हे सगळे एसईझेड ग्रामीण विभागात व्हायला हवे, मुंबईच्या आसपास करून काय करणार आहोत? मूलभूत सुविधा उभ्या करायच्या आहेत त्या आधी पूर्ण व्हायला हव्यात. नंतर एअरपोर्ट करायचा आहे, अवश्य करा. बाकी एसईझेड ग्रामीण भागात करा. इथे रोजगार आहे, इथं माणसं आहेत. इथली माणसं तिथं शहरात फुटपाथवर नेणार. त्यानंतर व्यवसाय काढणार याला काही अर्थ आहे का? म्हणून त्यात तेवढा बदल करायला हवा असं मला म्हणायचं आहे.

**श्री. पप्पू –** आपले श्रोत्यांच्या वतीनं पुन्हा अभिनंदन! आपण वेळ दिला त्याबद्दल आभारी आहोत.

धन्यवाद!



# सामाजिक ऋणमोचनाची अनुभूती व साधनशुचिता

अद्वैत फीचर्स, पुणे
– मंगेश पाठक – १२.१०.२००७

*अत्यंत काबाडकष्ट करीत करीत गरिबीतून एखाद्यानं जर यशाचं शिखर गाठलं तर त्या व्यक्तीला मिळणारं वैभव, यश, संपन्नता पचवता येतेच असं नाही. या यशाकडं त्रयस्थ वृत्तीनं पाहायलाही मानसिक धैर्याची गरज असते. भाऊंनी नुसतंच त्रयस्थ वृत्तीनं त्याचं अवलोकन केलंय असं नव्हे; तर त्या यशाचं उत्तरदायित्व समाजाकडे सोपवून त्या सामाजिक ऋणातून मुक्त होण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमागं असणारी वैचारिक बैठकही विदित केलीय.*

*व्यावसायिक नीतिमत्तेचा ऊहापोह करून भविष्यकालीन पिढ्यांना मार्गदर्शनही केले आहे. वस्तुत: व्यापारीवर्गानं साधनशुचिता कधी गांभीर्यानं घेतल्याचा सहसा पुरावा मिळत नाही; परंतु भवरलालजी मात्र व्यापारातही उत्पादन क्षेत्रातही साधनशुचितेचा प्रामाणिकपणाचा*

*मार्ग आग्रहाने धरतात. एवढंच नव्हे; तर दीर्घकालीन चिरंतन व टिकाऊ अस्तित्वासाठी तेच कसं आवश्यक आहे तेही पटवून देतात. नव्या पिढीच्या व्यवस्थापनशास्त्रात न बसणारे हे विवेचन कदाचित एखाद्याला तशी प्रेरणा मात्र देऊ शकेल.*

**श्री. पाठक** – मला एकच विचारायचं, की तुम्ही अनुभूती स्कूल काढण्याच्या विचारापर्यंत का आणि कसे आलात?

**भाऊ** – खरं म्हणजे एखादी संस्कारी, सुंदर शाळा हे माझ्या आयुष्यातलं जवळपास पंधरा वर्षांपासूनचं स्वप्न होतं. माझी एक सवय अशी आहे, की जे काही करायचं असेल ते उत्तमच केलं पाहिजे, नाहीतर करायचंच नाही. उत्तम करायचं तर मग त्याला भरमसाट साधनंही लागतात, त्याशिवाय श्रेष्ठता मिळवता येत नाही. So, in such a time, I could gather that strength; it was not possible. Fortunately, now, we are able to do that. So this is the time that we did it. आता याचा पाया काय आहे, कशासाठी आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. माझा हा दृष्टिकोन आहे, की मी जे मिळवलं ते शिक्षणामुळेच!



मला काही विद्वत्तेचा, विद्येचा किंवा ऐश्वर्याचा वारसा मिळाला नाही माझे आई-वडील शेतकरी, व्यापारी कुटुंबातले होते. आईला तर लिहिता वाचताही येत नव्हते. वडील प्रामाणिकपणे त्यांचा व्यवसाय करीत होते. एका लहानशा खेडेगावात वाकोदला मी जन्माला आलो, तिथे दहा वर्षे काढली. चौथीपर्यंत तिथे शिकलो. नंतर मुंबईला गेलो आणि मुंबईहून परत आलो. परत त्या खेड्यावर जाऊन काही दिवस शेती केली. हा सगळा अनुभव मी जो गोळा करू शकलो याला आधार काय होता? जीवनाबद्दलचा जागृत दृष्टिकोन हाच आधार होता. तो कसा विकसित झाला?

Only on the basis of knowledge that I obtained and the kind of creativity that was developed over a period of time, which again has it's source in to the good training. --- जर तुम्ही डोळस राहिलात तर असे बरेच प्रसंग येतात, तुमच्या वाचनात वेगळीच दिशा देणारी अशी पुस्तकं येतात, तुम्हाला अशा काही व्यक्ती भेटतात की त्यामुळे तुमचं जीवन घडत जाते, आकाराला येते, संस्कारीत होते. या सगळ्याला आधार कोणता आहे तर तो आहे शिक्षण. दुसरं कारण जे मला प्रकर्षाने जाणवते ते पाहू. तुमच्या माझ्या आपणा सगळ्यांच्या समाजात विविध घटक आहेत. हे आज एका अर्थाने हितसंबंध झालेले आहेत. शासनाची तिन्ही अंगसुद्धा एकप्रकारे आपले हितसंबंधच आहेत.

आज सर्वसामान्यांचं बोलायचं झाल्यास, प्रत्येक वर्गाचे काही ना काही हितसंबंध निर्माण झाले आहेत. शेतकऱ्याला सबसिडीशिवाय काही करायचं नाही. जेवढं कमी भावात मिळेल तेवढं पाहिजे. व्यापाऱ्याला कमी मेहनतीत जास्त पैसा पाहिजे. उद्योजकांना चुकीचा किंवा खराब माल विकून पैसा कमवायचा आहे. शिक्षकांना शिकवण्या करून पैसा कमावयाचा आहे. वर्तमानपत्रवाले असले तर त्यांना कोणत्याही ध्येयवादाने भारावून जाऊन लेखणी चालवण्यापेक्षा जाहिरातबाजीनेच बहुतांश पछाडलेले दिसत आहेत. त्यामुळे जो जास्त जाहिराती देईल त्याची टीमकी वाजवलीच पाहिजे, असे ते एकूण धोरण आहे.

मला आजच्या समाजात एकही वर्ग असा आढळत नाही की जो खऱ्या अर्थाने ध्येयवादाने प्रेरित होऊन काही करू इच्छितो आहे. सगळीकडे अशी बेटं आहेत, अशी माणसं आहेत; पण वर्ग नाही. म्हणजे जो प्रबोधनाचा प्रकाश आगरकरांमध्ये आपण पाहिला, म. ज्योतीराव फुलेंमध्ये पाहिला, लोकमान्य टिळकांमध्ये पाहिला, त्यांनी

आपलं जीवन समाजकार्याला नि:स्वार्थपणे वाहून घेतलं होतं. समाजात जातिभेदावर किंवा इतर काही मुद्यांना धरून जे आपापसांत मतभेद आहेत. त्यामुळे दुरावा निर्माण होऊन संघर्ष वाढतो. मूळ हेतू देशहिताचा असेल, उद्दिष्ट समाजकल्याणाचे असेल तर शिक्के बसण्याचं कारणच काय? पण तसे होत नाही. विशिष्ट शिक्के विशिष्ट वर्गांवर बसतातच. आपण सर्वसमावेशक होणार तरी कसे? आता दूरदृष्टी ठेवून जर या देशाचं भवितव्य उज्ज्वल करायचं असेल, तर आपण काय करावं? कुणी दानधर्माचाही पर्याय सुचवेल. क्षेत्र तर भरपूर आहेत दान करण्यासाठी. 'वैद्यकीय धर्मार्थ करायचाय? तुमचं स्वत:चं नाव द्यायचं.' असंच सर्वत्र चालू असतं.

मूलभूत काम करता आलं, जिथे शिक्षणासोबत संस्कार देता आले तर ते व्हायलाच पाहिजे. ते जर केलं तर जगताना एक समाधान आपल्याला मिळेल की या देशाचा हा जो भावी समाज आहे, निदान त्याच्यासाठी काही चांगले घडते आहे.

आज स्थिती अशी आहे की जर प्रामाणिक अधिकारी असेल तर तो प्रवाहाबाहेर फेकला जातो. म्हणजे त्याला एका बाजूला टाकले जाते. चांगला शिक्षक असला तर जे कामं करीत नाही ते त्याचे पाय ओढतात. वेगवेगळ्या उठाठेव्या करणाऱ्या आणि शॉर्टकटने पैसा मिळवू पाहणाऱ्या उद्योगपतीला जास्तीतजास्त भेसळ करून माल विकायचा असतो आणि जास्तीतजास्त पैसा कमवायचा असतो. सरळ मार्ग अवलंबणाऱ्या व्यापाऱ्यांच्या, उद्योजकांच्या असे लोक अगदी मानगुटीवर बसलेले असतात.

समाज काही त्याला फार मोठी वेगळी किंमत द्यायला तयार आहे, असंही नाही. कारण, समाजात प्रत्येक वर्गात काही ना काही लोकं असे असतातच, की त्यांनाच हे हवंही असते. असा सगळा तो विषय झाला आहे, म्हणून या अशा भ्रष्टाचाराने बरबटलेल्या वातावरणात जर आपल्याला लहानपणापासून काही संस्कार देता आले आणि ते विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवता आले तर They will turn out to be better citizen than what we are. आणि नुकताच हा प्रश्न मला सी. एन.बी.सी. च्या मुलाखतीतही विचारला होता, की याच्या बदल्यात तुम्हाला काही मिळेल का? वीस कोटी रुपये तुम्ही खर्च केलेत.

आपण मातृऋण, पितृऋण मानणारी माणसे आहोत. आपण निश्चितच कृतज्ञतेने परतफेड करायलाच हवी. आपण समाजाचेही काही तरी देणं लागतो.

मी या समाजाकडून एवढं भरभरुन घेतलं आहे त्यातला काही भाग तरी परत करू की नको? तसं जर असेल तर शिक्षणापेक्षा दुसरा जास्त उदात्त हेतू मला काही आढळत नाही. वैद्यकीय सेवा सुरू केली असती म्हणजे, एखादा दवाखाना उघडला असता, तरी मर्यादित व्यक्तींच्या उपचारासाठी मदत करू शकलो असतो; पण शिक्षणक्षेत्रात जर मी एकाला घडवू शकलो तर अनेक पिढ्या घडू शकतील अशी परिस्थिती आहे. त्यामुळे शिक्षणाला प्राधान्य देऊन हे आपण केलंच पाहिजे आणि त्या हट्टाने पेटून जवळजवळ नऊ महिन्यांत मी ही 'अनुभूती' शाळा उभी केली. माझा तो मोठा अट्टाहास होता. तो माझ्या जीवनाचा भाग आहे. कोणतंही काम जर करायचं असेल तर ते उत्तमच करायचं आणि त्याची गुणवत्ता चांगली ठेवायची, नाही तर करायचंच नाही!

समाजाचे जे काही देणे लागतो त्यातून मुक्ती मिळवण्याचा तो एक पवित्र मार्ग आहे. कोणत्याही परतफेडीची त्यातून अपेक्षा नाही. ते सगळं म्हणजे हिशेबाच्या भाषेत सांगायचं तर ती गुंतवणूक समजा किंवा काहीही समजा; परंतु त्यातून अपेक्षा मात्र एवढीच, की चांगले नागरिक निर्माण व्हावेत. ते समजा १०० असले ३०० असले तर ३६० होतील. त्याच्यापैकी १० असो नाही तर १०० असतील तेवढे घडवायला आपल्याला मदत होईल. ध्येय-उद्दिष्ट स्पष्ट असायलाच हवे.

**श्री. पाठक** – आजच्या काळात सचोटीने व्यवसाय करता येतो काय? त्याबाबत आपल मत काय आहे?

**भाऊ** – निश्चितच करता येतो. एवढंच नाही तर कोणत्याही शंकेशिवाय करता येतो. फक्त इतरांपेक्षा दुप्पट मेहनत करायची तुमची तयारी पाहिजे. जर तुम्हाला एका तासात चुकीच्या मार्गाने शंभर रुपये मिळणार असतील तर तुम्ही दोन तासांमध्ये शंभर रुपये मिळविण्याची तयारी ठेवली पाहिजे आणि ते दोन तास अगदी प्रामाणिकपणे परिश्रम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. चांगल्या मार्गाने पैसे मिळवणं शक्य आहे.

**श्री. पाठक** – परंतु जेव्हा बऱ्याचशा वाटा बंद होतात तेव्हा आपल्याला मनात नसतानाही चुकीच्या वाटेने जाण्यासाठी प्रवृत्त केलं जाते, तेव्हा आपल्याला खरोखरच असा प्रश्न पडतो, की खरंच आपण का करायचं? एखाद्या वेळेला आम्हाला समजतं, की या माणसाबद्दल काही लिहायला नको तरी आम्हाला लिहावं लागतं. तेव्हा तुम्ही एवढ्या सगळ्या तपश्चर्येतून पुढे आला आहात. या सगळ्या प्रश्नांसाठी आपल्याला मार्ग दिसतो का?

**भाऊ –** निश्चितच मार्ग आहेत, मार्ग नसण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रामाणिकपणाचा मार्ग सोडू नका. त्यात तुमचे अनेक फायदे आहेत. आज नाही तरी उद्या तुम्हाला समाज मान्यता देईल. यात काही वादच नाही, फक्त त्याला थोडा वेळ लागू शकतो.

तुम्ही जिथे जिथे जाल, तिथे तिथे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा जर प्रस्थापित करू शकलात, तर निश्चितच यश मिळते. आज आमची सगळी कामे सगळ्या ठिकाणी जातात, अगदी भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या समोरही जातात; पण आमच्याकडून पैसे मागायची त्यांची हिंमत होत नाही. आमची काम होतात, कारण त्यांना माहिती आहे, की भवरलालजी हे समाजासाठी एवढं काही करतात आणि पारदर्शकपणे करतात. आपण जर पैसे मागितले आणि त्यांनी नाही दिले तर आपण त्यांच काय बिघडवू शकणार आहोत? असाही ते विचार करीत असतील.

तुमचे हात स्वच्छ असतील आणि तुमचं मनोबल एवढं उंच असेल तर तुम्ही कोणत्याही संकटांना, परिस्थितींना सामोरे जाऊ शकता. आपलेच हात बरबटलेले असतील तर आपण काहीही करू शकत नाही. तुम्ही प्रत्येक वेळा हाच विचार करता, की इथे तडजोड कशी करायची, तिथे तडजोड कशी करायची. हा तडजोडीचा स्वभाव एकदा का तयार झाला तर आयुष्यामध्ये तुम्ही फार मोठं काही कार्य करू शकाल असं नाही. समजा करू शकलात, जसं त्यात काय पुष्कळ लोक करतात आणि त्यांना खूप गडगंज पैसाही मिळतो; पण तुम्ही एक लक्षात घ्या, की त्यांना पैसा मिळाला तरी प्रतिष्ठा मिळत नाही आणि अशा पैशाला शाश्वतता नाही.

समजा प्रतिष्ठा मिळाली तरी त्यांना लोकांच्या मनात स्थान मिळत नाही. आज टाटांना जेवढं आपण चांगलं समजतो आणि ते चांगले आहेत तेवढं आपण इतरांना समजतो काय? नाही समजत. त्यांच्याशी आपण व्यवहार करतो. कारण, नाइलाज आहे; परंतु जर एक संधी मिळाली तर आपण त्यालाच चांगलं म्हणतो. कारण, त्यामागे त्यांची १५० वर्षांची तपश्चर्या आहे. तडजोड केलेली नाही असे आदर्श तुम्हाला प्रत्येक कालखंडामध्ये मिळालेले आहेत, मिळतातच. जैन इरिगेशनची कार्यसंस्कृती तशा प्रकारची आहे.

आपण कशासाठी सगळ्यांसारखं व्हावं? आपण का असा विचार करावा? शेवटी प्रश्न दोनच आहेत, की एकतर तुमचं जीवन ते झिजून झिजून तुम्ही संपवू शकता किंवा त्याला गंज लागून ते संपणार आहे. या जीवनाचा अगदी कणकण काढून आपण प्रामाणिकपणे झिजत राहिलो तर काय बिघडलं? तुमची जी काही ध्येयं आहेत त्याकडे तुम्ही पोहोचाल, खूप मेहनतीने तिथे पोहोचाल. कदाचित माझ्याप्रमाणे तुम्हाला पाच हृदय विकाराचे झटकेसुद्धा येतील. त्यातून वाचाल ना? कारण सगळ्यांच्या सदिच्छा तुमच्याबरोबर आहेत.

'लाख दवासे एक दुवा भली' असं जे म्हणतात ते खरं आहे. समाधान ही एक फार मोठी गोष्ट असते आणि त्या समाधानाच्या पोटी तुम्ही झळकून निघता. जर आपल्या लोखंडाला पोलादाचं स्वरूप द्यायचं असेल तर त्याला अग्निपरीक्षेत उतरलंच पाहिजे. नाहीतर तर तसे होऊच शकत नाही. पाण्यातून जर वीज निर्माण करायची असेल तर त्याला टनेल करावेच लागते, त्याशिवाय पाण्यातून वीज निर्माण होऊच शकत नाही.

माणसालाही जर घडायचं असेल तर या सर्व परिश्रमातून जायलाच पाहिजे. परिश्रम करण्याची इच्छा आणि प्रत्यक्ष कृतिशील तयारी जे ठेवत नाहीत, त्यांनी स्वतःच्या जीवनाबद्दल काही खोलवर विचार केलाय असं मला तरी वाटत नाही. प्रामाणिकपणानेही चांगलं जीवन जगता येते. त्या मार्गाने खूप आर्थिक भरभराटही होऊ शकते आणि तुमचा जो आध्यात्मिक पाया आहे तो तुम्ही कायम ठेवू शकता. तुमची पुढील पिढी जी आहे म्हणजे तुमची नातवंड वगैरे त्यांच्यासाठी आदर्श निर्माण होतो. माझा एक तीन वर्षांचा नातू आहे. तो रोज कुठे-ना-कुठे माझा फोटो पाहतो आणि मला माझा फोटो आणून दाखवतो. आज त्याच्यासमोर आदर्श काय आहे की माझा फोटोसुद्धा असा कुठेतरी आला पाहिजे. मला मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी मिळाली, तेव्हा माझ्या नातवाला अथांगला सोबत घेऊन गेलो होतो. कशासाठी? फक्त एका कारणासाठी की त्याला ते पाहून एक प्रेरणा मिळावी आणि प्रेरणा काय मिळावी, की 'अरे यांनी तर रूढ अर्थाने पीएच्.डी.चा अभ्यास केला नाही तरी यांना 'डॉक्टरेट' ही पदवी मिळाली'. अशा पदव्या एक नाही, दोन नाही तर तीन मिळाल्या! या गोष्टीचा त्याला जो आनंद आहे तो अवर्णनीयच आहे!

मला हेच म्हणायचे आहे, की जीवनातली ही एक फार मोठी भरभक्कम अशी बाजू आहे. जर अशा पद्धतीने स्वतःचे व्यक्तिमत्त्व संस्कारित करीत राहिलात, प्रामाणिकपणे काम करीत राहिलात तर लौकिक अर्थाने यश मिळवायला एकवेळ उशीर लागू शकेल; पण न्याय नाकारला जाणार नाही. फक्त उतावीळ झाला आणि इतरांप्रमाणे खूप चैन आणि मजा मारायची आहे आणि चंगळवादात फसायचं आहे तर मग त्याला नाइलाज आहे.

मी आयुष्यातली तीस वर्षे भाडयाच्या घरात राहिलो आणि प्रत्येक घरामध्ये असताना आमचा आर्थिक व्यवहार काय होता, आमचा नफा काय होता आणि आमची काय परिस्थिती होती. त्याचं एक कोष्टक तयार केले आहे सोळा रुपये, बारा रुपये घराचं भाडं त्यावेळी होतं. चाळीतून सुरवात केली आणि इथपर्यंत पोहोचलोच ना? मग आणखी दुसरं तुम्हाला काय पाहिजे? जेवढया प्रामाणिकपणे करू शकाल तेवढ्या प्रामाणिकपणे प्रयत्न करायलाच पाहिजेत.

प्रत्येक वेळा तुम्हाला नाकाकडे पाहूनच काम करायला पाहिजे असंही नाही. 'नरोवा कुंजरोवा' महाभारतात धर्मराजानेसुद्धा हे केलेच होते ना? मला माहीत नाही बाबा, की तो हत्ती होता की माणूस होता?' परंतु, मुळातच जीवनाचा दृष्टिकोन असा दूषित करून टाकायचा आणि प्रत्येक विषयाकडे त्याच दृष्टीने बघायचं हा जो खाक्या आहे हा अयोग्य आहे. प्रामाणिकपणाने जगू शकतो, प्रामाणिकपणे आपण भराभराटही करू शकतो. मला यात शंका वाटत नाही, आत्तापर्यंत मला असे काही अनुभवही आले नाहीत. उलटपक्षी प्रत्येक वळणावर मला कोणी ना कोणी माझ्यासारखा चांगल्या पद्धतीने, चांगल्या विचारांनी जीवन जगणारा माणूस किंवा त्याच्यापेक्षाही उत्तम माणूस असा भेटतच राहिला.

नकारात्मक मानसिकतेत घडला असाल तर तशीच माणसं भेटतील. जीवनाची पद्धत नकारात्मकच होईल. तेव्हा ज्याला आपण सत्संग म्हणतो तोही तुम्हाला केव्हा प्राप्त होईल? अशाच वेळी होईल. आज तुम्ही कोठेही गेलात तरी तुम्हाला मान-सन्मानाने लोक वागवतात. का वागवतात? तुम्ही इतरांसारखे नाही म्हणून, नाही तर कशाला वागवतील? त्यांना माहिती आहे की इथे त्यांना भ्रष्ट वागायला काही वाव नाही. भाऊंच काम करायचं असेल तर सरळच काम कराव लागेल. अशी प्रतिमा तयार व्हायला, असं व्यक्तिमत्त्व तयार व्हायला मात्र खूप वेळ लागतो, आणि कसोटीतून जावं लागतं हे खरं आहे.

भरपूर मेहनत करायला पाहिजे. अखंड परिश्रमाची जी काही फळं आहेत ती केवळ 'रसाळ आणि गोमटीच' नव्हे; तर ती चिरस्थायीही आहेत. ती आधार देण्यायोग्य आहेत. अनिष्ट मार्गाने पैसा मिळवला तर तुमच्या आयुष्यातच तुम्हाला असंही दिसेल की तुमच्याच पुढच्या पिढीने सारी संपत्ती धुळीला मिळवली, जर थोडीफार त्यातूनही काही टिकली तर ती तिसऱ्या पिढीतच संपून जाते. कारण, ज्या पद्धतीने तो पैसा कमवला त्याच पद्धतीने पुढील पिढी व्यसनाधीन होऊन संपते. एक तर स्वत: व्यसनाच्या आहारी जाता. समजा ते नाही झालं तर पुढची पिढी निश्चित जाते. कारण, त्यांना कामच करायची गरज उरत नाही.

80% of the total businesses run by the family, get destroyed during the life time of the person, who created the business, and the other 18% in the next generation. Only 2% family run businesses remain beyond the third generation. त्यांच्यासमोर आदर्शही हाच असतो आता काही काम करायचीही गरज नाही. So why should he work? By human nature, it is not necessary for him to work. म्हणून ते संपवतात. असं का होतं? जर प्रामाणिकपणाने त्यांनी काम केलं असलं तर असं होणार नाही आणि म्हणून दीड-दीडशे वर्षे, तीन-तीनशे वर्ष टिकली अशी घराणी आहेतच नां?

चंद्रगुप्त मौर्यांचं राज्य साडेचारशे वर्षे टिकलं. अजूनही फोर्डचं जे नाव आहे किंवा जे सर्वपरिचित आहे. १५० वर्षे झाली टाटांच्याही घराण्याला. का बरं? आणि बाकीचे जे तुम्हाला दिसत आहेत ते क्षणभंगूर आहेत, ते जास्त काळ चालूही शकत नाहीत. चिरस्थायित्व ठेवायचं असेल तर त्यासाठी आधार हवा आहे तो कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणा पाहिजे. त्याचं अधिष्ठान दुसरं काही असूच शकत नाही. चुकीच्या मार्गाने योग्य उद्देशापर्यंत कुणी पोहोचू शकेल हे अशक्य आहे आणि शॉर्टकटने तिथे पोहोचलात तरी फार काळ ते यश टिकू शकणार नाही, हे निश्चित आहे.

**श्री. पाठक** – आमच्या मनात जो तिसरा प्रश्न होता, की आम्हाला हे विचारायचं होत की आर्थिक अरिष्ट आलं तेव्हा तुम्ही ते मान्य का केलं?

**भाऊ** – मला हा प्रश्न जनतेच्या बैठकीत या आधीही एकदा विचारला गेलाय. विचारणाऱ्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले होते. उदाहणार्थ- एवढ्या

संकटातून जात आहात. तुमचे लाख रुपयांचे चेक परत जात आहेत. तुमच्यावर १३८ च्या १९४ केसेस आहेत. असं असताना तुमच्या चेहऱ्यावर चिंता कधीच कशी दिसत नाही? आपल्या वागण्याबोलण्यात निराशा डोकावताना दिसत नाही. तेव्हा मी म्हटलं की, त्यात काय विशेष? मी एक ठरवून घेतलं आहे की, जीवात जीव असेपर्यंत सगळयांचे पैसे द्यायचे. आज मात्र हे पैसे फेडणे आपल्याला शक्य नाही. We don't have the ability to do but we have the desire to do. We have the necessary character to do.

आज माझ्या प्रतिष्ठेचं नुकसान होत आहे, माझं चारित्र्य बिघडत नाही. मला लोकांचे पैसे द्यायचेच आहेत. वकिलांनी किती वेळा सांगितलं की, तुम्ही न्यायालयात असा पवित्रा घ्या, असे काहीतरी वाद उभे करा तरच तुमच्यावरचं संकट टळेल. नाही तर कंपनी गुंडाळली जाईल. कारण, न्यायालयात आदेश द्यावाच लागतो. तेव्हा मी म्हणालो, खोटं बोलायचं काही सांगू नका. त्यांचे पैसे मी घेतलेले आहेत ते पैसे त्याला परत द्यायचेच आहेत.

आज माझ्याजवळ पैसे द्यायला नाहीत. ज्या वेळी येतील त्या वेळी मी देणार आहेच, योग्य व्याजासहीत देणार आहे; पण मी माझी मन:स्थिती कधीही विचलित होऊ दिली नाही. मनात कधी त्रागाही आला नाही. त्याचं कारण असं आहे, की त्याचं अधिष्ठानच हे होतं, की आपल्याला आयुष्यात सगळी कामे सरळ मार्गानेच करायची आहेत. कोणाला फसवणे, त्रास देणे हे शक्यच नाही. आपल्याशी तरी तसे कोण आणि का वागेल? आपल्याला का फसवेल? सगळ्या समस्या मिटत गेल्या, अंधार हटला कारण आत्मविश्वासाचा, उच्चतम संस्कारांचा प्रकाश हृदयात होता.

धन्यवाद!



# पाटबंधाऱ्याच्या कामी नवी वीट!

७०व्या वाढदिवशी दैनिक 'पुण्यनगरी'साठी
मुलाखत - अनिल पाटील - ११.१२.२००८

*मोठी धरणं, छोटे-मोठे बंधारे यांच्या उभारणीत, वापरात, कालव्यांच्या, पाटांच्या वापरात ब्रिटिश सरकारनं जी शिस्त १०० वर्षांपूर्वी घालून दिली होती, त्यात कालपरत्वे सुधारणा, बदल करण्यास कोणीच राजी नव्हतं. त्यामुळे तिथं साठणाऱ्या, मुरणाऱ्या, वाहणाऱ्या, उडून जाणाऱ्या पाण्याचं ऑडिट ही संकल्पनाच अस्तित्वात नाही. अशा पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातल्या वाघूर नदीवरचा बंधारा शासकीय- खासगी अशा भागीदारीत उभारला गेला, ही बाबच मुळात क्रांतिकारी आहे. त्यामुळे त्या बंधाऱ्यातलं काही ठराविक पाणी मालकी हक्कानं खासगी भागीदाराला मिळेल.*

*व्यवहारातली कार्यक्षमता ११०टक्के जपणाऱ्या खासगी मालकांकडून होणारा पाण्याचा वापर डोळ्यात अंजन घालण्यासारखा व आदर्श होईल यात काय नवल? त्यामुळं जर पाणीवाटपाला, पाणीवापराला एक नवीनच दिशा राज्यभर, राष्ट्रभर मिळाली तर सोन्याहून पिवळं. या विषयावरचे भवरलालजींचे विचार व त्याचं जोडीला कृती फारच अनुकरणीय ठरावी.*

**अनिल पाटील –** मोहाडी बंधारा व्हावा ही आपली खूप जुनी इच्छा होती का?

**भाऊ –** जळगावला नेहमी आठ दिवसांतून एकवेळा, चार दिवसांतून एकदा पाणी असा विषय सतावत असतो. त्यासाठी जळगाव महानगरपालिकेने सुमारे तीस कोटींपेक्षाही जास्त खर्च करून वाघूरवरून पाइपलाइन टाकलेली आहे. ती लवकरच कार्यान्वित होईल अशी अपेक्षा आहे.

वाघूर ही काही बारमाही नदी नाही, त्यामुळे केवळ तिच्यावर अवलंबून राहणं हे जळगावच्या आर्थिक विकासाला आणि नागरी जीवनाला दोन्ही दृष्टींनी परवडणारं नाही. किंबहुना असं परावलंबी राहणं धोकादायक ठरू शकते. पर्यायी योजना म्हणून निदान आपल्याकडे जलसाठा असावा हा एक हेतू. दुसरा हा, की शेतीत आणि कारखानदारीसाठी मला स्वत:ला येत्या पाच वर्षांत जी काही पाण्याची गरज भासणार आहे, त्यासाठी हुकमी साठा उपलब्ध करून घेणं अपरिहार्य होतं.

पर्यायाने त्यापेक्षा महत्त्वाचं कारण म्हणजे शासनाने आपल्याला या बंधाऱ्यासाठी काही आवर्तनं एका कराराद्वारा निर्धारित करून दिली आहेत. त्यामुळे तेवढं पाणी शासनाला गिरणा



धरणामधून सोडणं आवश्यक आहे. उर्वरित पाण्याचा विनियोग आपण आपल्या पद्धतीने करू शकणार आहोत. म्हणजेच कंत्राटी शेतीमध्येसुद्धा मी हे पाणी ज्या रस्त्याने ती पाइपलाइन जाईल त्या रस्त्याला लागून असलेल्या शेतीला आवश्यकतेनुसार पाणी देऊन परस्परांना फायदेशीर ठरेल असा शेतमाल उत्पादित करू शकतो.

परिणामी अनेक कोरडवाहू शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, ते त्यांच्या जमिनी बागायती करू शकतील. हे जरी आपण वगळलं तरी केवळ उपलब्ध साठ्यामुळे जमिनीच्या दोन्ही बाजूंना असलेल्या विहिरींची पातळीसुद्धा वाढण्यास मदत होणारच आहे. तीही एक सार्वजनिक हिताचीच बाब आहे. असा बंधारा तसेच तेथे साठणाऱ्या पाण्याचा विनियोग, हे माझ्या माहितीनुसार महाराष्ट्रात नव्हे तर भारतात पहिल्यांदाच अशा प्रायोगिक स्वरूपात करण्यात आले आहे.

एका अर्थाने शासनाला रॉयल्टी भरून आपण साठ्यातला काही भाग खासगी स्वरूपात हस्तांतरित करू शकू. हा एक नवीन पायंडा होणार आहे. एकच पंचाईत आहे. पूर्वी एक दीड कोटी रुपयांचा खर्च होईल हा अंदाज सांगितला असतानाही आता मात्र ती गुंतवणूक तीन कोटींच्या घरात जाईल असं सांगण्यात येत आहे. मी शासकीय करार सोबत आणलेला नाही. सदरच्या योजनेसंबंधी मिळालेली ही ऐकिव माहिती आहे. जळगावच्या दृष्टीने असा नावीन्यपूर्ण प्रयोग सर्वप्रथम येथे सुरू व्हावा यापेक्षा जास्त आनंदाची बाब या वाढदिवसाच्या दिवशी मला तरी दुसरी नाही. अर्थात एकूणच सर्व कामाला अजून वर्ष दीड वर्ष लागू शकेल.


बंधाऱ्याला आपण हवं ते नाव देऊ शकू असं असल्याने माझी पत्नी स्वर्गीय कांताबाई हिचे नाव देण्याचा आग्रह काही मित्रमंडळी करीत आहेत, त्याबद्दलही अंतिम निर्णय होणे अजून बाकी आहे.

**श्री. पाटील –** या सर्व प्रक्रियेत तीन वर्षे गेलीत. म्हणजे हा संकल्प तुम्ही तीन वर्षांपूर्वी केला होता.

**भाऊ –** हो बरोबर आहे, नवीनच प्रकल्प असल्याने शासनालासुद्धा सदर कामाला सुमारे तीन वर्ष उशीर लागला ही वस्तुस्थिती आहे; परंतु शासनाने पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपला तत्त्वत: मंजुरी दिली असल्याने असले प्रयोग करणे आता शासनाला शक्य होत आहे, हीच मुहूर्तवेळ आहे, असेच म्हणा ना. सदर खात्याचे

मंत्री, सचिव आणि विशेषकरून जळगाव पाटबंधारे विभागाचे सर्वच अधिकारी धन्यवादाला पात्र आहेत.

धन्यवाद!



# केळीच्या गोडव्यातून ग्रामविकासाच्या घराकडे...

७०व्या वाढदिवसानिमित्त दैनिक 'देशदूत'चे प्रतिनिधी श्री. हेमंत अलोने यांनी घेतलेली मुलाखत- ०८.१२.२००७ .

*केळीचं पीक म्हणजे खानदेशाची अस्मिता आहे; पण 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळं संपूर्ण मानवजातीपुढे जर अस्तित्वाचा भयंकर प्रश्न उभा केला असेल, तर केळी पिकातील नष्टचर्यांचं काय कौतुक? भवरलालजी म्हणूनच त्यावर नवे शास्त्रशुद्ध उपाय सुचवतात आणि निसर्ग बदलला तसे तुम्हीही बदला, तरच टिकाल हा संदेश देतात. परिवर्तनाचे मार्गही सुचवतात.*

*वाकोदच्या ग्रामविकासामध्ये तिथल्या जनतेच्या प्रत्यक्ष सहभागाला भवरलालजी अनन्यसाधारण महत्त्व एवढ्यासाठीच देतात, की त्यांना ते खेड, तिथलं जीवनमान यात जेवढं स्वारस्य आहे, त्यापेक्षाही जास्त तिथला माणूस बदलण्यात आहे. जर माणूसच सत्प्रवृत्त झाला तर विकास आपोआपच होईल असा त्यांचा होरा आहे.*

*विषय कोणताही असो चिंतनानं त्या-त्या विषयाच्या मुळाशी जाऊन, भिडून त्या समस्या उकलण्याची त्यांची मानसिकता आहे.*

**श्री. हेमंत अलोने** – भाऊ, एखादी अशी गोष्ट आहे का, की जे होऊन गेलं, त्याबद्दलची खंत किंवा चुटपुट?

**भाऊ** – मला जी गोष्ट करायची आहे, त्याचा कालावधी निश्चित झाला की, ती कार्यान्वित करायला मला वेळ फार कमी असतो, त्यामुळे मी ते काम गतिमानतेने करूनच टाकतो. आजपर्यंत पैशांअभावी माझं कोणतंही काम अडलं नाही.

माझ्या हाताशी खेळणारा किंवा तिजोरीत पडलेला, संचित अशी संपत्ती कधीच दिसली नाही. बँक बॅलन्स वगैरे वगैरे मला काही लागू होत नाही. त्यामुळे स्वप्न पाहणं आणि ते कार्यान्वित करणं यात एवढा कमी अवधी असतो, की मी त्याचा पाठपुरावा करून, निष्ठापूर्वक आणि निर्धाराने ते पूर्ण करतो. त्यामुळे मी जे जे काही ठरवलं, ज्या ज्या वेळी ठरवलं, त्यावेळी ते पूर्ण केलं.

**श्री. अलोने** – लहानपणी किंवा तरुणपणी एखादा छंद होता का?

**भाऊ** – एक शाळा आणि शिक्षण या दोन गोष्टी माझ्या मनात खूप दिवसांपासून होत्या. मला ते करायचं होते. मी मुळात असं मानतो, की माझ्या जगण्याचं अधिष्ठान शिक्षण आणि संस्कार हेच आहे! त्यादृष्टीने पाहता, त्या क्षेत्रात



जर आपण काही करू शकलो अधिक उत्तम! मात्र, जे ही कार्य होईल ते चिरस्थायी स्वरूपाचे असावे. त्यादृष्टीने आपण काही करायला पाहिजे. त्याच्यासाठी मनात आणून तर आठ महिन्यांमध्ये तशी वास्तू, जी कमीत कमी दोनशे-अडीचशे वर्षे टिकू शकेल, तेवढी बांधून पूर्ण झाली.

सतत प्रयत्न करणं आणि त्या प्रयत्नातून आपले उद्दिष्ट पूर्ण करणे हेच माझे काम. ते करत असताना त्यात अनेक अडचणी येतात. त्यावर मात करता येते. सामाजिक सदिच्छा फार मोठ्या प्रमाणावर माझ्या सोबत असतात. प्रत्येकाला तसा समाजाकडून जो प्रतिसाद मिळतो तो फारच कमी असतो. ज्या अडचणी असतात त्या शासनाच्या. परवानगीला अजून दोन वर्षे लागतील. त्याचं कारण असं आहे, की प्रथम बारावीपर्यंत शिक्षण होईल. त्यानंतर शॉर्ट ड्युरेशनचे प्रोफेशनल कोर्सेस होतील. माणसाच्या जगण्यात डायरेक्टली व्हॅल्यू ॲड करून मूल्यवर्धित करतील. आपल्या संस्थेत संस्कारित झालेला आणि प्रशिक्षित झालेला विद्यार्थी स्वत:चा रोजगार निर्माण करू शकेल, असे कोर्सेस जर आपण चालू केले तर त्याची खूप मदत होईल असं मला वाटतंय, तेव्हा पुढे ते काम करायचं मी ठरवलं आहे.

**श्री. अलोने –** भुजबळांचे जे नॉलेजसिटी आहे, त्यांच्याबद्दल आपल्याला काही सांगायचं आहे.

**भाऊ –** भुजबळांची नॉलेजसिटी मी अजून बघितली नाही, ती कमर्शिअल तत्त्वावर आहे की, कल्याणकारी तत्त्वावर चालते आहे, याचीही मला कल्पना नाही. मी मात्र कोणतही कल्याणकारी काम कमर्शियल तत्त्वावर नफा कमाविण्याच्या हेतूने करायचं नाही असा निर्णय आमच्यापुरता घेऊन ठेवला आहे. जर एखादं काम असं असेल की त्यात भ्रष्टाचार, काळे पैसे यांची देवाणघेवाण केल्याशिवाय भागणारच नाही तर तसलं कोणतच काम आपण करायचं नाही, हा आमचा निर्णय आहे. थोडक्यात जे सरळ-सरळ होऊ शकत नसेल ते न केलेलचं बरं. साधन आणि साध्य या दोहोंची शुचिता पाळणं चिरस्थायी काम करण्यासाठी आवश्यक आहे. प्रदीर्घ अनुभवानंतर हे माझे ठाम मत झाले आहे. असे ठाम मत झाल्यावर तडजोडीचा प्रश्नच राहत नाही.

**श्री. अलोने –** एक तडजोड केली, की अनेक तडजोडी कराव्या लागतात?

**भाऊ –** जीवनाचं दुसरं नावच तडजोड होऊन जातं ना. नाही का? जीवनाला

शाश्वत मूल्य नसेल तर ते चालते. समाजात बहुतांशी तसेच तर चालले आहे. समाजातील अनेक व्यवहार अवमूल्यनासह चाललेले आहेत. चुकीच्या मार्गाने जाणाऱ्यांपेक्षा आपण निश्चितच वेगळे आहोत! जैन उद्योग समूह आर्थिक संकटातून गेला, पण गुणवत्तेच्या संदर्भात कुठेच तडजोड केली नाही.

**श्री. अलोने –** यशाविषयी तर कोणीही बोलतं; पण अपयशाविषयी तुम्ही एवढं प्रांजळपणे बोललात, संस्मरणीय वाटलं.

**भाऊ –** हो! खरं त्या संदर्भातलं एक भाषणही आपल्याकडे ध्वनिमुद्रित आहे. ते तुम्ही अवश्य ऐका. त्यात मी अपयशावरच बोललो आहे.

**श्री. अलोने –** केळीचे व्यवहार ऑनलाईन करण्याचा जो प्रयत्न होता, त्याचं काय झालं? आपल्या पाच तालुक्यांत ते सुरू होणार आहे, तर त्याचा कितपत फायदा आपल्या केळी उत्पादकांना होऊ शकेल?

**भाऊ –** केळी फार पेरिशबल प्रॉडक्ट आहे. बरोबर? त्यात एखाद्या दिल्लीवाल्यांनी तुमच्याकडून एक ट्रक खरेदी केला, शेतकऱ्यांनी तो पाठवला अन् त्याला नेमके पैसे नाही मिळाले, कोणाला शोधत बसाल? कोणाला भेटायला जाल? जिथे जिथे संघटित बाजार आहे आणि जिथे परिवर्तनशीलता नाही, तिथे या गोष्टीचा जास्त फायदा होऊ शकतो. कारण, मधला माणूस कमी होतो; परंतु मी स्वत: याबद्दल साशंक आहे, की याचा खरा फायदा शेतकऱ्यांपर्यंत किती पोहोचेल?

आता तसं म्हणायला इथले केळी भरणारे अधूनमधून हात वर करतातच. आतापर्यंत असे एक-दोन प्रसंग झालेले आहेतच. या नव्या केसेसमध्ये जास्त होते; पण तसा अनुभव हे जे डाळवाले आहेत, त्यांनी ज्या वेळेला फॉरवर्ड बुकिंग सुरू केलं त्या वेळी काही काळ त्यांना खूप पैसा मिळाला; पण त्यानंतर सगळीच परिस्थिती बदलली.

फ्युचर्स मार्केटिंग हा जो विषय आहे हा जिथे सबंध एकॉनॉमी ही ऑर्गनाईज्ड आहे, चेकचा व्यवहार होत नाही, बँकेच्या सिक्युरिटी चेक होत नाही, पैसे असल्याशिवाय होत नाही, माहिती असल्याशिवाय यशस्वी होणं कठीण आहे. (ऑनलाइनची माहिती तसेच प्रशिक्षण हवेच.) शेतकऱ्याला माहिती नाही, तो संघटित नाही. त्यामुळे जर एखादा असा घटक तिकडे असला तो सगळ्यांना लुबाडून बेपत्ता होऊन जाईल.

सगळ्यांकडून माल मागून घेईल, पैसे देणार नाही, आधी तुम्ही पैसे मागवणार असाल आणि देणार असाल, तर तो काही पैसे पाठवणार नाही. त्याने तुमच्यावर विश्वास का ठेवावा आणि ठेवला, तर त्याने नाही पाठवलं तर तो काय करणार तुमचं? तुमच्या मागे तो येईल तरी कसा?

**श्री. अलोने –** किंवा त्याच्यापेक्षा हे केळी उद्योगाची स्थापनाप्रक्रिया आणि पणन उद्योग याबद्दल सांगा.

**भाऊ –** कशाची प्रक्रिया घेऊन बसलाय? सहकाराने स्वःहाकाराचं स्वरूप घेतलंय. जिथे जिथे किमान एक जरी सज्जन व्यक्ती मिळाली आणि तिने जर स्वतःचं जीवन त्या संस्थेसाठी वाहिलं, तिथे तिथे त्या संस्था नावारूपाला आल्या. त्यानंतर मात्र त्या संस्था बऱ्याच ठिकाणी मोडकळीला आल्या. हा आतापर्यंतचा आपला सहकार क्षेत्राचा अनुभव आहे. आपल्या रक्तातच व्यक्तिपूजा आहे. आपण व्यक्तिनिष्ठ आहोत. म्हणून आपण म्हणजे One Indian is equal to five foreigners. हे जरी खरं असलं तरी Five Indians are not equal to even one foreigner. पाच भारतीय एकत्र आले तर त्यांची जी सहकारी ताकद आहे ती पाचपट होत नाही. ती दीडपट होते. ती उलट कमी होते. कारण, ते एकमेकांचे पाय ओढतात. 'जॅपनीज' माणसाचा आदर्श यासंदर्भात डोळ्यांसमोर ठेवा. त्यांची परस्परांशी जुळवून घेण्याची वृत्ती, सामंजस्य, सहकार्याची भूमिका अनुकरणीय आहे.

शासनसुद्धा त्यांचा जो उद्योग असेल त्याच्याशी हातात हात मिळवून काम करीत असते. ते एकमेकांना असं युद्धाच्या रणांगणात आहे असं नाही समजत.

**श्री. अलोने –** नोकरशाही कमी करून लवकरात लवकर स्पीडअप कसं करायचं? जळगाव जिल्ह्यात केळी मुख्य घटक आहे. जिल्ह्याच्या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी नेमकं काय केलं पाहिजे?

**भाऊ –** केळी उत्पादनाचं क्षेत्र महाराष्ट्रात, बऱ्याच जिल्ह्यांमध्ये पूर्वी जिथे नव्हतं तिथे खूप प्रमाणात वाढलं आहे. त्यातल्या त्यात काही भागांमध्ये नांदेड, कोल्हापूर यात जमीन आणि पाणी आहे. खूप सुपिकता आहे. दोन्हीचीही उपलब्धता एवढी चांगली आहे त्यांच्याकडे. त्यामुळे त्यांना खानदेशपेक्षा भरपूर जास्त उत्पन्न मिळते. एवढंच नव्हे तर, पुण्यासारख्या ठिकाणीसुद्धा नारायणगाव वगैरे येथे खानदेशपेक्षा कितीतरी अधिक पटीने केळी घेणारे लोक आहेत. त्यामुळे

जळगावात जर केळीचं क्षेत्र एवढंच राहिलं किंवा वाढलं तर हालच होणार आहेत. त्याची तीन महत्त्वाचं कारणं आहेत, आपण पिढ्यान् पिढ्या केळीवर केळी घेतोय. तेव्हा एकप्रकारे जमिनीला घसारा होऊन त्या जमिनीचा कस कमी झाला आहे.

दुसरं असं झालयं, की तीच ती केळीची जात, वाण आणि पीक घेतल्यामुळे आता रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे आता आपलं दर एकरी उत्पादन कमी झालं आहे, तिसरी बाब केळीला खूपच पाणी लागतं, काही  भागात ते अजूनही उपलब्ध आहे, पाण्याची पातळी खाली जाते, त्यामुळे ते अनेकांच्या बाबतीत ते घडलेलं आहे. दुसरं, नाशिक, पुणं याठिकाणीसुद्धा आता केळी व्हायला लागली. म्हणूनच माझं म्हणणं आहे की केळीला आपल्या आर्थिक व्यवस्थेचा मुख्यकणा समजून त्यावरच पूर्णतः अवलंबून राहण योग्य होणार नाही, परवडणारसुद्धा नाही.

केळीसाठी आपण जर निर्यातीची बाजारपेठ उपलब्ध करून त्यासाठी सामुहिकरित्या प्रयत्न केले तर मात्र आपलं भवितव्य चांगलं होऊ शकते. कारण, आपण मुंबईसारख्या बाजारपेठेपासून फार जास्त लांब नाही. तिथे एका रात्रीत आपण पोहोचू शकतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून जर आपण उबवण्याची, वाढवण्याची, साठवण्याची प्रक्रियापद्धत बदलवली तर नक्कीच मूल्यांकन करता येईल.

आम्ही बाजारामध्ये जी केळी विकत आहोत. आता ती पंधरा रुपये किलोने विकत आहोत. एका किलोमध्ये सर्वसाधारणपणे सहा ते आठ केळी बसतात, लोकांना डझनभर घ्यायची जी सवय आहे ते एवढंस केळ असतं. तरीही ते डझनावरच आहे. आमची केळं एवढी मोठी असून तरीही ती वजनावर आहेत. खरी किंमत वजन आहे. परंतु लोकांना तशी सवय नाही; पण तरीही आमची केळी पंधरा रुपयांच्या भावानेसुद्धा जाताहेत. कारण, गुणवत्ता आहे; पण तो एक विशिष्ट असा ग्राहकवर्ग आहे.

आता आपण गल्लोगल्ली ते कसं उपलब्ध होईल याबद्दल विचार करतोय. ते केळं पाहिल्याबरोबर असं वाटतं, की आपण खावं! कारण, त्यात बुरशी नाहीय. ते ठिपके पडलेलं जे केळ आहे, त्यात खरं म्हणजे फंगस आहे. आपल्याला हे बघायला पाहिजे की आपण गुणवत्ता कशी सुधरवायची? मूल्यवर्धित कशी करायची? आणि त्यानंतर निर्यात कशी करायची? हे सर्व करू शकलो तरच आपल्याला तरणोपाय आहे.

आतापर्यंत चालत आलेल्या पद्धतीने आपण जुनाच कित्ता गिरवत राहिलो तर एकीकडे आपली उत्पादकता कमी, दुसऱ्यांची चांगली असे ते होईल. नारायणगाववरून केळी मुंबईला पोहोचायला जेवढं सहज शक्य आहे, जळगाववरून तेवढ्या वेळेत पोहोचणं मात्र शक्य नाही. मग कसं जमणार? तर सांगायच तात्पर्य, आपल्याला यासंदर्भात दूरदृष्टीने विचार करून काही प्रमाणात फलोत्पादनवरही भर द्यावा लागेल. उदाः आंबा. वगैरे.

**श्री. अलोने** – पारंपरिक दृष्टिकोन सोडला, तर बाजाराभिमुखता आपण सोडली असे म्हणता येईल का?

**भाऊ** – बाजाराभिमुखताच अशी हवी की शेतीला दिशा मिळाली पाहिजे.

**श्री. अलोने** – एकूण शेतीबद्दल जे खरं आहे तेच केळीबद्दल आहे ?

**भाऊ** – हो. विशेषकरून केळीच्या बाबतीत आहे. आता बघाना, उसाचं काय झालं?

**श्री. अलोने** – माती खूप वापरली गेली.

**भाऊ** – आहे ना. मातीचा अतिवापर आहे. सुपीकता वाढते. कारण, पाण्यावर पाणी दिल्याने, खालचे क्षार वर येतात. आणि दुसरं म्हणजे, की फर्टिलेयर तयार होतात, त्यामुळे नायट्रोजनचा त्रास होतो.

**श्री. अलोने** – वाकोदचा तुमचा प्रकल्प आहे. वाकोदसाठी आपण काही ना काही करीत असता, त्याबाबतीत काय झालंय?

**भाऊ** – हो, करायचा प्रयत्न आहे. माझ्या दृष्टीने काही गोष्टींना प्राधान्य होतं. त्यात रस्ते, गटार आणि पिण्याचं पाणी या तीन गोष्टी मूलभूत सोयीच्या प्राधान्याने करायच्या होत्या. आरोग्य आणि शिक्षण हे तर अतिशय महत्त्वाचे विषय. शिक्षणाच्या बाबतीत प्रगती अगदी वाखाणण्यासारखी आहे, म्हणजे ज्या शाळेचा दहावीचा निकाल २००६ मध्ये ६७.७४ टक्के होता, तो निकाल ८४.८४ टक्यांपर्यंत तर १२वीचा ६० टक्यांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. ज्या शाळेतून बी. एड्. साठी आणि डी. एड्.साठी यापूर्वी एकही विद्यार्थी गेलेला नव्हता, त्या शाळेतून आता नऊ विद्यार्थी डी.एड. साठी गेले, पुढच्या वर्षी त्यासाठी १२ किंवा १५ विद्यार्थी जातील अशी शिक्षणाच्या बाबतीत लक्षणीय प्रगती वाकोदमध्ये साधता आली आहे.

लातूर पॅटर्न मागविला, इथून आपण शिकवणी त्यांना दिली, प्रश्नसंच त्यांना

दिले आणि त्यांच्याकडून काम करून घेतलं. त्यानंतर इथून आपण त्यांना खूप मदत पाठविली. इंग्रजीसाठी तिथल्या शिक्षकांना आम्ही प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने आकर्षक मानधनही दिले. त्यांना सुरवातीची तीन वर्षे पगार नसतो, असला तरी फार कमी असतो. आपण अशा शिक्षकांना पुरवणी पैसे देतो. या सर्व प्रयत्नांना यश येऊन विद्यार्थ्यांत लक्षणीय प्रगती झाली. समाधान असतं. पालकांना अशी विनंती केली की जर मुलं अभ्यासात दुबळी असतील तर, त्यांना तुम्ही पुढे ढकलून काय साधता?

पालकांनीसुद्धा चांगला प्रतिसाद दिला आणि त्या मुलांना पक्क करण्यासाठी त्यांनी पुन्हा परीक्षा घ्यायला लावली. असं ते आहे. वाकोदकडून प्रत्येक कामामध्ये सहकाराची आणि सहभागाची जी अपेक्षा आहे, ती मात्र मी अजून काही निर्माण करू शकलेलो नाही. त्याबददल मी अजून उदास आहे. चारित्र्य संपन्नता हा जो विषय आहे, तो आता सुरू केलाय. त्यासाठी दारु, सट्टा, जुगार बंद करायचं वगैरे. ते बऱ्याच प्रमाणात मार्गी लागलं आहे, परंतु त्याचा परिणाम म्हणून सज्जन लोक आणि एकूण समाज हा निर्भय पद्धतीने वागू शकेल अशी परिस्थिती वाकोदमध्ये अजून काही निर्माण झालेली नाही.

भयमुक्त समाजाची ही सुरवात आहे, स्वावलंबी समाजाची निर्मिती करण्यासाठी मी सर्वोदयी कार्यकर्त्यांची मदत घेतोय. ब्रह्मकुमारी, सर्वोदय, आर्ट ऑफ लिव्हिंग असल्या संस्थांना, समाजसेवी संस्थांना उभं करून, महिलांचे बचत गट करून महिलाशक्तीला कसं वाढवता येईल, संघटित कसं करता येईल अशा पद्धतीने आपण तिथे जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

एक पूर्णवेळ सर्वोदयी कार्यकर्ताही आहे. तो दत्तमंदिरात राहूनच तिथे काम करतो. सांगायचं तात्पर्य, की त्याचाही एक परिणाम आहे; परंतु अजूनही लोकांची ही अपेक्षा असेल की आपण त्यांची खासगी कामही करावी, सामाजिक कामे करण्यापेक्षा व्यक्तिगत कामे करण्यामध्ये लक्ष देणे योग्य आहे का? दांडगी शक्ती म्हणजे राजकारणी शक्ती. त्यांचं दुसरं काही योगदानच नाही. अशा पद्धतीने मिश्र प्रवाह चालू आहेत.

कोणत्याही गावात एक-दोन वर्षे किंवा पाच वर्षे किंवा फार लांब अशी फारतर त्याहीपेक्षा विकासप्रक्रिया चालू ठेवणं आणि शासनाच्या दृष्टीने आदर्श

असं गाव करणं, नंतर मग ते परत तसेच पूर्वीसारखं होऊन जाणं यात मला काहीही रस नाही, मला त्यात स्वारस्यही नाही. मी शिक्षणावरच जास्तीत जास्त भर देईन. आरोग्य केंद्र आता शासनाकडून मंजूर करून घेऊन सुंदर पद्धतीने उभारलेलं आहे. शासनाला आता असा प्रस्ताव आम्ही दिला आहे, की व्यवस्थापनासाठी माणूस मी देतो, बांधकाम पूर्ण झालेलच आहे. तुम्ही तुमचे दोन डॉक्टर आणि नर्सेस पाठवा. बाकी व्यवस्थापन आमच्याकडे द्या. तिथे गावकऱ्यांना व्यवस्थित आणि अपेक्षित सेवा मिळू शकेल.

आमचा प्रस्ताव जर जिल्हा परिषदेने मंजूर केला, तर तेही एक काम मार्गी लागेल. नवीन आदर्श निर्माण होईल. जनता आणि शासन भागीदारी ही जी त्यांची कल्पना आहे, तो एक खूप चांगला प्रयत्न आहे. आतापर्यंत फक्त चौदा कामं करू शकलो; परंतु त्यांचा प्रतिसाद उत्तम आहे, हळूहळू त्यातही प्रगती होईल. त्यासाठी बँकेकडून कर्जाची सगळी व्यवस्था आम्ही त्यांना करून दिली. 'स्वतःहून काही सामाजिक कार्य करावं' असं वाटणारे बोटावर मोजण्याइतकेच आहेत, हे मात्र तेवढच खरं!

**श्री. अलोने –** भाऊ, त्यांच्यातून नेतृत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला का?

**भाऊ –** होय केला, तोच करतोय आता, सतत करतोय; पण त्यासाठी पाया व्यक्तिगत कामं करणं हाच आहे. त्यांची व्यक्तिगत कामं काही खोटी नाहीत. खरीच कामं असतात ती. एक सध्याचेच उदाहरण सांगतो. वाकोदच्या एका मुलीच्या ॲडमिशनचे काम आहे. तिला सव्वा लाख रुपयांचं डोनेशन द्यायचं आहे, तिच्याजवळ एक लाख रुपयेच आहेत. आता आमचा प्रयत्न हा चालला आहे की गावाने साडेबारा हजार रुपये उभे करावेत, साडेबारा हजार मी देतो, पंचवीस हजार देऊन तिची गरज पूर्ण करा. त्यांना त्याचं महत्त्व कळतं तर असा गावाचा सहभाग वाढवणार, म्हणजे कसा वाढवणार? राममंदिर बांधायचंय.

अतिक्रमण काढायचं काम गावाचं आहे. मी कसं काय काढू? तुम्ही म्हणाल, की पोलीस न्या. ते माझ्या विचारात बसत नाही. चांगलं काम करायचं असेल तर बळाचा वापर करायचा नाही. गांधीजींचं हे जे तत्त्व आहे ते मी काहीच सोडायला तयार नाही. त्यामुळे जोपर्यंत अतिक्रमण निघणार नाही, तोपर्यंत मी काहीच करणार नाही, हे मी ठरवलंय आणि त्यांना सांगितलं होतं. त्यांनी ठरवले होते, की भाऊंचा

बारा डिसेंबरला वाढदिवस आहे तेव्हा तिथे आपण कुदळी टाकू. त्या वेळी ते अतिक्रमण करणारे तिथे नव्हते. अतिक्रमण करणाऱ्यांपैकी दोन निघाले. एकाने अजूनही अतिक्रमण हटवले नाही. म्हणून तर आम्ही तो विषय सोडून दिला.

आपण भले सहा महिन्यांनी, ज्या दिवशी अतिक्रमण निघेल तेव्हा बघू. त्याला ताकीद द्यायची. त्याला दुसरीकडे मदत करायची, त्याच्यासाठी पैसा खर्च करायचा. एवढंच काम करायला मी तयार आहे; परंतु अतिक्रमण काढल्याशिवाय मी काही तिथे राममंदिराचं काम करणार नाही. ते जो करेल त्यात जेवढा पैसा गाव देईल, तेवढाच मी देईन त्यापेक्षा जास्त पैसा मी देणार नाही. त्यासाठी अगदी झोळी घेऊन प्रत्येक घरात जावं लागलं तरी माझी जायची तयारी आहे.

आम्ही एक अभियान या दृष्टीनेच चालवू. झोळी घेऊन फिरू. एक रुपया टाक, दोन रुपये टाक, पाच रुपये टाक; पण तू तिथे ये तर खरं! म्हणजे तुला असं वाटलं पाहिजे की या मंदिरात माझा काही सहभाग आहे. भाऊंनी केलंय असं म्हणण्यात काय अर्थ आहे? असं म्हणणार असाल तर ते तुझं नाहीच, हाच त्याचा अर्थ होईल. तुला ते तुझं वाटलं पाहिजे त्यासाठी तुझा सहभाग त्यात हवा. त्यादृष्टीने मानसिकता घडविण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे.

**श्री. अलोने –** शाळा, ग्रंथालय वगैरेचं काय?

**भाऊ –** ते सगळं सुरू केलंय. शिक्षणाचाच तो भाग आहे. तो तर आज चांगला झालाच सगळा. अग्रक्रमाने तोच केला ना! शिक्षण म्हणजे पहिलं प्राधान्य; पण ते पुढच्या पिढीसाठी आहे. निदान हे तरी माझ्या हातात आहे. अतिक्रमण काढणं हाच एक मोठा विषय आहे. कारण, कोणत्या ना कोणत्या राजकीय आधाराशिवाय तो माणूस अतिक्रमण करीतच नाही.

दांडगे लोकच असं करतात. आडदांड माणसं अशीच असतात.

**श्री. अलोने –** म्हणजे आता विकासकामे करायची आहेत, राजकारण किंवा काही करायचंय?

**भाऊ –** होय, विधायक अशी विकासकामे सुरू आहेत. पण प्रतिसाद मी आत्ताच तुम्हाला सांगितला तसा आहे.

**श्री. अलोने –** जळगाव शहरामध्ये मुलांसाठी क्रीडांगण किंवा बगीचे यासाठी काही पुढाकार घेण्याचा विचार आहे काय? कॉटन मार्केट... सगळंच गेलं आता,

ते मेहरूण तलावाचं मैदान एकदमच टोकाला आहे, मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील म्हणाल्या, की मला जळगावच्या मुलांसाठी काही करायचं, तर तो एक मुद्दा लावून धरता येईल आपल्याला! त्यांच्याकडून काही मदत घेता येईल. खरंच पाहिजे मुलांसाठी क्रीडांगण. एक एम. जे. कॉलेजचं एकलव्य मैदान जर सोडलं तर बाकी काही कुठे मैदानच नाही.

**भाऊ –** तुम्ही या ना एकदा आमच्या अनुभूतीमध्ये. साडेसात एकरांत नऊ ग्राउंड केले आहेत. आंतरजिल्हा स्पर्धासुद्धा तिथे होऊ शकतात अशा पद्धतीने त्यांची रचना केली आहे. अगदी नागपुरहून माती आणली आहे. खूप बघण्यासारखं आहे ते. माननीय राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील जर येऊ शकल्या, तर त्याचं औपचारिक उद्‌घाटन त्यांच्याच शुभहस्ते करायचं असं ठरवलं आहे.

**श्री. अलोने –** पुढील संकल्प याबाबत काय आहे?

**भाऊ –** संकल्प म्हणजे आता जेवढा वेळ समाजासाठी देतोय त्यात वाढ करायची. आताही खासगी कामासाठी काही ठराविक वेळ देत असतो. बाकीचा वेळ नेहमीच्या कामांसाठी आहे. यात आणखी काही वाढ करता येत असेल ती करून उर्वरित साधनस्त्रोत उपयोगात आणायचे असून, मी स्वत: सामाजिक कामांमध्येच लक्ष घालणार आहे. लिखाणकाम बाकी राहिलं आहे, तुम्ही सुरूवातीला त्या संदर्भातच माझ्याशी बोलला होता. जवळजवळ १२-१३ पुस्तकांची यादी आम्ही तयार केली आहे. तेवढी सगळी पुस्तकं लिहायची बाकी आहेत, ती मला स्वत:ला लिहायची आहेत.

**श्री. अलोने –** विषय काय आहेत.

**भाऊ –** अनेक विषय आहेत.

**श्री. अलोने –** भाऊ, आपण अजून कोणती स्वप्न पाहताय?

**भाऊ –** आम्ही ज्या उद्योग-व्यवसायात आहोत, उद्योगात आहोत, त्या उद्योगात जगातल्या पहिल्या पाचात आलो नाही आणि देशातल्या पहिल्या एक दोघांमध्ये आलो नाही, तर मग त्या व्यवसायामधून आपण निघून जावं. कारण, त्याशिवाय आता व्यवसायात तुम्हाला दोन पैसे मिळतील अशी परिस्थिती राहिलेली नाही, एवढी कठीण स्पर्धा झाली आहे. आपण काळाच भान ठेवून मूल्य सांभाळून केंद्रस्थानी राहून जगभर कंपन्या ताब्यात घ्यायच्या. योग्य वेळी, योग्य ठिकाणी

बाजार सहभाग वाढवायचा.

जगभर जैन इरिगेशन कंपनीची उत्पादने विकली जातात. देशाबाहेर आपले पाच कारखाने, आणि देशातही पाच अशी प्रगती आहे. ३० ते ३५ टक्के बाहेर निर्यात आहे. समतोल साधण्याचं काम सुरू आहे. घोडदौडही त्यासाठीच आहे. काही बाबतीत निश्चितच प्रगतीचा आलेख उंचावतोच आहे म्हणून मी समाधानी आहे. सामाजिक स्तरावर किंवा व्यावसायिक मला सगळ्याच बाबतीत विधायक आणि चिरस्थायी ठरेल असं काम करायचं आहे. त्यातला हा एक विषय आहे.

**श्री. अलोने –** बारा तारखेलाच शरद पवारांचा वाढदिवस आहे, यासाठी शरद पवारांच्या संदर्भात काय सांगाल? तुम्ही कसं बघता शरद पवारांकडे?

**भाऊ –** कृषिक्षेत्रातले जाणकार व्यक्तिमत्त्व शरद पवार साहेबांएवढा अष्टपैलू, राजकीय नेता मी तरी अजून पाहिला नाही. सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्र कोणतेही असो; त्यांचा सखोल अभ्यास आहे. ही आगळीवेगळी व्यक्ती आहे आणि ते व्यवहारी आहेत. गंभीर असं त्यांचं एकूण व्यक्तिमत्त्व आहे. समाजातल्या सगळ्याच स्तरातल्या लोकांना, त्यांच्यातली जी चांगली माणसं असतील त्यांना सांभाळून घेण्यासाठी त्यांना साथ देण्याची कला फार कमी राजकीय नेत्यांना साधलेली आहे. त्यांच्या एकूण राजकीय प्रवासात आणि जीवन प्रवासात त्यांनी कुठेही कटुता निर्माण होऊ दिली नाही.

उलटसुलट कोलांट्या हा सगळा जरी राजकारणाचा अविभाज्य घटक असला, तरी व्यक्तिगतरीत्या वैमनस्य हा विषय त्यांना कधीही शिवलेला नाही आणि म्हणूनच प्रत्येकाला ते हवेहवेसे वाटत असतात. शासकीय यंत्रणेला हाताळण्याची त्यांची जी काही पद्धत आहे तीसुद्धा आगळीवेगळी आहे. ते त्यांना दुखवत नाहीत. मात्र, अतिशय काटेकोरपणे, तारतम्याने सर्व बाबी हाताळत असतात.

**श्री. अलोने –** राजकारणी माणसाचं स्वप्न असतं, त्या स्वप्नाबद्दल काय?

**भाऊ –** राजकारणामध्ये सक्षम माणसंच जास्त असतात, असा आतापर्यंतचा इतिहास आहे, संख्येचा खेळ आहे. त्यामुळे एवढंच मला वाटतं. तुम्ही खूपच लिहिलं आहे त्यांच्याबद्दल.

धन्यवाद!



# पाण्यातला स्वार्थ अन् कडू परमार्थ

७०व्या वाढदिवसानिमित्त ‘आकाशवाणी’वर मुलाखत – सतीश पप्पू – ११.१२.२००७

*पाण्याच्या पारदर्शी स्वरूपामुळं त्यासंबंधीचे प्रश्न त्यामध्येच पूर्णपणे व स्पष्टपणे दिसतात. शेतकऱ्यांनी वैयक्तिक स्वार्थ पाहावा यात काहीच नवल नाही. तो तसा कोण पाहत नाही? व्यापारी, उद्योजक एवढंच नव्हे; तर मुरलेले राजकारणीदेखील स्वार्थच प्रथम पाहतात; परंतु काही प्रश्न असे असतात, की कोणाचेही किंवा सर्व संबंधितांचे सर्व स्वार्थ बाजूला ठेवून निव्वळ १०० टक्के देशहित पाहून आत्यंतिक धैर्याने वरवर फारच कटू वाटणारे निर्णय घ्यावे लागतात.*

*कदाचित घेणाऱ्याचेही त्यात नुकसान असू शकते. एवढा आत्मविश्वास, एवढं सामर्थ्य, एवढं धैर्य असायला तेवढंच चारित्र्य, शिक्षण, अनुभव असावा लागतो. अपार श्रद्धाही असावी लागते, आपल्या देशाचं असं दुर्दैवच म्हणायला हवं, की असं व्यक्तिमत्त्व आपल्याला आजकाल नेतृत्व म्हणून लाभलं नाही, लाभत नाही. पाणीप्रश्न हा तसलाच एक गहन प्रश्न. भाऊंसारख्या विचारवंताला तो*

*सोडवण्याची दिशा दिसते; पण तुमच्या-आमच्यासारखीच सर्वत्र आढळणारी अगतिकताही दिसते.*

*काळ कोणासाठीच थांबत नाही. पाण्याचा प्रश्न भविष्यात इतका बिकट होईल, की इथं माणसाचं अस्तित्वच पणाला लागेल व त्या रेट्यानंच तो प्रश्न सुटेलही. तेव्हा कदाचित भाऊंच्या या चिंतनाचे मूल्य उमगेल.*

**श्री. सतीश पप्पू –** खूप पूर्वी भाऊ तुम्ही पेट्रोलपंपावर असताना, एका ड्रिलिंग रीगवरील "ॲग्रीकल्चर अ प्रोफेशन विथ फ्युचर" या वाक्यानं तुम्हाला एक विलक्षण प्रेरणा दिली आणि त्यानं भवरलाल जैन, वाकोद आणि जळगावचं नाव जागतिक नकाशावर कोरलं गेलं. हा प्रवास आणि पाणी यांचा संबंध श्रोत्यांना सांगाल का?

**भाऊ –** तसा हा प्रयत्न ठिबकच्या आधीच सुरू झाला. खरं म्हणजे पीव्हीसी पाइप १९८० मध्ये सुरू केले. नदीवरून किंवा विहिरीवरून लांबवरून कुठेही जर आपल्याला शेतापर्यंत किंवा शेताच्या बांधापर्यंत पाणी आणायचं असेल तर पूर्वी आपण साधारणत: सिमेंट किंवा लोखंडाचे पाइप वापरत होतो. पाण्याचं नियोजन, पाण्याची बचत यांची खरी सुरवात पीव्हीसी पाइपपासून झाली.



साधारण: १९८८ च्या सुमाराला म्हणजे दहा वर्षांनंतर आम्ही ठिबक सिंचनात प्रवेश केला. नंतर त्यात प्रगती होत राहिली. त्या वेळी ती काळाची गरजही होती आणि आजही ठिबक सिंचन ही काळाजी गरजच आहे! ठिबकच्या प्रचार–प्रसारासाठी मात्र महत् प्रयत्न करावे लागले हे सत्य आहे. कारण, संकल्पना नवीन होती आणि नवीन संकल्पना रुजवायची असेल तर त्यासाठी कठोर परिश्रम हे उपसावेच लागतात.

कोणतीही संकल्पना असू दे, की कल्पना, जर काळाआधी आली तरी तिचा खूप त्रास होतो आणि काळाच्या नंतर आली तर तुम्हाला त्यात काही फायदा मिळू शकत नाही किंवा तुम्ही त्यात यशस्वी होत नाही. ही जी संकल्पना आहे ती वेळेवर आली असं मी मानतो. त्याचे कारण, त्याआधीही या गोष्टीचं पाहिजे तेवढं महत्त्व लोकांना पटलेलं नव्हतं. परंतु आगामी काळात हे असं घडू शकेल असा एक सुगावा लागलेला होता. त्यामुळे सर्वांनी या नवीन पद्धतीला साथ दिली आणि तो विषय शासनानेसुद्धा उचलून धरला. शासनाच्या अनुदानाशिवाय आणि शासनाच्या मदतीशिवाय हे काम करणं जवळपास अशक्य झालं असतं. बऱ्याच विकसनशील देशांमध्येसुद्धा असे प्रयत्न झालेत; परंतु ते प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत.

जेवढ्या प्रमाणात व्हायला पाहिजे होते तेवढ्या प्रमाणात झाले नाहीत. विशेषकरून महाराष्ट्रात शरद पवार साहेबांनी पहिल्यांदा हा विषय उचलला आणि केंद्र शासनाची जी काही मदत होती त्याच्याहीपेक्षा जास्त मदत ही आपल्या महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करून दिली. त्यांना या गोष्टीची जाणीव होती. जाणकार असलेल्या या अभ्यासकाकडे द्रष्टेपणा आहेच. इस्राइलला, अमेरिकेला गेले होते. त्यांनी हे तंत्र, ही पद्धती तिथे पाहिलेली होती. त्यामुळे या विषयाचा विकास साधण्यात मला असं वाटतं, की नेतृत्त्व आणि एक जाणकार अशा व्यक्तीचा मोलाचा सहभाग मिळाला.

जर हे घडलं नसतं, तर आज तो प्रवास आणखी खडतर झाला असता. जगात सगळ्यांच ठिकाणी असं म्हटलं जातयं की तिसरं महायुद्ध झालं तर ते केवळ पाण्याच्या प्रश्नावर होणार आहे. पाण्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत जातंय म्हणून पाण्याच्या बचतीचं महत्त्व तेवढ्याच प्रमाणात दिवसेंदिवस वाढतंय हे आता केवळ आपल्याकडेच होतंय असं नाही, जगभर हे असंच होतंय.

अमेरिकेसारख्या देशात जिथे भारताच्या तुलनेत चारपट पाऊस आहे, चारपट पाणी आहे आणि जमीनही सातपट आहे, पण लोकसंख्या मात्र आपल्यापेक्षा फार कमी आहे. अशाही देशात आता पाण्याचा अत्यंत तुटवडा व्हायला लागला आहे. अशाप्रकारे हा तुटवडा प्रत्येक ठिकाणी जाणवतोय. ग्लोबल वॉर्मिंगमुळे शक्यता ही आहे की, नद्यांना पूर येतील; पण नद्यांना पूर आल्याने पाणी वाहून गेले, धरणाची सुव्यवस्था नसली किंवा धरणाची सुव्यवस्था होत असली, तरी त्या धरणाचं पाणी जर आपण योग्य प्रमाणात वापरणार नसू, पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं नियोजन करून त्यातून जास्तीत जास्त नफा किंवा जास्तीत जास्त पीक आपल्याला 'मोअर क्रॉप पर ड्रॉप', ही थिअरी जर आपण घेणार नसू तर आपल्याला त्रासच होणार आहे.

बाराही महिने तर काही पावसाचं पाणी पडत नाही. आसाम आणि इतरत्र भागात खूप पाऊस पडत असतो, परंतु तो एकाच सिझनमध्येच पडत असतो. तिथेही पाण्याच्या नियोजनाची गरज आहे, साठविण्याची गरज आहे. पाण्याची गरज आहे असं म्हणण्यापेक्षा पाण्याच्या 'नियोजनाची' गरज आहे. थेंबा थेंबाच्या नियोजनाची गरज आहे. काही ठिकाणी तर पाऊस पडतच नाही, काही ठिकाणी अगदीच अल्प पडतो. आता आपण जी काही रक्कम आपल्या शेतीमध्ये लावतो आहे, जे दर एकरी आपले उत्पन्न आहे, दर लिटरचं आपलं उत्पन्न आहे, त्याचा हिशेब करायला जुळवायला आपण सुरवात केली पाहिजे. तो हिशेब जर आपण करू शकलो तर आपल्या हे लक्षात येईल, की उपलब्ध पाण्यामुळे आपण दुप्पट पीक घेऊ शकतो.

शेती हा राज्य सरकाराच्या अधिकारातला विषय आहे. केंद्र सरकार त्यासाठी फक्त मार्गदर्शक धोरणच देऊ शकते. अशी परिस्थिती असल्यामुळे घटनात्मक बदल घडल्याशिवाय त्यासंदर्भात काही करणे खरोखरच कठीण आहे. आपण जर बारकाईने विचार केला तर हे परिवर्तन ठिबक सिंचन घडवूनच आणते आहे. म्हणजे ठिबक सिंचनामुळे जे पाणी वाचतंय. त्यामुळे हा सामाजिक फायदासुद्धा घडून येतोय, की ज्याच्याजवळ पाणी नाही, त्याला ते पाणी मिळायला सुरवात झालेली आहे. त्याची त्याला किंमत द्यावी लागते; पण यापुढे ज्याच्याजवळ आहे किंवा ज्याच्याजवळ नाही, त्या सगळ्यांनाच पाण्याला किंमत द्यावी लागणार आहे.

पाण्याची योग्य ती किंमत दिलीच पाहिजे. हे झाल्याशिवाय पाण्याचा

जो अपव्यय आहे तो मात्र थांबणार नाही. याच्यासाठीच आपल्याला ते करणं गरजेचं आहे. पाण्याची योग्य किंमत आपण समाजाकडून घेतली पाहिजे आणि शेतकऱ्यांनीसुद्धा ती द्यायची तयारी दाखविली पाहिजे. हे केव्हा घडेल? शेतकऱ्याच्या मालाला जर योग्य भाव मिळाला तरच तो हे करू शकेल. तेव्हा त्याच्या मालाला योग्य भाव मिळवून देणं ही न्याय्य बाब आहे. तसा न्याय शेतकऱ्याला मिळाला तर पाण्याची योग्य ती किंमत शेतकऱ्याकडून वसूल केली तर त्याला तो नाही म्हणणार नाही; पण त्याच्या आधी आपल्याला त्याच्या मालाची किंमत, योग्य तो मोबदला देणं गरजेचं आहे. हाही एक देशाच्या पातळीवर चर्चेचा मुद्दा चालूच आहे. मा. शरद पवार, आपले कृषिमंत्री यांनी तो उचलून धरला आहे, लावूनच धरला आहे. त्यामुळे त्याचाही काही ना काही प्रमाणात परिणाम व्हायला सुरवात झाली आहे. धान्याचे भाव, इतर सगळ्याच वस्तूंचे भाव हे वाढलेले आहेत. ते वाढून त्यांना जर दोन पैसे मिळाले तर पाण्यासाठी पैसे द्यायला सुरवात होईल किंवा ते ती करतील.

**श्री. पप्पू –** भाऊ, पाणी पिणाऱ्या पिकांपेक्षा पाणी वाचवणारी पिकं शेतकऱ्यांनी घ्यावी असं आज भारताचे जलरक्षक म्हणून श्री. भवरलालजी जैन शेतकऱ्यांना सुचवतील काय? म्हणजे केळीमध्ये, उसात त्यांचं थोडंसं क्षेत्र कमी करा असं सुचविता येईल का?

**भाऊ –** खरं म्हणजे हा विचार मी पूर्वीपासून मांडतोच आहे, की ज्या ज्या विभागात आपल्याकडे पाण्याचा मूळ तुटवडाच आहे, तिथे तिथे आपण अशीच पिके घेतली पाहिजे की जी जास्त पाणी पीत नाही. पाणी विकत देण्याघेण्याचीही पद्धत नाही. तेव्हा पाणी न पिणारी किंवा कमी पाण्यात भागवणारी पिकं आपण घेतली पाहिजे. आपल्याकडे पाणीच कमी आहे, ही वस्तुस्थिती असेल तर तिथे ऊस किंवा केळी घेण्यापेक्षा तेवढ्याच पाण्यात आपल्याला दुपटीचं उत्पादन दुसऱ्या पिकाचं घेता येईल, उदा. कपाशी आहे, आपण तसं करणं जास्त फायदेशीर आहे.

समाजाच्या दृष्टीने फायदेशीर आहे. आपल्या स्वतःच्या दृष्टीने फायदेशीर आहे. यातले साधर्म्य हे आहे की जो भाग दोन्ही ठिकाणी कायम आहे, तो भाग आहे ठिबक सिंचनाचा! तुम्हाला जर ऊस लावायचा असेल आणि तुम्ही ठिबक सिंचन वापरलं तर निम्म्या पाण्यात काम होतं. केळी लावायची असेल तरी निम्म्या पाण्यात काम होतं. राहिलेलं जे निम्म पाणी आहे त्यासाठी जर त्या पिकाखालचं

क्षेत्र कमी करायचं असेल, तर इतर पीकं, फळबागा, भाजीपाला हे घेऊ शकता. आपण कपाशीसुद्धा घेऊ शकतो. तेव्हा तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्याला दोघांची सांगड घालता येते. प्रश्न तंत्रज्ञानाच्या वापराचा आहे.

खरा प्रश्न केवळ हेच करावं किंवा तेच करावं अशा टोकाची भूमिका घेण्याचा नाही. कोणत्याही टोकाच्या भूमिकेवर जाऊन चालतच नाही. त्याचं कारण असं आहे, की साखरेचीही आवश्यकता आहे, नाही म्हणून चालणार नाही. केळीची आवश्यकता आहे कारण ते एक अन्नच आहे. दोन केळी खाल्ली की, पोट लगेच भरतं.

आजची अशी परिस्थिती आहे, की सगळ्यात कमी भाव त्याचा असल्यामुळे ते गरिबांचं खाद्य आहे. ते अन्न आहे असं आपण मानतो. तेव्हा ते करू नका असं आपण म्हणू शकत नाही, ते शक्य नाही. त्यातला थोडाफार भाग जर तुम्हाला कमी करता आला आणि फळबागांकडे वळता येईल, तर ते उत्तम आहे आणि हे सगळं करताना पाण्याचं नियोजन मात्र गृहीत धरलं. कोणत्याही परिस्थितीत ते असणं हे अत्यंत आवश्यक आहे.

**श्री. पप्पू –** भाऊ आपण सांगितलं, की हे सगळं करीत असताना पाण्याचं नियोजन हा मुद्दा आपण गृहीत धरला पाहिजे; पण ज्याच्याकडं पाणी आहे त्यांच्यासंदर्भात बांधाचं जसं महत्त्व आहे तसं त्यांनी मनालासुद्धा बांध घालायचा प्रयत्न करणं ही काळाची गरज आहे, असंही आपण सुचवाल काय?

**भाऊ –** मला असं वाटतं, की ही गरज मुळात आहेच आहे. त्याचं कारण असं आहे, की आपल्याजवळचं उरलेलं पाणी आपण जर इतरांना देऊ शकलो नाही तर काय? आपल्याला त्याचं चांगलं नियोजन करून ठिबक सिंचनाद्वारे किंवा इतर सगळ्या पद्धती वापरून जर आपण निम्मं पाणी वाचवू शकलो तर पाण्याचं एक नवीन मार्केट हे उपलब्ध होणारच आहे. एका चांगल्या मार्गाने पाणी विक्री ही एक नवीन प्रथाच समाजात सुरू होणार आहे.

**श्री. पप्पू –** म्हणजे कुठल्या पद्धतीने असेल ते?

**भाऊ –** शेतकरी शेजाऱ्याला सांगेल ना की तुला पाणी पाहिजे असेल तर मी तुला एका वर्षाला २५०० रुपये दरानं एवढं पाणी देतो. तेही तू जर ठिबकने घेतलं तर तुझे पैसे डबल वाचतील, म्हणजे तेवढ्याच पाण्यात तुला डबल एरियात काम करता येईल. सिंचनाचं क्षेत्र वाढेल. तेव्हा याला पुरेसं पाणी असलं तर ते इतरांकडे

पोहोचणारच आहे. नाही तर पाणी परत भूगर्भातच चाललं जाईल किंवा तेथेच राहून जाईल, त्याच्या शेतातच तो टाकेल. दुसऱ्याला तो देणार नाही. असल्या प्रकारचं चित्र अजून नाहीये.

शेतीसाठी मुळातच पाणी कमी पडते आहे, याचं कारण त्याचं नियोजन नाही. आजसुद्धा जर आपण बघितलं तर केवळ दीड टक्का क्षेत्रच फक्त ठिबकखाली आहे आणि दीड टक्क्याच्या वरचं बाकी सगळी साडेअठ्ठ्याण्णव टक्के जमीन ही आजही पाटाच्या पाण्याने भिजते. सगळ्यांनी जर ठरवलं की, आपल्याला असं काही करायचंच नाही तर भरपूर पाण्याची उपलब्धता होईल आणि तसे झाले तर पाण्याची दुय्यम बाजारपेठच आपोआपच उदयाला येईल, स्वतःला बांध घालण्याचा जो विचार आपण मांडला ते सुद्धा त्यातून घडेल. त्याचं कारण असं आहे, की शेतकऱ्याला दोन पैसे त्यातून मिळतील. माल बनवून उत्पादन करून आपल्याला दोन पैसे मिळतात, त्याच्याऐवजी आपल्याला हे असं करूनसुद्धा दोन पैसे मिळू शकतात, त्याचा आनंद त्यांच्यासाठी खूप मोठा असेल. मात्र हे घडून येण्यासाठी आवश्यकता आहे ती नियोजनाची.

**श्री. पप्पू–** भाऊ, बोलण्याच्या ओघात तुम्ही वेगळा मुद्दा मांडला, म्हणून एक प्रश्न विचारतो, की दीड टक्का क्षेत्रफळामध्ये आज आपण सिंचनाची व्यवस्था करू शकलो, आपल्या संपूर्ण भारताचा विचार केला तर सर्व शेतकऱ्यांपर्यंत आपण हा विचार सर्वांपर्यंत पोहोचवू शकलो आहोत काय? समजा तो तसा पोहोचवू शकलो नसू, तर त्यातली नेमकी अडचण कोणती?

**भाऊ –** भारतभर आपण हा विचार सगळ्यांपर्यंत पोहोचवू शकलो असतो तर हा विषय तसा रखडत राहिला नसता. ठिबकखाली फक्त दीड टक्का शेती असूनसुद्धा संपूर्ण जगात भारत देश आज ठिबकच्या संदर्भात दुसऱ्या क्रमांकावर आहे, ठिबक सिंचनाखाली असलेलं क्षेत्र अमेरिकेच्या नंतर भारतातच जास्त आहे; परंतु जसं इस्राइलने केलं. १०० टक्के शेती फक्त ठिबक सिंचनाखाली आणली. त्याप्रमाणे इतरही दोन देशांनी तसा उच्चांक गाठला आहे; परंतु ते लहान देश आहेत, त्यामुळे त्यांच्या देशात त्या प्रमाणात लागू करणं त्यांना सहज शक्य झालं.

भारतात त्यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक प्रचंड स्वरूपाची होईल. आज

नाही तर उद्या मात्र आपल्याला हे करावंच लागणार आहे. त्यासाठी आपल्याला कायदाही करावा लागणार आहे की ठिबक कम्पलसरी वापरलंच पाहिजे. म्हणजे जिथे एक कालवा आहे आणि कालव्याचे क्षेत्र जर त्याठिकाणी, त्याच्या कमांड एरियामध्येही येत असलं तरी तिथेसुद्धा सिरॅमिक्स आणा. आपण सक्तीने ठिबक सिंचन वापरा असं सांगू शकू आणि तसं जर आपण सांगू शकलो तर तेवढं पाणी वाचेल पर्यायानं अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल.

इतरांना ते देता येईल. त्याहीपेक्षा दिलं किंवा नाही दिलं याचं महत्त्व नाही. मुळात प्रश्न निम्म पाणी द्यायला पाहिजे, मोजून पाणी द्यायला सुरवात करा. मोजून पाणी जर दिलं आणि ठिबक सिंचनाच्या पद्धतीने ते वापरा हा जर विचार मांडला तर ते जमते. मुळात प्रश्न असा आहे की शासनाजवळ ही एवढी मोठी यंत्रणा हे सगळं करण्यासाठी नाही. जरी यंत्रणा असली तरी खऱ्या अर्थाने जी शेतकऱ्याला भांडवली गुंतवणूक करावी लागते त्यादृष्टीने तो सक्षम नाही. त्याची स्वत:ची शेती त्यासाठी त्याला गहाण ठेवावी लागते, तेव्हा त्याला बँकेचं ५० टक्के कर्ज मिळते.

कर्ज मिळविण्यासाठी शेतकऱ्याला हे सर्व करावं लागतं. ते त्याला करणं शक्य नसतं. त्याने जरी ५० टक्के पैसे भरायचे ठरवले तरी तो भरू शकेल का? तो तर आधीच थकबाकीदार असतो. त्यामुळे त्याला कर्ज मिळूच शकत नाही. म्हणजे इच्छा असून तो घेऊ शकत नाही, इच्छा असूनही शासन देऊ शकत नाही. आमची तर खूपच इच्छा आहे, माझं तर आयुष्यच त्यात गेलंय, की हे सगळं भराभर करावं; परंतु असं ते घडत नाही, पण हळूहळू घडणार आहे आणि त्याचा वेगही खूप वाढणार आहे. यात मात्र कुठेच शंका नाही, ती काळाची गरज आहे.

**श्री. पप्पू –** भाऊ, एक शेवटचा प्रश्न, पाण्याची बचत आपण शिकवली. ती काळाजी गरज होती आणि आहेही. विजेची बचत समजावण्यासाठी तुम्ही सोलरच्या क्षेत्रातसुद्धा मोठ्या प्रमाणात काम करता. सोलार शेतीपंप जे खूप समृद्ध आहेत, अशा शेतकऱ्यांना जर आपण दिले तर त्यातून विजेची बचत होऊ शकेल असा विचार करावा, असं वाटतं काय?

**भाऊ –** मूळ प्रश्न बघा, की सोलरपंप ही संकल्पना काही नवीन नाही. याच्या आधीही सोलरपंप चालू आहेत. शासनाने एकेकाळी सोलर पंपांसाठी जवळजवळ ८० टक्के अनुदानही दिलं होतं. असे पंप खूप विकलेसुद्धा गेलेत. सुमारे १० ते १५

वर्षांपूर्वी परंतु त्यानंतर लाख लाख रुपये एका पंपाला लागतात असं कळलं किंवा दिसलं त्या वेळी शेतक-यांनी स्वत:ची जी काही रक्कम टाकून गुंतवणूक करायची त्यादृष्टीने त्याची तयारी नव्हती, म्हणून त्यांनी ते बंद केलं, आज ते परवडत नाही. दुसरं म्हणजे त्याला मर्यादा आहेत.

सर्वसाधारणपणे त्याचां जो हेड आहे तो वीस-तीस फुटांच्या वर असला तर तो चालू शकत नाही. त्याला खाली बसवावं लागतं. त्याला मेंन्टेनन्सचे प्रॉब्लेम आहेत, तेव्हा सोलर हे व्यावहारिक झालेलं नाही. जिथे व्यावहारिक झालेलं आहे तिथे मात्र त्याचा उपयोग करणं क्रमप्राप्त आहे. उदा. जिथे वीज मिळतच नाही, तिथे काय करणार? तर तिथे सोलरशिवाय पर्याय नाही. तेव्हा अशा ठिकाणी सर्वसाधारणपणे दिवसभरात २० तासांत एक लाख लिटरपर्यंत पाणी सोलरपंपाने मिळू शकतं.

आजही असे सोलरपंप उपलब्ध आहेत, तेव्हा शेतकरी त्याचा पूर्णपणे उपयोग करू शकतात. जरी वीज नसली आणि दिवसा जर पाणी द्यायचे असेल तर ते या गोष्टीमुळे शक्य होईल. ठिबक वापरल्याने विजेचीही बचत होतेच. सर्वसाधारणपणे पाट-मोकाट पद्धतीने शेतकरी दुप्पटच पाणी देतात आणि त्याच्यासाठी दुप्पट वीज वापरतात. ठिबकनं निम्मंच पाणीच लागतं. त्यामुळे वीजही निम्मी लागते आणि वीज तर व्यवस्थितरीत्या मिळाली पाहिजे, वीज मिळाली तर हा प्रश्नच येत नाही; परंतु आजच्या घडीला हे फार महागडं पडतं म्हणून सोलरचा प्रसार व्हावा तेवढा झालेला नाही. पण ठरवले तर अशक्य असे काहीच नाही.

धन्यवाद!

**मुलाखतकाराने केलेला समारोप-**

अशक्य हा शब्द अ-शक्य अशा अर्थाने घ्यावा. नाही हा शब्दच ज्यांच्या डिक्शनरीत नाही, जे सतत सकारात्मकच विचार करीत असतात असे भाऊ अशक्य बाबी शक्य करून दाखवतात. प्रत्येक गावात एकदिलाने आपण काम करू शकू, असा आत्मविश्वास भाऊ सर्वांमध्ये निर्माण करतात. इम्पॉसिबल या शब्दाच्या स्पेलिंगमधून आय.एम. पॉसिबल - 'हे मला शक्य आहे' असा संदेश ते देतात. तसा दृढविश्वास लोकांमध्ये पेरणाऱ्या भाऊंचे पुन्हा एकदा अभिनंदन!






# रम्य ते बालपण!

'कॅमलिन'साठी श्राव्य रेडिओ मुलाखत
– सुधीर गाडगीळ – १७.१२.२००७

*'बाळाचे पाय पाळण्यातच दिसतात' असं म्हटलं जातं; परंतु तसं असतंच असं नाही. आज भवरलालजी एक यशस्वी व नामवंत उद्योगपती म्हणून लोकांना माहिती आहेत. म्हणजे त्यांचा पिंडच तसा असणार, ते तशाच रीतीनं 'घडवले' गेले असणार, असं गृहीत धरलं जातं. आजचं त्यांचं मोठेपण त्यांच्या बाल्यात शोधायचा म्हणा वा ते बाल्यावर लादण्याचा प्रयत्न होतो.*

*अगदी घट्ट अशा खेडवळ वातावरणात, शेतकरी कुटुंबात वाढलेले भवरलालजी त्यांच्या खेडवळपणाचं, गावरानपणाचं भांडवल करणं नाकारतात. भाऊंचं यश हे त्यांच्या उपजत हुशारीत, कष्टात, चतुरस्रपणात आहे. बालपणातल्या आठवणीत ते मनोमन रंगून जातात. ज्यांना त्या वातावरणाचा अनुभव असेल, त्यांना या आठवणी स्वत:च जगल्याचा अनुभव नक्कीच येईल. मात्र, भवरलालजींच्या पारदर्शी प्रामाणिकपणाला दाद द्यायलाच हवी.*

**श्री. गाडगीळ –** कोणी पाहुणे घरी आले, की मुलांना एक प्रश्न कोणत्याही घरात विचारला जातो तो असा, ''अरे, तू मोठेपणी कोण होणार?'' असा प्रश्न भाऊ तुम्हालाही विचारला गेला असेल. अशा प्रश्नाला आपण काय उत्तर देत होता?

**भाऊ –** स्पष्टपणे तसं मला आठवत नाही; परंतु एक गोष्ट नक्की आहे, की मला तेव्हा उपमा त्या वेळी दिली जात होती की 'आला कुठला बाजीराव?' हा संदर्भ थोरल्या बाजीरावांचा होता. म्हणजे त्यांच्यासारखा योद्धा व्हायला पाहिजे आणि याची का एवढी ऐट? त्याच्याएवढं शौर्य आपल्याला गाजवता यायला पाहिजे.

ज्या क्षेत्रात आपण जाऊ तिथे तसं आपण काम करू शकलो पाहिजे असं कदाचित त्यातून ध्वनीत होतं. दुसरं असं मी स्वत: माझ्या मनामध्ये जे चित्र निर्माण केलं होतं की 'काय व्हावं?' तर डॉक्टर व्हावं असं मला वाटत होतं. कारण, तोपर्यंत मी काही न्यायालय पाहिलेलं नव्हतं. जळगावलाच आलेलो नव्हतो. त्यामुळे कोर्ट पाहण्याचा काही प्रसंग आलेला नव्हता.

वकिली हा पेशा तेवढा जवळून माहिती नव्हता. तेव्हा 'कुठला आला मोठा जिल्हाधिकारी?' हे शब्द जरी



ऐकून होतो तरी जिल्हाधिकाऱ्याला कधी पाहिला नव्हता. त्यामुळे ज्याला पाहिलं तो माणूस फक्त डॉक्टर होता.

कधीतरी तो आमच्या खेड्यात यायचा तेव्हा त्याचा तो स्टेथस्कोप आणि त्याचे ते पांढरे कपडे पाहून जरा मला बरं वाटायचं. मला वाटायचं डॉक्टर व्हावं. असा त्याकाळचा आदर्श माझ्या डोक्यात ठाम बसला. मात्र त्यानंतर मला आठवत नाही की मला काहीतरी व्हावसं वाटलं! जे काही घडत राहिलं ते मनापासून करत राहिलो.

**श्री. गाडगीळ –** भाऊ, आपला जन्म कोठे झाला?

**भाऊ –** माझा जन्म जळगाव जिल्ह्यात, जामनेर तालुक्यात अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेल्या वाकोद या खेडेगावात झाला. अजिंठ्याच्या डोंगरातून येणारी वाघूर नदी वाकोदला येते. निजामशाही म्हणजे हैदराबाद राज्य आणि मुंबई राज्याच्या सीमेवर असणार हे गाव. निजामशाहीची दहशत. अत्यंत हिस्त्रं असे लोक. गावात भीतीचं वातावरण असायचं. १८९६ ला राजस्थानातून माझे पूर्वज ११४ वर्षांपूर्वी जामनेर तालुक्यातल्या वडाळीला आधी आले. १९१५ ला वडाळी सोडून वाकोदला येऊन स्थिरावले.

**श्री. गाडगीळ –** भाऊ, आपलं शिक्षण तेथे किती झालं?

**भाऊ –** माझं शिक्षण चौथीपर्यंत त्या खेड्यात झालं. जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा होती. कधी चावडीवर भरायची तर कधी धर्मशाळेत भरायची. काही वर्षांनंतर स्वतंत्र शाळा म्हणून ती पुढे आली. त्या शाळेत नेहमीप्रमाणे इतर सर्वसाधारण मुलांचं जसं खेडयात शिक्षण होतं तसं त्या शाळांमध्ये माझं शिक्षण झालं.

**श्री. गाडगीळ –** चौथीनंतर आपलं शिक्षण कुठे झालं?

**भाऊ –** माझ्या चौथीनंतरच्या वर्षी मात्र वाकोदला एक दरोडा पडला होता. तो दरोडा पडल्यामुळे तिथली जी काही सधन म्हणा किंवा सर्वसाधारणपणे सधन म्हणा आणि त्यातल्या त्यात अल्पसंख्याक लोक होते त्यांना असं वाटायला लागलं की इथे सुरक्षितता नाही. त्यामुळे इथून स्थलांतरित व्हायला पाहिजे, पण तसे काही झाले नाही.

माझ्या परिवाराने मात्र मला जळगावला एक खोली घेऊन एका चाळीच्या घरात राहण्याची व्यवस्था केली. १२ की १४ रुपये महिना भाड्याची ती जागा शाळेच्याजवळच होती. चित्रा टॉकीजच्या बाजूची मराठी शाळा नंबर ३ तिथे माझं

चौथी ते सातवी असं शिक्षण झालं. त्यानंतर आठवीपासून त्या वेळची न्यू इंग्लिश स्कूल ही शाळा म्हणजे आजचं आर. आर. हायस्कूल, त्या माध्यमिक शाळेत मॅट्रिकपर्यंतचं माझं शिक्षण झालं.

**श्री. गाडगीळ –** भाऊ, शाळेत तुमच्या लक्षात राहिलेले शिक्षक कोणते?

**भाऊ –** प्रत्येक शाळेत जे शिक्षक असतात ना त्यांच्यापैकी एक-दोन शिक्षक तरी हमखास लक्षात राहतात. माझ्या वाकोदच्या शाळेत संपतगुरुजी होते, काय भयंकर कडक माणूस हो! अगदी सडपातळ आणि दहशत वाटावी अशी ती मूर्ती, पण अक्षर एवढं सुरेख आणि टपोरं की अक्षरावर माणसाने भाळून जावं! एकदा मला एक गणित काही केल्या जमत नव्हतं म्हणून ते माझ्यावर खूप रागावले. ते म्हणाले, ''तू मारवाडी असून तुला गणित येत नाही रे? अरे ही लांछनास्पद गोष्ट आहे!'' मी सरांना सांगितलं, 'सर, खरं आहे की मी मारवाडी आहे, पण मला असं वाटतं की गणित न जमणारे माझे काही मित्र मात्र मारवाडी नाहीत. हा गणित विषय काही मला जमलेला नाही.'

गणित सोडवता आलं नाही म्हणून त्यांनी त्या चार वर्षांच्या काळामध्ये मला एकच वेळा शिक्षा केली. मला त्यांनी तासभर उभ ठेवलं. तिथं ताठे गुरुजी नावाचे शिक्षक होते. ताठे गुरुजींचं अक्षरसुद्धा फारच सुंदर, मोत्यासारखं. ताठे गुरुजी म्हणजे अगदी वेगळ व्यक्तिमत्व होत. ते स्वत: बिनापैशांनी शिकवण्या करीत होते. त्यांची एक चक्की होती शनिपेठेत. त्या चक्कीवर मला बोलावून ते शिकवणी देत असत.

एक दिवस त्यांना काय लहर आली कुणास ठाऊक! तो प्रसंग माझ्या आयुष्यात मी कधीच विसरणार नाही. त्यावेळेला तमाशा करणारं एक थिएटर तिथे होतं. सिनेमे वगैरे होते की नाही माहिती नाही; पण जे तमाशाचं थिएटर होतं त्याला हैदरी थिएटर म्हणत असत. त्या हैदरी थिएटरमध्ये ते चक्क मला घेऊन गेले. मी पाचवीत किंवा सहावीत असेल तेव्हा! म्हणजे अगदी कोवळा पोरगा, १०-१२ वर्षांचा. मला ते चक्क त्या हैदरी थिएटरमध्ये घेऊन गेले. तिथे काही स्त्रिया तमाशा करीत होत्या. त्या तमाशात एका बाईने चक्क माझ्याकडे येऊन माझ्या तळहातावर एक बोट खरडलं! त्याचा अर्थ मला काही त्या वेळी लागला नाही; परंतु पुढच्या आयुष्यामध्ये ५० वर्षांनंतर ज्या वेळी ती खूण माझ्या धर्मपत्नीने केली त्या वेळी मला त्याचा अर्थ काय, हे कळलं; पण तो प्रसंग मी काही विसरू शकत नाही.

आयुष्यात एक वेळा का असेना; पण हैदरी थिएटरमध्ये गेलो. तिथे जे काही पाहिलं त्याचा खोल परिणाम माझ्या मनावर झाला. ताठे गुरुजींशी मी काही संबंध तोडले नाहीत; पण ताठे गुरुजींविषयी एक आदर्श शिक्षक म्हणून माझा जो एक मनातला भाव होता तो मात्र उरला नाही. त्यांनी असल्या भलत्या ठिकाणी न्यायला नको होतं असं प्रकर्षानं मला जाणवलं.

**श्री. गाडगीळ –** शाळेत कुठले विषय तुम्हाला आवडायचे?

**भाऊ –** अहो, शाळेचं काय विचारता? मला बीजगणित, भूमिती आणि तत्सम विषय त्याचा काहीच गंध नव्हता. ते काही जमतच नव्हतं! तुम्हाला आता मी जे सांगणार आहे त्याचं आश्चर्य वाटेल. मी दहावीला गेलो त्या वेळी एका हिंदीच्या परीक्षेला बसलो. टिळक विद्यापीठ मराठीच्या परीक्षा घ्यायचे. राष्ट्रभाषा प्रचार समिती हिंदीच्या परीक्षा घेत असे, इंग्रजीच्या परीक्षासुद्धा बाहेरुन घेतल्या जात होत्या.

मला आठवतं. आमचे राव सर भूगोल शिकवणारे होते, लहान लहान मिशा होत्या त्यांना. ते आणि मी आम्ही दोघे हिंदी परीक्षेला कोविदला बसलो होतो. निकाल आले. राव सरांपेक्षा मला जवळपास २६ गुण जास्त पडले. त्यामुळे 'गुरुसे चेला सवाई' असं सूचनाफलकावर राव सरांनी स्वत:च्या सहीने एक पत्र लावलं होतं. ''माझ्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या या विद्यार्थ्याचं मला कौतुक करावंसं वाटतं,'' असे त्यांचे भावोद्गार त्या फलकावर लिहिलेले, आजही मला आठवतात. दुसरा एक माझ्या आवडीचा विषय म्हणजे इंग्लिश! इंग्लिशला लांडगे सर होते. ते लांडगे सर त्या काळात शिकवण्या घेत नव्हते. शिकवण्या घेतच नव्हते आणि म्हणून घरी कोणाला बोलवतही नव्हते.

लांडगे सर म्हणजे एकदम जाडजूड, धिप्पाड अशी देहयष्टी आजही माझ्या डोळ्यांसमोर आहे. लांडगे सरांनी एकदा उत्तरपत्रिका वाटायला सुरवात केली. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे ते फक्त नंबर पुकारत असत. १११, ११७, १२०, १२१ तर माझा १५१ असा काहीतरी नंबर होता, एकूण २०० की २५० नंबर होते. तर त्यांनी सगळ्यांच्या उत्तरपत्रिका दिल्या आणि माझी उत्तरपत्रिका मात्र त्यांनी दिलीच नाही! त्या वेळची जी पद्धती होती ती अशी, की ज्यांनी कॉपी केली असेल किंवा काहीतरी गोंधळ घातला असेल अशा विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका मागे ठेवायचे, सर्वांत शेवटी त्यांच्याशी बोलायचं!

मला धडधड व्हायला लागलं, की आपली चूक तरी काय झाली असेल? आपला पेपर का नाही मिळाला? तर लांडगे सरांनी तो पेपर राखून ठेवला आणि म्हणाले ''हा नंबर कोणाचा रे? १५१ नंबर कोण?'' जसं कैद्याला बोलावतात ना १५१? तर मी लगेच ताडकन उभा राहिलो. ते म्हणाले, ''भवरलाल तुझा पेपर आहे?'' म्हटलं, 'सर, १५१ नंबर माझा आहे.' ते म्हणाले, ''हे बघ, तुला माझ्या हातून ७२ मार्क मिळालेले आहेत.'' १०० पैकी ७२ त्या वेळेला! हल्ली जसा मार्कांचा पाऊस पडतो तसा त्या वेळी पडत नसे! ९४, ९६, ९७ भाषेतसुद्धा असे गुण आता मिळायला लागलेत, पण आमच्या वेळी इतर सगळं स्वस्त जरी असलं तरी एवढं गुण मिळवणं मात्र महागडं होतं, कठीण होतं. ७२ गुण इंग्लिशसारख्या विषयात मिळवणं म्हणजे दिव्यच होतं.

लांडगेसर नंतर मला म्हणाले, ''अरे भवरलाल, मी शिकवण्या घेत नाही, पण तू उद्यापासून एक महिनाभर माझ्याकडे शिकवणीसाठी यायचं. तुझ्याकडून मी कोणतीही फी घेणार नाही, एक तासाच्या वर तुला बसू देणार नाही; पण जर पाच मिनिटे लेट झाला ना तर त्या दिवशी तुला आत घेणार नाही लक्षात ठेव. पाच वाजता यायचं.'' म्हटलं, 'ठीक आहे सर, येतो.' म्हणाले, ''बघ, माझ्या हातून तुला ७२ गुण पडले. बोर्डात असा माणूस अजून जन्माला यायचा आहे, की तो यापेक्षा तुला कमी गुण देऊ शकेल. जर मिळालेच तर ७४ मिळतील.''

मला सांगायला आनंद वाटतो, की लांडगे सरांचं ते भाकीत खरं ठरलं. त्या काळी सत्तराच्या वर गुण विशेष श्रेणी असायची. दोन विषयात मला विशेष श्रेणी मिळाली. इंग्रजीत ७४ गुण मराठीत ७२ गुण मिळाले. म्हणजे या दोन विषयांत विशेष श्रेणी मिळाली.

हिंदी हा विषय त्या वेळी सक्तीचा नसल्यामुळे तो पेपर देण्याची आवश्यकता नव्हती. थोडक्यात तुमच्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं झालं तर मला भाषेबद्दल विलक्षण प्रेम होते आणि आवडही होती. मला हे अभ्यासातलं गणित वगैरे काही जमलं नाही, पण मला वाटतं आयुष्याचं गणित जमलं! जरी ते गणित शाळेचं जमलं नसलं किंवा महाविद्यालयामधलं जमलं नसलं तरी आयुष्याचं गणित बऱ्यापैकी जमल आहे. म्हणून मागे वळून पाहता तसं काही निराश होण्याचं कारण नाही.

**श्री. गाडगीळ –** तुमच्या बरोबर असलेले शाळेतले काही मित्र लक्षात आहेत का? त्यांच्याबरोबरचा एखादा किस्सा किंवा कधी तुम्ही सहलीला गेला होता अशी काही आठवण सांगता येईल का?

**भाऊ –** मित्राची तशा पुष्कळ आठवणी आहेत; पण त्याच्यापैकी एक सांगतो. माझा एक वाकोदचा मित्र शिवाजी पाटील, माझ्याच वयाचा, तो एके दिवशी खोलीवर आला आणि म्हणाला, ''भवरलाल, मी उद्यापासून वाकोदला जाणार आहे.'' म्हटलं, ''कशासाठी जाणार आहे?'', ''मी ठरवलंय हे शिक्षण वगैरे काही आपल्याला नको आणि माझ्याकडून काही झेपवलं जात नाही. मी आपला घरी बसणार आहे.'' म्हटलं, ''बघ, तू घरी बिरी काही बसू नको, तुझ्याकडे दोनच पर्याय आहेत, एकतर शिक्षण घे, नाहीतर गुराखी हो. तेव्हा तुला जर गुराखी व्हायचं असेल, बैल आणि म्हशी वाळायच्या असतील तर मग तू घरी जाऊन बैस, नसेल तर शिक्षण घे. कारण, शिक्षणाशिवाय चालणार नाही.''

दिवसभर मी माझी शाळा बुडवून त्याच्याजवळ बसून राहिलो आणि शेवटी त्याचं मनपरिवर्तन करून त्याला शाळा सोडू दिली नाही. आयुष्यभर ती आठवण लक्षात ठेऊन, परवा माझ्या वाढदिवसाला शुभेच्छा पाठवताना त्याने ती आठवण उजळवली. अनेक आठवणी आहेत; परंतु ही जी आठवण आहे ही दोन गोष्टी सिद्ध करते.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असं म्हणतात ना त्यातला तो भाग आहे. म्हणजे हे जे नेतृत्वाचे गुण आहेत त्यापैकी तो एक गुण होता. आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे दुसऱ्यासाठी थोडंसं झिजायला पाहिजे. एक दिवस आपण आपली शाळा बुडवून आपल्या गावच्याच मित्राने, शाळा सोडू नये याच्यासाठी हट्ट धरून बसणं आणि त्याला पटवून ते त्याच्या गळी उतरवणं – यात एकतर वकिली हाही एक भाग आहे, शेवटी मी वकील झालोच! दुसरं म्हणजे दुसऱ्यासाठी थोडंफार झिजायची जी काही एक मनाची तयारी आणि सवय असते ती त्या वेळेला स्पष्ट झाली. असं मागे वळून पाहताना मला वाटतं.

**श्री. गाडगीळ –** तुम्ही लहानपणी खेळात भाग घ्यायचे का? किंवा ज्याला छंद म्हणतात असे काही छंद तुम्हाला होते?

**भाऊ –** एक लक्षात घ्या, की छंद वगैरे सगळं करायला वेळ कुठे आहे हो? कुठे तरी उकिरडयावर जायचं, तिथे प्रातर्विधी आटोपायचा, त्यानंतर घरी यायचं, नंतर शाळेत जायचं, आंघोळ करायचीच नाही, आंघोळ करायची तर चोरून मारून नदीवर जायचं. तेथून येऊन डोळे लाल झाले असतील तर डोळे कसेबसे सूर्याकडे बघून पांढरे करायचे म्हणजे घरी मार बसणार नाही. या सगळ्या क्लृप्त्या करता करताच नाकीनऊ यायचे. त्यानंतर अभ्यास करायचा.

आम्हाला तुमचे छंद वगैरे शब्द ते सगळे परदेशी, ग्रीक, लॅटीन, असे वाटतात. मुळात खेड्यापाड्यामध्ये आम्ही काय खेळू शकत होतो? तिथे कुठे मैदान होते? कुठे क्रीडांगणे होती? आणि आम्ही खेळून काय खेळू शकत होतो? एक भवरा किंवा गोट्या खेळत होतो आणि विटी-दांडू खेळत होतो. हे तीन आमचे त्या वेळचे खेळ होते.

क्रीडांगणाची, इतर कोणत्याही सुविधेची ज्याला आवश्यकता नाही, तोच आमचा खेळ! हल्ली खेळांच्या विविध प्रकारांना बरीच मोठमोठाली नावं द्यायला आपण शिकलो आहोत.

आजही खेड्यांमध्ये तुम्ही सांगता किंवा विचारता तशी परिस्थिती नाही. ग्रामीण जीवन अजूनही काय आहे आणि कसं आहे हे शहरी, महानगरीय वातावरणात राहणाऱ्यांना कसं ठाऊक असणार?

**श्री. गाडगीळ –** छंदासारखंच वाढदिवसांचं वेडही आजकाल जिकडेतिकडे आहे शहरांमध्ये! तुमच्या वेळी अशा पद्धतीचा वाढदिवस साजरा केला जात होता की नाही? वाढदिवसाच्या दिवशी डब्ब्यातून काही शाळेत घेऊन जात होतात का?

**भाऊ –** वाढदिवस वगैरे कधी नाही. आम्ही आमच्या मुलांचेसुद्धा वाढदिवस कधी साजरे करू दिले नाही. निदान माझ्यापुरतं बोलायचं झालं तर पहिल्या मुलाचा वाढदिवस साजरा करायचं त्याच्या आईने ठरवलेलं होतं. मी घरी आल्यानंतर तिने मला सांगितलं, की ''मी आज काही मुलांना बोलावलेलं आहे; कारण अशोकचा हा पहिला वाढदिवस आहे.'' मी म्हणालो होतो, ''मोठा झाल्यानंतर त्याचा वाढदिवस लोकांनी साजरा करावा आणि त्यांनी शुभेच्छेची फुलं त्याला आणून द्यावीत हे योग्य होईल, पण आपल्याला अफलातून आनंद झाला किंवा शिवाजी झाला असं समजून

आपण त्याचा वाढदिवस साजरा करायला सुरवात करायची, यात मला तरी काही तथ्य दिसत नाही.'' त्या दिवसापासून आमच्या घरात वाढदिवस ही पद्धत बंद झाली.

एक पंचाईत मात्र पुढे व्हायला लागली. वेगवेगळया चार घरातून चार सुना आलेल्या होत्या. नातू म्हटलं म्हणजे आमच्या मारवाडींमध्ये 'मुद्दलापेक्षा ब्याज प्यारा' असं म्हणतात. म्हणजे मुद्दल नाही आलं तर चालेल पण मारवाडयाला ब्याज मिळालं पाहिजे, तर नातू म्हटलं म्हणजे तो ब्याज आहे, मुद्दल म्हणजे पोरगा आहे. तर पोराचं नाही केलं कौतूक तर ते ठीक आहे, पण  निदान आता नातवंडांच तरी करावं, असा हट्ट माझ्या धर्मपत्नीनं धरला.

**श्री. गाडगीळ –** तुमचं कधीच नाही झालं कौतुक? तुम्ही लहान असताना?

**भाऊ –** माझ्या कौतुकाच तर काही विचारूच नका! मला नाही वाटत, काही विशेष करायचं उरलं होतं त्यावेळी. माझ्या नातवंडापर्यंतसुद्धा मी काही चालू दिलं नाही. केवळ हट्टच चालू दिला नाही असे नाही. त्यानंतर मी असा विचार केला, की सर्वसाधारणपणे भेट देणे आणि इतरही ज्या काही सगळ्या पद्धती आहेत. त्या आपण थांबवायला हव्यात. त्याचं कारण असं आहे, की जो माणूस किंवा जो मुलगा गरीब आहे, जो भेट परत देऊ शकत नाही, त्याच्या मनात एक न्यूनगंड निर्माण होतो.

कुणाच्याही मनात न्यूनगंड जर निर्माण होऊ द्यायचा नसेल, तर आपण भेट घेऊन जाऊ नये, त्याच्याकडून भेट घेऊ नये आणि आपण जर खऱ्या अर्थाने धनाने, मनाने, संस्काराने मोठे असू तर त्या दिवशी जेवढे पैसे वाढदिवसावर साजरे करायचे आहेत तेवढ्या पैशात ठोस, चांगले सामाजिक काम करावे. रिमांड होममध्ये जाऊन किंवा मूक-बधिरांच्या शाळेत जाऊन, अंधांच्या शाळेत जाऊन ज्या नातूचा वाढदिवस आहे त्याच्या हातून तिथल्या विद्यार्थ्यांना जे ठरलेलं आहे ते देत असतो. त्या मुलांना जेवणही देतो. नातवंडांच्या मनातला करुणाभाव, ओलावा कायम जागरूक राहायला हवा. त्यांच्यावर देण्याचे संस्कार झाले पाहिजे, त्याला चांगुलपणा समजला पाहिजे, दातृत्वाची वृत्ती लहानपणापासूनच वृद्धिंगत झाली पाहिजे, असा माझा त्यामागील विचार आहे.

आम्ही नातवंडांचे जे वाढदिवस साजरे करतो ते अशा पद्धतीने करतो. आमचा तर त्याही वेळेला केला नाही आणि आताही करत नाही. सत्तरी पार केली पण

कोणताच कार्यक्रम मी होऊ दिला नाही. एखादा मोठा कार्यक्रम साजरा करण्याविषयी खूप मोठा आणि प्रेमाचा दबाव आहे. तुमच्यासारख्या सगळया शुभेच्छुक मंडळींना असे वाटत असते, की एकदा तरी भाऊंचा वाढदिवसानिमित्त सत्कार व्हायला पाहिजे; पण अजून काही मनाला पटलेलं नाही की आपण आपला वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरा करावा!

इतरांचा जरूर करावा. जर शक्य असेल तर इतरांनी करावा नां! करतातच म्हणा. जवळपास हजार लोक तरी येतात, मला भेटतात, शुभेच्छा देतात. काही एस. एम. एस. करतात, काही फोनवर सदिच्छा व्यक्त करतात. देश-विदेशातून पत्र येतात. या सद्भावनांमुळे खूप आनंद होतो. तो दिवस मात्र त्याच एका कारणाने गजबजून जातो हे खरं आहे; पण मी हे साजरं वगैरे करण्याच्या भानगडीत काही पडत नाही. तुम्ही काही म्हणा, त्या अर्थाने तुम्ही आम्हाला गावंढळच समजा!

**श्री. गाडगीळ–** मघाशी भाऊ तुम्ही तमाशाची जी आठवण सांगितली, तेव्हा ती घटना तुम्ही तुमच्या घरी आई-वडिलांना सांगितली होती की नव्हती? आई-वडिलांची काय प्रतिक्रिया होती त्या वेळेला?

**भाऊ –** नाही, आई-वडील येथे जळगावात नव्हतेच. आई-वडील तर खेड्यावरच होते. मी एकटा आणि माझ्या काकू असे राहत होतो. त्यामुळे कोणाला सांगण्याचा तसा काही प्रसंग आला नाही आणि त्या घटनेने मी काही असा विचलित झालो नाही; परंतु माझ्या मनाला ती घटना पटली नाही. हे असं आपण आपल्या आयुष्यात काही करावं किंवा नाही? ते सगळं बघावं तरी कशासाठी?

तरुणपणी एक विचार हमखास मनात येतो, की प्रत्येक गोष्टीचा एकदा तरी अनुभव घ्यावा. थोडंसं पुढे जाऊन मला असं वाटलं, की विषाचा अनुभव का घेऊ नये? पण असं कधी होईल का? असले अनुभव घेऊन आपलं कल्याण होणार आहे का?

चांगल्या गोष्टीचं अनुकरण जरूर करावं, बाकीचं सोडून द्यावं. मी चौथ्या-पाचव्या रांगेत होतो. त्यामुळे फक्त तिने येऊन माझ्या हातावर जी काही खूण केली तेवढीच मला आठवते आहे. त्या घटनेचा पुढे काही ऊहापोह झाला नाही; पण ती घटना माझ्या लक्षात आहे. तुम्ही आज प्रश्न विचारला म्हणूनच ती घटना माझ्या

तोंडून निघते आहे.

**श्री. गाडगीळ –** आई–वडिलांच्या हातून तुम्ही कधी रट्टा खाल्ला होता का?

**भाऊ –** अरे! रट्ट्याचं काय बोलता राव? रट्टा असा खाल्ला की आयुष्यभर विसरणार नाही! म्हणजे मरेपर्यंत विसरणार नाही. आमच्याकडे आठवडे बाजार असे. शनिवारी गावाची जत्रा जशी असते तसा बाजार. आजूबाजूच्या खेड्यातून आणि शहरातून व्यापारी लोक तिथे येऊन आपला माल विकायचे. भाजीपाला कपडा, धोतरजोडा अशी काही खरेदी करायची असेल, बैल घ्यायचा असेल, कोणतीही वस्तू खरेदी करायची असेल किंवा विकायची असेल तर तो खरेदी–विक्रीचा व्यवहार त्या बाजारात व्हायचा. तेव्हा अशा आठवडे बाजारामध्ये मी माझ्या चुलत्यांबरोबर फिरत होतो.

पोळ्याचा दिवस जवळ येत होता, ग्रामीण भागात बैल हे फारच मोठं प्रस्थ आहे आणि तो त्यांचा अतिशय महत्त्वाचा, कृतज्ञतेचं मूल्य पाळणारा सण आहे. त्याच वेळी त्या बाजारामध्ये भवरे खूप आलेले होते विकायला. एक ढीगच्या ढीग भोव–यांचा होता, म्हणजे जसा एक डोंगरच! मला वाटतं पाच–सहाशे भोवरे तरी तेथे असतील. ते रंगीबेरंगी भोवरे आणि ढीग पाहून माझं मन काही राहावलं नाही. मी त्यातला एक भोवरा खिशात टाकला.

चलाख तर मी होतोच म्हणा; पण ही चलाखी जरा चुकीच्याच ठिकाणी वापरली. तो भोवरा मी खिशात टाकलेलं माझ्या चुलत्यांच्या लक्षात आलं. चुलत्यांनी मला काही सांगितलं नाही. घरी पोहोचेपर्यंत ते काहीच बोलले नाही. घरी पोहोचल्यानंतर माझ्या आईच्या कानावर त्यांनी ती घटना टाकली. आईने मला विचारलं, ‘‘तू भोवरा आणला आहे का?’’ मी उत्तर दिलं, ‘‘हो, आणला आहे.’’ आई म्हणाली, ‘‘तू तो भोवरा विकत घेतला होता का?’’ जे खरं होत तेच मी सांगितल. मी प्रामाणिकपणे आईला म्हणालो, ‘‘नाही’’ तिला खूपच वाईट वाटत होतं. ती म्हणाली, ‘‘भवरू, तू चोरी केलीस?’’ मी रडवेल्या स्वरात म्हणालो, ‘‘हो’’ आई त्या वेळेला स्वयंपाकघरातच जाणार होती आणि स्वयंपाक करण्यासाठी लाकडं आणि गोवऱ्या पेटवून ती चूल सुरू करावी लागे. म्हणून तिच्या हातात फुंकणी होती. फुंकणी म्हणजे बांबूला छिद्र पाडलेली बासरीच्या पद्धतीची फुंकणी होती. त्या फुंकणीने तिने मला मागच्या घरात नेऊन मारायला सुरवात केली.

माझ्या पाठीवर वळ उमटले. जवळपास रक्त आल्यासारखं झालं. पाठीवरचे वळ तर काही दिवसातच मिटले; परंतु तिने त्या काळी दिलेले प्रामाणिकपणाचे जे धडे होते ते धडे आणि त्या वळाचे जे बळ आहे ते आजही कायम आहे. लाडक्या लेकराला एवढं मारल्यानंतर आईला झोप तरी येईल का? माझी आई रात्रभर झोपली नाही, रडतच राहिली. तशीच निराश बसून राहिली. उठली, माझ्या जखमांवर हळद आणि तेल लावलं. खूप खूप रडली.

मला तिने यानिमित्ताने जो धडा दिला आयुष्याच्या वाटचालीत त्याच्यापेक्षा जास्त गंभीर असा विषय मला कधी लक्षातच आला नाही; पण आईची ती शिकवण अजूनही मी प्रामाणिकपणे आयुष्यभर सांभाळून आहे. जर खोटं बोलायचंच असेल तर जास्तीत जास्त धर्मराजासारखं नरोवा कुंजरोवा इथपर्यंत पोहोचतो. परंतु, खोटं बोलणं जड जातं. ते माझ्या वृत्तीत आणि कृतीत बसतच नाही. म्हणूनच लोक मला 'परखड' म्हणतात. तो परखडपणा या प्रामाणिकपणातून जन्मलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे आणि माझ्या या संपूर्ण कार्यसृष्टीमागे आई उभी आहे.

**श्री. गाडगीळ –** भाऊ, त्या काळात तुमच्यासमोर आदर्श व्यक्ती कोण होती?

**भाऊ –** त्या काळात तर आदर्श असणं हे फार सोपं काम होतं. त्या काळात पं. जवाहरलाल नेहरू आणि महात्मा गांधी हे दोनच आदर्श होते. कधी अधूनमधून तुमच्यात जर आगळं चैतन्य जिवंत झालं तर त्या चैतन्यामध्ये सुभाषचंद्र बोस हे नाव असायचं, हे आमचे आदर्श होते. सिनेमा क्षेत्रातलं म्हटलं तर नादीया, जॉन कावस, भगवान हे असत. त्यानंतरच्या काळातचे आमचे ते हिरो होते आणि सिनेमाचे हिरो वेगळे. इकडे जीवनाचे नायक वेगळे असा तो एक वेगळाच काळ होता. त्या काळात निवडीला फारसा वाव नव्हता. पण त्यावेळी निदान काहीतरी निवड तरी होती, आज तर तीही शिल्लक नाही असं माझं म्हणणं आहे. आज आदर्शच जर शोधायचा झाला तर, मला पर्याय शोधायला पाहिजे असं म्हणावं लागेल. त्यावेळी पर्याय कमी होते, पण निदान निवडीचे भान तरी होते, आज तेही दिसत नाही.

**श्री. गाडगीळ –** तुम्ही ज्यांना जीवनातले नायक म्हणालात त्यांना कधी ऐकण्याचा किंवा भेटण्याचा प्रसंग आला होता काय?

**भाऊ –** जवाहरलाल नेहरू हे आमच्या वाकोदला येऊन गेले होते. अजूनही माझी आई आणि बहीण जवाहरलाल नेहरूंचं दर्शन घेता यावं म्हणून मला डोक्यावर

घेऊन रांगेमध्ये उभे आहेत असं चित्र माझ्या डोळ्यांसमोर जसंच्या तसं आहे. देखणा माणूस. अजिंठ्यावरून, औरंगाबादहून येत होता आणि जळगावला जाणार होता. त्या दरम्यान वाकोद हे गाव असल्यामुळे आम्ही सगळ्या वाकोदकरांनी त्यांना घेराव घालून रस्ता बंद केला, त्यामुळे नेहरूंना थांबावंच लागलं. हजार एक लोकांना दर्शन देऊनच ते पुढे गेले.

**भाऊ –** तुम्हाला शाळेत असताना एखाद्या सहलीचा प्रसंग आठवतो का? किंवा आगगाडीमध्ये पहिल्यांदा बसला, अशा प्रकारची एखादी आठवण?

**भाऊ –** नाही खरंच नाही आठवत. एसटीने जायला आम्हाला एक रुपया आणि चार पैसे लागायचे! अहो तेवढेसुद्धा आमच्याकडे नसायचे. त्यामुळे आम्ही कुठून जाणार? गांधीजींकडे एक प्रस्ताव दिला होता. प्रस्ताव असा होता की मुंबईपासून कोलकत्यापर्यंत जर आपण रेल्वे सुरू केली तर सर्वसाधारण सामान्य माणसालासुद्धा प्रवास करता येईल. गांधीजी नेहरूजींना म्हणाले की कोणालातरी विचारा की बाबा किती खर्च येणार आहे? त्या काळामध्ये ते म्हणाले की दोन हजार कोटी रुपये! दोन हजार कोटी खर्च करून मुंबईपासून कोलकत्त्यापर्यंत माणसाला तू पोहोचवशील. मला तुला हे विचारायचं आहे की खेड्यामध्ये अशी किती माणसं आहेत ज्यांना मुंबईहून कोलकत्त्यापर्यंत जाण्याची गरज पडणार आहे? त्या योजनेसाठी खर्च होणाऱ्या दोन हजार कोटींमध्ये सगळ्या लोकांना पिण्याचं पाणी जर मिळणार असेल तर त्यादृष्टीने त्याची काहीतरी योजना आख.

तुम्ही जे मला विचारताय की रेल्वेचा काहीतरी प्रसंग सांगा, तर त्यानंतरचे पुष्कळ सांगू शकतो, हो पण त्यावेळेला आम्हाला कसली रेल्वे? आमच्याजवळ पैसेच नव्हते नां! म्हणजे खायला-प्यायला, खाकी सदरे शिवायला पैशांची मारामार होती, तर आम्हाला कुठे हे रेल्वे वगैरे परवडणार? आमच्या नशिबात नव्हतं ते त्या काळी.

**श्री. गाडगीळ –** त्या वेळी कपडे? काय असायचे आपले?

**भाऊ –** कपडे काय हाफपँन्ट, हापचडड्ी- हाफसदरा, पांढरा सदरा आणि खाकीची चडड्ी बस, दुसरं काय असणार आणि तेवढं पुरे होतं ना!

**श्री. गाडगीळ –** तुमच्या सणांच्या दिवशी तुम्हाला नवीन काय असायचं?

**भाऊ –** सणावाराला, आई आम्हाला नवे नवे कपडे करायची. वडील तर

कधीच कोणत्याही गोष्टींची खरेदीच करीत नसत; पण आमचे एक चुलते होते राणीदानजी. ते मात्र हौशी होते. ते मात्र कसंही करून त्या दुसऱ्या चुलत्यांचा सगळ्यांचा डोळा चुकवून काही ना काही नवीन कपडे माझ्यासाठी करून आणायचे. तसा दिसायला मी त्या वेळेला खूप सुंदर होतो, गोंडस होतो. त्यामुळे नवीन कपडे जर घातले तर आणखी छान दिसायचो, आई मला नेहमी अशा काही आठवणी सांगत असे.

माझी आई मला साखरगोटी म्हणत असे. आमच्या वाकोद गावात जर मी आमच्या त्या ओट्यावर बसलेलो असलो तर रस्त्यातून जाणारा-येणारा माणूससुद्धा मला कड्यावर पटकन उचलून घेऊन जात असे. आई मग ढिंडोरा करीत फिरत असे, अरे कुठे गेला, कुठे गेला. एवढा सर्वांना भावणारा असा गोलमटोल मी होतो.

**श्री. गाडगीळ** – मला एक सांगा तुम्ही पहिल्यांदा लहानपणी रेडिओ कधी ऐकला होता का किंवा तुमच्या गावात होता का?

**भाऊ** – आमच्या गावात त्या काळात रेडिओ ऐकलेला मला काही आठवत नाही. खरं म्हणजे जळगावात पहिल्यांदा पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरूंचे १५ ऑगस्टचे १९४७ चं भाषण मी ऐकलेलं मला आठवतंय. त्यानंतर गांधीजी गेल्यानंतर नेहरूजींनी जे भाषण केलं होतं, ते ऐकलेलं मला आठवतंय, त्याआधी रेडिओशी माझा काही संबंध आल्याचं स्मरणात नाही.

**श्री. गाडगीळ** – मघाशी आपण चोरीचा किस्सा सांगितला, एखादा खोडकरपणाचा किस्सा आठवतो काय?

**भाऊ** – खोडकरपणा? नाही. मी पहिल्यापासून जरा गंभीर प्रकृतीचा आहे. त्यामुळे खोडकरपणा अजूनही काही जमत नाही. आता समयसुचकतेने आणि मनाला आतून योग्य वाटल्या तर कोपरखळया आणि शब्दांच्या कोट्या करतो. हे जमतं; पण खोडकरपणा अजून असा जमलाच नाही आणि फुलपाखरासारखं तसा असतो तर बरंच काही करू शकलो असतो; पण ती संधी गेली हो आता! एकाहत्तरी झाली. आता तशी काही संधी राहिली नाही. (हशा) त्यामुळे मला असं वाटतय की खोडकरपणाबद्दल मी काही जास्त काही सांगू शकेल असं नाही. माफ करा, म्हणजे तुमचा अपेक्षाभंग आहे तो! (हशा)

**श्री. गाडगीळ –** लहान भावंडांबरोबर कधी खोड काढली?

**भाऊ –** आधीची आठ अपत्ये गेल्यानंतर माझा जन्म आणि त्यानंतर एकच लहान भाऊ. दोनच तर होतो आम्ही. त्या वेळी प्लेग आणि मोठमोठाल्या महामारी यायच्या. त्यात कोणी जिवंतच राहत नव्हतं ना! त्यामुळे तसं काही खेळायला वगैरे वगैरे काही विशेष वाव नव्हता. त्यातल्या त्यात आम्ही मारवाडी हो!

आम्ही जर एक रुपया कमावून आणला, तर चार आणे खर्च करायचे आणि बारा आणे शिल्लक मागे टाकायचे, हे आमचं ब्रीद आहे. त्यामुळे मारवाडी लोकांकडून तुम्ही या असल्या काही अपेक्षा काही करू नका की पैसे असले म्हणजे ते स्वछंदी होऊन, काय वाटेल तसे करतील! असं काही ते करत नाही. म्हणूनच मला असं वाटतं की, ते खूप काही करू शकता!

**श्री. गाडगीळ –** भाऊ, मारवाडी रक्तातच व्यापार असतो असं म्हटलं जातं, आपण असा कधी व्यापार बालपणी केला होता काय?

**भाऊ –** हो, हो, म्हणजे आम्हाला बाळकडूच तसं मिळतं ना! ज्या वेळी आम्ही सुटीतून इकडून जळगावहून तिकडे घरी जात होतो, त्या वेळी शेंगा खरेदी करण्यासाठी माझे चुलते जात असत. ते खरेदी केलेल्या शेंगांचं पोतं खांद्यावर टाकून घ्यायचे आणि दुसऱ्या हातात एक तराजू ठेवायचे. ते शेंगा खरेदी करून घ्यायचे. मला बरोबर घेऊन जायचे.

एक एक किलो कापूस आणायचा. कधीतरी तूप असेल तर तूप खरेदी करायचे आणि तो काटा थोडासा तिरका करून वाकडा करायचा. ही सगळी हातचलाखी! हे सर्व मी अगदी जवळून पाहिलेले आहेत. व्यापारीपण जे आमच्या रक्तात असते असे जे म्हणतात, त्याला कारण हे बाळकडूच आहे नां! पहिल्यापासून ते आम्ही बघतच होतो. त्या वेळी अर्धेल असे, अर्धेल म्हणजे धान्य मोजायचं माप.

मोजताना म्हणत, एकं, दोन, तीन, असं म्हणत म्हणत ते अर्धेले भरायचे. तसं बोलता बोलता ११ झाले तरी दहाच परत बोलून दहा द्यायचे! हे असले सगळे उद्योग आमचे चुलते करायचे आणि ते माझ्या अजूनही लक्षात आहे! म्हणजे मी ते आज करतोय असं नका समजू; परंतु ईश्वरकृपेने त्याच्यावर मात करू शकलो म्हणून पूर्ण महाराष्ट्रामध्ये भवरलाल जैन हा मारवाडी असला तरी पक्का मारवाडी नाही अशीच ओळख आहे!

**श्री. गाडगीळ –** भाऊ, तुम्हाला लहानपणी शेतीची आवड होती का? कधी शेतामध्ये काम केलं होतं का?

**भाऊ –** शेतीची आवड असली म्हणजे शेतात काम केलच पाहिजे असे आहे का? शेतावर रोजच जात होतो ना. म्हणजे समजा हंगाम असला, पेरणी, कापणी, मळणी असली तर न चुकता आमचे चुलते मला बरोबरच घेऊनच जायचे. शाळा सुटली म्हणजे त्या खेड्यात दुसरे काम तरी काय? हेच काम. जेवणसुद्धा तिकडेच. कापसाची गाडी भरून संध्याकाळी त्या गाडीवर बसायचं, म्हणजे डबल डनलॉप!

खूप उंचावरून म्हणजे बारा फूट, दहा फूट, नऊ फूट! अशा त्या गाडया असायच्या उंच. त्याच्यावर आम्ही बसून चालायचो. जणूकाही आपण तिन्ही जगाचा स्वामी असंच आम्हाला वाटायचं तेव्हा! शेती केवळ आमच्या रक्तातच आहे असं नाही, अगदी रोमारोमात भरलेली आहे! म्हणून शेती आणि शेतीविषयक व्यवसाय आज तुमच्यासमोर आहे. जैन ठिबक, जैन पाईप, टिश्यूकल्चर, फूडप्लान्ट हे सगळे जे काही तुम्ही बघताय त्याचा सगळा उगम त्या बालपणातच आहे. तेव्हापासूनचं ते बाळकडू आहे. जसं आम्हाला व्यापाराचं बाळकडू आहे तसं शेतीचंही आहे. मारवाडी जिथे जिथे गेले, त्यांनी प्राप्तीतून काहीना काही पैसा वाचवला आणि त्या बचतीच केलं काय? एक तर थोडंफार सोनं खरेदी केलं किंवा एखादं शेत घेतलं. ते शेत आणि सोनं खऱ्या अर्थानं जपलं, सांभाळलं. कारण, शेतांच्या किंमती वाढत राहिल्या. सोन्याच्याही किमती वाढत राहिल्या. म्हणजेच ते जरी सर्वसाधारण घरात जन्माला आले, तरी दूरदृष्टी ठेऊन व्यवहार करत राहिले.

**श्री. गाडगीळ –** तुम्ही सांगाना तुमचा एक किस्सा.

**भाऊ –** मी तुम्हाला आधी सांगितलंय, की गणित हा विषय कधीच जमला नाही. चित्रं काढता येत होतं असंही नाही. चित्रकला शिकवायला आम्हाला बढे सर होते. हे बढे सर म्हणजे आमच्या लांडगे सरांसारखं एक भादरस्त असं व्यक्तिमत्त्व; पण ते मात्र टोपी घालत असत. नेहरू सदरा, धोतर आणि टोपी. ते स्वत:च एक जिवंत चित्र होते! ते माझ्यासाठी खूप प्रयत्न करायचे म्हणायचे, ‘‘भवरलाल, तू एवढा हुशार आहेस पण तुला चित्रकला कशी काय जमत नाही रे?’’ म्हटलं, ‘‘सर, ते तर मलाही समजत नाही, पण सर तुम्ही मला काही तरी शिकवा. नाहीतर मी पास कसा होईन?’’ ते म्हणाले, ‘‘मी, तुला एक शिकवतो, ये. तू असं कर एक

बादलीचं चित्र काढं.''

मला प्रश्न पडला, बादली कशी काय काढायची? त्यांनी सांगितलं, ''असा एक गोल काढ, त्याला एक अशी रेषा मार, अशी एक रेषा मार आणि मग खाली आणखी असा गोल काढ. म्हणजे काय होईल बादली तयार होऊन जाईल.'' त्यांनी ती काढून दाखवली. तशी मी बादली काढली, बादली मला जमली. त्यानंतर त्यांनी सांगितलं, की ''या बादलीत आता नळातून पाणी पडते, असा विचार कर. तू नळ पाहिला आहेस ना?'' तेव्हा मी म्हटलं, ''होय, आमच्याकडे आहे नळ घरी.'' त्यानंतर ते म्हणाले, ''नळातून पाणी पडते आहे, असं काहीतरी दाखव.''

नळ काढणं सोपं आहे हो. म्हणजे नुसता एक एल मारला आणि त्याला दुसरा एक एल जोडला, की नळ झाला, तर तो नळ काढला, नळही जमला. त्यानंतर म्हणाले, ''ते थेंब दाखव खाली, म्हणजे पाणी पडतंय असं दाखव.'' तेही जमलं. नळ जमला. पाण्याचा थेंब जमला. त्यातून खाली पडणारे आणि बादलीमध्ये गोळा होणारे पाणी तेही जमलं. ते म्हणाले, ''तुला आणखी एक सोपं सांगतो रे!'' म्हटलं, ''काय?'' ''झाड काढ तू.'' म्हटलं, ''हे झाड कसं काय काढायचं? सगळ्या झाडांची पानं वेगवेगळी असतात. कोणतं झाड काढू?'' ''नाही, नाही, ते तसं नाही काढायचे, ही पेन्सिल घे आणि गोल गोल काहीतरी असं नुसतं रखडमपट्टी करीत तू जा. असं करून ते पेन्सिलनी कर. त्यानंतर त्याला खाली असा एक पाय जोडतो नं आपण, टेकणी जोडतो, तशी एक टेकणी जोडून दे. त्याला मग थोडसं तिरपं करून टाक, ते तिरपं जे आहे नं ती त्याची मूळं आहेत! मधला भाग आहे नं तो, तो त्याचा बुंधा आहे वरचे जे आहे न ते झाड आहे.'' असं करायला सांगितलं. मी म्हणालो, ''सर तुम्ही काढून दाखवा.'' त्यांनी काढून दाखवलं.

मला चित्रकला विषय जरी जमला नाही, तरी त्या बढे सरांनी जे मला आयुष्यामध्ये शिकवलं त्या झाड, पाणी आणि थेंब या तीन विषयांनी माझं जीवन व्यापलेलं आहे. निरंतर मी तेच काम करतो आहे. ठिबक सिंचनाचं अतिशय महत्त्वाच काम आहे. पाण्याची बचत हीच तर कृतिशील तळमळ आहे. पाण्याचं नियोजन, झाडाची लागवड आणि पर्यावरणाचा सतत ध्यास यालाच माझं जीवन वाहिलं आहे. चित्रकला ही जरी सोपी वाटत असली, तरी त्याचे परिणाम किती दूरगामी असतात, हे मात्र आता मागे वळून पाहता माझ्या लक्षात आले. बढे सरांनी मला

फार मोठ्या कामाचा संस्कारच जणू त्यातून दिला, मी कृतज्ञ आहे.

**श्री. गाडगीळ –** भाऊ, आपण चित्रांबद्दल सांगितलं, औद्योगिक क्षेत्रामध्ये आपलं मोठं नाव आहे, सामाजिक क्षेत्रातही मोठं नाव आहे, याची मुळं कुठेतरी लहानपणी रुजली होती काय?

**भाऊ –** होय, आज औद्योगिक क्षेत्रात जैन हे एक मोठं नाव आहे. जे कारखाने मुळात इथं सुरू झाले ते पाइपांचेच झाले. पाइप म्हणजे पाणीपुरवठ्यासाठी लागणारी साधनसामग्री. माझी आई, अत्यंत कनवाळू, दयाळू होती. दातृत्ववान. अजूनही मला आठवतंय. तिचे चुलत सासरे घरची रखवाली करायचे. त्यावेळी सगळं सामान घरातच असायचं. आग लागली तर काही नुकसान व्हायला नको. म्हणून धान्य कोठारघरातच असे.

आमचे चुलते म्हणजे आईचे चुलत सासरे, मी त्यांना आजोबा म्हणत असे, ते रोज सकाळी प्रातर्विधी आटोपायला तांब्या घेऊन बाहेर जात असत, म्हणजे दूर एक किलोमीटर शेताकडे जात असत. त्यामुळं शेत पाहणं होत असे. त्यांचं तेही काम आटोपून परत येत असत. त्यांना ते सगळं आटोपायला एक दीड तास लागत असे. त्या दरम्यान माझी आई गावातल्या गरोदर बायकांना किंवा गरजू बायकांना बोलावून मोफत ताक देऊन टाकायची. काही गरजू आले, तर तिने त्यांना ज्वारीसुद्धा दिल्याचं मला आठवतं.

ज्वारीच्या ढिगामधून ज्वारी काढलेली असेल तर लगेच त्या ढिगात एक खळगी पडलेली दिसते. म्हणून माझी आई त्यावर अशा पद्धतीने हात फिरवून द्यायची की काही कळू नये. गोरगरिबांचं आपल्याला काही चांगलं करता आलं तर आपण करायला पाहिजे, ही वृत्ती तिच्याजवळ मात्र सतत जागृत असे, अगदी जाईपर्यंत! त्या वृत्तीचा माझ्या मनावर खूप सखोल परिणाम झाला. म्हणून मला How to live with less हे फार प्रकर्षाने जाणवतंय. म्हणून मी माझ्या गरजा सातत्याने कमी करतो आहे.

आधीही त्या मी वाढू दिल्याच नाही; परंतु आता तर आणखीनच कमी करतोय. उदा. घड्याळ वापरत नाही. जर वेळच वाया घालावायचा नाही तर घडयाळ कशासाठी वापरायचं? जेवायला सुरवात केली असेल तर तीन वाट्या नको. ताटात जे सगळं वाढायचं ते वाढून घ्या. पोटात जाऊन एकत्रच होणार आहे, वेगवेगळं

घेण्यात काय अर्थ आहे? फार काय द्रवरूप असेल किंवा भात-वरण असेल किंवा कढी असेल, तर प्रश्न वेगळा आहे. नाहीतर सगळं एकच होईल. पाणी जर एकत्र प्यायचं असेल तर एवढं पाणी कशाला देता, निम्मच पाणी आपण पिऊ. अशा पद्धतीनेही काटकसर करतो.

इतरांना त्याचा कसा उपयोग होईल, हा विचार जर माझ्या मनात कोणी रुजवला असेल तर तो माझ्या आईने रुजवला. त्याचे असे दूरगामी संस्कारठसे माझ्या मनावर आजही आहेत. मला असं वाटतं, की ही माझी सामाजिक बांधिलकीची जी काही संकल्पना आहे, तिचा जन्म तिथे आहे. तुम्ही जे म्हणालात, की तुम्ही एवढं मोठं साम्राज्य उभं केलं आहे, हे सगळं, हा जो उद्योग आहे. जे काही घडलं ते ओघाने घडले आहे.

मी आयुष्यात असा कधीही विचार केला नव्हता, की आपल्याला एवढा मोठा व्यवहार करायचा आहे आणि एवढे पैसे कमवायचे आहेत, त्यासाठी व्यवहार केलाच नाही. आपण देशात सगळ्यात मोठं काम केलं पाहिजे, जगात कुठेतरी नाव होईल असं काम केलं पाहिजे, जळगावचं नाव सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक, कृषी, संशोधन अशा अनेक क्षेत्रात पुढे गेलं पाहिजे. जे काही करायचं असेल ते उत्तमच केलं पाहिजे, हा दुसरा आग्रह होता. या अशा दोन-तीन आग्रहाच्या पोटी, कठोर परिश्रम जन्माला आले.

कठोर परिश्रमांपोटी ते जन्माला आलं आणि म्हणून एवढी निर्मिती झाली. त्यात मी काय फार मोठं केलं आणि ते फार सुनियोजित असं होतं असा लोक त्याचा अर्थ लावतात. मलाही होच म्हणावं लागतं. त्याचं कारण असं आहे, की हे 'हो' म्हणणं काही तेवढं योग्य आहे किंवा बरोबर आहे, असं मला वाटत नाही. एकटा माणूस काय करू शकतो? इतर सगळ्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन आपण या सर्वसाधारण गावात असाधारण असं काम करू शकतो, यावर माझा मात्र विश्वास बसला. हळूहळू का असेना आपण वाकोदपासून वॉशिंग्टनपर्यंतचा हा प्रवास अशा रीतीने साधू शकलो याचा मला मनस्वी आनंद आहे.

**श्री. गाडगीळ –** भाऊ, शेवटचा प्रश्न आहे. लहानपणी आपण आपल्या आई-वडिलांबरोबर एखाद्या चित्रपटाला किंवा एखाद्या नाटकाला गेल्याचं आठवतं

का? एखादं नाव आठवत असेल तर सांगा.

**भाऊ –** हे बघा, तुम्ही हे मला नाटकी प्रश्न विचारताय! घुंगट घेणारी माझी आई. माझे वडील व्यापारी, ते ही एका सूतगिरणीचे जिनिंग फॅक्टरीचे खरेदीदार होते. वडिलांमुळे प्रामाणिकपणा आणि सतत कष्ट करण्याची मनोवृत्ती. आमच्यात निर्माण झाली. खेडेगावात राहिल्यामुळे शहरीपणाचा वारा कधी लागला नाही. सिनेमा बघायला जायचं तर सहा किलोमीटरवर असलेल्या पहूरला टूरिंग टॉकीजमध्ये जावं लागायचं. सहा किलोमीटर जायचं आणि रात्री सहा किलोमीटर परत यायचं आणि सिनेमा पाहायचा, म्हणजे त्याच्यासाठी आईचे फटके खायचे!

चुलत्यांकडून कशीतरी चोरून परवानगी घ्यायची वगैरे वगैरे असे हे सगळे द्राविडी प्राणायाम करावे लागायचे. शाळेमध्ये काही नाटकं पाहिल्याची आठवण मात्र थोडीफार आहे. विजय तेंडुलकरांचे 'घाशीराम कोतवाल', राम गणेश गडकरींचं 'एकच प्याला' ही नाटके पाहिल्याचं मला आठवतं. एका देशभक्तिपर गीताने मात्र माझ्या मनावर खूपच खोलवर प्रभाव गाजवला आहे. अधूनमधून अनेकदा मी ते गीत गुणगुणत असतो. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांनी लिहिलेले – 'ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' हेच ते गीत! मी अंदमानला जाऊन आलो. सावरकरांना ज्या कारागृहात ठेवलं होतं, ती खोली पहाण्याची इच्छा मात्र पूर्ण झाली नाही, ती मी नक्कीच पूर्ण करीन. एक दिवस मी नक्कीच तिथे जाणार आहे.

**श्री. गाडगीळ –** एखादा किस्सा सांगा ना.

**भाऊ –** एक किस्सा मात्र मला आठवतोय. आम्ही आमच्या शेतात बैलगाडीत बसून जात असताना रस्त्यावरच एक मळा होता, तो गावच्या पाटलांचा मळा होता. त्या मळ्याच्या बांधावर एक बोरीचं झाड होतं. तिला साधारणपणे दीपावलीच्या आसपास बोरं लागायची आणि ती बोरं आम्ही चोरून लपून खात असू. एकदा काय झालं, की पाटलांचा माणूस हा दबा धरून बसला. तिथे वाढलेल्या ज्वारीत तो काही आम्हाला दिसला नाही. बोरीच्या फांद्या जोरजोरात हलवायच्या आणि मग बोरी खाली टपाटप पडल्या की वेचायच्या आणि पळायचे असा तो आमचा नेहमीचा उपक्रम होता.

एकदा मात्र फारच अवघड परिस्थिती निर्माण झाली. फांद्या जोरजोरात हलवल्या गेल्या, बोरही टपाटप पडली होती, आम्ही ती पटापट वेचायला लागलो तोच तो

बोरीचा रखवालदार अवतरला. आमची तारांबळ विचारूच नका, अगदी पळता भुई थोडी झाली. कसल्या बोरी आणि कसलं काय! आम्ही एकदम सुसाट धावलो. तो माणूस संध्याकाळी आमच्या अंगणात दत्तासारखा उभा.

आईला म्हणाला, ‘‘तुझा भवरलाल आमची बोरं चोरून खातो आणि तुम्ही ही शिकवण दिली आहे का त्याला?'' आईला ते ऐकून खूप वाईट वाटले; पण तिने त्या माणसाला समजावून सांगितले, ‘‘अरे, बोरं ही खाण्याचीच गोष्ट आहे. सर्वांनाच आवडतात आणि त्यातल्या त्यात लहान मुलं आहेत ती! पण तुझी बोरं त्याने खायला नको असं जर तुला वाटत असेल तर त्याला मी तशी समज देते. आमच्याकडे आमच्या बांधावर बोरी नाही येत. आम्ही आता बोरं लावू म्हणजे त्याला हे असं करायची गरज भासणार नाही, तो एकटाच होता का?'' ‘‘नाही, नाही, त्याचे दोन-तीन मित्रसुद्धा होते!'' तेव्हा आई त्याला म्हणाली, ‘‘थोडीफार खोडकर असतात रे पोरं! पण तुला वाईट वाटत असेल तर, पुन्हा असं होणार नाही, मी त्याला समज देते.'' आईने नंतर मला समजावून सांगितलं, पण मारलं मात्र नाही.

धन्यवाद!





# जमिनीची वैचारिक नांगरट!

दैनिक 'पुण्यनगरी'साठी मुलाखत

– अनिल पाटील – २३.०१.२००८

*जमिनीचा वापर, तिची सुपीकता, उत्पादकता आणि मर्यादा अशा विविध अंगांनी जमिनीचा विचार करताना भवरलालजी त्याअनुषंगाने येणाऱ्या कितीतरी उपविषयांना सहजपणे स्पर्श करतात. ओसाड-सुपीक जमिनी व एस. ई. झेड. वाढती लोकसंख्या, नदी-जोड प्रकल्प, शासनाचा हावरटपणा, नेभळे नेतृत्व, जुनाट व कालबाह्य सिंचनपद्धत, नवतंत्र, नवीन साधनसामग्री, वापरातला प्रागतिक दृष्टिकोन अशा विविध विषयांना स्पर्श करून जाणारं त्यांचं चिंतन एका समृद्ध तसंच व्यावहारिक पायांवर आधारित असल्याचं जाणवतं आणि नेमकी याच गोष्टींची देशाच्या नियोजनात वानवा दिसतेय.*

**श्री. अनिल पाटील –** बायोटेक्नॉलॉजीचं कसं होईल?

**भाऊ –** टेन थेरोपी आहे. ज्याला टेनसेल म्हणतात. Tencell is the future! तुम्ही जर मला एका शब्दात विचारलं, की एकविसावे शतक कोणत्या

तंत्रज्ञानाचं आहे? तर मी तुम्हाला दोन शब्दांत सांगतो, की ई.टी. ॲण्ड बी. टी.! म्हणजे इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजी या दोघांमध्ये Whether it concerns pharmaceutical or agricultural म्हणजे ॲग्रीकल्चर असू द्या किंवा व्यवसाय असू द्या या सगळ्यांमध्ये जाडून घ्या. या तंत्रज्ञानांचा उपयोग करून सर्वांचं जीवनच पायाभूत/मूलभूत बदलून जाणार आहे. आयुष्याची दिशाच नव्हे; तर एकूणच मानवी जगण्यातच परिवर्तन होणार आहे.

**श्री. पाटील** – सकारात्मक की नकारात्मक?

**भाऊ** – ते तर त्या त्या माणसाच्या मानसिकतेवर, विचार करण्याच्या पद्धतीवर अवलंबून आहे!

**श्री. पाटील** – बायोटेक्नॉलॉजीचा दुष्परिणाम होऊ शकतो आणि जर असंच जर झालं तर?

**भाऊ** – कोणत्याही तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग करायचा की दुरुपयोग हे ज्याच्या त्याच्या हाती आहे.

**श्री. पाटील** – तुम्ही जो संवाद आतापर्यंत साधला त्यातून एक गोष्ट घडत राहिली. शेतीशी आणि मातीशी नातं तयार झालं. भारतीय शेतकऱ्यांसाठीचे प्रतिनिधी म्हणून तुम्ही समोर आलात. एकूणच याकडे तुम्ही कसं बघता?



**भाऊ –** ज्या पद्धतीनं कायदा पास झालेला आहे आणि ज्या पद्धतीनं तो वापरला जातो आहे या दोन्ही गोष्टींना माझा विरोध आहे. ज्या वेळी मला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा पुरस्कार मिळाला त्याप्रसंगी मी जे बोललो, त्यानंतर सरकारने तसं केलेलं आहे.

**श्री. पाटील –** तरीही मला असं वाटत नाही की, तुम्हाला अपेक्षित तसं झालं.

**भाऊ –** आता सरकारने एक ठरवूनच टाकलंय, की सरकार काही एस्. ई. झेड. साठी जमिनी संपादित करणार नाही. सुप्रीम कोर्टानीसुद्धा म्हटलं आहे, लोकहितासाठी हा कायदा केलेला होता म्हणून खासगी लोकांच्या मिळकती संपादित करू शकता. खासगी हितासाठी त्याचा उपयोग अनेक लोक करतात. हा दुरुपयोग आहे आणि हे थांबायलाच हवं, असा माझा एक विचार आहे. बाजार भावानेच जर त्या घ्यायच्या असतील तर ना हरकत द्या. एक हजार एकर जमिनीची गरज आहे. या कामासाठी जी पडीत जमीन असेल ती घ्यावी.

आम्ही जशी जैन हिल्स एका पडीत जमिनीवर वसवली. हजारो वर्षांपासून या जमिनीवर काहीच नाही आणि त्याच्या बाजूची जमीन आजही तशीच आहे. एकाच डोंगराचे ते दोन भाग आहेत, असं असताना, आम्ही जे केलं तेच इतरही करणार असतील तर उत्तमच! असा एक मुद्दा होता आणि दुसरा मुद्दा असा होता की, तुम्ही हे सगळं मोठमोठया शहराच्या जवळ का करता? पुणे आणि मुंबई सोडून महाराष्ट्रात इतरत्र का नाही? तेव्हा पुणे, मुंबई आणि नागपूर आणि जमलं तर नाशिक हे सर्व राजकीयदृष्टया सोयीस्कर आहे म्हणून! ही गावे सोडून महाराष्ट्र नाही का? ठासून सांगा ना की तुम्ही जिल्ह्याच्या ठिकाणी जा.

तुम्हाला जे योग्य वाटेल त्या जिल्ह्याला जा. तुम्हाला आवश्यक त्या सुविधा प्रदान करू. तिथे जी परवानगी लागेल ती आम्ही तुम्हाला देऊ, हजार एकर जमीन तुम्ही तुमच्या पद्धतीने विकत घ्या. तुम्ही हजार, दोन हजार कोटी गुंतवणार आहात. त्यात तुम्ही शेतकऱ्यांना थोडेफार जास्त पैसे दिले तर तुमचं काय बिघडलं? त्याला एक हजार रुपये वर्षासाठी त्या जमिनीतून मिळत आहेत त्याऐवजी जर त्याला उद्या पाच हजार मिळतील असा जर तुम्ही भाव देणार असाल तर आमचं काय म्हणणं आहे?

सरकारने त्याची जागा संपादित करावी, ती त्याला हस्तांतरित करावी. यात

सरकारने पैसा कमवावा. विकासकामे पुढे विकसित करून आणखी तिसऱ्याला द्यावी. त्यातही त्याने तीनपट पैसा कमवावा. यात शेतकरी संपला. याला काय अर्थ आहे? जर मी स्वत:ही शेतीत कारखाना टाकायचा ठरवला. तर जी नापीक नाही अशी एक एकर जमीनसुद्धा घेणार नाही आणि तशी ती उपजाऊ जमीन समजा असली तर त्या शेतकऱ्याला मी दहा एकर उपजाऊ जमीन दुसऱ्या ठिकाणी पैसे देऊन घ्यायला लावेन.

**श्री. पाटील –** याही पुढे जाऊन आम्ही असं म्हणू की हे प्रकरणच तुमच्या हातात द्यायला पाहिजे.

**भाऊ –** सांगायचं तात्पर्य काय आहे, की इथे जळगावला जैन हिल्सवर घडलेली एक घटना सांगतो. ज्याचं एक एकर शेत होतं इथे, तो माणूस माझ्याकडे ते विकायला आला. मी इथे जवळपास सातशे एकर शेती घेतली होती. मी त्याला सांगितलं की तू आता भूमिहीन होणार आहे. म्हटलं तुला किती पैशांची आवश्यकता आहे? त्यावेळी शेतीचा आम्ही ठरवलेला भाव ३०,००० रुपये एकराचा होता. तो म्हणाला की मला ३०,००० मिळाले तरी पुरे आहेत. तेव्हा मी विचारलं की, तुला इथून एक-दोन किलोमीटरवर शेत घ्यायचं असेल तर काय भावात मिळेल? तो म्हणाला १५,००० रुपये. मी त्याला समजावून सांगितलं, सगळ्यांना मी एकरी तीस हजार दिले, तुला पस्तीस देईन. त्यापैकी पंधरा हजार आधी देईन. तू जाऊन आधी ते शेत खरेदी करून ये. तो सौदा झाला की मला लगेच दाखव, त्यानंतर उरलेले पैसे देऊन मी तुझी जमीन खरेदी करीन आणि बाकीचे पैसे तू नंतर देऊन टाक.

**श्री. पाटील –** हे इतकं कशासाठी, एवढ्या पायऱ्या कशासाठी?

**भाऊ –** कारण असं, की त्या माणसाचं उदरनिर्वाहाचं साधन हातातून गेल्यानंतर त्याची पुढची पिढी शिकली सवरलेली नाही. त्याला समाजाकडून दुसरा काही आधार मिळणार नाही. अशा वेळी परिस्थिती फारच बिकट होते. तो एकतर मजूर होतो, नाहितर रोजच्या समस्यांनी जर्जर होऊन आत्महत्या तरी करतो. आधीच कर्जबाजारी, त्याला जे सत्तर-पंच्च्याहत्तर हजार रुपये मिळणार होते. त्यापैकी पंधरा हजार तर आम्हाला बँकेलाच भरायचे होते.

आम्ही ते भरणारच होतो आणि राहिलेले साठ हजार त्याच्या हातात देणार

होतो. पंधरा हजार आधी देऊन त्याला जर मी जमीन घेऊन दिली किंवा घ्यायचा व्यवहार करून दिला. बाकीचे पैसे ज्याची जमीन घेतली त्याला दिले तर मात्र त्याच्याजवळची दहा एकर आहे. त्यातली त्याने अडीच एकर विकली तर काही हरकत नाही.

**श्री. पाटील –** तुम्ही हा पालकत्वाच्या भावनेने विचार केलेला आहे, असा भावनात्मक विचार सरकार करीत नाही, याची निश्चितच आपल्याला खंत वाटत असेल.

**भाऊ –** याला अनेक कारणंही आहेत; परंतु मला जे तुम्ही दोन शब्द वापरले, की शेतीशी संबंध राष्ट्र जोडणी आणि त्यानंतरचा. माझा आक्षेप आहे त्या शब्दांना. शेतीशी माझे कृतज्ञतेचे ऋणानुबंध आहेत आणि ऋणानुबंधापेक्षाही आपण त्या मातीतूनच आलो आहोत, त्या मातीतच जाणार आहोत ही दृष्टी त्यामागे आहे. आपले सर्व पूर्वजही मातीतच कष्टत गेलेले आहेत. त्यांच्या परिश्रमाच्या घामाचा सुगंध अजूनही त्या मातीत आहे. तो जर जाणवत नसेल तर आपण संवेदनहीन आहोत असा त्याचा अर्थ होईल.

ज्या माणसाला शेती ही केवळ खरेदी-विक्रीची बाजारू वस्तू आहे असे वाटते, त्यांच्यासाठी मात्र या संवेदना लागू नाहीत. माझ्या दृष्टिकोनातून पाहिले तर शेती माउली आहे. या जगात दोन गोष्टी सर्वात श्रेष्ठ आहेत. एकतर माता, जी नवनिर्मिती करते, जिचा सृजनाशी, संवर्धनाशी संबंध आहे. दुसरी भूमी. भूमितूनही नवसर्जन घडते. इतर बाबी आपण रीसायकल करतो, म्हणजे परिवर्तन करतो. माता आणि भूमी यात निर्मिती आहे आणि या दोनच गोष्टी सर्वांत जास्त सक्षम आहेत. म्हणून मी तुम्हाला सांगतो, की धरतीचं ते नातं जर आपण विसरलो तर आज नाही पण भविष्यात मात्र आपण अडचणीत येऊ.

युद्धासाठी कितीही विमाने असली आणि कितीही अणुबॉम्ब असले, कितीही बलाढ्य सेना असली तरी अतिशय बिकट परिस्थिती निर्माण झाली, अन्नधान्याचेच प्रश्न निर्माण झाले तर कितीही डॉलर मोजले तरी अन्नधान्य मिळणार नसेल तर फारच मोठे प्रश्न निर्माण होतील. जगायचे तरी कसे? म्हणून पूर्वी राजे-महाराजे, छत्रपती शिवाजी महाराज भांडार करून ठेवायचे. जेवढं भांडार उपलब्ध आहे,

तेवढ्यापुरते ते पुढे आगेकूच करायचे, मोहिमेनंतर परतायचे.

धरतीमातेची सृजनशीलता म्हणूनच फार श्रेष्ठ आहे असे मी म्हणतो. त्यामुळे शेतीला बाजारातली एक वस्तू समजणे अयोग्य आहे. मी असा विचार करतो, की जी पडीत जमीन आहे तिच्यासाठी परिश्रम करणं, घाम गाळणं हे मात्र प्रत्येक नागरिकाचं पवित्र कर्तव्य आहे. तो जर ते करू शकला तर माझ्या दृष्टीने आपल्या देशात कोणताही प्रश्न शिल्लक राहणार नाही. ते शेतकरी जरी त्यांच्या शेतात जास्त उत्पादन मिळत नसले तरी खुशीत आहेत ना? इथे शहरात येऊन फुटपाथवर झोपणार, एका खोलीत सात-आठ जण राहणार आणि प्रदूषण करणार! त्यांच्याकडे शहरी लोक तुच्छतेने बघणार. त्यापेक्षा त्यांच्या त्यांच्या त्यांच्या गावी ते चांगले राहतात. खेडेगावात जेवढं प्रेम आहे, गावच्या माणसात जेवढा ओलावा आहे, प्रामाणिकपणा आहे तेवढा शहरात आहे का? तुम्ही त्यांना कोणत्या निकषांवर कमी लेखता? आधी त्याला कंगाल केले जाते. त्याला सांगतात की याच भावाने आम्ही पैसे देतो, तो मिळालेले पैसे उडवून टाकतो आणि व्यसनी होतो.

औरंगाबादला ज्या वेळी शेंद्रा औद्योगिक वसाहत विकसित झाली तेव्हा शेतकऱ्याला त्याने कधी स्वप्नातही पाहिला नसेल एवढा पैसा मिळाला. पाच वर्षांत बहुतांश व्यसनाधीन झाले. शेंद्र्यात लक्ष्मी अवतरली होती; पण माणसाने विवेक गमावल्यामुळे अवकळा पसरली. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा या ठिकाणी आहे, की उद्योजकांना आठ तास काम करून त्यांच्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने पैसा मिळतो, शेतकऱ्यांची मुलं हे सर्व पाहत असतात. एक असूया त्यातून निर्माण होते. 'शेतात इतकं काम करून, घाम गाळूनही आम्हाला ज्या प्रमाणात हवं त्या प्रमाणात मिळत नाही आणि हे आठच तास काम करून ऐशोरामात राहतात', असा भुंगा भणाणत राहतो.

एस. ई. झेडमुळे याचं प्रमाण समजा वाढतच गेलं आणि त्या भूलथापांना बळी पडून शेतकऱ्यांनी जर जमिनी विकल्या आणि सगळंच जर औद्योगीकरण झालं तर विपरीत परिस्थिती निर्माण होईल. जागरूक राहण्याची फार गरज आहे. दूरदृष्टी असणाऱ्यांनी वैचारिक आंदोलन उभं केलं तर खूप मोठं प्रबोधन होऊ शकेल.

**श्री. पाटील –** बंजर जमिनीमुळे पैसा मिळतो यासाठी स्वत: प्रेरित होऊन त्या

जमिनी मालकांनी विकायला सुरवात केली आणि उद्योगपतींनी त्या खरेदी करायला सुरवात केली तर काय होईल?

**भाऊ –** मग मात्र दोन प्रश्न निर्माण होतील. त्या जमिनी तशाच राहतील जिथे शेतकरी काही उत्पन्नच घेत नाही. बंजर जमिनी म्हणजे जिथे काही उगतच नाही किंवा शेतकरी उगवूच शकत नाही. उदा. जैन हिल्सची टेकडी आहे. त्यासमोर असलेल्या जमिनीवर पाचशे वर्षांपासून काहीच उगवत नाही. अशा जमिनीलासुद्धा आपण जर हिरवं केलं तर पर्यावरणाचं जतन होईल. आणि त्या फॅक्टरीमुळे पर्यावरण सुधारेल असं नाही. या जैन हिल्सचं काय झालं.

मला तब्बल पंधरा वर्षे लागली. अगदी अक्षरश: घाम गाळून सगळं तयार केलं. अगदी एक लिटरसुद्धा पाणी नसताना येथे पाणी उपलब्ध करून सुंदर असा हिरवागार, निसर्गरम्य परिसर तयार झाला. प्रत्येक गावात, प्रत्येक माणसाने विडा उचलून पर्यावरणाच्या संदर्भात विधायक काम करायचं ठरवलं तर आपल्याला काय अडचण येईल? हा पैसा, ही जमीन मी काही माझ्याबरोबर नेऊ शकत नाही. ती इथेच राहणार आहे, ही जमीन या देशाची, या समाजाची आहे. फक्त त्याला माझं नाव लागलेलं आहे; पण त्याचं काय महत्त्व आहे? या झाडांपासून मिळणारा ऑक्सिजन फक्त माझ्यापर्यंतच येणार आहे का?

**श्री. पाटील –** भाऊ, एवढा बारकाईने विचार फार बोटावर मोजण्याइतके लोक करतात. सरकारकडूनच साकल्याने विचार होत नाही, तर शेतकऱ्यांकडून काय अपेक्षा करायची?

**भाऊ –** सरकारने त्यांना एकतर साधनं उपलब्ध करून द्यावीत. जेणेकरून ते जमिनीचा उपयोग करू शकतील. म्हणजे असं, की प्रत्येकी पंधरा एकरात एक तरी विहीर खोदली पाहिजे, एक तरी तलाव असलाच पाहिजे. जेणेकरून पावसाच पाणी त्या तलावात साठवले जाईल. ते पाणी पंधरा एकराच्या आसपास शेती असणाऱ्यांनी एकत्रितपणे वापरलं पाहिजे.

शेतकऱ्यांची ताकद एकसंघ नसल्यामुळे आणि अनेक ठिकाणी भ्रष्टाचार माजला असल्यामुळे अशी काम ते करीत असताना खूप गोंधळ होतो. असा गोंधळ सोडवायला कोणीतरी प्रभावीपणे मार्ग काढायला पाहिजे. समस्यातून मार्ग काढणे हे केव्हाही योग्य आहे. हा विषय खूपच महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांना पैसे द्या,

कर्ज माफ करा. असल्या क्षणिक पर्यायांपेक्षा त्यांचं उत्पन्न वाढवा आणि ते वाढण्यासाठी मूलभूत सोयी वाढवून मदत करून या भूमिपुत्राला स्वावलंबी करा. समस्या सोडवण्याचा हा खरा मार्ग आहे.

**श्री. पाटील –** म्हणजे आत्महत्येवरसुद्धा तुम्ही हाच उपाय सांगाल?

**भाऊ –** दुसरा कुठला उपायच नाही. मूलभूत पायाभूत व्यवस्था आणि ती दूरगामी केल्याशिवाय म्हणजे शेतकऱ्यांना पाणी दिल्याशिवाय काही पर्याय नाही. थोडक्यात त्यांना सुरक्षित शेती देणं गरजेचं आहे. शेतकऱ्यांनी पावसाळ्यात ज्वारी लावली; पण समजा पाऊस एखाद्या वेळी वीस दिवस नाहीच पडला तर निदान एक तरी पाणी त्या ज्वारीला देता आलं पाहिजे.

एवढी व्यवस्था असली तरी पुरे झाली. समजा फेब्रुवारीनंतर त्याला दोनदा पाणी देता आले तर त्याची दोन पिके होऊन जातात. शेतकऱ्याची कपाशीबरोबर ज्वारीदेखील होते. डबल क्षेत्र होते, पडीक जमीन कामाला येते. शेतीकडेसुद्धा औद्योगिकदृष्ट्या पाहून त्या शेतकऱ्याचा जोडधंदा काय आहे हे बघितलं पाहिजे; पण तसं आपल्याकडे होत नाही.

**श्री. पाटील –** भाऊ, आपण आपल्या कामानिमित्तानं अनेक देशांना भेटी दिल्या आहेत. सध्या जागतिकीकरणाचं वातावरण आहे. तुम्ही बऱ्याचशा क्षेत्रात जगाच्या शर्यतीत आहात. ॲग्रोमध्ये आपण कुठे आहोत आणि जिथे आहोत त्याची कारणे काय आहेत?

**भाऊ –** ॲग्रोमध्ये आपली उत्पादकता जगाच्या तुलनेत बरी आहे. गव्हाचं उत्पादन चांगलं आहे. तांदूळ ३० टक्के आहे. डाळीत पन्नास टक्के आपण कमी आहोत. हॉर्टिकल्चरमध्ये म्हणजे आंबा, द्राक्ष किंवा इतर फळे यात आपण सर्वसाधारणपणे ३० ते १०० टक्क्यांनी कमी आहोत. फायबर क्रॉप म्हणजे फूड फायबर कापसाचे उत्पादन अजूनही जगाच्या तुलनेत निम्म्यापेक्षा कमी आहे. याचं एक कारण म्हणजे जगाच्या तुलनेत आपल्याकडे पाणी कमी आणि जमीन जास्त आहे.

आपले जे कायदे आहेत, त्यामधील वारसाहक्काच्या कारणाने जमिनीचे तुकडे होतात. त्यामुळे जमीन कसणं परवडणारं नाही. कमीत कमी वीस किंवा पंचवीस एकर शेती असली तर ट्रॅक्टर परवडतो, अन्यथा नाही. बैलजोडी आता अनेकांना चालवता येत नाही. शेतकरी विखुरलेला आहे. अनेक कर्जबाजारी झाले आहेत.

खूप जणांना व्यसनांचा विळखा आहे.

सुरवातीपासूनच शेती या विषयाला प्राधान्य न दिल्यामुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याला चार कारणं आहे. पहिलं शासनाने शेतीला प्राधान्य दिलेलेच नाही आणि ही परिस्थिती जवाहरलाल नेहरूंपासून आहे. काहीही प्रयत्न होत नाही असे नाही. काही निश्चितच सकारात्मक प्रयत्न करतात. आपल्या भारताचे कृषिमंत्री शरद पवार साहेबांना या सर्व समस्यांची जाण आहे. कारण, ते स्वत: हाडाचे शेतकरी आहेत. आजही बारामतीला तुम्ही गेलात तर तुम्हाला त्यांची शेती चांगलीच आहे, असं पाहायला मिळेल आणि ती त्यांची आहे म्हणून चांगली आहे असं नाही, ते त्याकडे जातीने लक्ष देतात.

मुळात प्रश्न असा आहे, की जे पश्चिम महाराष्ट्रात घडलं ते महाराष्ट्राच्या इतर भागात घडू शकत नाही. याची दोन कारणं आहेत. तिथला शेतकरी त्या वेळी तरी निश्चितपणे जास्त मेहनती होता, जास्त जिज्ञासू होता. तेवढा इतर भागातला शेतकरी नाही, हे आपल्याला मान्य करावेच लागेल. त्यांची घरं आजही शेतावर आहेत. आपण गावात राहतो.

राजसत्ता हा एक महत्त्वाचा भाग आहे. पाण्याचं नियोजन त्यांनी केले. त्यामुळे त्यांची सर्वांगीण प्रगती झाली. इकडे पाणी भरपूर असूनही त्याचा उपयोग आपण करू शकलो नाही. अगदी मराठवाड्यात आणि विदर्भात तर खूप पाणी आहे. पाणी असूनही त्याचा उपयोग मात्र होत नाही. आपल्या जायकवाडीमध्ये काय होत आहे? त्याचा उपयोग कुठे होतो? आणि उपयोग केला तरी तो फ्लड पद्धतीने करतात. जैन इरिगेशनच्या ठिबक सिंचनसारख्या पद्धती आहेत, त्या आधुनिक पद्धती आहेत; पण ते शेतीसाठी त्याचा उपयोग करीत नाही.

**श्री. पाटील –** हे संशोधन आहे. ते सरकारच्या हाती आहे आणि सरकार त्यांच्या हाती असे मला म्हणायचे आहे.

**भाऊ –** वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष तरी किती दिवस आणि कसे करणार?

**श्री. पाटील –** राजकीय लोकांची इच्छाशक्ती नाही असं आहे का?

**भाऊ –** इच्छाशक्ती नाही असं म्हणता येणार नाही. राजकीय मंडळींना त्यातून मार्ग आज सापडलेला नाही. ते आम्हाला त्यांच्या कळपात बसू देत नाहीत. त्यांचा एक वेगळा कळप आहे. तसं आमच्याशी चांगलं बोलतात. ते आमचा लांबून

आदर सत्कार करतात. समजा दहा लाख विहिरी खोदायच्या आहेत. सरकारी यंत्रणा इतक्या विहिरी खोदू शकत नाही आणि खोदल्या तर त्या जागेवर नसतीलच. त्यांना काम करण्याची इच्छा नाही असं नाही म्हणता येणार आपल्याला; परंतु त्यांना यातून मार्ग सापडला नाही.

कारण, समाजाची जी रचना आहे, तीच बरोबर नाही.

**श्री. पाटील –** लोकशाहीची रचना जी आहे ती पाच वर्षांनंतर काय होईल हे सांगता येत नाही.

**भाऊ –** दर वेळा नवीन सांगावं लागतं आहे, की तुम्हाला एक्सपान्शनला पुढच्या वेळेला मिळेल.

**श्री. पाटील –** भारत हा गरीब आहे की श्रीमंत आहे?

**भाऊ –** भारत हा गरिबांचा श्रीमंत देश आहे.

सर्वच परिस्थिती वाईट आहे असं नाही. अधिकाऱ्यांमध्येही काही अधिकारी चांगले आहेत. पुढाऱ्यांमध्येही काही पुढारी चांगले आहेत. राजकारण्यांमध्येही काही राजकारणी चांगले आहेत; परंतु अपवाद म्हणून काही त्रासदायक आहेतच.

**श्री. पाटील –** नदी जोड प्रकल्प कितपत लाभकारक आहेत?

**भाऊ –** हे बघा, पाण्याशिवाय जीवन नाही आणि जिथे पाणी पोहोचवू शकाल तिथे प्रगती पोहोचवली असा त्याचा अर्थ होईल, त्यातून निर्माण होणारे आणखी काही प्रश्न आहेतच. जीव वाचवणारं जे औषध असते तेच जीवघेणेही ठरू शकते; पण जीवदान देणाऱ्या योजना आहेत.

**श्री. पाटील –** त्यांची काही ॲलोपॅथी ट्रिटमेंट आहे का?

**भाऊ –** आहे. आपल्या देशात दुसरा मार्ग सध्या तरी सूचत नाही. त्याचं कारण असं आहे, की एकीकडे पूर असतो आणि दुसरीकडे दुष्काळ असतो. आता हा प्रश्न आपण सोडवणार कसा? दुष्काळी भागात पाणी आणणार कसं आणि पाणी आल्याशिवाय तो दुष्काळ मिटणार कसा? दरवर्षी आपण टँकरवर फार मोठी रक्कम खर्च करतो. एकाच वेळी तीस हजार कोटींची योजना करून प्रत्येक खेड्यामध्ये ज्याची त्याची आपल्या पाण्यापुरती सोय व्हावी.

समस्या सोडवण्यासाठी इतर तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्या सोडवता येतील.

प्रश्न निर्माण होतात तेव्हा प्रयत्न सतत सुरू ठेवले तर त्याची उत्तरंही सापडतात.

प्रदूषण फार मोठी गंभीर समस्या आहे. डिझेलच्या ज्या गाड्या चालतात त्याऐवजी पाण्यामध्ये किंवा कॅनॉलमधून जहाजं किंवा बोटी चालतील तर बराचसा फायदा आणि किती कमी खर्चात होईल ते. एका ठिकाणाहून दुसरीकडे त्या नदीच्या प्रवाहाबरोबर दोन्ही नद्यातून फारच कमी खर्चात माल वगैरे पोहोचवू शकाल.

**श्री. पाटील –** प्रत्येक गोष्ट जोपर्यंत उत्पादनक्षम होणार नाही आणि ती होऊ शकते फक्त त्याच्या मर्यादा पाळायला पाहिजे. काळया जमिनी औद्योगिकीकरणाकरता देऊ नका आणि बंजर जमिनीकडून काळ्या जमिनीसारखी अपेक्षा करू नका.

**भाऊ –** बस्स एवढंच. मात्र, बंजर जमिनीही देऊ नका हा खोटा आग्रह मी धरणार नाही. आयुष्यभर तसंच राहणार आहे. जिथे एकही रोपटं दिसत नाही. त्याला आपण जंगल म्हणू. एकही झाड दिसत नाही. त्याला आपण जंगल कसं काय म्हणायचं? फॉरेस्टची व्याख्या तरी काय आहे? वनराई असली पाहिजे. सरकारने साडेसातशे हेक्टर जमीन फॉरेस्ट म्हणून जाहीर केली आहे; पण त्यात झाडच नाही.

ओसाड जमिनी फॉरेस्ट म्हणून जाहीर होतात, याचं मला खूप आश्चर्य वाटतं! साडेसातशे हेक्टर जमीन आहे. मात्र, त्या जमिनीवर साधं झुडूपही नाही. त्यालासुद्धा सरकार फॉरेस्ट म्हणते आणि प्रिझर्व करते! त्यावर जर तुम्हाला वृक्षराई लावायची असेल तर ती जमीन तुम्ही सात वर्षांसाठी घ्या असं सरकारच म्हणत असते. सात वर्षांसाठी तुमचं नाव लावू. पस्तीस वर्षे उलटल्याखेरीज पैसे येत नाहीत, सात वर्षांत काय येणार आहे! असे असेल तर ही जमीन कोण घेईल? कशासाठी घेईल?

**श्री. पाटील –** आणि नियमांची प्रचंड बांधिलकी.

**भाऊ –** मुळातच त्याचा आर्थिक हिशेब तर बसला पाहिजे! तो बसत नाही. तसंच दरवर्षी स्वत:च झाडं लावतात आणि ती मरतात. शासनाने बरीचशी कामं चांगली केली हा भाग वेगळा आहे. शाळा, पिण्याचं पाणी, जेवढं शक्य आहे तेवढं केलंय.

(तुम्ही जरा मोकळं बोला. वाटल्यास असे सांगा, की हा भाग घ्या, हा घेऊ नका; पण तुमचं मोकळं बोलणं गरजेचं आहे. आत्तापर्यंत जे बोललो, तुम्ही जर पाहिलं तर ते तसेच आहे.)

**श्री. पाटील –** एक मात्र नक्की आहे. तुमच्या मनात चीड आहे. तुम्हाला हे

असं संतापून बोलावंसं वाटतं.

**भाऊ –** मी शरद पवारांना म्हणालो, की ''साहेब, सगळी चांगली माणसं शासनाविरुद्ध बोलताना आढळतात. उदा. शंतनुराव किर्लोस्कर, कश्यप महेंद्रा, राहुल बजाज...'' ही तीन नावं मी सांगतच होतो तेवढ्यात शरदराव म्हणाले 'आणि भवरलाल जैनही!' त्यांनी त्या तिघांनंतर लगेच माझ्या नावाचा उल्लेख केला. कारण, त्यांना कल्पना आहे, भवरलाल जैन हेही यासंदर्भात स्पष्ट बोलतात म्हणून...

**श्री. पाटील –** अगदी बरोबर आहे, पण ते एक असं व्यक्तिमत्त्व आहे, की तुम्ही तोंडावर जरी बोलले तरी त्यांना खेद आहे, असं काही जाणवलं नाही आजपर्यंत. भाऊ, नद्याजोड प्रकल्पासंदर्भात अनेक तज्ज्ञांचा असा विचार आहे, की त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडण्याची खूप शक्यता आहे. म्हणजे मुळावरच घाव बसण्याची शक्यता असल्यामुळे हा परवडण्यासारखा होईल का? अशी चर्चा त्यासंदर्भात होत असते.

**भाऊ –** मुळात प्रश्न असा आहे, की त्यासंदर्भात कोणी आकडेवारी द्यायला तयार आहे का? समजा एक गणित केलं दहा लाख झाडं तोडली जातील. मी त्यासाठी सांगतो की दहा कोटी लागतील म्हणून. कारण, पाण्याशिवाय झाड कसं जगेल? त्यामुळे तुम्ही हे खात्रीनेच समजून घ्या, की दहा कोटी लागतीलच म्हणजे दहा लाख झाडं मरणार आहेत. तुम्ही हे आकडे काढले याला काही अर्थ नाही. मी इथे पाचशे एकरामध्ये जर दोन लाख झाड लावू शकलो, त्यामुळे हा परिसर तुम्हाला चांगला वाटतो, निसर्गरम्य तर तो आहेच.

इथे जो रोजगार आहे तिथे तेवढा आहे का? रोजगार पाहिजे, उत्पादन पाहिजे, पर्यावरण पाहिजे, चारही तर गोष्टी दिलेल्या आहेत, मग तसं नियोजन इतरांनाही का नाही करता येत? तेवढ्या भरपूर संख्येने झाडं इतरांनाही का लावता येत नाही?

**श्री. पाटील –** मला असं वाटतं, की त्यांचीही हीच अडचण असावी, की तुमच्यासारखी विश्वासार्ह माणसं पटकन त्यांना नजरेसमोर दिसत नसतील का?

**भाऊ –** नाही मिळत. शासन हे तरी काय आहे? समाजाचाच भाग आहे. का ते आपल्यापेक्षा वेगळे आहेत? ते काही क्लेम करीत नाही, की आम्ही ईश्वर आहोत. तेसुद्धा आपल्यापैकीच आहेत. आपण जर चांगले असलो तर ते खराब कसे होतील? आपणही खराब आहोतच. त्यामुळे आपण हा मुद्दा मानायलाच पाहिजे,

की समाजाचा अर्थच शासन आहे.

**श्री. पाटील** – आता भयावह अशा गोष्टी आहेत, की पंजाबातसुद्धा शेतकऱ्यांमध्ये अशा आत्महत्या होत आहेत आणि आता नवीन एक एक प्रकार सुरू होत आहे.

**भाऊ** – त्याची कारणं प्रत्येक प्रांतात एकच असतील? जसजसं हे जीवनमान वाढेल तसतसं टेन्शन वाढेल आणि टेन्शन वाढून या वृत्ती वाढतीलच.

**श्री. पाटील** – भाऊ, आपली काही पुस्तकं मी वाचली. त्यातला मला आवडलेला मुद्दा हा, की तुमच्या गावातल्या लोकांच्या प्रतिक्रिया पुस्तकात लिहिल्या आहेत आणि आपण लहानपणी कोणाला मावशी म्हणतो, कोणाला काका म्हणतो त्यांच्या प्रतिक्रिया त्यात लिहिल्या आहेत. अगदी तुम्ही स्वत: असं लिहिलं, की आधी गाव मग माझं सगळं कर्तृत्व ही जी नाळ टिकवून ठेवलेली आहे! एवढं सगळं मला असं वाटतं, की हे सर्व सांभाळलेल्या, जोपासलेल्या एका फार मोठ्या वृक्षाशी मी बोलतो आहे की काय? भाऊ, प्लास्टिकसारख्या उद्योगात कसे काय आलात?

**भाऊ** – कृषिक्षेत्रात क्रांती करायला हेच प्लास्टिक उपयोगी पडलं ना? पहिल्यांदा नदीवरचं पाणी शेताच्या बांधावर आणायला. पूर्वी जे अडीच अडीच फुटांचे नॉन प्रेशर पाइप वापरत होतात, ते दररोज पाच वेळा फुटत होते. आम्ही ते जोडत होतो आणि त्यातच दिवस वाया जात होता. अर्धच पाणी शेवटपर्यंत पोहोचत होतो. त्याआधी तर दांडांनीच पाणी देत होतो. हे सगळं बंद होऊन ज्या वेळेला प्लास्टिकचे पाइप आले म्हणजे पीव्हीसीचे पाइप आले, त्या वेळी तुम्ही नदीचं पाणी किंवा जिथे असेल तिथलं पाणी बांधावर आणू शकला; पण त्यातलं एक लिटरही पाणी वाया गेलं नाही.

एकदा ते केल्यानंतर आयुष्यभर तिकडे बघण्याची गरजही नाही असं तंत्रज्ञान आलं. त्यानंतर ठिबक आलं. हे दोन्ही प्लास्टिकच आहे. तर हे दोन नसते तर शेतीचं काय झालं असत? त्याची कल्पनाही कुणी करू शकत नाही. म्हणजेच या तंत्रज्ञानाचा उपयोग आपण कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठीच केला आहे.

**श्री. पाटील** – मान्य आहे, आम्हाला १९८० मध्ये प्लास्टिकचा धडा होता आणि त्या वेळेस प्लास्टिक हे नव्याने शोधलं गेलं होतं. त्याचा उदो उदो चालू होता; परंतु लगेच आता त्याचे वाईट परिणाम दिसायला लागले. सरकार त्यावर

हळूहळू बंदी आणत आहे. हे असताना आपण जे म्हणत आहेत, की शेतीसाठी प्लास्टिकचा उपयोग इतकाच अर्थ मर्यादित राहिलेला नाही. भवरलालजी जैन हे व्यक्तिमत्त्व जे आहे; हे आता ज्ञानमय झालेले आहे, आपला प्रत्येक शब्द आम्हा ऐकणाऱ्यांसाठी महत्त्वाचा वाटणार आहे. 'प्लास्टिकचा पाइप वापरा' असं जेव्हा तुम्ही स्वत: म्हणतात त्या वेळी आम्ही ते शिरोधार्य मानतो. वास्तविक प्लास्टिक घातक ठरलेले आहे, तसे सिद्ध झालेले आहे. भवरलालजींनी म्हटल्यानंतर मात्र आम्ही विश्वास ठेवणार!

**भाऊ –** तुम्ही जे म्हणता, की प्लास्टिक घातक ठरलेलं आहे, कशामुळे म्हणता? जगाच्या पाठीवर पाण्याच्या वाहतुकीसाठी प्लास्टिकसाठी कुठेही बंदी आलेली नाही. आपण त्याचा उपयोग फक्त एकाच कामासाठी करतो. आमच्या शाळेत आम्ही प्लास्टिक आणूसुद्धा देत नाही; पण सगळे पाइप जमिनीखाली गाडलेले असतात. त्यामुळे पन्नास ते शंभर वर्षेसुद्धा त्यांना काही होत नाही. त्यातून पाणी प्रवाहित होत राहते, लीक होत नाहीत. अशा परिस्थितीत त्याचा उपयोग जर आपण केला नाही तर एक कामधेनू उपलब्ध असून आपण उपयोग करीत नाही असा त्याचा अर्थ होईल.

योग्य असा दुसरा कोणताही पर्याय जोपर्यंत उपलब्ध नाही, तोपर्यंत ते तंत्रज्ञान वापरावंच लागेल. असं कुठेही झालेलं नाही, की तुम्हाला जे म्हणायचं आहे, की हे जे प्लास्टिकचे तुकडे, कॅरीबॅग कुठेही टाकल्या तरी ते नाश होण्यासारखे नाही. त्या तिथे तशाच पडून असतात आणि कालांतराने त्यातून गॅस वगैरे निर्माण होऊन पर्यावरणाला त्याचा त्रास होऊ शकतो. या ज्या उपयोगाच्या काही पद्धती आहेत त्या उपयोगांवर नियंत्रण करायचं हे धोरण आहे.

तुम्ही म्हणता ते या पाइपाला लागू नाही. त्याचं कारण असं, की आम्ही ज्या प्लास्टिकचा उपयोग करतो तो केवळ शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी. कोणताही पदार्थ आपण असा तयार केलेला नाही, की जो पर्यावरणाची हानी करतो, म्हणून मी म्हणतो, की बायोडिग्रेटेबल प्लास्टिक म्हणजे साधारणत: या कॅरीबॅगस् आहेत, पॅकिंग मटेरिअल आहे याला तुम्ही कुठेही टाकलं तर त्याची माती होऊन जाईल असं जे व्हायला पाहिजे त्याला बायो डिग्रेटेबल म्हणतात.

**श्री. पाटील –** हे तसं आहे काय?

**भाऊ –** हे असंच राहणार आहे ना? शंभर वर्षे काय आणि दोनशे वर्षे काय? आणि ते परत रिसायकल होतं ना. म्हणजे समजा एक काढलं तर त्या ठिकाणी नवीन बसवायचं तर याचा उपयोग करताना आपण रिसायकल करतोच. आपण एकही किलो माल इकडेतिकडे विकत नाही.

**श्री. पाटील –** मी तेच सांगतो, की भवरलालजींनी प्लास्टिकचा उपयोग मर्यादित स्वरूपात केला आहे.

**भाऊ –** मर्यादा सांभाळून करणार असाल तर ते घातक नाही. शंभर–दोनशे वर्षे काही होणार नाही. पर्यावरणाला जिथे हानी होईल, तिथे प्लास्टिक वापरले जाऊ नये. परवाच्या माझ्या प्लास्ट इंडियाच्या भाषणातही मी हा मुद्दा मांडला होता.

**श्री. पाटील –** भाऊ, मला आपल्या शब्दाशब्दात हे जाणवले, की मर्यादा घालून घेणं, बंधन मानणं ही आयुष्यात फार महत्त्वाची गोष्ट आहे.

**भाऊ –** हो, ते खरंच आहे. प्रत्येक गोष्टीला मर्यादा घालून घेणं आवश्यक आहे. शासनाच्याही बाबतीत नागरिकांनी तेच करायला हवे. लक्ष्मणरेषा आखून घेणं हे महत्त्वाचं आहे. कारण, शासनालाही त्यांच्या मर्यादा आहेत आणि तसा तेवढा मर्यादित प्रयत्न ते करतात. आपल्याला कसं म्हणता येईल, की शासन काहीच करीत नाही? Whether it concerns pharmacy or agriculture, we should be liberal. आपल्याला जशा मर्यादा आहेत, तशा इतरांनाही असतात.

धन्यवाद!





# पद्मश्री सन्मानाच्या सावलीत

'झी' टीव्हीसाठी मुलाखत
– विकास भदाणे – २५.०१.२००८

*'पद्मश्री'सारखा सन्मान मिळाल्यानं माणसाला आनंद व्हावा, कृतकृत्य झाल्याची भावना व्हावी हे खरं; पण भवरलालजींसारखा माणूस विचारांती अंतर्मुख होतो व या सन्मानामागच्या सुख-दु:खाची उजळणी करतो. या सन्मानाची कारणमीमांसा करताना त्यांना शेती, शेतकरी यांचीच आठवण यावी यात नवल ते कसलं? हा सन्मान ते शेतकऱ्यांनाच अर्पण करतात. नव्या मोठ्या सामाजिक कामांच्या जबाबदाऱ्या घेण्याचं मनोगतही प्रकट करतात.*

*अशा माणसांना असंच टॉनिक हवं असतं!*

**श्री. विकास भदाणे –** पद्मश्री मिळाल्याबद्दल काय वाटतंय?

**भाऊ –** खरं मनापासून असं वाटतंय, की हा सन्मान या देशातल्या सगळ्या कानाकोपऱ्यात असलेल्या शेतकऱ्यांचा आहे. जोपर्यंत आपल्या देशात शेतीला प्रतिष्ठा मिळत नाही तोपर्यंत शेतकऱ्याला सन्मानही मिळत

नाही आणि आता हा सन्मान मला असं वाटतं, की आता शेतीला प्रतिष्ठा आणि सन्मान मिळायला सुरवात झाली आहे त्याचं हे द्योतक आहे.

एकीकडे हे जरी खरं वाटत असलं तरी शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्यांचे सावट या आनंदावर आहे. त्यासाठी आपण काय करू शकतो, याबद्दल सतत चिंतन करणं हा यापुढे माझा निर्धार आहे. त्यासाठी केवळ कर्जमाफी देऊन ते जमेल असं मला तरी वाटत नाही.

सक्रियपणे आपल्याला काय करता येईल याचाही विचार करायचा हे मी निश्चित केलेलं आहे. तेव्हा यापुढचे आयुष्य, विशेषकरून कोरडवाहू शेतीत आणि शिक्षणक्षेत्रात काय करता येईल यासाठी घालविणार आहे. शासनाने हा जो काही निर्णय घेतला तो चांगलाच आहे आणि त्यासाठी आपण उपकृत आहोत.

**श्री. भदाणे** – थोडा हिन्दी मे।

**भाऊ** – मुझे लगता है, ये जो सम्मान है ये मेरा नही बल्की देश के किसानों का है। जबतक कृषि को, खेती को प्रतिष्ठा प्राप्त नही होती तबतक इस देश मे किसानों को भी सम्मान नही मिलेगा। मुझे लगता है, ये सम्मान मेरा नही बल्की देश मे किसान जहाँ जहाँ है उनका ये सम्मान है। कृषि को, खेती को



जबतक प्रतिष्ठा नही मिलती तबतक किसान को सम्मान नही मिलनेवाला और ये आज का जो सम्मान हो रहा है वो उस की एक शुरुवात है और अब किसान और खेती को अच्छे दिन आनेवाले है, ये भी उस मे बिल्कूल जाहीर दिखता है।

आगे का जीवन समर्पित दो ही कामो के लिए करना है। एक तो शिक्षण क्षेत्र मे जो मूलभूत काम करना है, छोटे बच्चे जो है जो की पाचवी के उपर, लगातार जिन को समझ आकर उनका चरित्र बनाने का काम होता है वो करने के लिए मैं कटिबद्ध हूँ और सोचता हूँ। ये भी हो की साथ मे शासन ने जो भी कुछ किया है उसके बारे मैं उनका शुक्रगुजार हूँ।

धन्यवाद!






# एकविसाव्या शतकातील भारतीय शेतीवरचे आत्मचिंतन

'पद्मश्री'नंतर आकाशवाणी मुलाखत

– सतीश पप्पू – ०२.०२.२००८

*भारतीय शेती व्यवस्थेमध्ये पिढ्यान्‌पिढ्यांच्या मालकी हक्कांमुळे तसंच वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनींचे तुकडे वाढत गेले व त्या तुकड्यांचा आकारही लहान होऊ लागला. पर्यायानं शेतीवर जगणारी तोंडं वाढली व उत्पादन घटलं. या अरिष्टांवर कशी मात करावी हे पाहताना तो प्रश्न कमी व्यवहाराचा व जास्त भावनेचा असल्याचं ध्यानात आलं.*

*शासनानं एस. ई. झेड.चा पुकारा केल्यावर तर हा प्रश्न ऐरणीवरच आला. भाऊ सर्वदृष्टीनं ऊहापोह करून मार्ग सुचविण्यात अगदी योग्य व्यक्ती. याचं कारण ते स्वत: शेतकरी आहेत, शेती व्यवसाय करीत आहेत.*

*शेतीचं अर्थशास्त्र उद्योजक भाऊ उत्तमरीत्या जाणतात. जैन इरिगेशनतर्फे निर्यातही मोठ्या प्रमाणात होते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा दांडगा अनुभवही भाऊंच्या गाठीला आहे. या सर्व कारणांपेक्षा महत्त्वाचं कारण म्हणजे ते*

*खोलवर विचार करणारे विचारवंत आहेत. त्यामुळं या जटिल समस्येची मीमांसा करून त्यावर न्याय्य तोडगा सुचवू शकतात.*

*यादृष्टीनं त्यांचं हे विचारमंथन निश्चितच दिशादर्शक आहे.*

**श्री. सतीश पप्पू –** भाऊ हा गौरव म्हणजे भूमिपुत्राचा गौरव! 'पद्मश्री' पुरस्काराच्या सन्मानानंतर आपण ज्या क्षणी मागे वळून पाहता, तेव्हा त्या वाटचालीमधले कुठले टप्पे लक्षात येतात?

**भाऊ –** आपल्या आयुष्यातील टप्पे, घटना, व्यक्ती या सर्वांचं स्मरण करायला लावणारा. मुळातच कृषिक्षेत्राशी माझं घट्ट नात बांधून दिलं ते माझ्या आईने. तिचं माझं प्रेरणास्थान! उपजिल्हाधिकारीपदासाठीचे म्हणजे राजपत्रित अधिकारी या श्रेणीचं नियुक्तीपत्र मला प्राप्त झालं होतं. मी ज्या वेळी तिला विचारलं, की ''आई मी नोकरी करू की एखादा व्यवसाय, काय करू?' तेव्हा आईनं सांगितलं, की ''अरे, नोकरी करू नकोस. त्यानं तुझं पोट भरेल, कदाचित तुझ्यासोबत अवतीभोवती असलेल्या काही लोकांचंही पोट भरेल; परंतु पशू-प्राणी यांचं पोट मात्र भरणार नाही.'' पुढे ती म्हणाली, ''मी अशिक्षित



आहे, मला काही समजत नाही; पण मला असे वाटते, तू असे काही करावे, की जेणेकरून सर्वांचेच भले होईल.''

या संदेशाचा अर्थ सुस्पष्ट होता. मी शेती करावी हाच तो अर्थ होता. शेतीमध्येच हे शक्य आहे.

माझ्या आयुष्यातली आणखी एक प्रेरणादायी घटना तुम्हाला सांगतो. एकदा मी पेट्रोलपंपावर बसलो असताना एक स्कॉटिश ड्रिलिंगरिंग डिझेल भरायला आली. त्या गाडीवर एक ध्येयवाक्य लिहिलं होतं– Agriculture is a profession with future. शेती हा एक उज्ज्वल भवितव्य असलेला व्यवसाय आहे. त्या संदेशानेसुद्धा माझ्या मनात खळबळ निर्माण केली. मी त्यासंदर्भात जास्त गहनपणे विचार करू लागलो आणि शेवटी या निर्णयावर पोहोचलो, की आपल्याला कृषिक्षेत्रातच काम करायचे आहे.

माझ्या आयुष्याच्या प्रवासात मला अनेकांची साथसोबत मिळाली. काहींच्या नावाचा कृतज्ञतेने उल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे. या कृतज्ञ नामावलीत प्रथमतः नाव सांगायला हवे श्री. शरद पवारसाहेबांचे! मला वेळोवेळी व्यक्तिगतरीत्या आणि माझ्या संस्थेला त्यांनी भरभरून आशीर्वाद दिले आहेत. प्रत्येक वेळी शेतीमध्ये मी जे काही चांगलं केलं असेल त्यांनी त्याची मनापासून स्तुती केली. त्या कार्यात शासनाकडून जी काही मदत होणं शक्य असेल ती मदतसुद्धा त्यांनी उपलब्ध करून दिली, त्यांच्या हार्दिक प्रोत्साहनामुळे मी अनेक संकल्प पूर्ण करू शकलो.

पद्मश्री आप्पासाहेब पवारांचाही उल्लेख मी नेहमी कृतज्ञतेने करीत असतो. ते तर एकूणच या सर्व कामाबाबत माझ्या मागेच लागले होते. आप्पासाहेब म्हणत, की ''भवरलालजी मी आतापर्यंत माझ्या आयुष्यात कृषिक्षेत्रात जे काम केलं, तो वारसा तुम्हाला चालवायचा आहे.'' '...भवरलालजींसारखी शंभर माणसं घडणार असतील तर निश्चितच या देशाचं भवितव्य उज्ज्वल आहे.' हा अभिप्राय अण्णासाहेब शिंदे यांचा. त्यांनी ज्या वेळी जैन इरिगेशनला भेट दिली, त्या वेळी लेखी स्वरूपात अभिप्राय देत असताना असं नोंदवून ठेवलं आहे.

कवी ना. धों. महानोर ज्यांना मी नेहमी प्रेमाने नामदेव म्हणून संबोधतो त्याचाही मी उल्लेख करतो. आमच्या दोघांचीही प्रेरणा आणि धारणा ही मायमातीच आहे. मी वाकोदचा तर ते अगदी जवळ असलेल्या पळसखेड्याचे. ठिबक सिंचन,

कृषिसंवर्धन या दोन्ही गोष्टी, हे दोन्ही प्रकल्प आणि त्याही आधी पाइप या तिन्ही गोष्टी शेतकऱ्याला वरदान ठरल्यात! केवळ या घटनांमुळे आणि लोकांकडून मला मिळालेल्या उत्साहामुळे एवढे काम होऊ शकले, असं मला वाटते.

**श्री. पप्पू –** आपण एक पालक या नात्यानेसुद्धा कंपनीच्या प्रत्येक कामगाराच्या मागे उभे राहता. ही जी एक वडीलकीची जाणीव आहे ती दुर्मीळ असते. हा आई–वडिलांच्या संस्काराचा भाग आहे, असं आम्ही म्हणायचं काय?

**भाऊ –** एक बाब आधीच स्पष्ट करायला हवी, मी माझ्यासोबत काम करणाऱ्यांना कामगार म्हणत नाही तर 'सहकारी' म्हणतो. सहकाऱ्यांना आपुलकीची वागणूक आणि वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्यासंदर्भात तसा विचार करणे आणि कृती करणे. केवळ संस्काराचाच भाग नव्हे; तर पिढ्यान्‌पिढ्या माझ्या बांधणीत आणि घडणीत जे आकाराला आलं, त्याचाच तो आविष्कार आहे असं मी मानतो. या पुरस्कारामुळे विशेष जबाबदाऱ्या माझ्यावर येऊन पडल्या आहेत मला असे वाटते आहे.

विचार, उच्चार आणि आचार या सर्वच जीवनमूल्यांबाबत मी आता आणखी जास्त जपून वागलं पाहिजे असंही माझ्या लक्षात आलेलं आहे. संवेदनशीलता, सोशिकता ही वाढविली पाहिजे. माझ्या अंगी मुळात जरी कृतज्ञता असली तरी त्यातसुद्धा लक्षणीय वाढ केली पाहिजे. जर मी हे सगळं करू शकलो तर खऱ्या अर्थाने या पुरस्काराचा मी सन्मान केला असं होईल. मला असं वाटते की असले उदात्त विचार देण्यासाठी, त्याचा एक स्तर वाढविण्यासाठी हा पुरस्कार दिला गेला आहे.

**श्री. पप्पू –** पद्मश्री स्वीकारताना भाऊ, तुमच्या सहचारिणीची, स्वर्गीय कांताबाईंची आठवण आणि त्यांच योगदान या मुद्यावर थोडंस सांगता काय?

**भाऊ –** हा प्रश्न विचारला, की माझं मन भरून येतं, डोळ्यात अश्रू येतात. तिची आठवण आणि तिचा पंचेचाळीस वर्षांचा सहवास एक आदर्श भारतीय नारी म्हणून तिची जीवनयात्रा मनःपटलावरून जाते. तसा प्रवास जर शक्य झाला नसता, तिने तो केला नसता, तर मी आयुष्यात एवढा यशस्वी झालो नसतो. केवळ शेतीतच नव्हे तर आयुष्यातही पुढे येऊ शकलो नसतो. तेव्हा ती या पुरस्काराची निम्म्यापेक्षाही जास्त हक्कदार आहे असं मी मानतो. आज ती असती तर तिला काय वाटलं असतं? तीच बोलू शकते; परंतु आज माझा हा आनंद द्विगुणित झाला

असता एवढं मात्र मी नोंदवू इच्छितो.

**श्री. पप्पू –** ऐन उमेदीत असताना रोज जवळपास वीस ते एकवीस तास सतत तुम्ही काम करीत होतात, आज अठरा ते एकोणीस तास काम करता हे कामाचं स्वरूप तुम्ही वाटून कसं घेता? आणि अनेक विचार एका वेळेला विभाजित कसे करता?

**भाऊ –** खरंतर कामाच्या वेळा जर म्हटल्या तर त्या दोन प्रकारे विभागल्या जातात. एक तर आपण जागरूकपणे काम करतो. त्या कामाच्या वेळा चौदा तास ते सोळा तास असू शकतात, तेवढ्याच त्या असतात. बाकीच्या वेळा आपण झोपून असतो किंवा सुप्तावस्थेत आपण त्यावर विचार करत असतो. जर आपण त्याचाच त्यामध्येच समावेश केला तर मग या चौदा तासांचे किंवा सोळा तासांचे चोवीस ताससुद्धा होतात. जी व्यक्ती जेवण करावे लागते म्हणून करते, थोडीफार विश्रांती आवश्यक असते म्हणून घेते, ती व्यक्ती, तो माणूस चोवीस तास कामच करत असतो आणि त्यात विभागणीबाबत बोलायचे झाल्यास मी असे म्हणेल, की माझ्या आयुष्यात वेळेची विभागणी हा विषयच नाही, जोडणीच आहे.

प्रत्येक गोष्ट पुन्हा पुन्हा जोडली गेलेली आहे. कुटुंब आणि काम हे वेगळं आहे, समाज आणि कुटुंब हे वेगळं आहे, समाज, कुटुंब आणि काम हे वेगळं आहे, असं न समजता या सगळया गोष्टींचा एकात्मिकपणे विचार करणं त्यालाच मी काम असं म्हणतो. कंपनीच्या कार्यसंस्कृतीची व्याख्या विशद करताना मी असं लिहून ठेवलेलं आहे, की काम म्हणजेच जीवन आणि जीवन म्हणजेच काम! माझ्या या मूळ धोरणामध्ये आजपर्यंत कणभरही फरक पडलेला नाही. त्यामुळे याचे विभाजन होण्याचा प्रश्नच नाही.

ज्या वेळी मी माझ्या नातवंडांबरोबर वेळ घालवत असतो आणि त्यांच्यावर संस्कार करीत असतो, त्याचवेळी त्यांच्याकडूनही शिकत असतो. त्यामुळे शिक्षण घेण्याची प्रक्रिया सुरूच असते. समजा मी एखाद्या गावाला शेतात गेलो, रस्त्यावर जर एखादं मूल रडताना दिसलं किंवा एखादा भिकारी जो आंधळा आहे आणि त्याचे बरोबर एक मुलगी आहे जी त्याचा हात धरून पुढे चालते आहे, असे दृश्य पाहून माझं हृदय क्षणभर का असेना थांबल्यासारखं होतं.

मी तिथे थांबतो आणि तिथे माझ्या मनातली संवेदनशीलता जागृत होते. याचाच अर्थ असा, की जीवनातला एकही क्षण असा जात नाही, जागरूकपणे किंवा सुप्त

अवस्थेत की ज्या वेळी आपल्याला विचार सोडून गेले. विचार त्याच वेळा माणसाला सोडून जातात जेव्हा त्याचा जीवन प्रवास संपलेला असतो. नाही तर जीवन हे एकात्मिक आहे आणि त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनसुद्धा एकात्मिक असावा.

**श्री. पप्पू –** भाऊ, तुम्ही उद्योगसमूहाच्या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर असताना कठोर असता आणि अनुभूतीची जी 'अनुभूती' आली, तेव्हापासून लोकांना भाऊंमध्ये आजोबा जास्त दिसू लागले. तुम्ही मुलाखतीच्या ओघात एक सांगितलं, की संवेदनशीलता ही मुळात आहे, ती छोट्या मुलांच्या सहवासात आणखी वाढायला लागली. हा आता अविभाज्य भाग झाला असं म्हणायचं का?

**भाऊ –** होय, तो अविभाज्य भाग आहेच. अजून एक गोष्ट अशी, की ज्यांचं वय झालं आहे ती माणसं आणि मुलं यांच्यात फार मोठं साम्य आहे. इंग्रजीत त्यांनी एक विचारच मांडला आहे. चाईल्ड इज द फादर ऑफ मॅन. जसजसा माणूस या वाढत्या वयाकडे प्रवास करतो, तसतसं त्याच्यातलं बालपण जास्त जागरूकपण पुढं येते. आतापर्यंत जीवनाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन असतो, की मला हे करायचं आहे तेही करायचं आहे, अशा प्रकारे माणूस एक स्पर्धात्मक जीवन जगत असतो.

स्पर्धात्मक जीवन जगताना त्याला इतर विषयांबद्दल विचार करायला वेळ नसतो. जेव्हा पुढची पिढी आपण उभी केलेली संस्था आपली जबाबदारी सांभाळते तेव्हा तुम्हाला अशा विषयांबद्दल विचार करायला फुरसत मिळते. म्हणून आज जर तुम्ही मला विचारलं तर माझ्यासमोर दोनच विचार आहेत. त्यापैकी एकतर पुढची येणारी जी पिढी आहे त्यासाठी आपण काय करू शकू? शिक्षणक्षेत्र आणि कोरडवाहू शेतकरी माझ्या डोळ्यांसमोर आहे. या दोन विषयांनी मी व्यापला गेलो आहे किंवा झपाटून गेलो आहे असं म्हटलं तरी चालेल; पण करायचं आहे ते हेच!

**श्री. पप्पू –** जागतिक पातळीवर विचार करता या संपूर्ण बदलत्या परिस्थितीत आपल्या भारतीय शेतकऱ्यांची नेमकी अवस्था ही कशी राहील? कारण सेजच्या संदर्भामध्ये तुम्ही सातत्याने आपली भूमिका कठोरपणे परखडपणे मांडली आहे. भारतीय शेतकरी अस्तित्वात राहील अशी परिस्थिती भविष्याच्या दालनात कुठे दिसते आहे का?

**भाऊ –** तसा कठीण प्रश्न आहे, कमी वेळात याचं उत्तर देणं अवघड आहे. पण थोडक्यात मांडतो, की एक तर कोरडवाहू शेतीचे दिवस जे आजच बिकट

आहेत, वर जर शासनानं आणि समाजानं त्याकडे लक्ष दिले नाही तर परिस्थिती आहे त्यापेक्षाही खूपच जास्तच बिकट होईल, जास्त कठीण होईल, ती कठीण झाल्यानंतर त्याला दुसरा पर्यायच राहणार नाही. एक तर त्यानं शिकावं आणि कोणता तरी कारखाना टाकावा किंवा त्याच्या अंगी स्वत:चं काही कसब असेल तर त्याचा उपयोग करून त्याने पुढे जावं किंवा त्याला तेही शक्य नसेल तर त्याची स्वत:ची शेती चांगले पैसे मिळतात म्हणून इतरांना विकून टाकावी. याची चाहूल आपल्याला आताच लागलेली आहे.

पुणे, मुंबई, नाशिक यांच्या आसपासची जी जमीन आहे, ती पूर्वीची जी पाच किंवा दहा–पंधरा हजार प्रतिएकर या भावाने कोणी घेत नव्हतं. त्याला आज जर एक ते दीड लाख रुपये मिळाले तर तो समजतो, की या पैशांच्या व्याजानेसुद्धा माझं काम भागेल; परंतु या शेतीत माझं काम भागणार नाही म्हणून तो स्वत: स्वखुशीनेसुद्धा शेती विकायला तयार झाला आहे. असं म्हणणं खरं म्हणजे थोडंसं धारिष्ट्याचे होईल असही मला वाटतं. नाइलाजास्तव तो त्याच्या परिस्थितीत मारला गेला आणि आतापर्यंत त्याने सगळं पाहिलं आणि सहन केलं. इच्छा नाही तरीही तो ते करायला उद्युक्त झाला आहे.

मला असं वाटतं, की हीच प्रथा किंवा असा जो काही विचार त्याच्या मनात घोळायला लागला आहे, कारण पैसा त्याला दिसतो आहे. लहान लहान शेतीचे तुकडे कधीही जास्त उत्पादकता आणि उत्पन्न देऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती असल्यामुळे या ज्या गाड्या आहेत या दोन्हीविरुद्ध दिशेने एकमेकांकडे येत आहेत आणि त्या कुठेतरी मिळणार आहेत. म्हणून हा जरी आदर्शवाद असला की शेती हा आपल्या पूर्वजांच्या आठवणीचा एक भाग आहे, शेती ही त्यांच्या रक्ताची आणि श्रमलेल्या हाडांची आपल्याला ओळख करून देणारी बाब आहे.

शेती या संस्कृतीचा आत्मा आहे. परिश्रमावर आधारित शेती ही खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृती आहे. आगामी काळात हळूहळू का असेना त्यादृष्टीने परिवर्तन घडू शकते, असे परिवर्तन जगात अनेक ठिकाणी घडलेलेही आहे. आजच्या परिस्थितीला शासन जेवढे जबाबदार आहे तेवढाच समाजही जबाबदार आहे. मला निश्चितपणे असे वाटते, की हे परिवर्तन भारतात घडायला अजून किमान पन्नास वर्षे लागतील. अजूनसुद्धा चांगली शेती जिथे आहे, पाण्यावरती शेती जिथे आहे, तिथे

त्यांनी फळबाग लावलेली आहे. त्याला कुठेतरी आधार आहे. तो माणूस आता हताश झालेला नाही. तो आत्महत्येकडे वळलेला नाही आणि म्हणून आज आपण इथे बसू शकतो. मला असं वाटतं, की समाजाने या उपेक्षित वर्गाला जवळ केलं.

उपेक्षित वर्गासाठी ख-या अर्थाने लांब पल्ल्याच्या ज्या गोष्टी आहेत, त्यात गुंतवणूक केली तर बरं होईल. पहिली पंचवार्षिक योजना झाली, त्या वेळी एकूण बजेटच्या ४७ टक्के बजेट हे शेतीसाठी, पाण्यासाठी आणि विजेसाठी होतं. आज तेच बजेट ७ ते ८ टक्क्यांवर आलं आहे. केवळ शेतीसाठी ते जेमतेम अडीच ते तीन टक्क्यांवर आलेलं आहे आणि लोकसंख्या तर वाढते आहे. त्यामुळे शेतीवर पडणारा जो भार आहे तो कमी होणं गरजेचं आहे. तो कमी होण्यासाठी दोन मार्ग आहेत. एकतर त्यासाठी लागणारं पाणी आणि ती जमीन या दोघांची उत्पादकता वाढली पाहिजे. ती उत्पादकता वाढण्यासाठी शेतकऱ्यांचा स्वत:चा जो काही विचार आहे त्याची जी प्रवृत्ती आहे आणि त्याचा जो दृष्टिकोन आहे, तो बदलण्याची गरज आहे.

दृष्टिकोन जर त्यांनी बदलला तर जी एकत्रीकरणाची प्रक्रिया आहे, ती कदाचित थोडी आणखी लांबू शकेल. काय करावं, असं मला जर विचारलं गेलं तर तेच करणं योग्य आहे. शेती अशा प्रकारे नष्ट करणं किंवा भ्रष्ट करण्याची गरज नाही. वास्तविक पाहता, आपल्याकडे पडीत रान ज्याला शासन फॉरेस्ट म्हणते; परंतु जिथे साधं एक झाड, झुडूपसुद्धा दिसत नाही अशी हजारो लाखो एकर जमीन, बंजर जमीन आपल्याकडे पडून आहे. तिथे जाऊन याची तपासणी का करीत नाही?

ग्रामीण विभागात जाऊन एसईझेड का करीत नाही? ते मुंबई आणि पुण्याच्या आसपासच जाऊन एसईझेड का करतात? शासन यासाठी त्यांना का प्रोत्साहन देते? राजकारण्यांच्या एवढं जवळ असून जर मला हा विषय कळला नसेल तर समाजात इतर किती लोकांना तो गवसला असेल याबद्दल माझ्या मनात शंका आहे. ज्या वेळी एसईझेड कायदा पुढे येईल आणि त्यावर जे काही प्रकल्प होतील त्यातला जो भयानकपणा आहे हा समाजापुढे चांगल्या अर्थाने आणि स्पष्टपणे येऊ शकेल.

समाज केव्हा ना केव्हा जागृत होईल. आजही समाजाला हे माहीतच नाही, की एसईझेड म्हणजे काय? ते पूर्णपणे वाईट आहे हे म्हणणेही चूक आहे. तेवढंच ते चांगलं आहे हे म्हणणंही चुकीचं आहे. त्यातलं जे चांगलं आहे ते आपण घेतलं

पाहिजे. त्यात हळूहळू बदल होतच आहेत. कारण, सर्वोच्च न्यायालयाने नुकताच जो निर्णय दिला आहे. त्यात शासनाला त्याला लोकहितासाठी एखाद्या खासगी एसईझेडसाठी जमीन संपादित करणे शक्य होणार नाही.

२००५ मध्ये ज्यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा मला पुरस्कार मिळाला, त्या पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या मनोगतात मी ते मांडलेलं आहे. हे सगळं करावं लागेल; अन्यथा हा कायदा राक्षसी कायदा आहे, असं मी त्याचं वर्णन त्यात केलं आहे. तेव्हा मला असं वाटतं की जो कायदा आहे, त्याचं स्वरूप आपोआपच बदलणार आहे. समाजाच्या वजनामुळे बदलेल किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या दडपणामुळे बदलेल, इतर काही कारणांमुळेही बदलेल. हा कायदा आहे त्या स्वरूपामध्ये त्याची अंमलबजावणी शक्यच होणार नाही.

समाज घडूच देणार नाही. समाजाच्या मनात हे नाही, की ही सगळी जी जमीन आहे, जिथे चांगली पिकं निघत आहेत अशी सगळी पिकं बिल्डर्सच्या हातात जावी आणि त्यातून त्याने खूप पैसा कमवावा. त्याच्या काही पैशातला तो भाग आहे तिथेच तो खर्च करावा आणि तिथे जे काही विशिष्ट चांगले सुशिक्षित लोक असतील त्यांचंच फक्त भलं होणार आहे. त्यामुळे पाच हजार शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट होणार आहे. तेव्हा हा जो काही व्यवसाय आहे किंवा हा जो काही व्यवहार आहे, हा व्यावहारिक निकषांनुसार तपासून पाहिला तर त्या चौकटीतही बसत नाही. आज नाही तर उद्या शासनाला या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करावाच लागेल.






# आयुष्याची वाटचाल आणि वाटचालीवरचं आयुष्य!

सा. 'मधु-विचार' साठी मुलाखत
- स्वामी रेणापूरकर - २६.०४.२००८

*भवरलालजी हे पहिल्या पिढीचे उद्योजक. त्यांचे आई-वडील शुद्ध शेतकरी व जोडीनं धनधान्य विकून उदरनिर्वाह करणारे. हे घराणं वाकोदसारख्या खेडेगावातलं.*

*आज डझनभर कारखाने जगभर पसरून त्यांचा व्यवहार वार्षिक रु. ३००० कोटींवर गेलाय. जवळजवळ ८००० माणसांना ते रोजगार पुरवतात. म्हणूनच त्यांच्या या अफाट प्रगतीचं इंगित जाणून घेण्यात सामान्य माणसाला रस असतो, उत्सुकता असते. इथं ते त्यांच्या आयुष्याचा पट उलगडून दाखवताहेत. या प्रवासातली वळणे, आडवळणं सांगताहेत. या यशाचं, अपयशाचं विश्लेषणही करताहेत.*

**श्री. स्वामी रेणापूरकर –** भाऊ, आपण आपल्या आयुष्याची सुरवात खेडेगावापासूनची. आपण वाकोदला होतात. जळगावला कसे आलात?

**भाऊ –** माझा जन्म वाकोदचा! पूर्वी तेथे फक्त ३री पर्यंत शाळा होती. त्यामुळे

शिक्षणासाठी मला जळगावला पाठविले गेले. म्हणून तिसरी पास होताच १९४७ मध्ये मी जळगावला आलो. त्या वेळी आमचे घर दुकान असे काही नव्हते.

केवळ शिक्षणासाठी मी जळगावला आलो असता, पोलनपेठमध्ये १२ रुपये महिन्याच्या एका खोलीत एका चाळीमध्ये आम्ही राहायचो. आई जाऊन-येऊन राहायची आणि बाकीचे चुलते वगैरे जाऊन-येऊन राहायचे. अशा पद्धतीने त्यांनी मला वाकोदहून जळगावला केवळ शिक्षणासाठी पाठवलं.

माझा अभ्यास विशेष असा घरी होत नव्हता. कारण, आमच्याकडे येणारे-जाणारे खूप होते, त्यामुळे आमच्या समाजाचं एक कानजी शिवजी हे बोर्डिंग होतं. त्यामध्ये मला माझ्या घरच्यांनी टाकलं. त्यात मी दोन वर्षे होतो आणि तिथून मी दहावी पास झालो. न्यू इंग्लिश स्कूल अर्थात आता आर. आर. विद्यालयात मी होतो.

**श्री. रेणापूरकर** - आपण आपल्या व्यवसायाची सुरवात छोट्याशा भांडवलावर कशी केलीत? भाऊ, आपल्याला डेप्युटी कलेक्टरची अपॉइंटमेंट ऑर्डर आली होती. त्या काळी सरकारी नोकर इतके मजेत होते, अशी डेप्युटी कलेक्टरची नोकरी सोडून आपण आपल्या



व्यवसायात कसे काय शिरलात? त्यामुळे नोकरी करण्याबाबत आपल्याला त्या वेळी काय वाटलं होतं? आपण कृषिक्षेत्रातील व्यवसाय कसा काय निवडला?

**भाऊ –** माझी आई शिकलेली नव्हती. तिला लिहिता–वाचता येत नव्हतं. अशा स्थितीत कोणताही निर्णय घ्यायचा असला तर आपण आधी आई वडिलांना विचारतो. त्यांना आपण ईश्वरासमान मानून त्यांचा सल्ला अंतिम निर्णय आहे असे समजतो. तिने मला असं सांगितलं, की मोठं काम करायचं आणि मग सर्वांचे पोट भरायला एकच मार्ग आहे, तो म्हणजे शेती, कारण शेतीतच पशू, पक्षी, गुरंढोरं या सर्वांची पोटं भरू शकतात.

पुढे अशा अजून दोन–तीन घटना घडल्या. त्यांनी मला प्रोत्साहित केलं, की व्यवसायातच पडावं. आईने तर मला असं सांगितलंच; पण बी. एम. जैन म्हणजे माझे मित्र सुरेशदादांचे वडील. त्यांनीही मला सांगितलं, की आपल्या मारवाडी रक्तात नोकरी करणं हे नाहीच, तेव्हा तुम्ही दुसरं काहीही करा; पण नोकरी करू नका.

मी एका पेट्रोलपंपावर १९६५ मध्ये सहज बसलो असताना मला एक फॉरेनची ड्रिलिंग रीग म्हणजे बोरिंगची गाडी आली होती. ती दिसली. त्या काळी पिण्याच्या पाण्याचा फार बिकट प्रश्न होता. ती स्कॉटलंडची कंपनी होती. त्या देशाने आपल्याला ती भेट दिली होती. ती प्रत्येक खेड्यात जाऊन बोअर करून देत होती. त्या गाडीवर मागच्या बाजूला लिहिलेलं होतं, की 'शेती हा भविष्यातला सर्वांत जास्त फायदेशीर असा आणि ज्याला खूप मोठं भविष्य आहे असा व्यवसाय आहे' असं वाचलं आणि तेव्हापासून तर मी अगदी निश्चितच करून टाकलं होते, की आता आपल्याला या व्यवसायासाठीच आयुष्य वेचायचं.

त्याआधी मी डिझेल विकत होतो. पेट्रोल हे मोटारसायकलला लागत होतं, हे इंजिनला लागायचं आणि केरोसिन ऑइल हे प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात जायचं, तेव्हा निर्णय घेतला, की आयुष्यभर हेच करायचं. या तीन कारणांमुळे हे घडू शकलं.

**श्री. रेणापूरकर –** भाऊ, आपण जो हा रॉकेलचा व्यवसाय सुरू केला तेव्हा आपण गाडी घेऊन जात होता का?

**भाऊ –** हो, रॉकेल विकण्यासाठी चारचाकी जो ठेला असतो ना, त्यावर एक टाकी ठेवलेली असते आणि त्याला नळ लावलेला असतो. तर ती टाकी, एक माणूस मागून लोटायचा आणि मी त्याच्याबरोबर चालायचो. घरोघरी जाऊन

ते विकायच. जसं मी हा केरोसिनचा व्यवसाय केला तसाच मी गॅस सिलिंडरचाही व्यवसाय केला. त्या वेळी इतक्या संख्येने कोणी सिलिंडर घेत नव्हतं. कारण, लोकांना वाटायचं, की गॅसचा स्फोट झाला तर आपण मरून जाऊ, म्हणून कोणीच घेत नव्हतं. सिलिंडर विक्रीसाठी म्हणून भुसावळच्या रेल्वे कॉलनीतल्या प्रत्येक घरोघरी जाऊन ते विकायचो.

**श्री. रेणापूरकर –** आपण जैन पाइपच्या उत्पादनाची आणि विक्रीची सुरवात केव्हा केली?

**भाऊ –** पाइप उत्पादनाची आणि विक्रीची सुरवात औद्योगिक क्षेत्रात केली. जैन ब्रदर्सने प्रारंभ झाला. त्यासोबतच खतं, बी–बियाणं, इलेक्ट्रिक मोटारी, इतरांचे पीव्हीसी पाइप असे आपण विकले. या सर्वांच्या एजन्सीज आपल्याकडे होत्या. त्यानंतर जैन पाइप आले १९८० मध्ये. १९७८ मध्ये बनाना पावडर फॅक्टरी घेतली, नंतर १५ ऑगस्ट १९८० ला जैन पाइपची सुरवात केली. त्या वेळी ती को ऑपरेटिव्ह सोसायटीकडून घेतली आणि त्याचा खल पडला होता. नुसता खलच नाही पडला तर तो मुद्दा ॲसेम्बलीपर्यंत गेला.

एका व्यापाऱ्याला सहकार क्षेत्र विकणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. शासनाने त्याचं उत्तर दिले, की सोळा वर्षे झाली हा कारखाना बंद आहे. आता ती सोसायटी रसातळाला जाऊन लिक्वीडेशनला निघाली आहे. दिवाळखोरपणा टाळायचा असेल, सर्व कर्ज भरून काढायचं असेल तर हा एकच मार्ग आहे. सहकार क्षेत्रातून जर हा कारखाना बाहेर पडत असेल तर तो काही देशातून बाहेर पडत नाही किंवा महाराष्ट्रातून बाहेर पडत नाही म्हणून तो विकत घेणं हे देशद्रोहीपणाचं लक्षण आहे, असं वाटण्याचं कारण नाही. त्यासंदर्भात अशा पद्धतीने विचार करण्यात आला. साधारणत: १९७७ दरम्यानची ही घटना आहे. १९७७ च्या सुरवातीला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण होते, नंतर वसंतदादा पाटील झाले.

**श्री. रेणापूरकर –** ठिबक सिंचनाच्या उत्पादनाची संकल्पना कशी काय सुचली? ती कशी कार्यान्वित झाली?

**भाऊ –** ती १९८७ मध्ये सुरू झाली. १९८७ ते १९८९ या काळात ते झालं. महाराष्ट्रात जर २००० फूट जरी खोल गेलो, पृथ्वीच्या पोटातलं सगळं पाणी जरी उपसून काढलं तरी आपण २२ टक्क्यांवर जमीन ओलिताखाली आणू शकणार

नाही. पाणी बचत करण्याच्या कोणत्याही योजनेला अत्यंत उज्ज्वल भविष्य राहील, हे मला माहिती होतं. ट्रेड फेअरची जागतिक परिषद अमेरिकेत फ्रेस्नोमध्ये भरली होती, त्या ठिकाणी मी गेलो होतो. तिथे माझा परिचय अण्णासाहेब शिंदे आणि आप्पासाहेब पवार म्हणजे शरद पवारांचे मोठे भाऊ यांच्याशी जवळून झाला. त्यांनी मला सांगितलं की तुम्ही हे करा, त्यानंतर ते म्हणाले, तुमच्यासारखा माणूस या व्यवसायात पडला तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने फारच उत्तम होणार आहे. तुम्ही असं समजा, आमचं स्वप्न पूर्ण करण्यासाठीच तुमचा जन्म आहे. म्हणजे यासंदर्भात आम्ही जे करू शकलो नाही ते तुम्ही करावं. आम्ही आता म्हातारे झालो आहोत.

**श्री. रेणापूरकर –** आपल्याला या सर्व गोष्टींचं जे फळ मिळायला पाहिजे, ते मिळालं का? आपण जे अठरा अठरा तास काम करता, एवढा प्रकृतीला ताण देऊन ते कशासाठी करता?

**भाऊ –** फळाच्या अपेक्षेने काम केलं ते खरं कामच नाही. निष्काम काम करायला हवं. त्यातून जो आनंद मिळतो, तो जीवनात फार मोठे समाधान मिळवून देतो. समाधान तुम्हाला संपत्ती मिळवून देऊ शकत नाही. केवळ ज्ञानामुळेही समाधान मिळू शकत नाही. समाधान जर हवे असेल तर ते कामामधून मिळू शकेल. काम करण्यामध्ये जो आनंद आहे, काम करण्यासाठी जो झिरपतो, तो माणूस खऱ्या अर्थाने जीवनात यशस्वी होतो.

जे संपत्तीच्या मागे लागले असतील, ते कधी ना कधी थांबतील. पहिल्या पिढीत किंवा दुसऱ्या तिसऱ्या पिढीत ती लक्ष्मी जाणार. कारण, लक्ष्मी ही चंचल असते. सरस्वतीची ज्यांनी उपासना केली असेल, ती कुठेतरी, कशीतरी केवळ त्याच पिढीला नव्हे, तर पुढच्या पिढीलासुद्धा उपयोगी पडणारी बाब आहे. सरस्वतीची आराधना करीत जो माणूस स्वत:ला अखंड परिश्रमात बुडवून घेईल, तोच माणूस जास्त जगू शकेल. आजपर्यंत 'जास्त कामामुळे मेला' अशी इतिहासात कुठेही नोंद नाही! कामाच्या फिकिरीमुळे मात्र माणूस मरतो. कामाच्या चिंतेमुळे माणसाला त्रास होतो. मला चिंता नाही, चिंतन करता करता काम सुरू असते. मला कामातून खूप आनंद मिळतो, म्हणून मी हे काम करतो.

**श्री. रेणापूरकर –** आपण हे इतकं निर्माण केलं आहे तर हे आता मेंटेन करण्याबाबतचे आपले काय विचार आहेत?

**भाऊ –** मेंटेन करायला पाच हजार लोकं आहेत ना! आपले सप्लायर्स वगैरे सर्व मिळून तसे आठ हजार लोक आहेत.

**श्री. रेणापूरकर –** शेवटी हे बाहेरचे?

**भाऊ –** नाही, बाहेरचे नाहीत. समजा तुमचा स्वत:चा मुलगा असला, तरी तो स्वत: तुम्हाला सोडून इतर व्यवसाय करतो. तुमच्याजवळ राहात नाही. तो आपला आहे. कारण, आपण त्यास जन्म दिला आहे म्हणून. जो माणूस तुझ्याबरोबर पंचवीस वर्ष राहतो. तो आपला का नाही? तेव्हा असं म्हणता येत नाही की ते बाहेरचे आहेत.

**श्री. रेणापूरकर –** कंट्रोल कशाला म्हणतात? हे आपले सगळे शेअर्स होल्डर मेंटेन करतील असे वाटते?

**भाऊ –** शेअर होल्डर्स नाही, डीलर्स आहेत आणि जे सहकारी आहेत ते करतील.

**श्री. रेणापूरकर –** आपले कुटुंब हे सगळं करू शकतील ना?

**भाऊ –** चार मुलं आहेत ना! भावाची दोन मुलं आहेत, असे सहा आहेत. त्यांच्यानंतर काकांची मुलं आहेत. या व्यवसायात एकूण डायरेक्टली फॅमिलीचे आजही जवळजवळ चाळीस लोकं आहेत.

**श्री. रेणापूरकर –** पण असा तुमच्यासारखंच असं करेल असा तुमचा कोणी विश्वासू?

**भाऊ –** माझ्या व्यक्तिमत्त्वाचे जे काही वेगवेगळे अंग, पैलू आहेत, त्यापैकी एक एक पैलू चारही मुलांनी सांभाळलेला आहे. अशोकने सामाजिक बांधिलकी हा पैलू व्यवसायासोबतच सांभाळला आणि जोपासला आहे. अनिलचा व्यवसायामध्ये कसं बोलावं, कसं वागावं, बँक आणि आंतरराष्ट्रीय संबंध कसे ठेवावेत यात हातखंडा आहे. त्याचं इंग्रजीवर प्रभुत्व आहे. अजित हा एका ठिकाणी बसून, एका वेळेला सकाळी ०८.०० पासून रात्री ०३.०० वाजेपर्यंत सलग काम करण्याची त्याची तयारी असते, तेव्हा तो फारच कठोर परिश्रम करतो आणि महत्त्वाचं म्हणजे तो ते काम चांगल्यारितीने करू शकतो. अतुल हा चौथा मुलगा आहे. अतुलला कला आणि कलावंत या क्षेत्रात विशेष रस आहे. त्याचे संवाद कौशल्यही चांगले आहे. अतुलचे व्यक्तिमत्त्व भारदस्त आहे, त्यामुळे तो कुठेही, कोणत्याही कामासाठी

गेला तर त्याला चांगला प्रतिसाद मिळतो. त्यामुळे त्याला मार्केटिंगचं काम दिलेलं आहे. म्हणजेच काय की, एक प्रॉडक्शनचे काम पाहतो, एक मार्केटिंगचं काम पाहतो, तिसरा बँकिंग फायनान्स, इंटरनॅशनल हे काम पाहतो, चौथा फळप्रक्रियेचा कारखाना पाहतो आणि शिवाय सामाजिक कामं, अशी वेगवेगळी अंगे आहेत.

**श्री. रेणापूरकर –** म्हणजे आपण एकंदरीत सर्व मुलांबद्दल समाधानी आहात?

**भाऊ –** मला असं म्हणायचं, की 'समाधानी' हे अंडर स्टेटमेंट आहे. त्याच्याहीपेक्षा वरची डिग्री अशी आहे, की यापेक्षा आयुष्यात ईश्वराकडून जास्त काही मागूच शकत नाही. मला तर न मागता मिळालं आहे ना! एवढं ईश्वराने भरभरून दिलेले आहे. ईश्वरानं मला आता शेवटच्या क्षणापर्यंत कार्यसिद्ध ठेवावे एवढीच शेवटची मागणी त्याच्याकडे आहे.

**श्री. रेणापूरकर –** भाऊ, आपल्यावर एवढी संकटे आली; पण तरीही जनकल्याणासाठीच ईश्वरानं जिवंत ठेवले आहे. अशा अगदी वेगळ्या विचारवंताचा सहवास आम्हाला मिळाला आहे!

**भाऊ –** चांगल्या कामांमधून जी काही प्रेरणा मिळते ते कामच खरं आपलं भांडवल आहे.

**श्री. रेणापूरकर –** आपल्याला 'पद्मश्री'चा सन्मान प्राप्त झाला, हे खूपच चांगलं झालं; परंतु असा पुरस्कार मिळायला फार उशीर झाला, असं नाही वाटत का? म्हणजे आपण देशाच्या पातळीवर किंवा जागतिक स्तरावर खूप चांगलं काम केल आहे. अनेक लोकांना वशिल्यानं पदव्या मिळाल्या असं सर्वसाधारण मत आहे, आपल्याला असा सन्मान प्राप्त व्हायला उशीर झाला असं वाटत नाही का?

**भाऊ –** जो माणूस निष्काम समाजोपयोगी करीत असेल, त्या माणसाने फळाची अपेक्षा करू नये. शासन ही फार मोठी संस्था आहे. भारत हा खंडप्राय देश आहे. एवढ्या मोठ्या देशात विशिष्ट क्षेत्रात देशहिताच्याही दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण काम करणारा माणूस धुंडायलासुद्धा वेळ लागतो. दुसरं असं, की अशा प्रकारच्या घटना ज्या वेळी घडतात, त्या वेळी मी असा विचार करतो, की आपलं काहीतरी कुठंतरी चुकलं असलं पाहिजे. कदाचित त्यामुळेही असा उशीर झाला असेल.

समजा चुकून नकारात्मक विचार माझ्या मनात आला तर माझ्या मनाची शांती बिघडते, म्हणूनच मी जीवनाकडे अतिशय सकारात्मक दृष्टिकोनातूनच बघत असतो.

आपण असाच विचार करावा, की जे घडते आहे ते योग्यच आहे. तसा विचार जर आपण केला तरच आपण सुखी आणि संपन्न होऊ. तसं नसतं तर जीवनात लोकांना एवढी दु:खं आहेत त्याचा विचार करा.

मला पद्मश्रीचा बहुमान मिळाला म्हणून त्याचा खूपच गवगवा झाला, मी मात्र स्वतः 'पद्मश्री भवरलाल जैन' असं कधीही लिहिणार नाही. यानंतरही इतर कोणत्याही स्वरूपात सन्मान प्राप्त झाला, तरी तसे स्वतःहून लिहिणार नाही. कारण, मी या जगात आलो ते उघड्या हातांनी आणि जाणारही आहे उघड्या हातांनी. तेव्हा या ज्याही घटना घडतात, त्याकडे आयुष्याच्या वाटचालीतील–प्रवासातील घटना म्हणूनच पाहावे.

**श्री. रेणापूरकर –** भाऊ, एकवेळ अशी आली होती, की आपल्या कंपनीची आर्थिक परिस्थिती धक्कादायक झाली होती; परंतु आपण हिंमत न हारता अनेक ठिकाणी प्रयत्न करून ती गाडी रुळावर आणली. हजारो लोकांना नोकऱ्या लावल्या, अनेकांना मदत केली, तेव्हा अशा बिकट परिस्थिती आपल्याला मदत करण्यासाठी किती लोक पुढं आले?

**भाऊ –** कुणी मदतीला येण्याचा राहून गेला असं मला आठवत नाही. सगळ्यांनी आम्हाला मदत केली. माझे जे सहकारी, माझे बँकर्स, माझे मित्र, त्यांनी स्वत:च्या मिळकती विकून आपल्याला मदत केली. आपल्याला मदत केली नाही, अशी संपर्कातील एकही व्यक्ती किंवा संस्था नाही!

**श्री. रेणापूरकर –** ज्या वेळी १० रुपयांचा शेअर्स ४५० रुपये झाला, तेव्हा आपण अनेक लोकांना लखपती केले?

**भाऊ –** मी काही केले नाही, ते झाले.

**श्री. रेणापूरकर –** त्यामुळे आपल्याला काय वाटले?

**भाऊ –** मला फार समाधान वाटलं. ज्या दिवशी अशी वाईट परिस्थिती आली, की शेअर्सचा भाव १० रुपये झाला, त्यापेक्षाही कमी झाला त्या वेळी मला फार दु:ख झालं. आपल्या भागधारकांची ही अपेक्षा नव्हती. आपण त्यांच्या अपेक्षापूर्तीला उतरलो नाही याचं अतीव दु:ख झालं. मी जाहीर कबुली देऊन संबंधितांची जाहीर माफीही मागितली.

**श्री. रेणापूरकर –** आपला सर्वांत सुखाचा दिवस कोणता?

**भाऊ –** मला सगळेच दिवस सारखेच आहेत. मला स्वत:ला एकही दिवस असा सांगता येणार नाही, की हा सर्वांत जास्त सुखाचा दिवस आहे. मला सगळेच दिवस सुखाचे आहेत. मात्र, माझी आई गेली आणि माझी पत्नी गेली त्या वेळी मला दु:ख झाले; परंतु त्यानंतर आठ-पंधरा दिवसांत मी दुःखावर नियंत्रण मिळवले.

मी माझ्या कामाला लागलो, गर्क झालो. प्रत्येक दिवस माझ्यापुढं सारखाच येतो. त्यामुळं हा दिवस कोणता आहे. आज वार काय आहे, महिना काय आहे, वर्ष काय आहे, काही काही वेळा तर हेही आठवत नाही. पक्षी चिवचिवाट करायला लागले की पहाट झाल्याचं ओळखतो. पहाटे लवकर उठतो. रात्री झोप लागली की झोपतो. फारच अतीव दु:ख किंवा अतोनात आनंद असे क्षण माझ्या आयुष्यात खूप कमी.

धन्यवाद!





# सन्मानाच्या हिम खंडातला अदृश्य भाग!

'पद्मश्री' प्रीत्यर्थ दैनिक 'सकाळ'ने घेतलेली मुलाखत – सुरेश उज्जैनवाल – ०८.०६.२००८

*हिमखंडाचा फक्त एक अष्टमांश भागच दृश्य असतो, म्हणजेच सात अष्टमांश पाण्यात बुडलेला किंवा अदृश्य असतो. 'पद्मश्री'चा सन्मान मिळाल्यावर भवरलालजींच्या भावना जाणून घेण्यासाठी त्यांच्या यशाचं मूल्यमापन करण्यास त्यांनाच सांगण्यात आलं, तेव्हा त्यांनी जे चिंतन प्रकट केलं त्याचाच हा मथितार्थ.*

*कष्ट, गुणवत्तेची सातत्यानं जोपासना व श्रमांचा कार्यकारणभाव, सृजनशीलता आणि सामाजिक बांधिलकीची दृष्टी हे त्यांनी यशामागील रहस्य सांगितले, तसंच याच तत्त्वांवर काम करावं; परंतु पारितोषिक, सन्मान याकडे विनम्रपणे दुलर्क्षच करावं, असंही ते म्हणतात यशाचं, सन्मानाचं इतकं स्वच्छ सरळ विश्लेषण कुठंच आढळणार नाही.*

**श्री. सुरेश उज्जैनवाल –** काल दोन-तीन मुद्दे आपण विचारात घेत होतो. एक म्हणजे गुणवत्ता आणि कामाची पद्धत. आपण एखादे काम हातात घेतो तर ते पुरस्कार मिळवण्यासाठी नव्हे;

तर आपण त्यामध्ये जीव ओततो, त्यात आपली गुणवत्ता सिद्ध करतो. अनेक क्षेत्रांत आपण तांत्रिकदृष्ट्या सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान वापरले, त्यामागे उद्देश काय? आपली मुलाखत घेण्यामागे आमचा उद्देश हा आहे, की तुमच्यामध्ये एक व्यावसायिक व्यक्ती म्हणून जे गुण आहेत. ते जाणावेत.

**भाऊ –** व्यावसायिक संस्थांना वेळोवेळी पुरस्कार का मिळतात? म्हणजे मानसन्मान का मिळतात? त्याची अनेक कारणे असतात. त्यात विशेषकरून ज्या संस्था गुणवत्तेची जाण ठेवतात किंवा गुणवत्ता पूजतात त्यांचा विशेष प्रकारे सत्कार सन्मान होत असतो.

गुणवत्ता ही जशी जीवनात महत्त्वाची आहे तशीच ती व्यवहारातही महत्त्वाची आहे. गुणवत्ता ही फार कठोर परिश्रमाने प्राप्त करण्याची गोष्ट आहे. गुणवत्तेच्या बरोबर 'सृजनशीलता'ही महत्त्वाची आहे. प्रत्येक वेळी नावीन्याचा ध्यास ठेवून जर आपण अनेकविध विषयांकडे बघत राहिलो तर आपल्याला नवनवीन दालने मिळत राहतात आणि आताची जी दालने सुरू आहेत, त्यात आपण सुधारणा करू शकतो. असे जर आपण करीत राहिलो तर ओघानेच आपल्याकडे पुरस्कार चालत येतात!



माझ्या आयुष्यात मी एक तिसरा अनुभव घेतला आहे, की व्यावसायिक यात्रेत एखादे काम साधारणपणे जे याआधी कोणीही केलेले नाही आणि ते मूलभूत असे काम जर आपण करीत असाल किंवा करणार असाल तर त्यासाठी साधना, आराधना आणि मेहनत करण्याची जर आपली तयारी असेल, तर आपल्या मूलभूत कामाचे कौतुक म्हणून केवळ जनताच नव्हे, समाजच नव्हे; तर शासनसुद्धा डोक्यावर घेत असते. कारण, ते काम असे असते, की जे शासनाला जमलेले किंवा सुचलेले नाही किंवा समाजात रुजलेले नाही आणि ते नवीनच आहे.

सामाजिक जीवनाला एकप्रकारची मूल्यवर्धनाची झालर लागणार आहे, असे ते काम असते आणि त्यासाठी ते लक्ष घालत असतात किंवा त्यांचे लक्ष केंद्रित होते. आपण हाती घेतलेले कार्य तन्मयतेने करीत असताना सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे सातत्याची गरज असते आणि ते सातत्य जर आपण पंचवीस ते पन्नास वर्षे अखंड परिश्रम घेऊन, प्रामाणिकपणाने साधू शकलात तर त्याचा एक विशिष्ट असा सन्मान होत असतो.

केवळ सातत्याने ते जमते असेही मी बघितले आहे. साधन आणि साध्ये यांची शुचिता जे लोक पाळतात किंवा ज्या संस्था पाळतात, जेवढी शक्य आहे तेवढी पाळतात, त्या संस्थांना समाजसुद्धा खऱ्या अर्थाने त्यांच्या अवतीभोवती कोट करून उभा राहून एकप्रकारे त्यांचे संरक्षण करीत असतो. त्यांना मदत करीत असतो, त्यांना वाढवत असतो आणि ज्यावेळी समाजच स्वत: किंवा ग्राहकच असे करतो, तेव्हा त्याची नोंद ही शासनालासुद्धा घ्यावी लागते.

साधन आणि शुचिता हीसुद्धा तेवढेच महत्त्वाचे काम आहे. साधन चांगले आहे, साध्यसुद्धा उत्तम आहे, मेहनत तुम्ही करतात, एवढे करूनही भागत नाही. कारण, तशा अर्थाने प्रत्येक माणूस आपल्या जीवनात जे काही प्रामाणिकपणे काम करीत असेल ते सगळेच काम हे सामाजिक हिताचेच काम असते. आपण टी.व्ही. बनवणार असाल, तर त्यातूनही समाजाची सेवा करीत आहात; पण मला असे वाटते, की टी.व्ही. बनविणे किंवा साबणाचा कारखाना टाकण्यापेक्षा किंवा एखादी सौंदर्यवर्धक अशी वस्तू बनवण्याचा कारखाना टाकण्यापेक्षा जर सर्वसाधारण समाजाच्या प्रश्नांना, समस्यांना आपण हात घालू शकला, तिथे जर आपण समाजासाठी पर्यायाने देशासाठी उत्तम असे काही करू शकलात, तर ते उत्तमच!

जे रंजलेले, गांजलेले आहेत आणि ज्यांच्याकडे मुळातच परंपरेने काही चालून आलेले नाही, ज्यांना विद्वतेचा वारसा नाही, ज्यांना वैभवाचा वारसा नाही, संपत्तीचा वारसा नाही अशा लोकांकडे जर तुम्ही वळलात आणि सामाजिक बांधिलकीतून तुम्ही जर काम केले, तर तुमचा विशेष सन्मान होतो!

जैन उद्योगसमूहाला आतापर्यंत या वेगवेगळ्या कारणांसाठी जवळपास १५० पारितोषिके मिळाली. मला समाजाने भरभरून खूप प्रेम दिले. त्या प्रेमाचे द्योतक म्हणून वेळोवेळी अनेकविध संस्थांनी, त्या राज्यपातळीवरील असो किंवा देशपातळीवरील असो किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील, त्यांनी पुरस्कारसुद्धा दिले आहेत. या सगळ्या पुरस्कारांमध्ये आता 'वॉटर कॉन्जरवेटर ऑफ इंडिया' नावाचा माझा व्यक्तिश: सन्मान करण्यात आला. मला असे वाटते, की जागतिक बँकेच्या दृष्टीने, जागतिक बँकेसारख्या संस्था त्यात समाविष्ट झालेल्या असल्यामुळे, तो फार मोठा गौरव आहे!

अमेरिकेत ठिबक सिंचनाच्या जागतिक पातळीवर मिळालेला पहिला सन्मान आहे. या सगळ्या सन्मानानंतर आज जेव्हा 'पद्मश्री' घोषित झाला, त्या वेळी खरोखरच असे वाटले, की आपण जे काही करतो त्याची नोंद कोणी तरी घेतली! मला असे वाटते की, मी जे केले, ज्यासाठी केले, त्या उद्दिष्टाचे महत्त्व आहे. मी माझ्या जीवनाची वाटचाल उपेक्षित शेतकरी बंधू-भगिनींकरिता अर्पण केली, म्हणून मला हे प्राप्त झाले. त्याच अर्थाने मी हा सन्मान ज्या दिवशी मिळाला त्याच दिवशी माझ्या शेतकरी बांधवांना अर्पण केला. तो माझा नाही; आता तो सन्मान त्यांचाच आहे! धन्यवाद!

डॉ.भवरलालजी जैन.- एकत्रित संस्थाअनुसार पुरस्कारांची सारांश स्वरूपातील मुख्य सूची

| अ.क्र. | वर्गीकरण | संख्या |
|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय संस्थांनी दिलेले पुरस्कार | ०१ |
| २ | केंद्र सरकारद्वारा प्रायोजित व दिलेले पुरस्कार | ०१ |
| ३ | राज्य सरकारांनी प्रायोजित केलेले व दिलेले पुरस्कार | ०५ |
| ४ | देशभरातल्या नावाजलेल्या संस्थांनी दिलेले पुरस्कार | ३० |
|  | एकूण | ३७ |

**पद्मश्री डॉ.भवरलालजी जैन यांना मिळालेली पारितोषिके–सन्मान** (दि.२८.०४.२०१२ पर्यंत)

| *अ. क्र.* | *वर्गीकरण* | *प्रायोजित करणारी संस्था* | *संख्या* | *वर्ष* |
|---|---|---|---|---|
| | ***केंद्र सरकारने प्रायोजित केलेली आणि दिलेली पारितोषिके:*** | | | |
| १ | पद्मश्री | गृह मंत्रालय, भारत सरकार | १ | २००८ |
| | ***राज्य सरकारांनी प्रायोजित केलेले आणि दिलेले पुरस्कार:*** | | | |
| २ | डॉक्टर ऑफ लेटर्स (डी.लिट.) | महाराष्ट्र सरकार (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ) | १ | २००६ |
| ३ | डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस्सी.) | महाराष्ट्र सरकार (कोकण कृषी विद्यापीठ) | १ | २००६ |
| ४ | डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस्सी.) | राजस्थान सरकार (एम.पी.यू.ए.टी) | १ | २००६ |
| ५ | डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस्सी.) | तमिळनाडू सरकार (टी.एन.ए.यू) | १ | २००८ |
| ६ | जळगाव रत्न | जळगाव महानगरपालिका | १ | २०११ |
| | ***आंतरराष्ट्रीय संस्थांनी दिलेले पुरस्कार अथवा सन्मान:*** | | | |
| ७ | क्रॉफर्ड रिड मेमोरिअल पुरस्कार | इरिगेशन असोसिएशन, अमेरिका | १ | १९९७ |
| | ***देशभरातल्या नावाजलेल्या संस्थांनी दिलेले पुरस्कार:*** | | | |
| ८ | 'उद्योग पत्र' | आय.टी.आय.डी. (नवी दिल्ली) | १ | १९८२ |
| ९ | सत्कार समारंभ | जामनेर (एनजीओ) | १ | १९८२ |
| १० | आय.एम.एम. बाटा मार्केटिंग पुरस्कार | आय.एम.एम. बाटा | १ | १९८३ |
| ११ | ए.आर. भट उद्योजकता पुरस्कार | एफ.ए.एस.एस.आय. | १ | १९८४ |
| १२ | 'उद्योगविभूषण' प्रशस्तिपत्र व ट्रॉफी | आय.टी.आय.डी. (नवी दिल्ली) | १ | १९९२ |
| १३ | सन्माननीय सदस्यत्व (ऑनररी मेंबरशीप) | आय.टी.आय.ई, हैदराबाद चॅप्टर | १ | १९९३ |
| १४ | एफ.आय.ई. फाउंडेशन पारितोषिक | इचलकरंजी (एन.जी.ओ.) | १ | १९९५ |
| १५ | वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रा. वि. प्र. पुरस्कार | व्ही.एन.के.एस.–जी.व्ही.पी. पुसद | १ | १९९७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान पुरस्कार | व्ही.एन.एस.पी., पुसद | १ | १९९८ |
| १७ | 'यशोदीप पुरस्कार' | आय.आय.ई., नाशिक चॅप्टर | १ | २००१ |
| १८ | लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्कार | रोटरी क्लब, मुंबई डाउनटाउन | १ | २००१ |
| १९ | सत्कार समारंभ | भुज (एन.जी.ओ.-बी.जे.एस.) | १ | २००१ |
| २० | गांधी-आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार | जी.ए.एफ.एफ.एम.आय., मुंबई | १ | २००२ |
| २१ | 'ॲग्रीकल्चरल टेक्नॉलॉजिस् रत्न' | विझिटेक्स फाउंडेशन | १ | २००४ |
| २२ | ॲग्रो इंडस्ट्रिअल सोशल मॅनेजमेंट ॲडमिनिस्ट्रेशन पुरस्कार | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | १ | २००६ |
| २३ | वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रा. वि. प्र. पुरस्कार | व्ही.एन.के.एस.-जी.व्ही.पी. पुसद | १ | २००८ |
| २४ | भारताचा जलरक्षक | वॉटर डायजेस्ट | १ | २००६ |
| २५ | बुंद बुंद का रखवाला | किसान भारती आणि अद्वैसरी सोसायटी | १ | २००९ |
| २६ | लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्कार | ए.आय.पी.यु.बी. | १ | २००९ |
| २७ | भारत सेवक रत्न | एनजीओ परिसंघ | १ | २००९ |
| २८ | पद्म जागृती | कै. अमितसिंग मेमोरियल फाऊंडेशन | १ | २००९ |
| २९ | पोद्दार रत्न | ए.आर. पोद्दार कॉलेज ऑफ कामर्स | १ | २०१० |
| ३० | सन्मान | डाऊ केमिकल्स इंटरनॅशनल प्रा. लि. | १ | २०१० |
| ३१ | सहचारिणी कृतज्ञता - 'ती आणि मी' साठी | सुशिला राम कदम स्मृती | १ | २०११ |
| ३२ | लाइफटाइम अचिव्हमेंट | वर्ल्डट्रेड सेंटर | १ | २०११ |
| ३३ | गुजरात-महाराष्ट्र गौरव | फिलींग्स मल्टीमिडीया लि. | १ | २०११ |
| ३४ | क्रियाशील ग्लोबल | सद्‌गुरू मंगेशदा क्रिय योगा फाऊंडेशन | १ | २०११ |
| ३५ | जीवन गौरव | भारत कृषक समाज | १ | २०१२ |
| ३६ | मॅन ऑफ दी डीकेड | ए.आय.पी.यु.बी. | १ | २०१२ |
| ३७ | लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्कार | सी.पी.एम.ए. | १ | २०१२ |
| | ***एकूण*** | | **३७** | |



# व्यावसायिकतेचे तत्त्वचिंतन!

'दै. राजस्थान पत्रिकेला'ला दिलेली मुलाखत
– प्रवीण जाखड – २३.०९.२००८

*भवरलालजींना व्यवसायात यशापयशाचे दिवस आले. त्यांचे काही निर्णय, काही आडाखे चुकलेही. अर्थातच त्याचा भुर्दंडही त्यांनाच बसला; पण भट्टीतून तावूनसुलाखून निघालेलं सोनं ज्याप्रमाणे दुप्पट चमकतं तसंच त्यांचं झालं. प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी त्यांनी आपलं सर्वस्व पणाला लावलं. ते बाहेर पडलेही. पण त्यात त्यांचा प्रामाणिकपणा दिसला. धैर्य दिसलं. बुद्धिचातुर्य दिसलं. तेच सगळ्यांनी मानलं. या सर्व काळाचं त्यांनी सिंहावलोकन केलंय.*

*कठोर परिश्रम, सकारात्मक मन:स्थिती, सतत प्रयत्न, पारदर्शकता या मूल्यांनी अंकित झालेल्या त्यांच्या कार्यसंस्कृतीची त्यांना भरभक्कम साथ मिळाली. या कार्यसंस्कृतीच्या संस्काराचा आपल्या विवेचनात ते नेहमी ऊहापोह करतात. कामाचं महत्त्व ते सहकाऱ्यांना पटवून देतात. त्यांच्या व्यावसायिकेत दुर्मिळतेनं दिसणारी प्रामाणिकतेची*

*बांधिलकी दिसते. कारण, मुळातच भवरलालजींचा पिंडच तत्त्वचिंतकाचा आहे. या मुलाखतीत याचा प्रत्यय नक्कीच येईल.*

**श्री. प्रवीण जाखड –** सात हजारांच्या भांडवलावर सुरू झालेल्या जैन उद्योगाची आजची उलाढाल २५०० कोटींवर गेलीय. फक्त ४५ वर्षांत मिळवलेल्या या भव्य यशाचं गमक काय आहे?

**भाऊ –** जैन इरिगेशनने मिळवलेल्या यशाला आपण अभूतपूर्व यश असं म्हणालात त्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद! प्रथमत: तर मी असं म्हणेन, की या जगात यशस्वी ठरलेल्या संस्था बऱ्याच आहेत. आपण त्यांच्या यादीत जैन इरिगेशनचा समावेश केला त्याबद्दल धन्यवाद! मला मात्र असंच वाटतंय, की निव्वळ असं यश मिळालं असतं तर मी एवढा सुखी अन् समाधानी झालो नसतो. मिळालेल्या यशाबरोबरच आम्ही आमच्या सामाजिक उत्तरदायित्वाची जबाबदारी पूर्ण करण्याचाही प्रयत्न केला, करतो आहे.

कंपनीची प्रगती त्यामुळेच तर होते आहे. या कंपनीचा उद्योग आणि व्यवसाय दिवसेंदिवस अनेक पटींनी वाढतोच आहे. मला वाटतं याचं कारण आम्ही आमच्या उत्पादनांना निव्वळ



आमच्या उदरनिर्वाहाचं साधन न मानता जनतेची उत्पादकता वाढविण्याचंच एक साधन मानलंय! जोपर्यंत मी माझ्या शेतकऱ्यांच्या घरात दोन पैशांची उत्पादनवाढ करू शकत नाही, तोपर्यंत तरी मी त्यांच्याकडून कशाचीही अपेक्षा करणार नाही. जर त्याला वाढीव उत्पन्न मिळत असेल आणि त्यायोगे त्याला दहा रुपये प्राप्ती होत असेल, तर त्यामधील एक रुपयाचा मी हक्कदार असेन, असंच मी मानतो.

आमची सर्व उत्पादनं ही शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादकतेत वाढ करणारी अशीच आहेत. त्यांच उत्पन्न वाढवायला ती मदत करतात. आमच्याही प्रगतीचं हेच मूळ कारण आहे. कित्येक वर्षांपासूनच आमची विकासाची घोडदौड जोरात चालू आहे. त्यातही एक सातत्य आहे. तुम्ही मला हेही विचारलंय, की याचे रहस्य काय? त्याचं रहस्य किंवा गुपित असं काही नाहीये. कार्यसंस्कृतीमुळेच हे घडणं शक्य झालं आहे. कार्यसंस्कृती ही तर मुळात श्रमाधिष्ठितच आहे. कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणा याला अनन्यसाधारण महत्त्व दिलं जात असतं.

कठोर परिश्रमाला तर आम्ही साक्षात परमेश्वरच मानतो. तीच आमची पूजा-अर्चा असं आम्ही मानतो आणि या देवतेमुळेच आमच्या जीवनाची वृद्धी-सिद्धी होते ही आमची श्रद्धा आहे. याच कारणानं इथं काम करणारी प्रत्येक व्यक्ती - ज्या व्यक्तीला आमचा सहकारी असंच म्हणतो! आम्ही तिला आमचा नोकर म्हणतच नाही. सहकारी इथले खरे मालक आहेत. त्यांच्या त्यांच्या कामाचे तेच स्वत: मालक आहेत आणि म्हणून त्यांचं वागणं अर्थातच मालकाप्रमाणंच असतं. अशाच बांधिलकीनं आणि तितक्याच प्रेमानं ते आपापल्या कामात समरस होतात.

आमचा प्रत्येक सहकारी तन-मनानं एकरूप होऊनच कामाला वाहून घेत असतो. ही वैशिष्ट्यपूर्ण अशी एक कार्यसंस्कृती आहे. या दोन महत्त्वपूर्ण कारणांनीच जैन इरिगेशनची प्रगती होते आहे. हा विकास सगळ्यांच्याच नजरेत भरण्याइतका भरीव आहे. जैन इरिगेशनमध्ये सहकारी निवडताना आम्ही असं पाहत असतो, की भले त्याचं शिक्षण कमी झालेलं चालेलही; परंतु त्याचं त्याच्या कामावर भरपूर प्रेम असायला हवं आणि जर त्याचं त्याच्या कामावर निस्सीम प्रेम असेल, तर त्याच्या आवडीचं काम अत्यंत तन्मयतेने करतो. त्याला प्रशिक्षण देण्याची गरज वाटली तर आम्ही त्याची योग्य ती तयारी करून घेत असतो.

आम्ही असेही मानतो, की ज्यानं एकदा जैन उद्योगसमूहात प्रवेश केलाय तो

तर आपल्या विस्तारित परिवाराचा एक अविभाज्य भागच होतो, म्हणूनच आज इथं सुमारे ८,००० माणसं कार्यरत असूनही गेल्या ३५ वर्षांत ते आजपर्यंत श्रमिकांच्या दृष्टीने, आमच्या सहकाऱ्यांच्या दृष्टीनं एकदाही मनजोडणीचा प्रयत्न करावा लागल्याची घटना घडलेली नाही. यालाच आम्ही भाग्याचं लक्षण म्हणत असतो!

**श्री. जाखड –** काम आणि संस्था यापेक्षा लोकांनाच आपण कायम जास्त महत्त्व देत आला आहात, असं का?

**भाऊ –** कोणी व्यक्ती अथवा संस्था जर असं समजत असेल, की उत्पादन करणारं यंत्र म्हणजेच सर्वकाही आहे, तसंच मोठमोठ्या इमारती इथं आहेत त्याच सर्वकाही होत, तसंच इथल्या उद्योगधंद्यात आम्ही इतके पैसे गुंतवलेत तेच सर्वकाही आहे, असं मानणं चुकीचं होईल. मला हे मान्य आहे, की एखाद्या ठिकाणी आपल्याला बरीच यंत्रं क्रमाक्रमाने मांडलेली दिसली तर याचा अर्थ असा होतो, की आपण एखाद्या प्रदर्शनालाच भेट द्यायला आलेले आहात. तिथंही आपल्याला यंत्रच यंत्र दिसतील. आपण जर एखाद्या कारखान्यात गेलात तरी आपल्याला तिथं यंत्रच यंत्र दृष्टीस पडतात.

आपण जर कधी एखाद्या ऑटोमोबाइल उत्पादन करणाऱ्या कारखान्यात गेलात तर तिथं आपणास लाखोंनी यंत्र दृष्टीस पडतील. मोठ्या मोठ्या इमारतीच बघायचं आपण जर ठरवलंत तर आपल्याला ताजमहालपेक्षाही सुंदर सुंदर इमारती पाहायला मिळतील. तसं पाहता आमच्याकडील इमारतींपेक्षा कितीतरी सुंदर इमारती आपणांस पाहायला मिळतील. नाही तर, आमच्या कारखान्यात जशा इमारतीही पाहायला मिळतील. जर आपल्याला हे कारखाने या इमारती एकमेकांना जोडण्याची आणि शिवाय त्यांच्याशी आपल्या आत्म्याचं मनोमीलन करण्याची इच्छा असेल तर असं हे काम फक्त एखादा माणूस, व्यक्ती किंवा सहकारीच करू शकतो.

आमचा हा दृढविश्वास आहे, की जर तो आपला सहकारी म्हणून स्वीकारार्ह असेल, तर सहकारिता पूर्णपणे पचवूनच तो सहकारी होईल. यंत्र तर लागणारच, इमारती तर होणारच होणार आणि जोडीला जे पैसे तिथं गुंतवावे लागलेत त्यांचा उपयोगही होईल आणि तो माणूसच जर योग्य नसेल, तर ज्या सर्व गोष्टी मी इथवर विस्तारानं सांगितल्यात त्या सर्वच्या सर्व असूनही काहीच साध्य होणार नाही. जर

त्यामुळे खरोखरच काही साध्य होणार नाही, हे निखळ सत्यच आहे.

आमच्या दृष्टीनं हेही महत्त्वाच ठरतं, की आम्ही यंत्रांना, इमारतींना, पैशांना जितकं महत्त्व आज देतो आहोत त्याच्या कित्येक पटीने महत्त्व आम्ही ज्यांच्याबरोबर आमचं पूर्ण जीवनच व्यतीत करतो. त्या आमच्या सहकाऱ्यांना दिले पाहिजे. जर त्यांच्या काही अडचणी असतील, तर खरं पाहता त्या आमच्याच अडचणी आहेत, त्यांना प्राथमिकता देऊन त्यांची सोडवणूक केली गेली पाहिजे. त्यानंतरच त्यांचे समाधान केले गेले पाहिजे.

आम्ही दुसऱ्या इतर अडचणींवर त्यानंतरच मार्ग काढू शकू. जर आपण त्या सहकाऱ्यांनाच आपलं मानलं तरच ते त्यांच्या कामांना आपलं मानतील! आणि जेव्हा ते आपापली कामं मालकीच्या भावनेने करतील तेव्हाच आपल्याला त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीवर लक्ष ठेवण्याची गरज भासणार नाही. ते स्वत:हूनच ते काम पूर्ण करतीलच! एवढेच नव्हे; तर ते जितके जास्तीत जास्त चांगले करण्याची शक्यता असेल तितके चांगले ते करतील. जेव्हा एखादा माणूस ही गोष्ट मन:पूर्वक स्वीकारतो तेव्हा तर मात्र तुम्ही हे समजूनच घ्या, की कंपनीच्या व्यवस्थापनाने आपापलं काम फारच उत्तमरित्या पार पाडलेले आहे.

जर आपण सहकाऱ्यांचा विश्वास संपादन करू शकलात आणि त्यांच्यात जे काही कसब आणि क्षमता असेल त्याचा पक्का अंदाज आपणाला आला तर माझी अशी खात्रीच आहे की, जीवनातलं तेच एक सर्वांत मोठं काम आहे! त्याच पद्धतीनं काम करीत करीत आम्ही या क्षणापर्यंतचा प्रवास केला आहे आणि हा प्रवास असाच चालू रहावा असेच प्रयत्न राहतील. म्हणूनच आम्ही सुरवातीपासूनच आमच्या उद्योग जगतात माणसाला जेवढे महत्त्व दिलंय तितके दुसऱ्या कोणत्याही घटकाला दिलेलं नाही.

**श्री. जाखड –** राजस्थानशी संबंधित असणाऱ्या व्यावसायिकात आपलं आगळंच व्यक्तिमत्त्व आहे. त्यासंदर्भात आपण काय सांगू शकाल?

**भाऊ –** हे पाहा, तुम्ही मला हरभऱ्याच्या झाडावर चढवू पाहत आहात. मला खूप मोठा माणूस बनवू पाहता आहात. खरंतर आम्हाला वेगळे पाडण्याचाच तुमचा बेत आहे. आमचे जे दुसरे उद्योजक मित्र आहेत त्यापेक्षाही वेगळं असं मानू पाहत आहात. तसं पाहता काही एका मर्यादेपर्यंत तरी तुम्ही जे म्हणताय ते फार

चांगलंच आहे आणि खरंही आहे. आम्ही मालक तर नक्कीच आहोत. राजस्थानचेही आहोतच. मारवाडीही आहोतच आणि मारवाड हा राजस्थानमधील फारच बिकट असा प्रदेश आहे.

आमचे पूर्वज तेथूनच आलेले होते. राजस्थानबरोबर आजही आमचे संबंध घनिष्ट आहेत. तरीसुद्धा माझं असंच म्हणणं आहे, की जेव्हापासून आम्ही महाराष्ट्रात आलोय, त्या येण्याला आता जवळजवळ ११५-११६ वर्षे होऊन गेली, तेव्हापासूनच आम्ही या मायमातीला आमची मायमाती मानलं! जन्मभूमी आणि कर्मभूमीही सर्वकाही महाराष्ट्रच! आम्ही या मातीशी पूर्णपणे एकरूप झालोय.

इथल्या वातावरणात, निसर्गाशीही एकरूप झालोय. इथलं आणि राजस्थानचं वातावरण पूर्णत: भिन्न असूनही आम्ही त्यांना जोडणारा हा जो उद्योग-व्यवसाय आहे तो तर त्याच्या त्याच्या जागीच आहे. तिथंही तोच उद्योगधंदा करायचा होता, जो आमच्या पूर्वजांनी केला आहे. त्यांनी कठोर परिश्रम केले होते. पाण्याच्या एका थेंबा थेंबासाठी इकडंतिकडं भटकत होते आणि आजही इथं तर आम्ही पाण्याचा थेंब थेंब जपत आहोत. किंबहुना त्यासाठी आपलं सारं आयुष्य पणाला लावलंय आम्ही! शेवटी थोडक्यात असं, की तिथलं काम आणि इथलं काम हे एकच आहे; पण त्याच कामात एक श्रद्धा आणि निष्ठेची नवी दिशा प्राप्त झाली आहे.

मला हे मान्य आहे, की मी पैशांसाठीच उद्योग-व्यवसाय करतो आहे आणि उद्योग-व्यवसायासाठीच पैसे प्राप्त करीत आहे, म्हणूनच मी वेगळा असा होऊच शकत नाही. उद्योग-व्यवसाय आणि पैसा वेगवेगळा ठेवत जर मी काही उत्पन्न मिळवू शकलो तर ती संपत्ती मला या समाजापरत्त्वेच मिळाली असं होतं. याच तत्त्वाधारित जीवन व्यतीत करीत आहे. म्हणूनच समाजाप्रति माझी जी बांधिलकी असायला हवीय, जे माझं उत्तरदायित्व असायला हवंय त्यालाच नेहमी दृष्टीसमोर ठेवून मी माझे जीवन व्यतीत करू पाहतो. त्याचं कारण असे, की मी या भूमीलाच माझी भूमी मानलंय आणि राजस्थानातून आलो असूनसुद्धा तिथले जे उत्तम संस्कार होते आणि सद्‌गुण होते म्हणजे तेथील कठोर परिश्रम, प्रामाणिकता हे सर्वश्रेष्ठ गुण तर तिथलेच उपजत आहेत.

कलेचा एक चांगला उपासक असणं हाही तिथलाच एक सद्‌गुण आहे. या

सर्व सद्‌गुणांचा संचय आम्ही इथं केलेला आहे आणि त्यांचं सिंचनही आम्ही इथच केलेलं आहे. जेव्हा या गुणांना आम्ही संचित एकत्रित करून इथं आणलं जेव्हा आम्ही मग त्यांचं इथ सिंचनही केलं तेव्हा त्यांच्यातून जे वैभव रूपानं उभं ठाकलं, तेच आज आपण इथं पाहत आहात. त्यामध्येच आज आपल्याला एकप्रकारचं वेगळेपण जाणवत आहे, ती तर फारच आनंदाची गोष्ट आहे.

जर इथं येऊनही आम्ही राजस्थानी म्हणून राहू शकतो आणि राजस्थानी असूनही जितका एक महाराष्ट्रीयन माणूस उत्तमरित्या काम करू शकतो तसंच काम करू शकलो तर असं समजा, की दुधात साखरच पडली. त्यामधून काहीतरी चांगलंच निर्माण होणार, चांगलीच चव येणार हे नक्की! याच दृष्टिकोनातून जीवनाचा आनंद आम्ही चाखत आहोत आणि समाजाबद्दल अपार निष्ठाही ठेवून आहोत. समाजाची जितकी कामं आमच्याकडून होऊ शकतात तितकी करीतच राहतो. अनेक पुरस्कारही जैन इरिगेशनला मिळाले.

**श्री. जाखड –** आपण कृषी व्यवसायाशीच नाळ जोडलेली आहे आणि शेतकऱ्यांशी कायमचीच बांधिलकी मानताना, आपल्यावर आपल्या आईच्या विचारांचा–संस्कारांचा प्रभाव जाणवतोच! भाऊ, आपण जर या क्षेत्रात आलाच नसता तर आज काय करीत असता?

**भाऊ –** या क्षेत्रात आलो नसतो तर आपल्याप्रमाणं पत्रकार झालो असतो. कदाचित मी साहित्यिकही झालो असतो. कदाचित मी नानी पालखीवाला यांच्याप्रमाणे वकीलही झालो असतो किंवा एखादा प्राध्यापकही झालो असतो. तसं पाहता, होण्यासाठी कितीतरी पर्याय उपलब्ध होते तेव्हा, आजही आहेत; परंतु एक गोष्ट अशी, की राजकारणात मात्र कधीच गेलो नसतो. याचं कारण असं, की गांधीजींनंतर राजकारणाचा एक धंदाच बनलाय.

माझ्या मनाला अशा गोष्टींमुळे खूपच टोचणी लागते. मी कधीच राजकारणी होणार नाही, झालो नाही. त्याच्याशिवाय मी काहीही होऊ शकेन असं मला वाटत. जे होणार होतो, तो झालो आणि त्यातच मला आनंद आहे. जे काही आपण करतो तेच चांगल्या रीतीनं करावं म्हणजे झालं! 'जे काम हाती घ्याल ते सर्वांत उत्तम करावे', हेच आमच्या जीवनाचं ध्येय आम्ही मानलंय. जे काही आम्ही करतोय त्यातच आम्ही आमचं तन, मन आणि आत्माही झोकून देतो! जो माणूस अशा

रीतीनं आपलं तन, मन, आत्मा झोकून देऊनच काम करतो तेव्हाच त्यातून एखादी अशी कृती निर्माण होत असते जी आज तुमच्यापुढे आहे!

**श्री. जाखड –** कराराच्या शेतीद्वारे जैन इरिगेशन शेतकऱ्यांचे जीवनच बदलू पाहत आहे. या क्षेत्रात आता किती विस्तार करण्याची योजना आहे?

**भाऊ –** आज तर कराराच्या शेतीमुळं जवळजवळ पाच हजार शेतकऱ्यांच्या कुटुंबांत आनंदाचे वातावरण तयार झालेलं आहे. शेतकऱ्यांच्या या देशात पाच हजार शेतकरी म्हणजे फारच अल्प संख्या आहे ही. या देशात कमीत कमी साठ लाख शेतकरी आहेत. मात्र मला याची जाण आहे, की शेतकऱ्यांसाठी आम्ही जे काय केले आहे, ते काम महत्त्वाचे आहे याचं कारण त्यासोबतच आम्ही ठिबक सिंचनही देत असतो. यामुळंच त्यांच्या जीवनात, त्यांच्या उत्पादनात तसेच त्यांच्या यशातही खूपच बदल होत असतात. फार मोठ्या प्रमाणात ते जर त्यांना दिलं गेलं तर ती एक मोठीच बाब होईल.

केवळ कराराच्या शेतीद्वारेच त्यांच्यापर्यंत पोचायचं म्हटलं तर मला वाटते, की येणाऱ्या तीन ते पाच वर्षांच्या कालावधीत आम्ही जास्तीत जास्त एक लाख शेतकऱ्यांपर्यंत पोचू शकू. सुदैवानं याहीपेक्षा जास्त शेतकऱ्यांपर्यंत जर आम्ही पोचू शकलो तर मात्र सोन्याहून पिवळं! आजची आमची योजना नजरेपुढं आहेच पण आम्हाला असं वाटतंय की भारतातल्या प्रत्येक प्रांताप्रांतात असंच होत राहावं. आमचं पाहून पाहून का असेना, इतरांनीही पुढं यावं!

प्रामाणिकपणानंच जर शेतकऱ्यांशी व्यवहार केला तर ते खूप मोठ्या प्रमाणावर पसरेल हे निश्चित! पण ही राहिली शेवटी निसर्गाशी संबंधित गोष्ट. यात बऱ्याच सेवाही द्याव्या लागतात! यात आपल्या स्वत:च्या स्वार्थापलिकडे जाऊन त्या शेतकऱ्याच्या हिताचा विचार करावा लागतो! आणि हे काम जरा कठीणच असल्यानं किती लोक ते करू शकतील? हा मोठा प्रश्नच आहे, पण माझी तीव्र इच्छा आहे, की जास्तीत जास्त लोकांनी याचा अवलंब करावा.

**श्री. जाखड –** एकवेळ अशीही आली होती की, जैन इरिगेशनला आपल्या सहकाऱ्यांचे पगारही करणं शक्य होत नव्हतं! परंतु आता मात्र आपला व्यापार जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचत आहे. या यशस्वितेचा मूलमंत्र कोणता आहे?

**भाऊ –** व्यक्तीच्या आयुष्यात तसंच संस्थेच्याही आयुष्यात चढउतार तर

येणारच. बरं ज्या जीवनात चढउतारच नाहीत ते जीवन कसलं? जोपर्यंत उतारच येत नाही तोपर्यंत चढ चढून येण्यातल्या आनंदाची चवही कशी कळणार? या समाजात सर्वच सज्जन झाले, तर दुर्जनांचं काय? दुर्जन आहेत म्हणूनच तर सज्जनांची किंमत आहे! उतार असतो म्हणूनच तर चढाचं कौतुक असतं. चढाव असतो म्हणूनच तर उतार सहजतेनं उतरला जातो आणि ते तर होणारच असते. ते तसं झालं त्यामुळंच तर मला वाटतं एका दृष्टीनं मला जीवनाकडे पाहण्याचा नवा मार्गही सापडला.

आपल्या प्रश्नाचा रोख मात्र मला असा दिसतोय, की ज्यायोगे आपण हे जाणून घेऊ पाहता आहात, की त्या वाईट दिवसांच्या कालखंडातून आम्ही बाहेर कसे पडलो? आम्हाला यश कसं आलं? आम्ही उलट उसळी मारून उभे कसे राहिलो? किंवा त्यातून आम्ही परत एकदा उभारी कशी घेतली? हेच तुम्हाला जाणून घ्यायचंय. मला तुम्हाला हे आवर्जून सांगावंसं वाटतंय, की पारंपरिक गोष्टी तर त्या तशाच राहिल्या होत्या आणि कठोर परिश्रमही पूर्वीप्रमाणेच होत होते. त्यांच्या जोडीला प्रामाणिकपणाही तोच होता.

आमच्या लक्षात आलं, की आमची चूक झालेली आहे, जेव्हा आम्हाला हेही समजलं, की आमच्या हातून झालेल्या चुकीमुळे हजारो लोकांना त्रास सहन करावा लागलाय, ह्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे लोक होते. पुरवठादार होते, बँकर्स होते, ग्राहकही होतेच. तेव्हा आमच्याही मनाला बोचणी लागली. आम्ही सरळ साधी जाहिरात दैनिकांत देऊन टाकली. सगळ्यांना मिळून आम्ही असं म्हणालो, की 'बंधूंनो, मला क्षमा करा. माझ्या हातून झालेल्या चुकांमुळे आपणांस दु:ख होते आहे; परंतु मी आपणांस हे आश्वासन देऊ इच्छितो, की आम्ही अगदी लवकरात लवकर, यातून बाहेर पडणार आहोत आणि यातून बाहेर पडल्यावर आपणासमोर पुनश्च उभारीनं उभे ठाकू. आपल्याला ज्या काही यातना भोगाव्या लागल्यात, त्याबद्दल आम्ही आपणाकडून माफीची याचना करतो.' अगदी सरळ सरळ निर्भयपणे कॉर्पोरेट जगतात आम्ही जाहिरात देऊन मोकळे झालो. पेपरच्या अर्ध्या आकारात ती जाहिरात होती.

आजही ती जाहिरात कॉर्पोरेट जगताची आपली स्वत:ची अशी विशेष उल्लेखनीय घटना उदाहरण म्हणून दिली जाते. माझी अशी धारणा आहे, की आमच्या त्या यशाचं काही गुपित असलेच तर कोणतं? त्या तितक्या कठीण परिस्थितीनंतरसुद्धा

आज आम्ही इथवर पोहोचल्याचं मर्म असेल तर ते कोणतं? महत्त्वाचं पहिलं कारण म्हणजे आम्ही प्रामाणिकपणे जगासमोर उभे ठाकलो.

जे काही झालं होतं ते सगळं खरं खरं सांगितलं आणि दुसरं म्हणजे कठोर परिश्रम केले; पण जर माझ्या सहकाऱ्यांनी मला साथ दिली नसती तर मात्र कदाचित मी अडचणीत येण्याची शक्यता होती, असं मला वाटतं! परंतु त्या काळात एकाही माणसानं आम्हाला सोडलं नाही. यासंदर्भात हेही लक्षात ठेवायला हवं, की त्या पाच वर्षाच्या काळात त्यांचे पगारही नियमित होत नव्हते. तरीही कोणीही कंपनी सोडून गेले नाही. अशा सहकाऱ्यांचा मला अभिमान वाटतो.

जर तसं झालं नसतं तर मात्र फारच कठीण परिस्थिती निर्माण झाली असती. तेव्हा जितक्या अडचणी पुढं होत्या त्या नक्कीच वाढल्या असत्या. त्यात एक गोष्ट फारच महत्त्वाची होती. आम्ही इतक्या मोठ्या संकटात रुतलो होतो आणि इतक्या कठीण आर्थिक पेचप्रसंगातून जात होतो याची किंचितही तमा न बाळगता त्यांनी उत्पादनांच्या गुणवत्तेत कुठही, किंचितही तडजोड केली नाही. गुणवत्तेला बिघडू दिलं नाही.

शेतकऱ्यांना आमचा जो माल तेव्हा द्यायचा होता त्यात आम्ही कमी गुणवत्तेच्या दर्जाचा माल देण्याचा प्रयत्नही केला नाही. उत्पादन उपलब्धच नसेल तर आम्ही स्पष्टपणे तसं सांगितलं. आम्ही केव्हा देऊ शकू हे सांगितलं. त्यावर ज्यांना थांबणं शक्य होतं ते थांबले. परिस्थितीने कोणतेही झेप घेवो, आपण गुणवत्तेपासून ढळू नये. आम्ही ढळले नाही आणि तसे होणे कधी ही शक्य नाही! माझी अशी धारणा आहे, की या कारणांमुळेच आम्हाला पुनश्च यशप्राप्ती झाली.

धन्यवाद!



# एका मित्राला यथोचित श्रद्धांजली

आकाशवाणी मुलाखत

– सतीश पप्पू – १९.११.२००८

*(कै.) पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार हे एक चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व होते. शेती, शेतकरी आणि शेती व्यवसायाला त्यांनी वाहूनच घेतले होते. एका बाजूने ही व्यक्ती सुशिक्षित, व्यवहारी, जग बघितलेली, अनुभवी होती; तर दुसऱ्या बाजूने भवितव्याची स्वप्नं पाहणारीही होती. म्हणूनच भारतातील पारंपरिक शेतीला नवशास्त्रांच्या तंत्रांच्या रेट्याची निकड त्यांना जाणवत होती. अशात त्यांची भवरलालजींशी ओळख झाली. मग काय? समसमा संयोग की जाहला.*

*आप्पासाहेबांनी सर्वतोपरी सर्वकाळ खुल्या दिलाने भवरलालजींना मदत करूनच ते गेले. त्यांच्या स्वप्नासाठी झटत राहणाऱ्यांचे कौतुक करण्याचा हा प्रकार त्यांच्या आत्म्याला नक्कीच चिरशांती देईल, हा भवरलालजींचा विश्वास म्हणून हा पुरस्कार.*

**श्री. सतीश पप्पू** – श्रोतेहो, 'पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषी उच्चतंत्र पुरस्कार' समारोह २१

नोव्हेंबरला जैन हिल्सवर संपन्न होणार आहे. आपल्या सगळ्यांना खानदेशचे एक वैशिष्ट्य आवर्जून माहीत आहे ते म्हणजे खानदेशच्या अनेक ठिकाणांना आपण ‘प्रतिपंढरपूर’ अशी उपमा देतो.

अमळनेरचे सखाराम महाराजांचे मंदिर असेल, शेंदुर्णीला त्रिविक्रमाची यात्रा असेल, पिंपळगाव-हरेश्वरलासुद्धा महाराजांच्या समाधीच्या ठिकाणी भक्तांसाठी स्वत: पांडुरंग या खानदेशामध्ये आला, हा खानदेशवासीयांचा दृढ विश्वास आहे. अशा या खानदेशात शेतकऱ्यांसाठी ‘कृषिपंढरी’ प्रगल्भ शेतीविचारांचे अचूक असे सिंचन त्यांना वेळोवेळी देत देत ‘कृषिपंढरी’ डॉ. भवरलाल जैन यांनी म्हणजेच मोठ्याभाऊंनी जळगावात तयार केली.

या‘कृषिपंढरी’त सगळया शेतकऱ्यांचा जो पांडुरंग आहे, भारताचे कृषिमंत्री माननीय शरदराव पवार हे कर्तबगार शेतकऱ्यांच्या भेटीला २१ तारखेला आपल्या जळगावात येत आहेत. सगळ्यांनी डोळ्यात साठवावा असा हा दर्शन सोहळा जळगावमध्ये होणार आहे.

कार्यक्रमाच्या निमित्ताने पद्मश्री डॉ.भवरलाल जैन यांच्याकडून ज्यांच्या नावाने हा पुरस्कार दिला जात आहे त्या आप्पासाहेब पवारांच्या संबंधामध्ये काही



आठवणी आणि एक व्यक्ती, एक मित्र आणि मार्गदर्शक आप्पासाहेब आणि भवरलालभाऊंशी त्यांची मैत्री या दोन्ही गोष्टी आपल्यासमोर याव्यात म्हणून आज आपण भाऊंशी बोलणार आहोत आणि त्याचबरोबर या पुरस्कारामागची भूमिका जी आहे तीसुद्धा भाऊ आपल्याला शेवटी सांगणार आहेत. भाऊ, नमस्कार!

**भाऊ –** नमस्कार!

**श्री. पप्पू –** भाऊ प्रस्तावनेत आपल्याला जी विनंती केली एक व्यक्ती, एक मित्र, एक मार्गदर्शक आप्पासाहेब आणि तुम्ही.

**भाऊ –** श्रोतेहो, नमस्कार. आप्पासाहेबांना स्वर्गवासी होऊन जवळपास ८ वर्षे झाली. आप्पासाहेब २००० मध्ये गेले आणि त्यानंतर लगेच २००२ मध्ये आप्पासाहेबांच्या स्मरणार्थ पहिला पुरस्कार आपण वितरित केला. मनात अशी प्रबळ इच्छा निर्माण झाली, की ज्या आप्पासाहेबांनी शेतकऱ्यांसाठी आणि शेतीसाठी एवढे काही केले त्यांचे नाव सातत्याने महाराष्ट्रात आठवणीत राहावे. ते ठेवण्यासाठी जे काही संस्मरणीय प्रसंग आपल्याला निर्माण करावे लागतात, त्यामध्ये होतकरू शेतकऱ्यांना किंवा मुरब्बी शेतकऱ्यांना आपण जे काही पुरस्कार देतो, त्याद्वारे त्यांच्यात एक जागृती आणण्याचा प्रयत्न करतो. ही खूप सकारात्मक, अनुरूप अशी घटना आहे. तसे व्हावे म्हणूनच या पुरस्काराची सुरवात आपण केली.

आप्पासाहेब एक कधीही न विसरले जाणारे व्यक्तिमत्त्व आहे. पांढऱ्या शुभ्र झगमगणाऱ्या दातांची कवळी, धिप्पाड शरीरयष्टी, ६ फुटांवर उंची, १०० किलोपेक्षा जास्तीचे वजन. आप्पासाहेब मला पहिल्यांदा भेटले १९८५ मध्ये अमेरिकेत. एका प्रदर्शनासाठी आम्ही गेलो होतो, परस्परांना ओळखत नव्हतो, नावे ऐकून होतो; पण प्रत्यक्ष भेट झाली नव्हती. आप्पासाहेबांबरोबर त्या वेळी अण्णासाहेब शिंदेसुद्धा होते. त्यांना ओळखणे मला कठीण नव्हते. त्यांची ती ठरलेली खांद्यावरची शाल आणि आप्पासाहेबांचा तो हसरा चेहरा! कधीतरी वृत्तपत्रात पाहिलेली ती प्रसन्न मुद्रा लगेच आठवली आणि दोघांनाही मी 'नमस्कार' असे म्हटले. तेही त्याच रांगेत उभे होते, ज्या रांगेत मी उभा होतो. ग्रे हाउन्डची बस येणार होती आणि आम्हाला आमच्या हॉटेलवर घेऊन जाणार होती. आम्ही एका हॉटेलमध्ये आहोत याचीसुद्धा आम्हाला कल्पना नव्हती; परंतु एकत्र भेट झाली आणि गाडीत जेव्हा बसलो तेव्हा एकत्रच बसलो. विषयाला लगेच सुरुवात झाली. तिघांनाही जोडणारा, घट्ट बांधून ठेवणारा

प्रभावी दुवा होता तो म्हणजे शेती-शेतकरी, पाण्याचे नियोजन. पाण्याशिवाय शेतकरी हे समीकरण न चालण्यासारखे आहे, हे महाराष्ट्रात वेगळे सांगण्याची गरज नाही, ते तर त्यांनी पहिल्या दिवसापासूनच हेरलेले होते, म्हणूनच तर आप्पासाहेब आणि आण्णासाहेब तेथे हजर होते. आप्पासाहेब त्या दिवशी म्हणाले, 'भवरलालजी, तुम्ही इथे कशासाठी आलात? आपला धंदापाणी पाइप बनविणे-विकणे हे सर्व सोडून इथे कशाला आलात?' तेव्हा मी म्हटले, 'आप्पासाहेब, जर नुसते पाइपच विकत राहिलो आणि शेतीची अवजारेच विकत राहिलो, तर किती दिवस चालेल? पाण्याची समस्या एवढी बिकट झाली आहे, की कदाचित शेतीच आपल्याला दिसणार नाही, केवळ कारखानदारी आपल्याला काही काळानंतर दिसेल. अशा बिकट परिस्थितीचा आधीच जागरूकपणे विचार करून पाण्याचे नियोजन आपण केले नाही, तर भविष्यात फार गंभीर समस्या निर्माण होतील.'

आप्पासाहेबांनी माझ्याकडे विशिष्ट दृष्टीने पाहायला सुरवात केली. 'जो विचार माझ्या मनात आहे तोच विचार याच्याही मनात रुजत चालल्याचे दिसते आहे.' असंच आप्पासाहेबांना वाटलं असणार. अण्णासाहेबसुद्धा भारावून गेले आणि ते म्हणाले, ''भवरलालजी, मी पहिल्यांदाच एखादा व्यापारी किंवा उद्योजक असा बघतोय, की जो एवढा दूरदृष्टीचा विचार करून लांबच्या पल्ल्याची अशी योजना आखायला तयार झाला आहे!'' त्यानंतर आमची विविध विषयांच्या अनुषंगाने खूप दिशादर्शक अशी चर्चा झाली.

अण्णासाहेबांचे शेवटचे शब्द होते, ''भवरलालजी, आम्हाला असे वाटते, की तुमच्या निमित्ताने आमची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कोणीतरी एक 'दूत' आला आहे!'' आमची संस्मरणीय अशी ही पहिली भेट. मी कमीत कमी चार-पाच वेळा बारामतीला आप्पासाहेबांना भेटायला गेलो. प्रतिष्ठानला भेट दिली. तिथे जे नवनवीन प्रयोग चालू होते त्यांची पाहणी केली, कोणत्याही वेळी काही महत्त्वाचे पाहुणे भेट देण्यासाठी येणार असतील, तर आप्पासाहेब मला आवर्जून बोलावून घेत असत.

बहुतांशी मी आणि नामदेवराव (कवी ना.धों. महानोर) सोबतच तेथे जात असू. अनेकदा मी एकटासुद्धा त्यांच्याकडे गेलो. मोठ्या आपुलकीने आप्पासाहेब घरीच जेवायला बोलावत, अतिशय आग्रहही करीत. जेवताना आणि जेवणाआधी आणि मुक्कामातसुद्धा शेतीवर चर्चा रंगायच्या. त्यानंतर मला असे लक्षात आले, की

आप्पासाहेबांना शेतीवर बोलायला खूप आवडते. स्वत: हाडाचे शेतकरी तर होतेच, कारखानदारही होते. पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांनी जबाबदारीने काम पाहिले होते. बोलणे अत्यंत शास्त्रशुद्ध, अतिशय चांगल्या पद्धतीने आपला विषय मांडत असत. दोन-दोन किंवा अडीच-अडीच तास सभेमध्ये बोलत. श्रोत्यांना, शेतकऱ्यांना मंत्रमुग्ध करीत असत.

शेतकऱ्यांना समजेल अशा भाषेत विषय मांडत असत. जळगावला शेतकऱ्यांची संमेलनं असतील, मोठमोठ्या सभा असतील किंवा काही नवीन विषय त्यांच्यासमोर मांडायचा असेल त्या-त्या वेळेला आम्ही आप्पासाहेबांना बोलावत असू आणि तेही मोठ्या हिरिरीने येथे येत असत.

एवढ्या रसाळ वाणीने ठिबक सिंचनासारख्या विषयावर आणि इतर शेतीमधल्या प्रयोगांवर ते बोलत असत. त्यांचं बोलणं ऐकल्यावर वाटत असे की शेतीवरच बोलणारे ते प्राध्यापकच आहेत! जोपर्यंत शास्त्र आणि तंत्राची त्याला जोड दिली जाणार नाही, आपण कितीही प्रयत्न केले, तरी शेतकऱ्याची प्रगती होऊ शकत नाही, तोच संदेश त्यांच्या बोलण्यामधून ते नेहमी देत असत. शेतकऱ्यांचा लहान जरी कार्यक्रम असला तरी आप्पासाहेबांना विनंती करा म्हणजे ते हजर झालेच, अशी परिस्थिती होती.

पाच-सहा वेळेला आप्पासाहेब जैन हिल्सला आले. एकदा तर फक्त कारखाना बघण्यासाठी म्हणून मी त्यांना बोलाविले. तेसुद्धा त्या वेळेला शेतकऱ्यांची एक बस भरून त्यांना घेऊन आले. जे जैन हिल्सवर शेतीबद्दलचे प्रयोग चालले होते, ते दाखविले. ज्या-ज्या वेळी नवीन काम केले, त्या-त्या वेळी आप्पासाहेबांची आम्हाला खूप प्रकर्षाने आठवण झाली आणि होत असते. इथे जैन हिल्सला त्यांच्या हातून अनेक उद्‌घाटन सोहळेही पार पडले.

शेती आणि शेतकरी, त्याविषयी त्यांना असलेला लळा, हीच फक्त आठवण येते. आप्पासाहेब गेले त्या वेळी मनापासून असे वाटले, की महाराष्ट्राला, शेतकऱ्यांना ज्यांनी भरभरून दिले, त्यांची आठवण कायम जागती रहायला हवी. दर दोन वर्षांनी पुरस्काराच्या प्रेरणादायी वातावरणात ती आठवण अधिक प्रेरक होत जाते आहे. पुरस्काराआधी जाहिरात माध्यमांना आपण आप्पासाहेबांबद्दलची माहिती देत असतो.

पुरस्काराबाबत लिखाण करीत असतो. त्याचबरोबर सबंध महाराष्ट्रभर फिरून, माहिती संकलित करून शेतकऱ्यांची छाननी एका निवड समितीद्वारा करीत असतो.

त्या पुरस्काराच्या निमित्ताने सर्व शेतकऱ्यांना स्फूर्ती मिळते आणि प्रेरणादायी कामही सुरू राहते. आप्पासाहेबांनी मला काय दिले? हे जर आपण विचारणार असाल, तर दोन शब्द महत्त्वाचे ठरतात. एकतर प्रेरणा आणि दुसरे म्हणजे आत्मविश्वासाची वृद्धी!

'जो विषय मला प्रिय आहे त्या विषयामध्ये तुम्ही बेधडकपणे पुढे जा, आम्ही सगळे तुमच्या पाठीशी आहोत, वाटेल ते करू; परंतु महाराष्ट्रातल्या पाण्याचे नियोजन झाल्याशिवाय महाराष्ट्र पुढे जाणार नाही, महाराष्ट्रातला शेतकरी प्रगती करू शकणार नाही.' मला त्यांनी वारंवार बजावून सांगितल्या त्या या अत्यंत महत्त्वाच्या बाबी. त्यांच्या प्रेरक मार्गदर्शनाने माझा विश्वास अधिक बळकट होत गेला. त्यांच्यासारखे मुरब्बी आणि कृषिक्षेत्रात ज्यांनी इतके वर्षे काम केले आहे ते जर असे म्हणत असतील, तर प्रसंगी धोका पत्करूनसुद्धा आपला हा व्यवसाय पुढे रेटला पाहिजे या विचारावर मी माझ्या संकल्पाशी दृढ झालो. माझ्या त्या दृढपणाला आप्पासाहेबांनी अतिशय सकारात्मकपणे खतपाणी देण्याचे काम केले.

मला असे वाटते, की केवळ मित्र म्हणून नव्हे; केवळ ओळख म्हणून नव्हे; केवळ शेतकऱ्यांसाठी झटलेला माणूस म्हणून नव्हे; तर या सगळ्यांची बेरीज करून जर त्यांच्या स्मृती आपण अशा पद्धतीने तेवत ठेवल्या तर महाराष्ट्रात अशा शेतकऱ्यांसाठी झटणाऱ्या लोकांना आपण काहीतरी प्रतिष्ठा प्रदान केल्यासारखे होईल. त्यांच्याही ठायी अशी प्रेरणा जागी होईल आणि तेसुद्धा या कामाला लागतील, अशा पवित्र भावनेने या पुरस्काराकडे मी बघतो.

आदरपूर्वक सांगायचं म्हणजे याच भावनेने पवार कुटुंबीयसुद्धा या पुरस्काराकडे बघतात. अनेक शेतकरी बांधवांची उपस्थिती लाभते, प्रेमाने भारावलेली ही मंडळी. कृषिमंत्री मा. बाळासाहेब थोरातसुद्धा येत आहेत. पूर्वीतर मा. मुख्यमंत्री विलासरावजी स्वत: दोन वेळा येथे पुरस्कार देण्यासाठी येऊन गेलेले आहेत. या वेळी काही अपरिहार्य कारणामुळे ते येऊ शकलेले नाहीत. एकूणच आप्पासाहेबांबद्दलचा हा गौरव आणि कृतज्ञता समारंभ आहे, असे मला वाटते.

धन्यवाद!

**पद्मश्री कै. डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषी उच्च तंत्र पुरस्काराचे मानकरी**
(२००२ ते २०१०) १) विश्वासराव कचरे–सोलापूर २) प्रभाकर मानकर–अकोला
३) विश्वासराव पाटील–जळगाव ४) भगवानराव क्षीरसागर–जालना
५) सौ. मनीषा भाऊसाहेब कुंजीर–पुणे



# उद्योगचक्रातील कंगोरे

डोंबिवलीच्या उद्योजकांशी प्रश्नोत्तरे

– २०.१२.२००८

*डोंबिवलीच्या इंडस्ट्रिअल असोसिएनशच्या सदस्यांशी आदरणीय भाऊंनी केलेला संवाद वजा गप्पा गोष्टी, भाऊंच्या उद्योजकीय अनुभव संचिताचा आलेखच म्हणावा लागेल. चारित्र्य, कठोर परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी या त्रिवेणीशी भाऊंचे संस्कारशील नाते. कृषिसंस्कृतीतून घट्ट झालेला हा संस्कार सर्वांपर्यंत पोहचवावा, हाच भाऊंचा उद्देश.*

*संपत्तीकडे पाहण्याचा भाऊंचा दृष्टिकोन मननीय आहे. नैसर्गिक प्रेम, शुद्ध सात्त्विक भावना या जीवन सागरातील मूल्यांचे सहजोत्कट दर्शन भाऊ या चर्चेत घडवतात. (याला केवळ चर्चा म्हणण्यापेक्षा चिंतन म्हणणे जास्त योग्य ठरेल!)*

*भाऊंचा 'सहकारी' हाही त्यांच्या जिव्हाळ्याचा भाग कसा आहे, कृतज्ञतेचा सुगंध आयुष्य कसे दरवळून टाकतो, प्रखर आत्मविश्वासाने ध्येयनिष्ठ माणसाचे आयुष्य कसे उजळून निघते, गुणवत्तेचे वलय आर्थिक साम्राज्य कसे उभे करते या प्रश्नांच्या उत्तरासाठी चौफेर व सकस असा हा संवाद समजून घ्यायलाच हवा.*

**प्रतिनिधी** – भाऊ, आम्ही सर्व उद्योजक तसे खूप धडपडे आहोत, प्रयत्नवादी आहोत, आमच्याही म नात मोठे उद्योजक होण्याची आकांक्षा आहे.  म्हणूनच आमच्यापैकी कोणाला काही अडचण आली, समस्या निर्माण झाल्या तर आम्ही सर्व सदस्य त्याला सहकार्य करतो. उद्योगविश्वातील यशस्वी उद्योजकांना भेटणे, त्यांनी उभे केलेले प्रकल्प पाहणे अभ्यास करणे, अशा कर्तृत्ववान व्यक्तींशी चर्चा करणे असाही एक महत्त्वपूर्ण उद्देश आमचा असतो.

जगातल्या एका नामांकित, कर्तृत्ववान व्यक्तीशी आज आम्ही संवाद साधत आहोत याचा आम्हाला  खूप आनंद आणि अभिमानही वाटतो. जैन इरिगेशन कंपनीचे प्रकल्प, संशोधनपर केंद्र, अनुभूती शाळा या सर्व स्थळांना भेट दिल्यानंतर, आम्ही खूपच भारावून गेलो आहोत.

भाऊ, एम. आय. डी. सी. च्या जागेत लघुउद्योग उभा करणे किंवा एखादा मोठा औद्योगिक प्रकल्प यशस्वी करून दाखविण्याचे प्रयत्न वेगळे आणि उजाड, बकाल डोंगरांवर सुंदर, हिरवेगार औद्योगिक साम्राज्य उभे करणे वेगळे यासाठी आपल्या अंतरी ईश्वराचाही स्पर्श असावा लागतो.



भाऊ, आपण एवढे मोठे उद्योगविश्व उभे केले, त्या ईश्वराला प्रत्यक्षात आम्ही पाहत आहोत. त्या ईश्वराशी बोलत आहोत, असेच आम्हाला वाटते आहे! (प्रचंड टाळ्या..)

**भाऊ –** मनापासून आपणा सर्वांचे या निसर्गरम्य शांत स्थळी स्वागत. आपण ईश्वर संकल्पनेचा उल्लेख केला. चांगल्या कामात, परिश्रमाच्या घामात ईश्वराचे दर्शन होते. आपण त्यासंदर्भात भावना व्यक्त केल्या असा सुसंस्कृत आणि समतोल अर्थ लक्षात घ्यायला अडचण नाही.

मला स्वत:ला एकतर्फी भाषणांपेक्षा अशा चर्चा, प्रश्नोत्तरे हेच आता अधिक आवडतात. भाषण देणे मी आता खूप कमी केलं आहे. आत्तापर्यंत मराठी, हिंदी, इंग्रजीत जी भाषणे झाली, त्यांचे संकलन केले आहे. त्यातील मराठीतून केलेली भाषणे लवकरच पुस्तकरूपाने उपलब्ध होतील, आपणा सर्वांना वाचता येतील. ही भाषणे म्हणजे आहे तरी काय? त्यातील विचार, उदाहरणे म्हणजे माझ्या आयुष्यभराच्या वाटचालीची ती जिवंत ओळख आहे! ही भाषणे एका अर्थाने माझा परिचय आहे.

विस्ताराने या विषयी बोलण्याचे कारण त्या पुस्तकातील एखादे पान, त्या पानावरचे एखादे वाक्य, एखादा शब्दही कुणाच्या आयुष्यात उपयुक्त ठरला आणि त्याला दिशा मिळाली, त्याचे भले झाले तर मी समजेन माझे आयुष्य सार्थकी लागले आहे. (टाळ्या...) 'व्हॉट इज कॅरी होम मेसेज?' हा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यासाठी भाषणापेक्षा सुसंवाद चांगला. त्या निमित्ताने एखाद्या समस्येच्या निराकरणाचा मार्ग शोधता येईल, एखाद्या नवीन गोष्टीवर आपल्याला प्रकाशही टाकता येईल. विचारा आपण.

**प्रतिनिधी –** भाऊ, सर्वांना आश्चर्य हेच वाटते, की आपण कृषिक्षेत्राशी संबंधित उद्योग निवडलेत. आपण त्या कामात यश मिळवले; पण हेच क्षेत्र निवडावे असे का वाटले?

**भाऊ –** चारित्र्य, कठोर परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी माझ्या आयुष्याचे हे तीन आधारस्तंभ! या तिघांचा सुंदर समन्वय मला कृषिसंस्कृतीत दिसतो. या क्षेत्राशी जुळलेल्या माणसाचा अथपासून इतिपर्यंत अगदी सर्वांशीच संपर्क येतो. शेतीत कष्ट खूप आहेत. हे खरे आहे, पण संपर्काचा स्तर मात्र खूप मोठा आहे.

उद्योग कोणताही असो संघर्ष अध्याहृत आहे. तरीही फार मोठी इंडस्ट्रियल घराणी शेतीशी संबंधित या उद्योग-व्यवसायात पडलेली दिसत नाहीत.

'प्रचंड कष्ट, मिळणारा मोबदला अल्प' असे हे गणित त्यांना मानवणार तरी कसे? तातडीने पैसा हवा असणाऱ्यांना, अतिरिक्त नफ्याकडे सतत डोळे लावून बसलेल्या अनेक उद्योजकांना शेतीत तातडीने काय मिळेल? तर निराशाच मिळेल. (हशा...) तिथे संयमाची आवश्यकता आहे. शेतीशी संबंधित जे जे करता येईल ते आव्हानात्मक असले तरी आपण करून दाखवू, ही जिद्द माझ्या ठायी होती म्हणून मी शेतीविषयक उद्योगात पडलो.

एखाद्या इन्व्हर्टर बनवणाऱ्या उत्पादकाचा वर्षभरात जास्तीत जास्त किती लोकांशी संपर्क येतो? चारशे-पाचशे, फारतर हजार लोकांशी येत असेल. शेतीशी संबंधित आमच्या कंपनीचे कामकाज असल्यामुळे वर्षभरात केवळ लाख-दोन लाख लोकांशी आमचा संपर्क येतो असे नाही, तर पंधरा-वीस कोटींच्याही वर या संपर्काचा आकडा जाऊन पोहचला आहे. दोन कोटी केळीची रोपटी दिली जातात. त्यात दोन-सव्वादोन लाख शेतकऱ्यांशी संबंध येतो.

पाइप विक्री असो वा ड्रीपचे वितरण प्रचंड जनसंपर्क जैन इरिगेशनचा होतो. हा व्याप आता जगातही मोठ्या प्रमाणावर पसरला आहे. तेरा कारखाने परदेशात आहेत, बारा भारतात आहेत. अर्थात या संपूर्ण यशाचे श्रेय मला एकट्याला द्याल का? ज्या उद्दिष्टांसाठी आपण जगलो ते उद्दिष्ट सर्वांत महत्त्वाचे असते! (टाळ्या...) शेती, शेतकरी ह्यांना हे श्रेय द्या. शेतीशी संबंधित अगदी लहानातलं लहान कामं जरी कुणी केलं तरी तुम्ही मोठे होऊ शकता. तुमच्या कामाचे स्वरूप मात्र जोमदार असले पाहिजे. या उद्योग-व्यवसायात पडल्यावर मला अपयशांच्या अनेक मालिकांशी सामना करावा लागला.

यशाने अनेकदा हुलकावणी दिली. पिच्छा पुरवणे, सतत कामात व्यस्त राहणे, सातत्य ठेवणे, यात आम्ही कमी पडलो नाही. ध्येयाचा ध्यास कायम जागृत ठेवला. लोकांच्या हृदयाला जाऊन भिडणारे हे शेतीचे क्षेत्र. शेती एक तर दुर्लक्षित विषय. साठ वर्षांनंतर आता आता शासन म्हणायला लागले आहे, की 'शेतीसाठी काही ना काही केले पाहिजे'.

महानगरातल्या शहरातल्या माणसांचा शेतीशी तसा संबंध येत नसावा; पण आता त्यांनाही वाटायला लागले आहे, हा संवेदनशील विषय आहे. खरं म्हणजे या लोकांनी आधी हा विचार करायला हवा. आपले रोजचे उदरभरण कोणामुळे होते? मातीत पिकलं तर पोटात जाईल ना! आपल्याकडे खूप सोने-चांदी, हिरे माणिकमोती असले तरी त्यामुळे पोट भरणार आहे का? पोट भरण्यासाठी अन्नच हवे! अन्नधान्याचा विषय निघाला म्हणून सांगतो, या धान्याचंही ब्लॅक मार्केटिंग आता मोठ्या प्रमाणात वाढलं आहे.

क्लास, हायर मिडल क्लास, मोठ मोठे कार्पोरेशन ज्यांचा शेतीशी तसा संबंध नाही शेतकऱ्यांप्रमाणे त्याबाबतचा अंत:करणापासून कळवळा नाही. अशा कंपन्या फार मोठी आर्थिक गुंतवणूक या क्षेत्रात करू पाहताहेत. शेतीत केवळ पैसा ओतला तरच शेती होते असे नाही. कितीही पैसा टाका, पैसाच उगवेल हे कसे सांगणार? भूमिपुत्रांकडे जरा आपुलकीने नजरा वळल्या आहेत. त्याची कारणे भले वेगळी असतील. फार मोठमोठ्या कंपन्यांनी शेतीत पैसा गुंतविल्याने मिडल क्लासने पाहिले आणि लगेच मध्यमवर्गाचे त्या गुंतवणुकीकडे लक्ष वेधले गेले.

खरोखरच शेतकऱ्यांकडे सहानुभूतीने पाहायला हवं, असं त्यांना वाटू लागलं. आपणा सर्वांपेक्षा भूमिपुत्र जास्त राबतो हे त्यांच्या लक्षात आलं असावं. मध्यमवर्गीय माणसं आता या शेतकऱ्यांच्या बाजूनं हाही विचार करीत असावीत, 'आपण महागाई भत्ते घेतो, इतरही आनुषंगिक लाभ आपल्या पदरात पडतात, पण या शेतकऱ्यांचं मात्र तसं नाही. शेतकऱ्यांच्या कथा, व्यथा आपण जाणून घेतल्या पाहिजेत' असा विचार त्यांच्या मनात यायला लागला आहे, यावरून समजायला हरकत नाही की शेतकऱ्याला चांगले दिवस यायला लागले!

भूमिपुत्र हा ज्याप्रमाणे या पृथ्वीतलावरील एक महत्त्वपूर्ण आणि अत्यंत जबाबदार घटक आहे, त्याप्रमाणे आणखी एक घटक खूपच अपरिहार्य आहे, तो घटक म्हणजे पाणी! दरडोई केवळ १६ लिटर पाणी वापरणारा समूह ७० टक्के आहे. म्हणून उरलेले शहरी नागरिक दरडोई २०० लिटर पाणी सढळ हाताने खर्च करताना आढळतात! परिणामी हे २०० लिटरचे प्रमाण दिवसेंदिवस कमी कमी होणारच.

'फक्त स्वत:साठी' जगणाऱ्यांना याची काय पर्वा? म्हणून माझं म्हणणं आहे, की आयुष्याची वाटचाल सुरू ठेवताना काही उद्दिष्ट हवे, ध्येय हवे. या हेतूत

स्वविकाससोबत समाजहिताचे धोरण हवे, चिंतन, मनन हवे, कृती हवी. आर्थिक समृद्धी नको का मिळायला? आर्थिक समद्धी तर हवीच! पैशाने माणूस बऱ्याच गोष्टी विकत घेऊ शकतो! पण पैसा साठवून ठेऊ नये. समृद्धी जेवढी अधिक तेवढ्या व्यापकतेने सामाजिक समरसतेची, सहकार्याची भावनाही वृद्धिंगत व्हायलाच हवी.

आता मी आपणाशी जो संवाद साधतो आहे, तो संवाद तब्येतीच्या दृष्टीने मी टाळू शकलो असतो; पण तसे मी केले नाही. कारण, मी नेहमी सकारात्मक विचार करतो. मी विचार केला, ठीक आहे, आपण करू डोंबिवलीकरांशी चर्चा, त्या दिवशी कदाचित आपली तब्येत चांगली राहील! संपत्तीकडे मी त्याचं दृष्टीने पहातो.

व्यावसायिक कामकाजासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक ही तर अपरिहार्य बाब. पहिलं प्राधान्य व्यवसायाला, त्यानंतर ज्यांच्या सोबत आपण कठोर परिश्रम घेतो ते सहकारी, त्यानंतर आपण निश्चितच सामाजिक बांधिलकीचा विचार करावा. किंबहुना तो संस्काराचा भाग आहे. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कामात आम्ही मनापासून सहभागी होतो. समाजातील गुणवत्ता ओळखणं, जोखणं, जोपासणं, त्याचं संवर्धन करणं. विशेष कर्तृत्व करून दाखविण्याची उमेद आणि क्षमता असणाऱ्यांच्या भरभक्कमपणे पाठीशी उभे राहून त्यांना सक्षम करणं, त्यांनाही सामाजिक सत्कार्याला जोडून घेणं, हे सर्व जैन इरिगेशन करीत आहे आणि हे काम इथे निरंतर सुरू राहील.

आम्ही हे सर्व विचारपूर्वक करतो. त्यातून आम्हाला मनस्वी समाधान प्राप्त होतं. एरवी हे समाधान जगातल्या कोणत्याही सुपर मार्केटमध्ये विकत घेता येत नाही. शुद्ध समाधान, सात्त्विक आनंद, पवित्र मैत्री, सज्जनांचा सहवास, आपल्या रक्ताच्या नात्याकडून मिळणारं नैसर्गिक प्रेम हे मॉल्समध्ये विकत मिळत नाही! (हशा...) It is not for sale मी ज्याला मनापासून चाहतो, त्याला मी इमोशनल सपोर्टच्या वेळी तो सपोर्ट देईलच! समजा तो आजारी पडला तर, त्यासाठी २ दिवसांची रजा काढणं आवश्यक असेल, तर काढलेच! कारण त्यात मला 'समाधान' आहे.

मला एकदा शरद पवारसाहेबांनी विचारलं, की ''भवरलालजी, तुम्ही दिल्लीला येत आहात, कशासाठी येत आहात?'' मी म्हणालो, ''विनाकारण येतो आहे! माझं आपणाकडे कोणतंही काम नाही; पण विनाकारण भेटूच नये, असं काही आहे का?'' माझं म्हणणंच असं आहे, की मैत्री म्हणजे सहजता, सरळता, अनौपचारिक

ऋणानुबंध! कोणत्याही कारणाशिवाय जे परस्परांना अंत:करणापासून भेटू इच्छितात आणि भेटतात ते खरे मित्र! अशा मित्राला आपण सांगू शकतो, ''तुला डोळे भरून पाहिल्याशिवाय मला बरं वाटत नाही म्हणून आलो. वहिनी घरी नसतील तर तू लिंबू-पाणी नाही दिलेस तरी चालेल! पण माझ्यासाठी दोन-चार मिनिटं तर काढ!'' (हशा आणि टाळ्या...)

आपल्याला जे पुस्तकी शिक्षण दिले जाते, ते हृद्यपेक्षा गद्य अधिक आहे. जे प्रश्नोत्तर पाठ करायला शिकवते; पण त्यातला भाव उचलायला शिकवते का? मित्रांनो, आम्ही शेतीकडेच वळलो, का? कृषिक्षेत्राविषयी मला प्रेरणा मिळाली ती कशी, कोणत्या स्वरूपात हा फार मोठा इतिहास आहे. माझ्याविषयी प्रकाशित झालेल्या पुस्तकात तुम्हाला हे वाचायला मिळेलच. मी स्वत: काही पुस्तके आता लिहितो आहे. त्यातही तुम्हाला अनेक नवीन विषय वाचायला मिळतील.

चाकोरीबद्ध कामं करणं आणि आगळी वेगळी सृजनशीलता जोपासून इतिहास निर्माण करणं वेगळं. स्मारकरूपाने असलेली, विशाल, भव्य आणि संस्मरणीय अशी निर्मिती म्हणजे इतिहास! इतिहासात स्मारके महत्त्वाची, तसा जपून ठेवलेला लेखी दस्तऐवज, पुरावे, कागदपत्रेसुद्धा तेवढीच महत्त्वाची. माझे एक सहकारी इतिहास संशोधक आहेत. डॉ. श्रीनिवास साठे त्यांचे नाव. डॉ. साठेंनी आमच्या संपूर्ण परिवाराच्या वाटचालीवर एकूणच ऐतिहासिकदृष्ट्यां प्रकाशझोत टाकला आहे.

इंग्रजांचे याबाबत काम अधिक काटेकोर आहे. भारतातून त्यांनी किती सोने नेले, किती चांदी, आयर्न वगैरे नेले, कोणत्या जहाजावरून नेले? याचा संपूर्ण इत्यंभूत इतिहास इंग्रजांनी लिहून ठेवला आहे. सगळे गॅझेटमध्ये इमानदारीने नोंदवले आहे. म्हणजे पाहा, बेईमानी केली तीसुद्धा इमानदारीने लिहून ठेवली! (हशा...) पण, मित्रहो, इमानदारी हा महत्त्वाचा विषय आहे.

भाषणांच्या निमित्तानं मी अनेकांशी मनमोकळेपणे संवाद साधू शकलो, लेखातून पत्रातून मुलाखतीतूनही काही विचार भावना व्यक्त झाल्या. या सर्व रचनेत कधी उत्स्फूर्त तर कधी पूर्वतयारीने संवाद साधता आला. अनेकदा अनेक विषय, मुद्दे विचार मनातले मनातच राहिले. काही अल्प स्वरूपात व्यक्त झाले, तर काही प्रदीर्घ स्वरूपात. आता हे सारे साहित्य पुस्तकरूपाने प्रकाशित व्हावे असे वाटते आहे. हे लेखन काळाच्या त्रिमितीतले एक दस्तऐवज ठरण्याची शक्यता असल्याचे अनेकांचे

मत असल्याने मी हे काम आता मनावर घेतले आहे.

वाङ्‌मयीननिर्मिती हासुद्धा माझ्या आयुष्याचा एक महत्त्वाचा उद्देश मी मानला आहे. प्रत्येक कामाचा संबंध अर्थकारणांशी जोडलाच पाहिजे, हा अट्टहास कशासाठी? पैसा मिळवणे हे माध्यम आहे, ते महत्त्वाचे; परंतु ते केवळ एक साधन आहे, ज्यांचे ते साध्य होईल ते पैशाचे निश्चितच गुलाम होतात. पैशांची गुलामगिरी ज्यांच्या वृत्तीत भिनते, त्यांना आयुष्यातल्या निरागस आनंदाचा लाभ मिळणार तरी कसा? पैशांचे गुलाम स्वत: तर दु:खी असतातच; परंतु घरातल्यांनाही, मित्रपरिवाराला, सहकाऱ्यांनाही दु:खच देत राहतात. एकच मंत्र माणसाला सुखी–समाधानी ठेवू शकतो, तो म्हणजे 'इतरांना आनंद द्या, स्वत: आनंदी राहा!'

परवा माझ्या कारखान्यातील मिक्सिंग विभागातील एका सहकाऱ्याच्या संदर्भात घडलेली घटना. शिप्ट संपलेली होती. तो घरी जाण्याआधीची आवराआवर करीत होता. तो झाडण्यासाठी खाली वाकला आणि खाली कोसळला. पुन्हा उठलाच नाही. ही घटना घडल्यानंतर साधारणत: दोन–तीन तासांनंतर मी त्या कारखान्यात माझ्या एका मिटिंगसाठी गेलो होतो; परंतु भाऊंना आधीच एवढा त्रास आहे, पाच हार्ट अटॅक येऊन गेले, दोन बायपास होऊन गेल्या, असे असताना ही दु:खद घटना एकदम सांगायची तरी कशी? असा विचार झाल्यामुळे माझ्यापर्यंत ती बातमी लगेच पोहचली नाही. मात्र, दुसऱ्या दिवशी मला ही घटना समजली. त्या दिवशी रात्री साडेबारा वाजेपर्यंत मला झोपच आली नाही.

मी सतत त्याच घटनेच्या विचारात गुंतून राहिलो. कंपनीच्या ४७ वर्षांच्या इतिहासात दुसऱ्यांदा घडलेली ही अतिशय दु:खद अशी घटना! तसे पाहिले, तर एकूण आठ हजार सहकारी असलेल्या जैन इरिगेशन कंपनीत ४७ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात अपवादात्मक दोनदा अशा घटना घडल्या. सुरक्षिततेबाबत रेकॉर्ड चांगले, व्यवस्थितपणा– शिस्त यात काटेकोरपणा, फॅक्टरी अगदी स्वच्छ अशा सर्व सकारात्मक बाजू असताना हे असं विपरित घडलं तरी कसं? आपल्याला आता नेमकी कोणती पावलं उचलावी लागतील, ज्यामुळे एकाही सहकाऱ्याला यापुढे कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही? असा विचार आम्ही करू लागलो.

विचारविनिमयानंतर मी सहकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक योजना तयार केली.

त्या योजनेनुसार सहकाऱ्यांकरिता वैद्यकीय चाचणी अनिवार्य केली. ६-७ डॉक्टरांची टीमच तयार झाली. प्रत्येकाचं मेडिकल रेकॉर्ड तपासून स्ट्रीपल्स रेकॉर्ड, ब्लड-यूरीन, इसीजी हे सर्व करून रेकॉर्ड अपडेट करून घेतले. माझा तो सहकारी तर क्षितिजापलीकडे निघून गेला होता; पण सर्वांकरिता विशेष काही करून दाखविण्याची प्रेरणा देऊन गेला होता. त्याच्या परिवाराला कायद्याच्या चौकटीतून सहकार्य होणार होतेच; पण त्यापलीकडे आणखी भरीव सहकार्य निश्चित करता येण्यासारखे होते.

मी कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांना काही सूचना दिल्या. संपूर्ण फॅक्टरीचा एक दिवसाचा पगार, त्या रकमेएवढेच पैसे कंपनीचे असे एकत्र करून त्या सहकाऱ्यांच्या पत्नीच्या नावाने फिक्स डिपॉझिटमध्ये टाकण्याविषयी सूचना दिली. शिवाय त्याच्या मुलांच्या शिक्षणाकरिता सहकार्य करायला सांगितले. त्याच्या घरातील कुणालाही नोकरीची आवश्यकता असल्यास प्राधान्य देण्याविषयी सांगितले.

जे जे ठोस स्वरूपाचे सहकार्य आहे ते ते करण्याविषयी सूचना दिल्या. ८,००० सहकाऱ्यांच्या आरोग्य तपासणीचा प्रपंच मोठा आहे. आतापर्यंतच्या तपासणीत काही कटू बाबी समोर आल्या. ०२. एच. आय. व्ही च्या केसेस, तर हेपिटायटीसच्या नऊ केसेस निघाल्या. हृदयविकाराच्या दोन, तर डोळ्यांचे प्रॉब्लेम असलेल्या १०० केसेस मिळाल्या. अजूनही तपासणीचे कार्य सुरूच आहे. दोन-तीन महिने तरी अजून लागतील. शक्य होईल तितकी काळजी घ्यायची. मेडिकल ऑफिसर्सचीही नेमणूक केलेली आहेच.

जो सहकारी आपलेपणानं, कामाची मालकी स्वीकारून कठोर परिश्रम करतो, प्रामाणिकपणे कंपनीशी एकनिष्ठ राहतो त्याच्यासाठी या अद्ययावत सुविधा देण्याचे एक समाधानच मला मिळत असते. माणसांपेक्षा पैसा जिथे केंद्रस्थानी येतो, तिथे हे होऊ शकणार नाही. प्रगतीच्या शिखरावर खऱ्या अर्थाने विराजमान व्हायचं असेल, तर पैशाचा साधन म्हणून वापर करा, साध्य म्हणून नव्हे. माणसापेक्षा मोठे या जगात काहीच नाही!

केवळ ७,००० रुपयांत मी व्यापार सुरू केला. हळूहळू व्याप वाढत गेला. माझ्याकडे स्मॉल स्केल्सचे अकरा कारखाने होते. फॅमिली मेंबर्सही खूप होते. महाराष्ट्रात कोणत्याच मोठ्या कारखान्याला किंवा मध्यम उद्योगाला या काळात मध्यवर्ती शासन पाइप बनवण्याचा परवाना देत नसे. माझ्या उद्योजकीय वाटचालीत

मी सातत्य ठेवलं कठोर परिश्रमात. सोबत असणाऱ्या सर्वांना या कार्यसंस्कृतीचा उत्कट अनुभव घेता आला.

वाकोदसारख्या खेड्यातून मी शहरात आलो. शेतावर उन्हातान्हात राबलो. त्या अनुभवाच्या संचिताचा धनी असल्यामुळे साता समुद्रापार परदेशात गेलो, तरी मातीतून उगवलेली नि रक्तात संस्कारांच्या रूपानं भिनलेली जीवनमूल्ये विसरलो नाही. भारतात कारखाने खरेदी केले तसे टप्प्याटप्याने परदेशातही खरेदी केले थेट अमेरिकेपर्यंतही मजल मारली. पैशाच्या समृद्धीत मी स्वत:ला बुडवून घेतले नाही. अलिशान बंगले, चैन- ऐश असे विचार तर आसपासही कधी फिरकले नाही, फिरकणं शक्यच नाही.

केवळ स्वत:पुरताच ही पथ्ये पाळली गेली असं नाही तर माझ्या संपूर्ण परिवाराला या मर्यादा घालून घ्याव्या लागल्या. तीन महत्त्वाची पथ्ये आम्ही पाळली. एक उद्दिष्ट ठेवलं, विशिष्ट ध्येय ठेवून आयुष्याची वाटचाल सुरू आहे. हृदयात प्रेरणा आहे, मनात उमेद आहे. दुसरी बाब समृद्धीकडे साधनेच्या रूपानं पाहिलं. पैशांचा साधन म्हणून उपयोग केला आणि तिसरी बाब मन पारदर्शक ठेवलं. व्यापक ठेवलं. स्वत: इतकच इतरांनाही महत्त्वाचं मानलं. पारदर्शकता आणि प्रामाणिकतेच्या बळावर माझी वाटचाल सुकर झाली.

ज्या वेळी आपण उदार मनानं कुणाला काही गिफ्ट म्हणून देतो, तेव्हा परतफेडीची अपेक्षा नको, कारण गिफ्ट बाय डेफीनेशन गीव्ह नो राइटस् टू ऑब्लिगेशन. तुम्ही मला एखादी वस्तू गिफ्ट दिली आणि त्यानंतर मी तुमचे अडलेले एखादे काम करून द्यावे अशी अपेक्षा तुम्ही व्यक्त केली तर त्याला गिफ्ट म्हणता येईल का? इत:पर तो व्यवहार ठरेल! आपण एकमेकांशी असे वागत राहिलो, तर त्यात सद्‌हेतू कुठे आहे? त्यात स्वार्थ आहे, एक्स्चेंज आहे.

माझ्या काही मित्रांचा यासंदर्भातला अनुभव सांगतो. मी माझ्या मित्रांना म्हणालो, ''माझ्याकडून जर तुम्ही काही रक्कम घेतली तर लोनवर मी व्याज घेणार नाही'', माझ्या या आगळ्यावेगळ्या नियमांचे स्वागत होईल असेच मला वाटले; पण झाले भलतेच! काही मित्र म्हणाले, ''व्याज घेणार नाही, याला काही व्यवहार म्हणत नाही, तुम्ही जरा व्यवहारी व्हा!'' हे एक टोक मला परवडले असते. कदाचित; पण काही मित्रांनी तर कमालच केली. त्यांनी काय केलं असेल? घेतलेल्या रकमेच्या

परतफेडीचे नावच काढले नाही! (हशा...) पण या मित्रांच्या एका सज्जनतेचं मी जाहीर कौतुक करतो, त्यांनी त्यानंतर पैसेही मागितले नाहीत, हे केवढं मोठं औदार्य त्यांच्या मनाचं! (हशा...)

गंमतीचा भाग जाऊ द्या. माझे आणि त्यांचे संबंध कायमचे सुसंवादी राहिले, त्यात कोणतीही बाधा आली नाही. त्या पैशांपेक्षा मी या दुसऱ्या गोष्टीला जास्त महत्त्व देतो. सहकाऱ्यांच्या बाबतीतला माझा एक वेगळा दृष्टिकोन पाहा. कंपनीच्या चालकांना वाटत असते. आपण याला नोकरी दिली, त्याला नोकरी दिली. आपल्यामुळे त्यांचे भले झाले. असा विचार या चालकांच्या मनात येत असतात. काहींच्या वर्तनातूनही ते व्यक्त होत असतात; पण यादृष्टीने त्या सहकाऱ्यांकडे न पाहता, आपुलकीच्या जिव्हाळ्याने ओलाव्याने पाहिले तर, त्या सहकाऱ्यांचे आणि आपले संबंध घट्ट, खोलवर रुजतात.

संचालकांनी त्या त्या विषयातील लायक-जबाबदार सहकाऱ्यांबद्दल याही दृष्टीने विचार करावा. आपला हा सहकारी आपला एक मजबूत खांब आहे. आपल्याशिवाय त्याचे काहीही अडणार नाही, त्याला दीडशे-दोनशे, पाचशे रुपये रोज पडेल अशी नोकरी बाहेर उपलब्ध आहे. आपल्याला असा अनुभवी आपल्या कार्यपद्धतीत संस्कारित झालेला सहकारी मिळेल का? समजा एखादा नवीन उमेदवार घेतला, तर तो काय काय नखरे करेल हे कसे सांगणार? आणि हा अंदाज तरी कसा करायचा की जो नवीन सहकारी येईल तो या जुन्यापेक्षा निश्चितच सरस असेल? अशा विविध कोनातून सहकाऱ्याचा विचार करावा. त्याला आपल्या एकूण रचनेतला वेगळा घटक न मानता, आपल्या कार्यसंस्कृतीतला एक महत्त्वपूर्ण घटक म्हणूनच त्याच्याकडे व्यापक दृष्टीने पाहावे.

सहकाऱ्यांकडे असे पाहण्याचे शिक्षण समाजाकडे पाहण्याचीही समज देते. जळगावच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रमांचे पाहा. राज्यस्तरीय असो वा देशपातळीवर वा आंतरराष्ट्रीय पातळीवर जैन इरिगेशनचा सहभाग आवश्यक आहे असे आम्ही मानतो. हे झाले चांगल्या घटनांचे. काही भयानक घटनाही घडतात. उदा. आग लागली असेल, तर जीवन मरणाचे प्रश्न निर्माण होतात. महापालिकेकडील अग्निशामक गाड्या, आमच्या कंपनीच्या अग्निशामक गाड्या अशा वेळी एकत्रितपणे आग आटोक्यात आणू शकतात. 'आमच्या कंपनीचे बंब

मिळणार नाहीत,' ही भूमिका मानवतावादी नाही. समजा दुर्दैवाने हीच घटना फॅक्टरी घडली, तर महापालिकेने हाच विचार करायचा का? 'हे शहर माझे आहे, इथले बंधू-भगिनी माझे आहेत, हा देश माझा आहे.' हे फक्त प्रतिज्ञा म्हणण्यापुरताच मर्यादित ठेवायचे का? इथे राहून न्यूयॉर्कच्या मायाजाळात गुरफटलेल्यांना ही बांधिलकी येणार तरी कोठून?

१९६४-६५ ची एक सत्य घटना. मी दुकानाच्या काउन्टरवर बसलो होतो. एक विद्यार्थी माझ्याकडे आला. त्याचे अगदी जवळचे नातेवाईक आमच्याकडे मोठ्या अधिकार पदावर होते. खरं तर तो विद्यार्थी या अधिकाऱ्याची मदत घेऊ शकला असता, त्याने तसा प्रयत्नही केला होता; पण त्या अधिकाऱ्याने त्याला नाराज केले होते. शेवटी तो फार मोठी उमेद घेऊन माझ्याकडे आला. सोलापूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याकरिता त्याला १०,००० रुपये कमी पडत होते. एक शेवटचा प्रयत्न म्हणून तो माझ्याकडे आला होता. दुपारचे दोन वाजले होते. मी जेवणासाठी घरी निघणारच होतो. त्याची समस्या मी शांतपणे ऐकून घेतली. मी त्याला एवढंच म्हणालो, तू चार वाजता माझ्याकडे ये. मी घरी न जाता माझे स्नेही रायसोनी वकील यांच्याकडे गेलो. 'मला १०,००० रुपये उसनवार द्या' मागणी केली. व्याजाने रक्कम मिळाली. दुपारी चार वाजता तो विद्यार्थी आला... आज तो विद्यार्थी स्वत: तर डॉक्टर आहेच. शिवाय, एका प्रख्यात डॉक्टरचा बाप आहे! (टाळ्या...)

आनंदाची बाब म्हणजे त्या परिवाराने त्या १०,००० रुपयांची आठवण ठेवून कृतज्ञतेने मला दवाखान्याच्या उद्घाटनासाठी बोलावलं. मी त्यांना वाकोदला प्रॅक्टिस सुरू करण्याचा सल्ला दिला. रीतसर त्यांनी जेवढा पगार मागितला तेवढा पगार दिला. ''तू फुकट हे काम कर'' हे मी अधिकारवाणीने सांगू शकलो असतो, त्याला तसे करावे लागले असते; पण मी तसे केले नाही. मी तसा नकारात्मक अधिकार गाजवला नाही, एक महत्त्वाचं कारण म्हणजे अशा प्रकारे वागण्यासाठी जी एक वेगळी हुशारी लागते ती आमच्यासारख्या माणसांजवळ नसते. केलेली मदत, केलेले सहकार्य पटकन विसरता यायला हवं.

चांगल्या संबंधांचा पायाच तो आहे, की आपल्यासाठी कुणी काही चांगलं पेरलं असेल, ते कधीच विसरायचं नाही आणि आपण कुणासाठी काही केलं असेल तर ते कधीच लक्षात ठेवायचं नाही. (टाळ्या...) १९६२ चे एक उदाहरण देतो.

बँकेत माझ्या खात्यावर ७,५०० हजाराचा चेक जमा होणार होता. सात हजारापर्यंत रक्कम मी त्या खात्यात टाकली होती. पण पाचशे रुपयांसाठी तो चेक परत जाणार होता. तो चेक त्या दिवशी बाउन्स झाला असता तर आज जैन इरिगेशनचा इतिहास वेगळाच राहिला असता.

घरगुती गॅस एजन्सीच्या डिपॉझिटसाठीचा तो चेक होता. माझ्या विषयीच्या एका वेगळ्याच विश्वासापोटी बँकेच्या एका सद्गृहस्थाने स्वत: पाचशे रुपये माझ्या खात्यात भरले, आलेला चेक अर्थातच पास झाला. कॅशिअरने चेक योग्य वेळी मॅनेज केला. त्या सद्गृहस्थाने मला फक्त एवढंच सांगितलं, तुम्ही लवकर पैसे खात्यात जमा करा, नाही तर अडचणीत याल. मी त्या मुस्लीम गृहस्थाला म्हणालो होतो, ''मी एवढी रक्कम गोळा करण्यासाठी खूप वणवण भटकलो आहे, तात्पुरता तुम्ही ५०० रुपये भरून टाका, तुमचे पैसे मी प्रामाणिकपणे परत करेल.'' या माणसाने मला पाचशे रुपयांची वेळच्या वेळी मदत व्हावी म्हणून काय करावं? गावात जाऊन दोन-दोनशे रुपये दोन ठिकाणाहून आणि शंभर रुपये आणखी एका ठिकाणाहून गोळा करून मला आणून दिले.

असे ऋण जन्मात तरी फेडता येण्यासारखे आहेत का? त्याने पुढे आणखी सहकार्य केलं. माझ्या रॉकेलच्या व्यवसायात मला खूपदा रक्कम भरताना उशिराने भरण्याची सवलत दिली. तो माणूस रिटायर्ड झाला. ४-६ महिन्यांनंतर ५०० रुपये दरमहा असे पेन्शन मी त्याच्यासाठी सुरू केले. या सद्गृहस्थाच्या मरणानंतर त्याच्या पत्नीकरिता दरमहा ७०० रुपये पेन्शन करून दिले. एक उर्दू कॉलेज उघडणार होते. त्यांना काही रक्कम कमी पडत होती. आम्ही त्यांना सात-साडेसात लाख रुपये देऊन त्या कॉलेजला नूर महंमद चाचा असे त्या सद्गृहस्थाचे नाव द्यायला सांगितले. तरीही मी हेच म्हणेन, की त्या पाचशे रुपयांची किंमत या साडेसात लाखांत होऊच शकत नाही! (प्रचंड टाळ्या...)

मी त्या कॅशिअरलाही विसरलो नाही. तो कॅशिअर वारल्यानंतर चार-पाच वर्षांनी त्याचा मुलगा डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल्स होऊन मला भेटायला आला. त्याला मी लगेच कंपनीत रुजू करून घेतले. तो मुलगा आज ऑफिसरचं काम करतो. चांगलं काम करतो आहे. या मुलासंदर्भातली योगायोगाने एक बाब आठवली म्हणून सांगतो. मी त्याला चेन्नईला कंपनीच्याच कामासाठी बढतीवर पाठवला होता.

तो तिथे गेलाही.

दोन महिन्यांनी परत आला, म्हणायला लागला, ‘‘पत्नी नाही म्हणते, तिला तिकडे एकटेपणा जाणवतो, भाषेची अडचण येते’’, तो जळगावी परतला. पूर्वीसारखा उत्साह त्याच्यात जाणवेना. उदासीन दिसायचा. मी त्याला सहज बोलावून घेतले, विचारले ‘‘तुला मुलंबाळं किती आहेत रे?’’ तो म्हणाला, ‘‘मला मुलंबाळं नाही.’’ मी म्हणालो, ‘‘का?’’, तो म्हणाला, ‘‘माझ्या लग्नाला १० वर्षे झाली; पण अजून काही नाही.’’ त्याच्या उदासीनतेचं कारण माझ्या लक्षात आलं. मूलबाळ होण्याबाबतच्या आशा-आकांक्षाच त्यानं सोडल्या होत्या.

मी त्याला म्हटलं, ‘‘तू असं कर मुंबईला जा. माझ्या मुलाने जिथे ट्रिटमेंट घेतली तिथे तू जा’’. आनंदाची बाब म्हणजे त्याच्याकडची गोड बातमी आहे! (हशा... ) It is only on such basis that relationship can be maintained; can be greased, can be lubricated and can remain very healthy. It is just not possible to have any other formula.

आयुष्यात ज्याची जागा त्यालाच असते. ज्याचा सन्मान त्यालाच असतो. आईचे मानाचे पाट आईला, पत्नीचे पत्नीला. भावाचे भावाला! साल्याला भावाचे पाट देऊन जमणार तरी कसे? पत्नी, शालक हे महत्त्वाचे नाही का? आहेतच; पण त्यांचे स्थान वेगळे, आईचे, भावाचे निराळे. हे समजून-उमजूनच वागायला हवे. मला सहकाऱ्यांबद्दलही अनेकदा विचारले जाते. ‘‘जळगावसारख्या ठिकाणी तुम्हाला चांगली माणसे कशी मिळतात हो? आपण एवढे आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवसाय करतात. ६०० कोटी रुपयांचा एक्सपोर्ट करतात, ३००० कोटींचा तुमचा टर्नओव्हर आहे. तुम्हाला असे सहकारी मिळतात तरी कसे?’’

सहकारी निवडताना आम्ही पाहिलं प्राधान्य दिलं जळगावला. खानदेशातलं कुणी बाहेरच्या राज्यात, देशाबाहेर गेला असेल, तर त्यालाही आम्ही परत बोलावतो. एक जाहिरातच या संदर्भात दिली होती. टाइम्स ऑफ इंडियामध्ये. ही जाहिरात मराठी भाषेतली पहिल्या पानावर छापून आली. ‘खानदेशी एन.आर.आय. हो परत या’, या जाहिरातीला योग्य प्रतिसाद मिळालाही. ग्लोबल लेव्हलला गेल्यावर परदेशातल्या विशेषत: अमेरिकेतल्या भारतीयांनाच पुन्हा मायदेशात परतण्याचे आव्हान करण्याचा संकल्प मनात आहे. (प्रचंड टाळ्या...)

मी खूप माणसं जोडली, आयुष्यभर जोडतच राहिलो. अनेक माणसे इथे

आलीत, घडलीत, प्रशिक्षित झाली. इथल्या कार्यसंस्कृतीशी इतकी एकरूप झाली की, स्वत:चं वेगळेपण ती केव्हाच विसरलीत! अनुभूतीच्या पीआरओची गोष्ट. अनुभूतीचे शिक्षक कुणी तमिळनाडूकडचा आहे, तर कुणी कर्नाटक तर कुणी आंध्र तर कुणी बंगालचा, त्यांना इथली निसर्गरम्य स्थळे माहीत नव्हती. ते कुलकर्णीला म्हणाले, ‘‘तुम्ही आमच्याबरोबर पालला चला, तिथे फॉरेस्ट आहे असं म्हणतात, तुम्ही सोबत असले म्हणजे बरं होईल!’’ कुलकर्णी म्हणाला, ‘‘मी शाळा सोडून कुठंच जाऊ शकणार नाही, शाळा सांभाळणं हे माझं पहिलं काम आहे! तुम्हाला सहलीला जायचं असल्यास अवश्य जा!’’ They feel insecure without him.

मला या कुलकर्णीविषयी जितकी खात्री आहे, तितकीच माझ्या ड्रायव्हरविषयी आहे. He will exactly do what is required, in place of Kulkarni. I can give this in writting to you, even about my driver, because he is highly motivated. भले त्या ड्रायव्हरची समज कमी-जास्त असू शकते. परप्रांतातून आलेल्या त्या शिक्षकांची भाषा, त्यांना काय हवं-नको ते त्याला समजायला कदाचित दोन-चार मिनिटे उशीरही लागेल; पण एकदा समजल्यावर तो तत्परतेने ते पुरवेल. तेवढ्याच तत्परतेने कुलकर्णी करेल, यात वादच नाही. This is the most outstanding feature of this organization; getting done outstanding work from ordinary people, extra-ordinary work from ordinary people and making them, building them here.

मला पुणेकर उद्योजकांनी अशाच एका कार्यक्रमात काही प्रश्न विचारले होते. त्यातला एक प्रश्न त्यांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा असा होता. त्यांचं म्हणणं असं होतं, की ‘‘भाऊ, तुम्हाला तुमच्या कार्यपद्धतीनुसार काम करणारी आणि नुसतंच कामासाठी काम नाही, तर निष्ठेने कठोर-परिश्रम करणारी एवढी प्रामाणिक माणसं मिळतात तरी कशी? आमच्या पुण्यात अशी माणसं मिळत नाहीत असं नाही. मिळतात; पण टिकत नाहीत.’’ मी त्यांना म्हणालो, ‘‘हा पुणे शहराचा प्रभाव आहे! (हशा...)

पुण्यात एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भ्रमंतीत हरवून जातात अनेक माणसं ...जळगावात काय माणसं साधी आहेत; पण ती काम मात्र असाधारण करतात. (टाळ्या...) आता चांगली माणसं जळगावात कामात गुंतून राहिल्यावर पुण्यात ती

येणार कोठून? (हशा...) पुण्यात माणसे मिळणार नाहीत का? मिळतील ना; पण अशी साधी-सरळ नाही. खूपच हुशार! (हशा....) कंपनीचं काहीही हो, आपला खिसा आधी भरला पाहिजे, ठरलेल्या तारखेला पगार झालाच पाहिजे. कायम स्वकेंद्रित गणितात गुरफटलेली अशी खूपच हुशार माणसं पुण्यात जरूर मिळतील!''

माझ्या या साधकबाधक उत्तरावर त्यांच्या प्रतिक्रिया ऐकण्यासारख्या होत्या. त्यातील एक म्हणाला, ''भाऊ, तुम्ही बोलता बोलता चपराकच दिली आम्हाला?'' मी म्हटलं, ''नाही मित्रा माझा तसा काही उद्देश नव्हता''. तुम्हाला तसं वाटलं असेल, तर सॉरी, (हशा आणि टाळ्या...) एवढं सगळं पुणेकरी कथानक डोंबिवलीकरांना सांगण्याचं कारण काय? माणसं घडवावी लागतात, नाती सांभाळावी लागतात तेव्हा हा एकजिनसीपणा, एकात्मता निर्माण होते. बांधिलकी ही आभाळातून पडणारी गोष्ट नाही. इतर सर्व वाद टोकाचे आहेत. भावनावाद समतोल आहे. त्याचा आधार घेत घेत पुढे जाऊ या. डोक्याचा वापर कमी करा. हृदयाचा जास्त करा! (टाळ्या...)

संवेदनशीलतेमुळे व्यावसायिक आयुष्यातीलच नव्हे; तर खासगी आयुष्यातीलही निम्म्याच्या वर प्रश्न सुटतील. माणसांच्या आशा-आकांक्षांचीच लांबी-रुंदी विस्तीर्ण असून चालत नाही, माणसाचं हृदयसुद्धा मोठं हवं! (टाळ्या...) फार मोठं टारगेट ॲचीव्ह करायचं, असं सतत घोकणारी माणसंही मी पाहिली आहेत, वर्तमानपत्रातून त्यांच्याविषयी वाचायलाही मिळतं. दाऊदचे उदाहरण पाहू. दाऊद जे करतो आहे ते मोठंच काम करतो आहे, त्याच्या दृष्टीने विध्वंस हेच त्याचं टारगेट आहे.

निरपराध लोकांचीही कत्तल होते. त्याच्या दृष्टीने या गोष्टी म्हणजे क्षुल्लक बाबी. फार मोठं असं भव्यदिव्य करून दाखवण्याची जिद्द जरूर असावी; पण आपण जे काम हाती घेतलं आहे, ते समाजविधायक आहे की विघातक, याचं भान मात्र सतत ठेवावं. आयुष्यात केवळ नफेखोरीचाच विचार करणारी माणसं टोकाची विधानं करताना दिसतात. ''आम्ही टॅक्स भरतो ना, मग इतर गोष्टींची पर्वा न करण्याची आम्हाला काय आवश्यकता? सामाजिक कामाच्या भानगडी आमच्या मागे लावू नका.'' मन मोठे नसेल, तर खऱ्या अर्थाने मोठे काम उभे राहणार तरी कसे?

**प्रश्न –** भाऊ, आपण पूर्वी प्रकाशित केलेल्या एका जाहिरातीसंदर्भात मला एक प्रश्न विचारावा वाटतो, की एवढा मोठा उद्योगसमूह आपल्या नेतृत्वशक्तीनुसार

आपण साकार केला; परंतु आयुष्यात काही घटना नकारात्मकही घडतात. अशा वेळीही आपण अतिशय सकारात्मक भूमिका घेऊन वृत्तपत्रात एक जाहिरात दिली होती, 'मी दु:खी आहे, मी आनंदी आहे, मला विश्वास आहे', त्या जाहिरातीसंदर्भात काही सांगता का?

**भाऊ –** आमच्यावर खूप कठीण अशी वेळी होती, आर्थिकदृष्ट्या आम्ही संक्रमणातून जात होतो. संकट खूप मोठं होतं. थोडक्यात तुम्हाला समजेल त्या भाषेत सांगतो, की साधारणत: आमची उलाढाल साडेचारशे कोटींवरून अडीचशे कोटींवर आली होती आणि व्याज आणि मुद्दल हे मिळून साडेचारशे कोटी आम्हाला देणे होते.

अडीचशे कोटींचा धंदा आणि साडेचारशे कोटींचे देणे होते. आता ही कंपनी वर येईल असे तुम्हाला वाटते का? कोणत्याही समजदार माणसाला, ज्याला विशेषकरून फायनान्सचे ज्ञान आहे त्या सगळ्या लोकांनी ही कंपनी राइट ऑफ केली होती. माझे जवळचे मित्र त्यांनीसुद्धा, कारण त्यांना फायनान्स समजत होते. आमचे एक-एक लाख रुपयांचे चेक परत जात होते आणि एक-दोन नाही अनेक.

आम्ही इंटर कार्पोरेट डिपॉझिट (आय.सी.डी.) घेतले होते. कोणाकडून दोन लाख, कोणाकडून पाच लाख, कोणाकडून पन्नास लाख. आता हा प्रश्न सोडवावा कसा? माझा मुलगा हा सर्व व्यवहार पाहत होता, तो अमेरिकेला गेला होता, दोन महिने तो येणार नव्हता. किल्ला सांभाळण्याचे काम माझ्याकडे ओघाने आले.

मी मुंबईत ते पाहण्यासाठी जाऊन बसलो. तोपर्यंत मला या गोष्टींची कल्पना नव्हती, की आपण एवढ्या डीप वॉटरमध्ये आहोत, एवढे क्राईसेस आपल्याकडे आहेत. माझी सवय अशी आहे, की माझ्या कॅबीनमध्ये लोकांना बोलावण्याऐवजी मी त्यांच्या कॅबीनमध्ये जातो म्हणजे तिथे जास्तीच्या दोन खुर्च्या असतील तर मी त्याच्या खुर्चीत नाही बसत; पण त्याच्यासमोरच्या खुर्चीत जाऊन बसतो. तो काय ऑपरेट करतो आहे, कसा ऑपरेट करतो, कसे बोलतो वगैरे याचंही आपलं निरीक्षण होतं आणि त्याचा विषय काय चालला आहे, हेही कळते.

मी त्यासंबंधित व्यवहार बघणाऱ्या अधिकाऱ्याच्याच समोर जाऊन बसलो तर त्याची धावपळ सुरू होती. त्याच्या टेबलवर दोन फोन होते, ज्याचे पैसे देणे होते. तो पैसे मागत होता आणि हा दुसऱ्याकडून पैसे घेत होता. म्हणजे याची टोपी त्याच्या

डोक्यावर अशा पद्धतीने ते चालत होते. मी त्याच्याशी बोलायला सुरवात केली, विचारले, की ''तुला आय. सी. डी. चे आधी कोणत्या व्याजदराने पैसे मिळत होते.'', तो म्हणाला, की ''दीड वर्षापूर्वी आपण १२ टक्क्यांनी सुरवात केली. नंतर पुढे पुढे वाढत वाढत आज २२ टक्क्यांनी घेतो आहे.''

मी त्याला म्हणालो, ''१२ टक्क्यांनी तू घेतले आणि ते पैसे २२ टक्क्यांचे घेऊन परत देणार आहे, तर हे तुझे कसे चालणार आहे. कारण, एवढा नफा आपल्याला नाही होत. आपला व्यवसाय एवढा जोरावर नाही तेव्हा आपण हे पैसे भरणार कसे? It is impossible that we will be able to pay this money. तोटाच एवढा आहे, की आपण मुद्दलमध्येच घाटा करतो आहे, असं करून, मग फायदा काय? मग कसे काय जमवायचे. तुला असे वाटते की, तू तुझी इज्जत सांभाळतो आहे. तुझी इज्जत तर आधीच गेलेली आहे''. तो म्हणाला ''कशी?'' लोक तर अजूनही पैसे देत आहेत ''होय, अजूनही देत आहेत, काय किंमतीत देत आहेत. १२ चे २२ मध्ये घेत आहेत''. याचा अर्थ रिस्क कॅपिटल म्हणून जास्तीतजास्त व्याज घेत आहे, त्यांनी तुला राइट ऑफच केले आहे. तुला असे वाटते, की त्यांना समजलेले नाही, त्यांना हे समजलेले आहे; पण ते व्याजच एवढं जास्ती होऊन जाणार आहे, की त्यातच त्याची मुद्दल पैसे वसूल होऊन जाणार आहेत. त्यामुळे ते म्हणतात, की बघू काय होते ते, चालू द्या; पण कंपनी तशी काही वाईट नाही, असा त्यांचा समज आहे म्हणून ते असं करतात. आपल्याला थांबले पाहिजे.''

मी असे म्हटल्याने त्याला घाम सुटला. तो म्हणाला, ''आपण जर थांबलो तर मार्केटमध्ये काय होईल?'' मी म्हटले ''तुला असे वाटते, की मार्केटमध्ये हे माहिती नाही. माझा असा विचार आहे, की ज्या दिवसापासून हे सुरू केले आहे, त्या दिवसापासून मार्केटमध्ये माहिती आहे, की तू त्रासात आहेस आणि म्हणून तुला आता चांगले चांगले लोक पैसे देत नसतील. सेकंड आणि थर्ड कॅटेगरीचे जे लोक असतील तेच तुला पैसे देत असतील.'' त्याच्यासमोर तो सगळा चित्रपट आला.

मी त्याला म्हटले की ''तू आता असे कर की, उद्यापासून आपल्याला आय. सी.डी.साठी पैसे घेणे बंद कर आणि जेवढे आय.सी.डी.वाले आहे त्यांना सांगायचे आहे, आमच्याजवळ तुम्हाला द्यायला पैसे आता नाहीत, आम्ही देणार आहोत

तुम्हाला पैसे, मी तुम्हाला उद्या येऊन भेटतो आणि प्रत्येकाला जाऊन प्रत्यक्ष भेट आणि तुझ्याकडून जो आवरला जाणार नसेल त्याला तू माझ्याकडे घेऊन ये आणि तो येणार नसेल, तर मी त्याच्या ऑफिसमध्ये यायला तयार आहे, त्याच्या घरी जाऊन भेटू आपल्याला कमीपणा वाटण्याचं काहीच कारण नाही. आपल्याला त्यांचे पैसे द्यायचे आहेत. हे तर निश्चित आहेच.''

धडाधड लोकांनी सेक्शन १३८ च्या केसेस केल्या. कारण, सगळ्यांना चेक दिलेले होते, तर आश्चर्य वाटेल तुम्हाला, की रेप्युटेशन कसे कामा येते. त्यातील ८२ लोकांपैकी फक्त सहा लोकांनी केसेस केल्या. ७६ लोकांनी केसेस नाही केल्या. ७६ लोकांपैकी सर्वांनी वन बाय वन येऊन री- निगोशिएट करून गेले, की तुम्ही इतक्या दिवसांत आम्हाला पैसे द्या, व्याज कमी द्या, शेवटचा हप्ता आम्ही व्याजाचा घेणारच नाही किंवा घेणारही नाही वगैरे असे सर्व करून ते सहा लोक मात्र गेले. त्यात एक सेंट्रल बँक होती. त्यांचे पाच कोटी रुपये होते. ती बँक असल्याने त्यांनी सांगितले की, ''हाय कोर्टात त्यांनी रीट पिटीशन केले, कंपनीची दिवाळखोरी, फॉर वायडिंग अप ऑफ जैन इरिगेशन''

वकिलांनी एक-दोन तारखा घेतल्यानंतर सांगितले, की पुढच्या वेळी आपण काही कारण देणार नसू तर कोर्ट डिक्री देईल किंवा लिक्वीडेशन ऑर्डर पास करील, तर मी वकिलांना सांगितले, की ''तुमचा काय प्रस्ताव आहे?'' ते म्हणाले, की ''आपण असं म्हणायला पाहिजे की, आपलं एवढं व्याज द्यायचे ठरलेले नव्हते यांनी आमच्याकडून जास्त व्याज लावले, आमचे असे ठरलेले होते की, जर आम्हाला शक्य झाले तर आम्ही देऊ, नाही तर हे आम्हाला रिजनेबल करून देतील; पण आता हे बदलून गेले, आता हे रिजनेबल करायचे नाही म्हणतात, यांची परिस्थिती नाजूक आहे म्हणून, असा काहीतरी डिसप्युट उभा केला पाहिजे'' असे वकील म्हणाले. तरच शक्य आहे, नाहीतर काही शक्य नाही.

मी म्हणालो, ''वकीलसाहेब, मी माझ्या आयुष्यात काही खोटे बोललो नाही आणि मला काही खोटं बोलायची इच्छा नाही'', त्यावर ते म्हणाले की, ''तुम्हाला कंपनी सोडावी लागेल.'' ''जे काय व्हायचे असेल ते होऊन जाईल. मी काही खोटे बोलणार नाही. I have taken his money, and I mean to pay that back. I need time. I don't have an ability to pay; I have a desire

to pay. I have an integrity to pay. परंतु खोटे बोलायचे नाही.'' ते मला म्हणाले की, "We have no case."

तो म्हणाला, ''तुम्ही दुसरा कोणीतरी वकील पाहून घ्या. हा वाईटपणा मी कशाला घेऊ''. म्हटलं, ''तसं नाही, काही मार्ग काढा ना!'' तो म्हणाला की, ''मार्ग काय काढणार? कायदा सरळ आहे की, तुम्ही जर पैसे देऊ शकत नसाल तर त्याला वाईडिंग ऑफ पिटीशन अलाऊ होईल. म्हटलं'' असे नाही साहेब'', ''एवढे सोपे थोडे आहे. तसे म्हटले तर याचे पाच कोटी द्यायचे आहेत. आपल्या यापैकी चारशे पन्नास द्यायचे आहेत, चारशे पन्नासपैकी तीनशे सत्तर कोटी बँकांचेच आहेत.

मी म्हटलं, बँकवाल्यांना सांगा ना तुम्ही शपथपत्र द्या की आमचे तीनशे सत्तर घ्यायचे आहेत, आम्ही काही वाईडिंगमध्ये जात नाही आणि हा पाच कोटीवाला वाईडिंगमध्ये जातो आहे. हा सिक्युअर्ड असला आणि आम्ही अनसिक्युअर्ड असलो, आम्ही सिक्युअर्ड आहोत, आय.सी.डी.वाला अनसेक्युअर्ड आहे, त्याच्याकडे काही सिक्युरिटी नाही. तर आम्हीच जर सिक्युरीटीवाले इथेच बसलेली आहोत''.

कोर्टाने त्यांना सांगितले, की ''तुम्ही अनसिक्युरड आहेत म्हणून तुम्हाला फिलींग होते आहे. हे जरी असले तरी science or philosophy of law आमच्या बाजूने आहे. त्यांनी आम्हाला जॉइन होऊन जावे. त्यांना असे जर वाटल असेल, तर आमचे तीनशे सत्तर आहेत, आम्ही ३७५ धरू. आम्ही त्यांनाही सिक्युरिटीमध्ये सामील करून घेऊ. जे काही व्हावयाचे असेल ते सर्वांना Proportionately वर मिळेल. रुपयाचा एकच आणा मिळायचा असेल समजा, तर ते सगळ्यांना मिळेल, त्यांनाही मिळेल. तर तो म्हणाला ''नाही-नाही I am not willing to do that, I want my money, and I have come under section १३८.''

सेंट्रल बँकेचा वकील म्हणाला. कोर्टाने आमच्या वकिलांना विचारले, की ''तुम्ही इतर बँकांचे शपथपत्र आणू शकता काय?'' आमचे वकील म्हणाले, ''होय'' आमच्या वकिलांना मी आधीच सांगून ठेवले होते की, शपथपत्र द्यायचे काम पडले तर आपण बँकेकडून तसे शपथपत्र देऊ. तर आय.सी.आय.सी.आय. बँकेला सर्व सांगितले, त्यांनी शपथपत्र दिले. कोर्टाने ते शपथपत्र वाचले की, We have full faith in the company and it's revival and as such, we don't find it necessary to proceed with the winding up petition. We oppose this

winding up petition.

वकिलांना आम्ही सांगितले, की ''तुम्ही या केसमध्ये युक्तीवाद करा की तीनशे सत्तर कोटीवाले नाही म्हणतात आणि तुम्ही पाच कोटीवाल्यांचे ऐकून हे करणार आहात का? इतरांवर हा अन्याय आहे.'' तर कोर्टाला तो युक्तिवाद पटला आणि कोर्टाने सेंट्रल बँकेला सांगितले, की You settle it outside the court; otherwise I am going to give the judgement in their favour. म्हणजे मी काही वाईंडिंग अपची ऑर्डर करणार नाही. तुम्ही आउटसाइड सेटलमेंट करा. तेव्हा सेंट्रल बँकेने सेटलमेंट केली आणि तो विषय संपला.

एवढ्या जीवघेण्या परिस्थितीतून आम्ही जात होतो. यांनी जे जाहिरातीविषयी सांगितले त्या वेळी माझी काही झोप उडाली नव्हती; परंतु मला मनापासून खूप दु:ख होते, की आपल्या कमिटमेंट, आपण सह्या केलेले चेक आपण ऑनर करू शकत नाही. वाईट तर वाटतेच, दु:ख वाटतेच! मी विचार करत होतो, की या दु:खाला हलकं कसं करावं. तर दु:खाला हलकं करण्यासाठी माझ्या मनात असा विचार आला की, जी काही वस्तु:स्थिती आहे ती सर्वांसमोर लेखी स्वरूपात मांडून टाकावी.

मी स्वत:च एक जाहिरात तयार केली, की I am sad. त्यात लिहिले होते, की आम्ही आमच्या शेअर होल्डरला लाभांश देऊ शकलो नाही, आमच्या सप्लायर्सला वेळेवर पैसे देऊ शकलो नाही, आमच्या क्रेडिटर्सला आम्ही दिलेल्या कमिटमेंट पाळू शकलो नाही आणि आज आम्हाला जेवढा कच्चा माल हवा आहे, तेवढा मालही आम्ही आमच्या कारखान्याला पुरवू शकत नाही. आमचा माल आम्ही वेळेवर आणि हवा तेवढा पुरवू शकत नाही, म्हणून आम्ही ग्राहकालासुद्धा अडचणीत आणत आहोत. याबद्दल मला अतिदु:ख आहे ग्राहक म्हणा, क्रेडिटर म्हणा किंवा सप्लायर्स म्हणा, तेव्हा अतिच दु:ख आहे.

I am happy. भोवताली विपरीत परिस्थिती असतानाही आम्ही फार चांगले काम केल्याबद्दल, आम्हाला जागतिक ॲवॉर्ड मिळाला आहे. भारत सरकारने नाही म्हणता म्हणता आम्हाला आता यावर्षी सात ॲवॉर्ड दिले. एक्सपोर्टमध्ये चांगले काम केले, सामाजिक क्षेत्रात चांगले काम केले. एक इंटरनॅशन ॲवॉर्ड मिळाला, नोबेल प्राइजच्या बरोबरीने – प्रतिष्ठेचा तो समजला जातो. एकीकडे सामाजिक हिताची, राष्ट्रहितैषी अशी कामे आहेत. दुसरीकडे मी तुम्हाला सांगितले, की आम्ही

सॅड आहोत, आम्ही असे करू शकत नाही.

जाहिरातीचा तिसरा भाग आहे, की I am confident. की, मला खात्री आहे, की आम्ही पूर्ववत यश प्राप्त करणार आहोत. सर्वांचे पैसे देणार आहोत. कारण, देण्याची नियत आहे आणि देण्याची क्षमता आज मात्र नाही; परंतु हे दिवस काही राहणार नाहीत. आम्ही प्रामाणिक असल्यामुळे आमची खात्री आहे. दोन गोष्टी आमच्याजवळ आहेत, आम्ही गुणवत्तेशी कधीच प्रतारणा केली नाही. प्रामाणिकपणा आम्ही सोडलेला नाही.

कठोर परिश्रम करण्यासाठीच आमचा जन्मच आहे असे आम्ही मानतो. त्यामुळे तो सोडायचा प्रश्नच नाही. या तीन गोष्टीवर आमची खात्री आहे, की आम्ही नव्या उमेदीने परत येऊ. कंपनीला पुन्हा चांगले दिवस येतील असा आत्मविश्वास त्यात व्यक्त केला. आमचे जाहिरात स्टार जे असतात त्यांनी एक सुंदर असे रेखाचित्र केले म्हणजे अर्ध्या पानाची जाहिरात होती ती त्यात एक रोपटे दाखवले होते, त्या रोपट्याखालची काही पानं कोमेजलेली होती. मधली दुसरी पानं जी आहेत, तीसुद्धा तशी कोमेजण्याच्या मार्गावर होती आणि त्यावर जे कोंब होता, त्या कोंबामधून नवीन फुलोरा येतो आहे असे दाखवले. त्याचे रेखाचित्र फार मार्मिक होतं, की असे हे होते आहे आणि यावर कळस म्हणून असे होते आहे.

ज्या ठिकाणी एक लाखाचा चेक न वटता परत जात होता त्या वेळी सतरा लाख रुपये खर्च करून 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये मी ही जाहिरात दिली होती. त्याआधी आमच्या घरात खूप वादंग होते. ही जाहिरात देण्याची गरज आहे का? आपली परिस्थिती वाईट आहे हे दुसऱ्यांना सांगून ते आपल्याला पैसे देणार आहेत का? आपण हे कशासाठी करायचं? परिस्थिती वाईट आहे हे सांगून आणखी जे देत आहेत तेही द्यायचे बंद करतील. परिस्थिती वाईट सांगून आज जो सप्लायर आपला आहे, तो थोडफार तरी देतो तोही देणे बंद करेल, म्हणजे सगळं बंद होऊन आपण संपूनच जाऊ वगैरे.

त्यावर खूप वादंग झालं, खूप लोकांनी विरोध केला, कंपनीतील लोकांनी विरोध केला. एवढेच काय सहकाऱ्यांनी सांगितले, की ''भाऊ तुम्ही हे काय करता. काही गरज नाही ना! लोकांना काय वाटायचं ते वाटू द्या. आपण स्वत:हून त्याची

कशाला कबुली द्यायची. ‘येरे बैला मार मला’ अशातला तो प्रकार होईल! मी त्यांना म्हटलं, की तुम्ही एक लक्षात घ्या, भाऊ जे जगतात ते काही जगासाठी जगत नाहीत. ते स्वत:साठी जगत आहेत. मी काही आजपर्यंत कोणाची नोकरी केली नाही, मी माझ्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीला जागूनच जगणार आहे.

माझी सद्‌सद्‌विवेकबुद्धी मला जागृत करायची आहे आणि मला याबद्दल काय वाटते हे मला जगाच्यासमोर मांडायचे आहे. मलाही दु:ख वाटते आहे, मला या गोष्टीचा आनंद आहे, मला या गोष्टीचा विश्वास आहे आणि हे असे घडणार आहे त्यामुळे I will remain committed. I will lessen my burden. आज माझ्यावर जे दु:खाचे बरडन झालेले आहे आणि मी खचतो आहे तर माझे खचणे बंद होईल. माझं जर खचणं बंद झाले तर तुम्ही सर्व वर याल. पण मीच जर खचून गेलो तर तुम्ही नक्कीच संपले हे समजून चला, म्हणून तुम्ही मला खचू देऊ नका मला जे योग्य वाटते ते करू द्या. जे व्हायचे असेल ते होऊ द्या.’’

जाहिरात आम्ही त्या वेळी दिली आणि कार्पोरेट जगतामध्ये खळबळ झाली. अजूनसुद्धा तुमच्यापैकी एक माणूस तरी असा आहे, की त्याला ती जाहिरात आठवते. किती वर्षे झाली याला, बारा वर्षे झाली. बारा वर्षांनंतर एका माणसाला तरी ती जाहिरात आठवते आहे. म्हणजे पाहा किती इम्पॅक्ट झाला होता त्या जाहिरातीचा!

लोकांना जे वाटले होते त्यापैकी काही झाले नाही, कोणी आम्हाला माल द्यायचा बंद केला नाही, जे देत होते ते देतच राहिले आणि जे देत नव्हते ते देतच नव्हते; परंतु काही ॲडव्हर्स झाले नाही, उलट सगळ्या लोकांनी आम्हाला हे सांगितले, की ही पहिली केस आहे, की हे पब्लिकली जाऊन हे मंजूर करता, की माझी चूक झाली आणि मला माफ करा. त्यात क्लीअरकट ॲपॉलॉजी मागितली होती. कारणे काही लिहिली नव्हती. हे असे का घडले वगैरे असे काहीही लिहिलेले नव्हते. त्याला अनेक कारणे आहे, एक्स्टरनल कारणे आहेत, सरकारचे असे झाले, बँकांचे असे झाले, यांनी आम्हाला मदत केली नाही. यातले काहीही नाही.

माझे हे चुकले आणि माझ्या एकट्यामुळे तुम्हाला त्रास झाला म्हणून मी तुमची माफी मागतो. The telling message was I am sorry that you have been put to inconvenience because of me. One man accepted the full

responsibility for the crisis. आणि सही केली होती, म्हणजे भवरलाल जैन, चेअरमन, जैन इरिगेशन असे म्हणून स्वाक्षरी करूनच ती जाहिरात दिली होती, परत हे कोणी म्हणायला नको, की कोणीतरी कॉपी लिहिलेली आहे, कोणीतरी जाहिरात दिलेली आहे वगैरे असे नाही.

This is an affidavit I am giving you, under my own signature. I will bounce back. कंपनीचा शेअर नऊ रुपये होता. एके काळी साडेतीनशे होता, नऊ रुपयांवर घसरला. एकेकाळी तो साडेसातशे झाला. आता तो परत तीनशे-सव्वातीनशेवर आहे, परंतु नऊ रुपयांवरून सातशे रुपयांवर गेला आणि माझी खात्री आहे की, मी हे जग सोडून जाण्याआधी तो नक्की हजार रुपयांच्या वर जाईल! (टाळ्या...) त्याचं कारण असे आहे, की आपण आपले हातचे असे काही राखतच नाही.

माझे जीवन हे एक उघडे पुस्तक आहे. पारदर्शकता, कार्पोरेट गव्हर्नन्स कम्बाईन्ड विथ सेल्फ कॉन्फीडन्स आणि प्रामाणिकपणा स्वत:च्या कॉन्शीयसशी प्रतारणा करू नका. बोलून मोकळे व्हा, सांगून मोकळे व्हा. जे सत्य असेल ते सांगा, काही फरक पडणार नाही. सहकार्य करतील नाही तर, नाही करणार! समजा जे करणार नाहीतच त्यांच्यापुढे गीता वाचली तरी काय फायदा? गाढवापुढे वाचली गीता रात्रीचा गोंधळ बरा होता! (हशा...)

आमच्याच जातीचा म्हणजे ओसवाल-जैन समाजातला मोठा समजला जाणारा एक माणूस पानपरागवाला मला भेटायला माझ्या ऑफिसमध्ये आला होता. त्याने आम्हाला तीन कोटी रुपये दिलेले होते. मला असे वाटले, की मी त्याच्याशी काहीतरी संवाद साधू शकेल. ''भवरलालजी मै ये सुनने को नही आया की, आपकी डिफीकल्टीज क्या है, मै यह जानने के लिए आया हूँ की, मेरा ब्याज कब मिलनेवाला है? ये पहिली बात और मुद्दल कब मिलनेवाला है, और क्या वो मिलनेवाला है? मिलनेवाला है या नही. मै तीनही सवाल का जवाब पुछने को आया हूँ मेरे को दुसरा कुछ भी लेनदेण नही है.''

मैने बोला की, ''तीन सवालों का जवाब तो साफ है, कोठारीजी, आज पैसा देने के लिए नही है, इसलिए मुद्दल कब दू ये बता नही सकता, देनेके लिये आज ब्याज भी नही इसलिए ब्याज भी कब दुंगा ये भी नही बता सकता, यदि

आप चाहते है तो आपको सब मार्ग खुले है, जो आप करना चाहते है आप कर सकते''. ''आप ऐसा कैसा बोल सकते है, ये क्या बोल रहे आप?'' ''आपको जो भाषा समझती है, उसी भाषा मे बोल रहा हूँ, यदि मेरी भाषा आप सुनना चाहते है, तो मेरी डिफीकल्टीज समझकर मेरे क्या प्लॅन्स है वो बता सकता हूँ, यदि आपको वो नही सुनना है तो चाय मंगाई हुई. चाय पी लिजीए, वो भी नही पिना है, तो कुछ ठंठा मंगाता हूँ'' पण तो शांत झाला नाही. कारण, त्याच्या मनात हे पक्क होतं, की पैसा हाच ईश्वर आहे.

मी त्याच्यासमोर गीता वाचण्यात काही अर्थ नव्हता. तो काही मला भेटायला आला नव्हता. तो त्याचा पैसा कुठे आहे, तो पाहायला आला होता. त्यानंतर त्याच्या मनात काय बदल पडला असेल, त्याने दावा वगैरे काही केला नाही. त्याने कदाचित दुसऱ्या ठिकाणी चेक केले असेल, माणसं चांगली आहेत वगैरे. माझ्या सहकाऱ्यांना मी देणेकऱ्यांबाबत बेसिक सेंट्रल मेसेज दिला होता, की We have no capaicity to pay but we have integrity to pay. Our reputation has been damaged but our character is intact. Therefore, we will pay but you but kindly bear with us. एवढंच बोलायचं. ही प्लेट जशी लावतो ना आपण, की यू आर ऑन होल्ड प्लीज वेट. तशी प्लेट वाजवायची तू दुसरे काहीच करू नकोस आणि ते तू कन्व्हीक्शनने बोलले पाहिजे. प्लेटसारखं बोलू नको. तू कन्व्हीक्शन दे. आमची माणसं चांगली आहे, आमचे चेअरमन चांगले आहेत, सगळे चांगले आहे, कंपनी चांगली आहे. आज नाही उद्या निश्चित परिस्थितीत बदल होणार आहे. फक्त वेळ द्या. अशा पद्धतीने पादर्शकता, प्रामाणिकपणा कायम ठेवून आमची कंपनी त्या भयानक वादळातून बाहेर पडली. मित्रांनो, या जाहिरातीने इतिहास निर्माण केला. उद्योगक्षेत्रातल्या अनेकांना १० वर्षांपूर्वीची ही जाहिरात अजूनही आठवते.

**प्रश्न** – भाऊ, आता सर्व ठिकाणी स्मॉल स्केल इंडस्ट्री आली आहे. आता जे ग्लोबल रेसेशन येऊ घातले आहे, असे थोडेफार जाणवायला लागले आहे, आम्हाला, अशा वेळी ॲक्चुअली काय करायला पाहिजे, की म्हणजे टिकाव धरता येईल. याविषयी आम्हाला मार्गदर्शन हवे आहे.

**भाऊ** – एक लक्षात घ्या, की पहिली गोष्ट आपल्याकडे ग्लोबल रेसेशन,

तसं त्या प्रमाणात येणार नाही, हे नक्की आहे. त्याचे कारण असे आहे, की जी टोटल ग्रोथ ट्रॅजेक्टरी आता आपली बसलेली आहे, त्यामध्ये आपण फार मोठ्या प्रमाणात आयात होणाऱ्या पदार्थांवर अवलंबून नाहीत. म्हणजे अजूनही आपली इकॉनॉमीबाहेरील जगाच्या इकॉनॉमीशी इंटिग्रेट झालेली नाही.

इतर काही देशांत जे झाले ते इकडेही तसे होईलच असे नाही. शेअर मार्केट भाग वेगळा आहे. किती लोकांना लागू आहे तो? तो साधारणत: दोन कोटी लोकांना लागू आहे किंवा ११० कोटी लोकांमध्ये फार तर पाच कोटी लोकांना लागू असेल, आणि त्यांना काही तशी उद्याच्या पोट भरण्याची फिकीर नाही. We should not worry too much as to what is happening in the stock market. इंडेक्स आणि सेन्सेक्स हे युसलेस आहे. त्याचे सोडा तुम्ही, ते आमच्यासारख्यांनाच लागू आहे.

बसल्या बसल्या असा विचार करायचा, की यामध्ये माझी वर्थ तीन हजार कोटी आहे, दीड झाली म्हणून आपण दु:खी झालो, तीन झाली म्हणून आपण सुखी झालो, ''अरे लेका, तू करायला काय गेला? तू आहे, तिथेच बसलेला आहेस, अन् तू कशाला विचार करतो की, दीड झाली, अन् तीन झाली. (हशा....)'' What nonsense? Why should people think like that? I just don't know. I just don't understand. Why they do go to share market? मला माझा एक शेअर विकायचा नाही, माझा शेअर घ्यायला माझ्याजवळ एकही पैसा नाही. जसे हे जागेवाले आहेत ना!

पाच लाखांचे पंधरा लाख, पंधरा लाखांचे तीस लाख, तशी माझी हालत आहे. माझाच शेअर आहे तो खूप वाढतो आहे आणि तो घ्यायलाच माझ्याजवळ पैसे नाहीत. त्यामुळे मला काय आकर्षण राहणार आहे? शेअरचे हजार रुपये झाले समजा, तरी मला विकायचा नाहीच ना! विकायचाच असेल तरी मी चॅरिटीसाठी विकेल, हेही तुम्हाला सांगतो. माझे शेअर जेव्हा मला विकायचे त्यावेळी मी ते अशाच ब्लॉकमध्ये विकेल, की हे पन्नास कोटी रुपये आले, म्हणजे पन्नास कोटी समाजाला अर्पण करायचे, संपला विषय.

जाण्याच्या आधी आपण आणखी सामाजिक ऋण फेडण्याच्या दृष्टीने करू तो भाग वेगळा, पण तोपर्यंत काही मला शेअर विकायचे नाही किंवा घ्यायचे नाही त्यामुळे कशाला त्या भानगडीत पडायचे? साधारणत: आपला जो विकासाचा दर आहे तो अपवाद वगळता कमी होण्याची शक्यता नाही. त्यामुळे मला असे वाटते,

की तुम्हाला ओव्हरऑल स्मॉल स्केलला फार मोठा झटका बसण्याची शक्यता नाही.

आता समजा तुम्ही एक्सपोर्ट ओरिएन्टेड असाल तर थोडाफार बसेल; परंतु तो थोडाफार डीमांड कमी झाल्यामुळे बसेल, आपले तसे नफ्याचे प्रमाण मात्र कमी होणार नाही कारण असे आहे की, तो माल इथेही विकण्यासारखा असेल, तर तो तुम्ही इथेही विकू शकाल. भारताचे नाणं रुपया पडून आहे त्यामुळे आत्ता तरी निर्यातीत सध्या बऱ्यापैकी नफा आहे आणि शासनालासुद्धा याबाबतीत काहीतरी करावेच लागणार आहे. कारण, त्यांचे एक्सपोर्ट जर कमी झाले तर त्यांचेही दिवाळे निघेल. तुमचे बरे चालेल, पण सरकारचे दिवाळे निघेल. कारण एक्स्पोर्ट जर झाले नाही, त्यांना जे कर्ज भरायचे आहे, ते डॉलरमध्ये भरावे लागते. मग ते कसे भरणार? त्यांचा ट्रेड डेफिसिट वाढतो आणि ते इमोर्टस्ही करीत आहेत, त्यामुळे ते दुप्पट होते.

तिसरी गोष्ट अशी आहे की, Small scale industry, still provides a large measure of employment, as compared to large scale industry. म्हणून जर परिणाम झाला तर लार्ज स्केल इंडस्ट्रीवर आधी होईल, त्यानंतर आपल्यावर होईल. नेहमी उलटे होते. यावेळी तसे होण्याची शक्यता कमी आहे. लार्ज स्केलवर जो स्मॉल स्केल अवलंबून आहे, तो मात्र It will definitely affect him. अशा वेळी काय करायचे? हा विषय आहे.

दोन गोष्टी आहेत, की एक तर आपल्याला प्रॉडक्ट शिफ्ट करता येत असेल, त्याच मशीनवर किंवा थोड्याफार लहान-मोठ्या मशीन्स समाविष्ट करून किंवा इकडे तिकडे करून, तर आपण डायव्हरसिफिकेशन करावे. माल दुसऱ्याला कोणाला जर देता येत असेल, तर तो देण्याचा प्रयत्न करावा. दुसरी गोष्ट अशी, की कोणतीही नवीन भांडवली गुंतवणूक उत्पादन सोडून, इतर क्षेत्रात करू नये. उदाहरणार्थ आपल्याला जर जागा कमी भावात मिळते आहे किंवा कमी व्याजदरावर कर्ज मिळते आहे किंवा घर बांधण्यासाठी सात-आठ टक्क्यांमध्ये मिळते आहे, अशा कामांसाठीसुद्धा आपण असलेला पैसा टाकू नये. अगदी मी तर म्हणेल की, आपल्याकडे जर एखादे लग्न कार्य असेल आणि ते सहा महिने पुढे ढकलणे शक्य असेल, तर ते पुढे ढकलावे.

आपल्या हातात रोख रक्कम असावी. आपल्याकडे कमीत कमी बँकेचे कर्ज

पाहिजे, जोपर्यंत बँकेचे व्याजाचे दर कमी होत नाही तोपर्यंत आणि ते दर आता कमी होतील. माझी अशी अपेक्षा आहे की, हे दर आणखी दोन टक्क्यांनी कमी होतील. म्हणजे अमेरिकेमध्ये Already they have come down to zero. In Japan they are at zero. म्हणजे आज युरोपमध्ये ते दोन टक्क्यांवर आहेत. अजून आपण खूप जास्ती आहोत, म्हणजे आता जर इन्फ्लेएशन जर सहा टक्के आहे, तर जास्तीतजास्त आठ टक्क्यांच्यावर व्याज नको असा सर्वसाधारणपणे अर्थशास्त्राचा नियम आहे, पण आपल्याकडे अर्थशास्त्र चालतच नाही. आपल्याकडे दुसरेच शास्त्र चालते. म्हणजे राजकारण चालते.

तुम्हाला एक गंमतीदार गोष्ट सांगतो की, या देशात कोणते अ‍ॅक्ट चालू आहेत? किंवा चालतात. मला एका वकिलाने सांगितले, की ''हमने तो ऐसा देखा है की, इस देशमे सिर्फ दो अ‍ॅक्ट चालू है.'' मैने पुछा, ''कौनसे भाई?'' एक तो ''मिन्नत अ‍ॅक्ट, चलता है।'' म्हणजे हाजी हाजी करायची. म्हणजे याच्या दाढीत हाल घाल, त्याच्या दाढीत घाल आणि कसेही करून पटवून आपले काम करून घ्यायचे. ''मिन्नत अ‍ॅक्ट चलता है, कोर्ट मे भी और बाहर समाज मे भी...'' असे त्यांनी सांगितले आणि ''दुसरा जो अ‍ॅक्ट चालतो तो रिश्वत अ‍ॅक्ट चालतो'', म्हणजे लोकांना पैसे खाऊ घाला आणि तुम्ही तुमची कामे करून घ्या, असे सामाजिक परिस्थितीबद्दल त्या विधिज्ञांचे भाष्य होते हे!

अशा परिस्थितीमध्ये आपण "Stay liquid stay cash" म्हणजेच जे काही परचेस डिसिजन आपण डीफर करू शकू ते आपण केले पाहिजे. अगदी ऑफिस फर्निचरपासून, तर सर्व गोष्टींच्या बाबत, तसे केल्यास काही विशेष फरक पडत नाही पाहायला गेलं तर, तिसरी गोष्ट की, कोणत्याही परिस्थितीत आपण आपल्या गुणवत्तेशी तडजोड करता कामा नये. ती फार वाईट वेळ असते त्यावेळी आपण स्वत:च सॉफ्ट टारगेट होतो.

मनाला असे अगदी वाटते, की पाच टक्क्यांच्या ऐवजी सात टक्के टाकले तर काही हरकत नाही फीलर किंवा थोडा फार ऐसा चलता है, हा जो उद्देश आपण जर ठेवला तर, आपला शेवट अटळ आहे असं समजा. आपण जाणारच! अगदी जाणार! परंतु आपण हे पथ्य जर सांभाळू शकलो आणि कसेही करून आपल्या ग्राहकाला पटवू शकलो, की ''माझा माल मी अशा अशा पद्धतीने बनवतो, मला

एवढ्या किंमतीत तो पडतो आणि मला तो एवढ्यात देतो आहे आणि तुला जर वाटत असेल, की एवढाही नफा मी घ्यायला नको, तर तोही देऊ नकासे; परंतु तू हा माल तर बघ, दुसरा कोणीतरी तुला कमी भावात देतो आहे म्हणून तो घेण्यापेक्षा, मी तुला आयुष्यभर देत आलो आहे आणि आजही देण्याची इच्छा आहे, पण माल खराब करून देण्याची इच्छा नाही, तेव्हा आपण तेवढे सांभाळून घ्यावे.''

मला असे वाटते, की १०० पैकी ८० लोक तुमचे ऐकतील. खरंच तुमचा माल चांगला असेल आणि ते पाळलं असेल ते पथ्य आत्तापर्यंत तर तर ही वेळ अशी आहे, की या वेळी तुम्ही शपथ घ्यावी, नव्या दमाने शपथ घ्यावी, की मी तेच पाळेल, मी ते तसंच ठेवील. गुणवत्तेशी मात्र आपण कधीही तडजोड करू नये एवढे नक्की आहे. माझ्या आयुष्यातील हा एक चौथा-पाचवा मंत्र आहे असे तुम्ही समजा, की गुणवत्तेशी तडजोड करायची नाही आणि ती मी शेपवटपर्यंत केली नाही आणि म्हणून माझा कस्टमर बेस उडला नाही.

माझे पुरवठादार दु:खी झाले, माझे शेअर होल्डर दु:खी झाले, माझे बँकर्स दु:खी झाले, माझे क्रेडिटर दुखी झाले; परंतु माझा ग्राहक दु:खी झाला नाही! त्याला माल मिळाला नाही म्हणून तो दु:खी झाला असेल; पण जो मिळाला, तो खराब कधीच मिळाला नाही, म्हणून त्यांनी माझ्या मालाची मागणी कायमच ठेवली. मी देऊ नाही शकलो नाही म्हणून त्याला वाईट वाटलं, त्याने मला शिव्या घातल्या, की एक महिना झाला तुम्ही आमचे पैसे घेऊन बसला, आम्हाला माल नाही दिला, पण ज्या दिवशी त्याला माल आला, त्यादिवशी त्याचे मन पुन्हा आमच्याविषयी चांगले झाले. तो विसरला.

गांधीजी म्हणाले होते बघा, Price is quickly forgotten; quality is ever remembered. म्हणून गुणवत्तेशी प्रतारणा करू नका आणि वर्कींग कॅपीटलबद्दल सतर्क राहा. वर्किंग कॅपिटल फार मोठ्या व्याजाने उभे करण्याचा प्रयत्न करू नका. पुरवठादारांकडून जेवढे क्रेडिटवर मिळाले तेवढेच घ्या. त्यातल्या त्यात आपला उद्योग कसा व्यवस्थित चालेल याचा विचार करा. वर्किंग कॅपीटलबद्दल फार सतर्कता वापरा. नवीन गुंतवणुकीबद्दल हात आवरता घ्यावा आणि क्वॉलिटीची प्रतारणा करू नका.

तीन गोष्टी जर या आपण पाळल्या, तर आपण फार मोठी उडी घेऊ शकू असे शक्य नाही तर तग धरून राहू. याचे कारण असे आहे, की जगात आज नवनवीन

भरारी वारे नाहीत. मग ते तुमच्याकडे कुठून येणार; परंतु आमच्यासारखा जो उद्योग आहे त्याला मात्र हे विशेष लागू नाही. पोट सर्वांनाच आहे, खाणेपिणे हे चालूच राहणार आहे. ती इनव्हालनटरी प्रोसेस आहे, म्हणजे तुम्ही इच्छा व्यक्त केली नाही तर तुम्हाला थोड्या वेळाने भूक लागणारच आहे. प्रत्येक उद्योग-व्यवसायाला मात्र ते लागू नाही. शेतीला या बाबी लागू नाहीत.

**प्रश्न –** सरासरी बाहेर लोक म्हणतात, की शेती परवडत नाही. कारण, ते छोटे शेतकरी आहेत म्हणून पण त्यांचे मत तर इथे वेगळेच असते.

**भाऊ –** शेती जर कोरडवाहू असेल, तर ती परवडत नाही, ही वस्तु:स्थिती आहे. जर तुमच्याजवळ पाणी असेल आणि तुम्ही नवीन शास्त्राचा आणि तंत्राचा उपयोग करणार असाल, तर ती तुम्हाला परवडेल, तुमची स्वत:ची आहे म्हणून ती तुम्हाला परवडेल, तुम्ही स्वत: त्यात काम करणार असाल तर ती तुम्हाला परवडेल. आमच्यासारखी अशी तुम्हाला शेती करायची असेल त्या बंजर जमिनीचे कन्व्हरजन तसेच ट्रान्सफॉरमॅशन करायचे असेल तर हा प्रकल्प जवळजवळ बारा वर्षांचा आहे.

बारा वर्षांनंतर ब्रेक इव्हन येतो, त्यानंतर तुम्हाला पैसे मिळायला सुरवात होते, महत्त्वाचा विषय याचबरोबर हाही आहे, की ५५०० रुपयांमध्ये घेतलेली जमीन आज २५ लाख रुपये एकरामध्ये जाते ना! जर तुम्हाला विकायची असेल तर! जमिनीची व्हॅल्यू ॲडिशन आहे, ती जर तुम्ही गृहीत धरली तर ते प्रॉफिटेबलच आहे. जरी बारा वर्षांनी झाली, तर बारा वर्षांत काही एवढे झाले नसते. ५५०० रुपयांचे २५ लाख कसे झाले असते? तर यात जे ॲप्रिसिएशन आहे, त्या ॲप्रिसिएशनचा आर्थिक फायदा हा एक भाग आहे.

दुसरं क्रिएटिव्हिटीचा जो आनंद आहे तो तुम्हाला दुसऱ्या कोणत्याही व्यवसायात इतक्या मोठ्या प्रमाणात मिळू शकत नाही. कोणत्याही फॅक्टरीमध्ये मिळू शकत नाही. अगदी तुम्ही नवीन शोध लावला तरी ते मिळणे कठीण आहे. कारण, इथे रोजच नवीन शोध आहे, एका दाण्याला हजार दाणे येतात, यापेक्षा आणखी वेगळा शोध तो काय असणार! (टाळ्या...) रोजच तुम्हाला दिसते ते. त्यामुळे इथे जो क्रिएटिव्हिटीचा जो आनंद आहे, हा वेगळा आहे; परंतु इकॉनॉमिकलीसुद्धा ते व्हायेबल आहे, दहा-बारा वर्षे वाट पाहण्याचा संयम असेल आणि तुम्ही स्वत:

शेती करणार असाल तरच! आम्ही इथे पाणी निर्माण केले.

आमच्याजवळ काही पाटाचं पाणी आले नाही. आम्ही विचारपूर्वक त्याचं नियोजन करून, शास्त्र तंत्राचा उपयोग करून ते घडवून आणले आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे खरोखरच शेती फायदेशीर आहे का तर त्याचे उत्तर 'नाही' असेच आहे! ती कोरडवाहू असेल तर नाहीच नाही. ती बदलवायची असेल तर त्यासाठी भांडवलाची गरज आहे. भांडवल आहे इनपूट जर तुम्ही धरला, इकडूनतिकडून पाणी आणण्याचा प्रयत्न केला, छोटासा खड्डा करून पावसाचे पाणी एकत्र केले आणि एकाच्या ऐवजी दोन पिके घेतली किंवा मध्येच तुम्हाला सरव्हायवलचे पाणी देता आले तर तगू शकाल, दोन पैसे मिळू शकतील; पण त्यासाठी तुमच्या मनाची, भांडवलाची आणि रिस्क घेण्याचीही तयारी हवी.

व्यवसायात दहा टक्के रिस्क घेत असाल, तर शेती ही ९० टक्के रिस्क आहे आणि १० टक्के यश आहे, एवढा मोठा तो रिव्हर्स रेशो आहे म्हणून तर शेतकऱ्याला संस्कृतीचा पाया म्हणतात. (टाळ्या...) दोन गोष्टी आहेत पाणी आणि शेतकरी. सरस्वती असो किंवा कोणतीही नदी तिथेच मानवी वस्ती झालेली आहे. जिथे वस्ती झाली ती भरभराटीस आली तर तिथे ॲग्रीकल्चर आहे, म्हणूनच तिचे संगोपन आणि विस्तार झाला आहे. म्हणून त्याला पाया म्हटलेले आहे, त्याला दोन्ही पायाभूत गोष्टी असल्यामुळे त्या सोप्या नाहीत हे उघड आहे. शेतशिवारात जो आनंद आहे, तो विरळ आहे, असा आनंद समजून-उमजून घेण्यासाठी ध्येयवेडे लोकच हवेत.

धन्यवाद!





# ध्येय-उद्दिष्टे झाडाच्या बुंध्यासारखी घट्ट असावीत!

(१९६५च्या बी.ए.एम्.एस्.च्या सहपाठी डॉक्टरांनी जैन इरिगेशन कंपनीला भेट दिली, त्या वेळी त्यातील काही डॉक्टरांनी अनुभूती विद्यालयात भाऊंची घेतलेली मुलाखत.) - ०४.०१.२००९

*आयुष्याचे चक्र गतिमान ठेवणारी प्रेरणा आणि सत्त्व टिकवणारी ऊर्जा या दोन महत्त्वपूर्ण शक्तींचा अन्वयार्थ डॉ. भवरलालजी जैन यांनी या सुसंवादात उलगडून दाखवला आहे. स्वार्थ साधण्यासाठी जगाच्या बाजारात अनेकांची अहमहमिका चाललेली असते. तरीही अशा वातावरणात सुसंस्कृत माणसांनी मात्र 'देण्याची वृत्ती' जोपासणे का आवश्यक असते, याचा भावार्थ साध्या; परंतु सुंदर शब्दात या मुलाखतीत स्पष्ट केला आहे.*

*जीवनाचा खरा अर्थ समजावून घेतला पाहिजे. जगावर चांगल्या अर्थानेही राज्य करता येते, तसा आत्मविश्वास आणि तशी जिद्द मात्र हवी. संस्कारधन हेच खरे शाश्वत धन कसे, संवेदनशीलता खूप मोठे सकारात्मक परिवर्तन कसे घडवू शकते, भाऊ उद्योजकीय व्यस्ततेतही पुस्तकांच्या*

*जगात कसे वावरतात, या प्रश्नांची समर्पक उत्तरे जाणून घेण्यासाठी ही मुलाखत वाचायलाच हवी.*

**डॉक्टर –** भाऊ, नमस्कार

**भाऊ –** नमस्कार,

**प्रश्न –** भाऊ, आम्ही सर्व बी.ए.एम्.एस्.चे पासष्ट सालचे सहपाठी आहोत. आमच्या वैद्यकीय शिक्षणाच्या कालावधीत, साधारणत: १९६२ पासून आपल्या उद्योजकीय आयुष्याचा श्रीगणेशा झाला याची आम्हाला कल्पना आहे; आपण त्यानंतर आजपर्यंत प्राप्त केलेले देदीप्यमान सुयशही आम्हाला माहीत आहे; परंतु भाऊ, आपल्या कॉलेजविषयी आम्हाला माहीत नाही, त्याविषयी काही सांगाल का?

**भाऊ –** मी मुंबईच्या सिडनेहॅममध्ये पहिले दोन वर्षे, नंतरची दोन वर्षे पोतदार कॉलेजला कॉमर्सचे शिक्षण घेतले. माहिमच्या लॉ कॉलेजमध्ये कायद्याचे शिक्षण झाले. कॉलेजात असताना नियमितपणे अभ्यास आणि इंग्रजी भाषेसंदर्भात अधिकाधिक बहुश्रुत होण्याचा प्रयत्न त्या काळात केला. त्यानंतरच्या काळातील एकूणच सर्व परिश्रमाचा इतिहास सांगायचा म्हटला, तर त्यासाठी दोन-चार मिनिटे पुरेशी नाहीत. माझ्या आयुष्यभराच्या



वाटचालीचा वेध घेणारी काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात तुम्हाला हा इतिहास वाचता येईल, त्याचा अभ्यास करता येईल.

**प्रश्न** – भाऊ, आपले व्यक्तिमत्त्व असे आहे, की ज्यांची ज्यांची भेट होते, त्यांना प्रेरणा मिळते! पण ही प्रेरणेची, स्फूर्तीची ज्योत निरंतर तेवत ठेवण्यासाठी काही मार्गदर्शन द्या. म्हणजे ही स्फूर्ती कायम टिकू शकेल.

**भाऊ** – प्रेरणा, स्फूर्ती हे घटक आयुष्यात फार महत्त्वाचे आहेत. आयुष्याचे चक्र गतिमान ठेवण्याची विलक्षण शक्ती प्रेरणेत आहे! आयुष्याच्या विविध टप्प्यांवर, विविध प्रेरणा कार्यरत असताना आपल्याला दिसतात. ध्येय-उद्दिष्टे मात्र झाडाच्या बुंध्यासारखी घट्ट असावीत! (टाळ्या...) माझ्या आजच्या दिनक्रमाची प्रेरणा आहे नि:स्वार्थ सेवा! आपल्या मनात सहज एक विचार, आता हे ऐकता ऐकता डोकावून जाईल, की एवढी सर्व लक्ष्मी प्रसन्न असल्यामुळे भाऊ आता असे म्हणत असतील, सुरवातीपासून भाऊंना असे वाटत असेल का? वगैरे असे प्रश्न आपल्या मनात येतील आणि येतात, ते स्वाभाविक आहे. मला एक बाब स्पष्टपणे नमूद करायला आवडेल. मी मातृप्रेरणेने उद्योजकीय विश्वाकडे वळलो. तिच्या संस्काराचा धागाच एवढा बळकट होता की, मी एवढ्या आर्थिक उलाढालीच्या जगात वावरत असूनही मला 'देण्याची वृत्ती' असलेला माणूस म्हणूनच घडवला आहे. स्वत:साठी तर सारेच करतात, घर-दार, नातेवाईक त्यासोबत समाज केवळ समाजच नाही, तर वृक्ष-लता, प्राणी-पक्षी या सृष्टीशी एकरूप होण्याचा संस्कार त्या माउलीने दिला. मित्रांनो, आयुष्यात प्रेरणा जितकी महत्त्वाची तितकी ऊर्जाही! गतिमानतेसाठी प्रेरणा आहे, तर स्वत्त्व टिकवण्याची क्षमता उर्जेत आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कविवर्य विंदा करंदीकरांची कविता सर्वांना माहीत आहे.

देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे,
घेणाऱ्याने एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे!

'हात' घ्यावे म्हणजे आपणही, 'देण्याचा' संस्कार उचलावा. नि:स्वार्थ भावनेने केलेल्या सेवेतून शतपटीने आनंद अधिक मिळतो. त्यालाच मी ऊर्जा म्हणालो. वेळ, काळ, परिस्थितीनुरूप माणसाने योग्य निर्णय घेऊनच वाटचाल केली पाहिजे. आयुष्ययात्रेच्या या उत्तरार्धात भरीव अशा सामाजिक कार्यात जर मी स्वत:ला गुंतवून घेतले, तर उर्वरित आयुष्य नक्कीच स्वास्थ्यवर्धक आणि समाधानपूर्वक जगता

येईल. आपल्यावर समाजाचे निश्चितच ऋण आहेत. चांगल्या कुटुंबात जन्म होणे, परिवारही चांगला लाभणे, कामाची नीतीमत्ता जोपासणारे सहकारी मिळणे हा एक योगच आहे! यादृष्टीने विचार केला, तर आपले वेगळेपण निश्चितच उठून दिसते.

उद्योजकीय पर्वात अनेक चढउतार पाहिले, अनुभवले, अपयशाच्या उतारावर घसरू नये आणि यशाच्या शिखरावर पसरू नये! वेळोवेळी प्राप्त झालेल्या प्रत्येक क्षणाला, अनुभवाला मोठ्या धैर्याने सामोरे गेलो. आज व्याप प्रचंड वाढला आहे. अर्थात आपणा सर्वांना याची कल्पना आहेच. कंपनीची गुणात्मक आणि संख्यात्मक स्वरूपात होणारी वाढ प्रतिष्ठेची आहे; तशी आर्थिक समृद्धीचीही! हे सर्व मला मिळाले. हा जो सुव्यवस्थित दिनक्रम आहे, त्याचे श्रेय संपूर्ण जैन इरिगेशन कंपनीच्या स्थापनेपासून आतापर्यंत ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांना आहे.

सभोवताली जरा उघड्या डोळ्यांनी नजर टाका. दोन वेळच्या जेवणासाठी अनेकांना संघर्ष करावा लागतो. दारिद्र्याचे प्रश्न अतिशय भयानक आहेत. अशा वातावरणात एका अर्थाने, एक आर्थिक सुरक्षितताच आपल्याला लाभली आहे. जन्माला आलो, 'अ रे आईचा' म्हटला. जन्मदात्रीने सांभाळले. तसे मातीनेही जपले-जोपासले. पाण्याने जीवन झुळझुळत ठेवले. निसर्गाने सौंदर्य शिकवले तर, आभाळाने व्यापकतेचे भरभरून दर्शन दिले. समाजातल्या अनेक माणसांनी सहकार्याचा हात पुढे केला. हा निसर्ग, हा समाज या सर्वांशी माझे अतूट असे घट्ट नाते आहे.

'समाज' म्हटला म्हणजे नानाविध प्रकारच्या, स्वभावाच्या व्यक्ती त्यात आल्याच. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' हा भाग असणारच! परंतु प्रत्येकाने हे आत्मपरीक्षण केलेच पाहिजे की, 'मी समाजाकडून लहानपणापासून आजपर्यंत खूप काही घेतले, पण दिले काय?' जे जे शक्य असेल ते देत राहण्याची मनोवृत्ती घडत जाणे म्हणजे माणूस सुसंस्कारित होणे! 'शक्य होईल तेवढे' हे शब्द कृपया लक्षात ठेवा. आपण आत्ता ज्या परिसरात आहोत, त्याला डिव्हाइन पार्क म्हणतात. मला सांगायला आनंद वाटतो, की शिक्षणासाठी असणाऱ्या या जागेकरिता, इमारतीकरिता, ही सर्व रचना साकार करण्याकरिता आम्ही पन्नास कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. ज्याला शाळा काढायची आहे, त्या प्रत्येकानेच पन्नास कोटी खर्च केले पाहिजे, असे मुळीच नाही.

आपापल्या परिस्थितीचा विचार करूनच खर्च होणे आवश्यक आहे. आपल्याला नसेल एवढा खर्च झेपवत, तर प्रामाणिक शिक्षक व्हायचा प्रयत्न करून पाहायला काय

हरकत आहे? ज्याला जे जमते आणि करून दाखवण्याची संधी आहे, त्याने ते कर्तृत्व अवश्य करून दाखवावे. एखाद्या एन.जी. ओ. मध्येही आपल्याला सहभागी होता येईल. अनेक स्त्री-पुरुष महिला बचत गटाचे काम करतात. स्त्रियांना स्वावलंबनाचे धडे देऊन सक्षम करतात, असेही सत्कार्य हाती घेता येईल. आपल्या मदतीने, सहवासाने, विचारधारेमुळे इतरांच्या आयुष्याचे भले होत असेल, तर आपण ते अवश्य केलेच पाहिजे! नि:स्वार्थ सेवा हा अनमोल दागिना आहे! इतरांच्या आयुष्यात आपण कोणत्या ना कोणत्या प्रमाणात सकारात्मक परिवर्तन आणू शकलो, योग्य ती दिशा देऊन गतिमान करू शकलो, तर ते सार्थक आयुष्य!

नि:स्वार्थ विचारांनीसुद्धा आपण समृद्ध होऊ शकतो. मात्र या समृद्धीचा मूलभूत पाया सकारात्मक विचारांचा स्त्रोत हाच आहे! It is not what difference, I can make to myself but what difference I can make to others in their lives. अनेक लोक वाढत्या वयात, वाढत्या प्रश्नांचे जंजाळही मोठ्या प्रमाणात वाढवून घेतात. अनेक व्यथा-कथा त्यांना त्यामुळेच सतावत राहतात. वाट चुकलेल्या अशा प्रवाशांच्या आयुष्यात सुख-शांतीचा थांबा तरी कसा असणार? ‘हा काळच वाईट आहे, ‘ही आजकालची मुलेच अशी निघाली, जाऊ द्या  कलियुग आहे’, अशी नकारात्मक टिपणी करण्यातच त्यांचा वेळ जातो. सतत ‘नाही नाही’ चा धोशा माणसाला निराशेच्या खोल गर्तेत ओढत जातो. याउलट परिस्थिती असली तर? सकारात्मक विचारांनी आपले मन भरलेले असले तर? आपल्याला आणखी खूप चांगले काम करून दाखवायचे आहे, अशी भक्कम जिद्द असली, तर? इतरांच्या हसऱ्या चेहऱ्यात स्वत:चा आनंद शोधला तर? तर काय होऊ शकते? मित्रांनो, मी आपणासमोर ह्याच सकारात्मक विचारांमुळे उभा आहे! (प्रचंड टाळ्या...)

पाच हार्ट अटॅक, दोन बायपास, त्यानंतर एक एन्जोप्लास्टी झाल्यानंतर पेसमेकर बसविलेली भवरलाल जैन नावाची व्यक्ती तुम्हाला हे सांगते आहे, सकारात्मक विचार करा, तरच चांगले आयुष्य जगू शकाल! (टाळ्या...) माझी चारही मुले अतिशय जबाबदारीने कंपनीचे काम सांभाळत आहेत. कंपनीतील उच्च अधिकारी, इतरही सर्व सहकारी योग्य दिशेने कार्यरत आहेत. म्हणून मी आता शांतपणे बसून राहावे का? तसे होणे अजिबात शक्य नाही. कारण मी मघाशी सांगितली ती शक्ती, ती ऊर्जा माणसाला आयुष्यभर तेवत ठेवते. ही ऊर्जा कशी प्राप्त झाली. कुणी म्हणेल

हा अध्यात्माचा प्रसाद आहे, कुणी म्हणेल ही नशिबाची देणगी आहे, मी मात्र माझ्या मूळ वैचारिक अधिष्ठानाशी ठाम आहे, ही ऊर्जा आली कार्यसंस्कृतीतूनच आणि स्वत:ला कायम चांगल्याच कामातच गुंतवून ठेवणाऱ्या व्यस्त दैनंदिनीतून.

**प्रश्न** – भाऊ, आम्हाला सर्वांनाच एक गोष्ट जाणून घेण्याची खूपच उत्सुकता आहे, सर्वसाधारण माणूस ज्या रुळलेल्या वाटेने विसी-पंचविशीत जातात, तशी वाट सोडून, शेतीची कास आपण धरली हे कसे काय?

**भाऊ** – तुम्ही फार चांगला प्रश्न विचारला. सर्वसाधारणपणे काय असते, की स्वप्न पाहणे हा तर प्रत्येकाचा नैसर्गिक भाव आहे. स्वप्नांचा मागोवा घेत पुढे जाणे हे अनेकांचे रुटिन असते. माझ्या बाबतीत तसे झाले नाही. इतर माणसांपेक्षा मी स्वत:ला सर्वसाधारण माणूस समजतो. 'आऊटस्टँडिंग' वगैरे असा काही मी स्वत:विषयी गैरसमज करून घेतलेला नव्हता आणि नाही. मला मॅट्रिकमध्ये ५६ तर बी. कॉमलाही ५६-५७ एवढेच टक्के मिळाले. कायद्याचे शिक्षण घेतले, त्यातही तेवढेच टक्के प्राप्त झाले. यावरून लक्षात येतेच, की सुरवातीपासूनच एक सर्वसाधारण विद्यार्थी होतो. अफलातून, 'हुशार' असा विद्यार्थी नव्हतो. आई-वडिलांनी दिलेल्या संस्काराचा परिपाठ गिरवणे आणि नियमित अभ्यास करणे, हा कृतिपाठ मात्र मी आयुष्यभर सांभाळला, आजही सांभाळतो आहे.

'आपण इतरांपेक्षा कुणीतरी वेगळे आहोत.' असा अहम् जर मनात शिरला, तर हळूहळू त्या ताठ्यामुळे आपणाकडून अनेक लोक दुखावले जातात. निकोप संबंध जपण्यासाठी-जोपासण्यासाठी इतरांमधील एक राहणेच चांगले! आयुष्य हळूहळू गतिमान होत गेले. मी डोळसपणे प्रत्येक गोष्ट टिपत गेलो. डोळे उघडे ठेवून स्वप्न पहिलीत, केवळ एक दोनच पहिलीत असे नाही, स्वप्नांची मालिकाच पाहिली म्हणा! एकेक स्वप्न पूर्ण करण्याचा, प्रत्यक्ष साकार करण्याचा चंगच बांधला. साधन-संपत्ती वाढत गेली. उपलब्धतेनुसार स्वप्न आणि वास्तवाची चौकट ओळखली. हिंमत कधीही सोडली नाही. आपण बँकेत काही पैसा राखून ठेवला पाहिजे, एल.आय. सी. ची पॉलिसी काढली तरच सर्व सुरळित होईल, असे विचार कधीही मनाला शिवले नाही. आपण करून दाखवूच, ही जिद्द असल्यामुळे असुरक्षितता, दोलायमान स्थिती कधीच अनुभवली नाही.

**प्रश्न** – भाऊ, जैन इरिगेशन कंपनीचा हा वाढता व्याप-विस्तार आज प्रचंड

आहे. उद्योजकीय विश्वात पदार्पण करताना आपल्याला याची खात्री होती का? इतके सर्व शक्य होईल?

**भाऊ –** काही प्रश्नांचा शोध घ्यायचा असेल, तर आपल्याला उगमांकडे जावे लागेल, आरंभ जाणून घ्यावा लागेल! मी जामनेर तालुक्यातल्या वाकोद खेड्यातला! खेड्यातले जगणे, ग्रामीण भागात राहणे तो अनुभव कसा असतो याची आपल्यापैकी अनेकांना कल्पना आहे. सुरवातीची दहा वर्ष वाकोदलाच गेलीत. शिक्षण झाले. व्यावसायिक जीवनाचा दहा वर्षांचा अनुभव प्राप्त झाला. त्याच टप्प्यात एक दिवस, एक क्षण असा आला की, मी त्या दिवसातल्या वेगाबद्दल खूप विचार केला. जीवनाचा अर्थ फक्त धावण्यात आहे का? या प्रश्नाने मला अस्वस्थ केले. महात्मा गांधीजींचे एक कोटेशन प्रकाशाच्या लखलखीत रेषेसारखे चमकून गेले. 'There is more to life than speed'. 'जीवनाचा अर्थ केवळ धावणे नव्हे, तर त्याच्याही पलीकडे आहे'. अशा प्रखर शब्दांनी काही विचारशलाकांनी आपले आयुष्य उजळून जात असते.

आचार्य विनोबा भावेंचे एक वाक्य मला यासंदर्भात सांगावेसे वाटते, की 'पुस्तकात शब्द असतात, पण त्या शब्दांचा प्रत्यक्ष अर्थ मात्र आपल्या जीवनात असतो', शब्दांशी हे जिवंत नाते मी सुरवातीपासून सांधून आहे. म्हणूनच गांधीजींच्या त्या वाक्याने माझे आत्मपरीक्षण सुरू झाले. पूर्वी आपण साधा ऑर्डिनरी टेलिफोन कॉल लावायचो. आता अर्जंट कॉल लावायला लागलो. त्यानंतर ऑन डिमांड लावायला लागलो, नंतर लायटनींग कॉल लावायला लागलो. या आणि अशा वेगाला, बदलांना पूर्णविराम नसतो. व्यवसायाचेही असेच. व्यवसाय जिद्दीने, ध्यासाने केला, तर त्यात वाढ होणारच! हे सर्व म्हणजे आयुष्य का? आनंद, सौख्य, समाधान या नैसर्गिक स्त्रोताचे काय? असा विचार करून मी शेतीशी पुन्हा जोडला गेलो.

माझे मित्र कवी ना. धों. महानोर यांच्या शब्दात सांगायचे, तर मी तिच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो! कृषिसंस्कृतीत आनंद आहे, सृजन आहे, संवर्धन आहे. आई आणि भूमी यांच्यातील नवनिर्मितीचे समान तत्त्व वंदनीय आहे! आईला स्वत:च्या लेकरांकडे पाहताना आपण पहा किंवा हिरव्यागार पिकाला वाऱ्यावर डोलताना धरणीमातेला होणारा आनंद, संवेदनेने जाणून घ्या, असे पाहण्यात, असे जाणून घेण्यातच, माणसाचे माणूसपण आहे! (टाळ्या...) इतर रचनेचे कृत्रिम फॉर्म्युले

आहेत. चार विशिष्ट गोष्टींचे एकत्रीकरण म्हणजे ही निर्मिती नाही, हे सृजन नाही.

निर्मितीचा आनंद शेतीशी नात असले, तर अधिक उत्कटतेने अनुभवता येतो, असा माझा निष्कर्ष आहे. माझ्या वडिलांबरोबर मी चुलत्यांबरोबर शेतात गेलो होतो, ते दिवस आजही मला स्पष्ट आठवतात. १९७२ मध्ये पुन्हा खेड्यात गेलो. शेतीचे काम सुरू केले. नव्या पर्वाला प्रारंभ झाला. १९७२ ते १९७४ चा तो कालखंड. शेतीत राबता राबता सखोल अभ्यासही केला. विहिरी खोदल्या, खाली उतरलो. लोकांबरोबर राहिलो, स्वत:ही राबलो, एखादा अडकलेला दगड कसा काढायचा आणि पुढचे काम कसे सुकर करायचे, हे मी त्या लोकापासून शिकून इतरही लोकांना तिथे शिकवले, त्यांच्यातले खाचखळगे नंतर मी त्यांना सांगू लागलो.

शेतीच्या कामात शांतता ही पूर्व अट आहे. तिथे उतावीळपणा चालत नाही. घाई, गर्दी गोंधळ यांना तिथे वाव नाही. एक अनुभवच तुम्हाला सांगतो. एकदा ६ बाय ६ चा वाफा लावला. त्याला युरिया दिला. कुणीतरी सांगितले होते, की ''तुम्ही यूरिया टाकला, तर रोपे भराभर वाढतील, दोन टक्के युरिया घ्यायचा आणि पाण्यात टाकायचा.'' मी तो सल्ला अमलात आणला. चार दिवसांनी पाहिले तर रोपांनी चांगली जोमदार वाढ धरली होती. माझ्या मनात विचार आला, दोन टक्क्यांच्या ऐवजी, चार टक्के टाकले तर आणखी लवकर लवकर, रोपांची वाढ होईल. हाही विचार मी अंमलात आणला. तिसऱ्या दिवशी पाहतो, तर काय? रोपेच जळून गेलेली! (हशा...) शेतकऱ्यांच्या दृष्टीने रोपांकडे पाहिले असते तर ही वेळ आली नसती. व्यापाऱ्यांच्या दृष्टीने पाहिले. डिमांड कॉलच्या ऐवजी लायटनिंग कॉल लावला तर तो लवकर लागेल. हे तत्त्व तिथेही लावून पाहिले. (हशा....)

याकरिताच माझे म्हणणे आहे की, अनुभव फार महत्त्वाचा. Beyond the limit, you can not make haste in nature. Otherwise, disaster is the net result. The total loss is the net result. हे मी त्या अनुभवातून शिकलो. शेतीने मला खूप मोठे जीवन शिक्षण दिले. अनेक शेतकऱ्यांशी संवाद साधता आला, त्यांच्या अनुभवाच्या शिदोरीत डोकावता आले. कृषीसंबंधित अनेक प्रयोग प्रकल्प देश-विदेशात जवळून अभ्यासता आले, अनेक संदर्भग्रंथ, नियतकालिके अभ्यासता आली. अनेक एजन्सीज घेतल्या होत्या, त्यातूनही फार मोठे व्यावहारिक शिक्षण झाले.

मार्केटिंग शिकलो, लोकांशी कसे बोलावे हा फार मोठा विषय आहे आणि

महत्त्वाचा भाग आहे. स्वत:जवळ पैसे नसताना धंदा कसा करावा, हे मी या जगाच्या बाजारात शिकलो. दुसऱ्याच्या पैशावर व्यवसाय कसा करावा हेही सगळे इथेच शिकावे लागले! (हशा...) कारण मित्रांनो, माझ्याकडे गडगंज पैसा नव्हता. पैसा खिशात भरपूर राहिला असता, तर जगाचे नानाविध अनुभवांचे चटके बसले नसते, चटके बसल्याशिवाय शिक्षण कसे होणार? आयुष्यात अनेक प्रकारचे अनुभव आले. त्यामुळे त्या-त्या टप्प्यावर व्यवस्थित विचार करून, पुढचे पाऊल टाकू शकलो.

**प्रश्न –** भाऊ, आपण ठिबक सिंचनामुळे जगप्रसिद्ध आहात. जगात एकामागे एक परदेशी कंपनी आपण टेकओव्हर करीत आहात. वास्तविकता पाहिली, तर हे कटू सत्य आहे, की इंडियन कंपन्यांना जनरली परदेशी कंपन्या टेकओव्हर करतात. आपण मात्र परदेशी कंपन्या टेकओव्हर करतात, हे कसे काय? आपण अशा परदेशातील कोणती कंपनी टेकओव्हर करणार आहात?

**भाऊ –** इंग्रजांनी आपल्या देशावर १५० वर्षे राज्य करून आपल्या भारत देशाच्या साधनसंपत्तीची यथेच्छ लूट केली. आपली संपत्ती तिकडे गेली. आपण नुसते कळवळत बसायचे का? आपल्या संपत्तीला सन्मानाने परत मायदेशी आणायचेच नाही का? आपल्या बुद्धिकौशल्याने ती संपत्ती परत आणली तर? (टाळ्या...) हीच माझी बलवत्तर इच्छा! (हशा...) मला अनेकदा अजूनही हे चित्र खूप ठिकाणी दिसते, फॉरेनर दिसला म्हणजे दुधा दह्याने धुतलेला एखादा देवच समोर अवतरला आहे की काय? असे डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहतात. फिरंग्यासंबंधीचे, हे गोऱ्या कातडीचे आकर्षण अजूनही गेले नाही. मला त्यांचा द्वेष नाही, मी त्यांना इतरांएवढेच महत्त्व देतो, एवढेच! भारतीयांनी जिद्द धरावी, परदेशात गेल्यावर या गोऱ्या माणसाने आपल्या गाडीचा दरवाजा उघडून आदबीने नमस्कार घातला पाहिजे, (टाळ्या...)

जैन इरिगेशनच्या परदेशातील कंपन्यांमध्ये एकूण ५५० गोरी माणसे कामाला आहेत. त्यांना 'येस सर' 'येस सर' म्हणावे लागते, दुसरे करणार तरी काय? (हशा... टाळ्या....) ठिबक सिंचनाबाबत आपण प्रश्न विचारला. मित्रांनो, आपण महाराष्ट्रात राहतो, इथे पाण्याचे दुर्भिक्ष आहे, ते कायम राहणार आहे, हेही आपल्याला माहिती आहे. अशा प्रश्नांवर उपाय योजना शोधण्यासाठी धडपड मात्र आपण केलीच पाहिजे. अमेरिकेतील फ्रेस्नो शहरात एक आंतरराष्ट्रीय शिबिर भरले होते. Water saving technology and the productivity increasing technology was the main idea behind holding that exhibition. तिथे मी पहिल्यांदा ठिबक सिंचनप्रणाली

पाहिली. मला प्रकर्षाने जाणीव झाली, ‘ही टेक्नॉलॉजी आपल्या देशाची नितांत गरज आहे. पाणी वाचवण्यासाठी, उत्पादन वाढवण्यासाठी हा राजमार्ग ठरेल’ . हे मी हेरले आणि १९८७ मध्ये मी पुन्हा अमेरिकेत गेलो, ठिबक सिंचनसंबंधित व्यवसायाला प्रारंभ केला. आज या क्षेत्रातील कामात आपली कंपनी संपूर्ण जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. (टाळ्या....)

आपण एक प्रश्न हाही विचारला होता, की आता परदेशातील कोणती कंपनी टेकओव्हर करण्याचा विचार आहे? ठिबक सिंचन क्षेत्राशी संबंधित जगात प्रथम क्रमांकावर असणारी कंपनी आपण घेण्याच्या विचारात आहोत! (प्रचंड टाळ्यांचा वर्षाव) संपूर्ण जगावर एका चांगल्या अर्थाने मी म्हणेल, आपले राज्य राहावे!

**प्रश्न** – भाऊ, एवढी मोठी जमीन आपण घेतली आहे, एवढ्या प्रचंड प्रमाणात जमीन आपल्या कंपनीची असावी, अशी संकल्पना तुम्हाला कशी सुचली?

**भाऊ** – जमीन घ्यायला केवळ संकल्पना सुचून चालत नाही, हाती पैसा आवश्यक आहे! (हशा...) कारण संकल्पना खूप चांगल्या सुचतात; पण त्यांच्या पूर्ततेसाठी पैशांचे पाठबळ लागते. नियमानुसार ५५ एकराच्या वर जमीन विकत घेता येत नाही. सरकारने शेती संशोधनासाठी अशी जमीन घेण्यासाठी परवानगी दिली. चार-पाच वर्षांत हळूहळू, टप्प्याटप्प्याने जमीन घेत राहिलो. जमिनीचा सुरवातीला पाच हजार रुपये एकर भाव होता, नंतर भाव वाढतच गेले. आता पंचवीस लाख रुपये एकर आहेत.

**प्रश्न** – भाऊ, आपल्या आयुष्याच्या या उत्तरार्धात आपण शिक्षणक्षेत्राकडे कसे काय वळलात?

**भाऊ** – माझ्या अनेक भाषणांत आणि लेखनातही अनेकदा मातृपितृ संस्काराचा उल्लेख येतो. आजही आपणा सर्वांशी सुसंवाद, साधताना एक-दोनदा मी हा उल्लेख कृतज्ञतेने केला. संस्काराचा वारसा माणसाचे जगणे मूल्यात्मक ठेवतो. शिक्षण त्याला व्यावहारिक प्रतिष्ठेची बैठक प्राप्त करून देते. यादृष्टीने पाहिल्यास माझ्या आई-वडिलांकडून मला संस्कारांचा वारसा मिळाला, पण रुढ अर्थाने पुस्तकी शिक्षणाचा वारसा काही मिळाला नाही. आई शिकलेली नव्हती. वडील चौथीपर्यंत शिकू शकले, माझे आजोबा वारल्यामुळे अकराव्या वर्षीच त्यांच्यावर घराची जबाबदारी येऊन पडली. त्यांना शिक्षण बाजूला ठेवावे लागले.

मला शिकायची गोडी होती. मी शिकलो. मुळच्या भक्कम संस्कारांच्या अधिष्ठानाला शिक्षणाची व्यावहारिक जोड मिळाली. शिक्षणामुळे अनेक संधी उपलब्ध होतात. मी आयुष्यात इतरही गोष्टी कशा शिकलो, हे मघाशीच तुम्हाला सांगितले. I always wanted to contribute something to the society. ही सुरुवातीपासूनच प्रबळ भावना मनात रुजून बसली होती. एखादी गोष्ट करायची ठरविल्यावर करायचीच! केवळ करायचीच नाही, तर उत्तम करायची! (टाळ्या....) अशा कामात कुणाची सक्ती असते का? मुळीच नसते. आपल्या मनाला वाटत असते की, आपण जे साकार करत आहोत, ते समाजासाठी, राष्ट्रासाठी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे. अशा वाटण्यातही फार मोठा आत्मविश्वास असतो. त्यातूनच 'अनुभूती'ची निर्मिती झाली. टप्प्याटप्प्याने 'अनुभूती' शाळेचे कामकाज सुरू झाले. सत्तावीस कोटी रुपये आतापर्यंत लागून गेले. जागा वगैरे जमेला धरले तर एकूण पन्नास कोटींची ही गुंतवणूक आहे! काही लोकांच्या प्रतिक्रिया अशाही येतात, ''पन्नास कोटी? एवढा खर्च शाळेसाठी करावा का?'' वगैरे.

आयुष्याची सुरवात खऱ्या अर्थाने शाळेत होते. आपण सर्वजण इथे उपस्थित आहात. तुम्हाला आजही शाळेतील शिक्षकांचे नाव लगेच आठवेल; पण कॉलेजच्या प्राध्यापकांचे लगेच आठवेलच असे नाही. शाळेचे संस्कार कोवळ्या वयात होतात, अगदी पक्केपणाने होतात; पण इथे मी शाळेसोबत कॉलेजही चांगल्याच दर्जाचे कसे होईल, हे पाहणार आहे. विद्यार्थी संख्या मर्यादित असली तरी चालेल पण गुणात्मकता मात्र हवीच! इथे ॲडमिशन घेताना, हुशार विद्यार्थी आहे पण खऱ्या अर्थाने आर्थिक अडचण येत आहे, अशा वेळी शिष्यवृत्तीचीही सुविधा आहे.

**प्रश्न –** भाऊ, आपण शालेय शिक्षणाकरिता 'अनुभूती' विद्यालय काढले, शिक्षण-तंत्रशिक्षण अशा बाबतीतही काही नियोजन आहे का?

**भाऊ –** आहे ना! पुण्याला सिम्बॉयसिस संस्था आहे, त्या संस्थेने एकाच कॅम्पसमध्ये अनेक कोर्सेसची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तशी संस्था इथे सुरू करण्याचा मानस आहे. इथे शिक्षण घेतलेला प्रत्येक विद्यार्थी स्वत: सक्षम होईलच. शिवाय, हजारो लाखो लोकांना तो रोजगार देईल. नोकरीसाठी वणवण भटकणारे नाही तर, नोकरी देणारे, उच्च कार्यसंस्कृती जोपासणारे युवक युवती घडवायचे आहेत! माझ्या दृष्टीने ते तर आनंदपर्व असेल. If I can see the first batch of Anubhuti, I will be very grateful to God.

**प्रश्न –** भाऊ, मी आपली काही पुस्तके वाचली आहेत, जसे 'आजची समाजरचना: तिचे स्वरूप आणि पुनर्बांधणी' , आपल्यावर लिहिलेली 'वाकोदचा वटवृक्ष' , 'पाषाणातून पाझर', 'सुजलाम् सुफलाम्' , 'उमललेले संवाद' तसेच 'भूमिपुत्र'चे काही विशेषांक मी वाचले आहेत. भाऊ, आपल्याला लेखन करायला वेळ केव्हा मिळतो? सध्याही तुम्ही अशा प्रकारचे लेखन करीत आहात की नाही? आपण आत्मचरित्र लिहिणार आहात का?

**भाऊ –** एकाच दमात अनेक प्रश्न विचारले मित्रा! (हशा...) माझ्या काही पुस्तकाची निर्मिती त्या-त्या कालावधीत झाली. काही मित्रांच्या प्रेमळ आग्रहास्तव लेखन करावे लागले. माझी भूमिका, अनुभवांचे संचित, माझी स्पष्ट मते मांडणे मला त्या-त्या काळात अधिक गरजेचे वाटले, त्यातून काही पुस्तके आलीत. आत्मचरित्र तर नक्कीच लिहायचे आहे. किंबहुना वैयक्तिक जीवन आलेखासोबत कंपनीचाही आलेख स्पष्ट करणारे आत्मचरित्र लिहिण्याच्या दृष्टीने माझे काम सुरू झाले आहे. साधारणत: वीस-बावीस पुस्तकांचा आराखडा डोळ्यांसमोर ठेवला आहे. मी आतापर्यंत मराठीतून केलेल्या भाषणांची पुस्तके लवकरच प्रकाशित होतील.

विविध विषयांवरची १०० च्या वर भाषणे वाचकांना वाचायला मिळतील. हिंदीतून आणि इंग्रजीतून केलेल्या भाषणांच्या पुस्तकाचाही विचार सुरू आहे. आपण एवढ्या आत्मीयतेने पुस्तकांबद्दल विचारले म्हणून मी एवढ्या मनमोकळेपणाने हे सर्व सांगू शकलो. अशाही संवादाचे एक प्रोत्साहक समाधान मिळते. आता वेळ कसा मिळतो? या प्रश्नाकडे येऊ. जैन इरिगेशनचा वाढता व्याप मी माझ्या मुलांकडे सोपविला आहे. साठ टक्के वेळ त्यामुळे माझ्या पुस्तकांसाठी मला देता येतो.

**प्रश्न –** एक स्त्री म्हणून मला काही गोष्टी समजून घ्यायला आवडेल. 'प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे, एका स्त्रीचा हात असतो,' असे म्हटले जाते. भाऊ, तुमच्या पत्नीच्याही बाबतीत असे म्हणता येईल का?

**भाऊ –** ताई, तुम्ही हा फारच क्वचित विचारला जाणारा; पण अतिशय महत्त्वाचा असा प्रश्न विचारला. माझ्या पत्नीचा म्हणजेच स्वर्गीय कांताबाईंचा माझ्या यशात किती वाटा असावा? १०० टक्के! (टाळ्या....) अर्धांगिनीच नाही, तर पूर्णपणे तिचा सहभाग माझ्या कामात आहे. उद्योजकीय विश्वात नवे काही करून दाखविण्याची उमेद असणाऱ्या माणसासोबत संसार करणे सोपे नाही. त्यासाठी

त्याग, समर्पणशीलता, सोशिकता आणि सर्वांत महत्त्वाचा गुण सौजन्यशीलता लागते. चांगले शिक्षण झालेले, किंबहुना माझ्या एवढे शिक्षण झालेल्या कांताबाईंनी कोणताही व्यत्यय न आणता, वेळोवेळी प्रेरणा-प्रोत्साहन देऊन मला कार्यरत ठेवले. आमच्या दोघांच्या या सहजीवनावर मी एक पुस्तकच लिहितो आहे. बारा-तेरा चॅप्टर त्या पुस्तकात असतील. त्यातील ०७ लिहूनही झाली. आपण आमच्या ऑफिसच्या संपर्कात राहा, तुम्हाला नक्कीच हे पुस्तक ०२-०३ महिन्यांत वाचायला मिळेल.

**प्रश्न –** भाऊ, आपण एवढे मोठे साम्राज्य उभे केले, समाजाप्रती कृतज्ञ राहून लाखों लोकांना सहकार्य केले, अनेकांना आयुष्यात उभे केले, आपणास आंतरराष्ट्रीय ख्यातीचा नोबेलच्या तोडीचा पुरस्कार यापूर्वी मिळाला. त्या मानाने 'पद्मश्री' पुरस्कार उशिरा मिळाला, असे आम्हाला वाटते. 'पद्मश्री' ऐवजी त्यापेक्षा मोठा, 'पद्मविभूषण' चा सन्मान आपल्याला मिळायला पाहिजे होता, असे वाटते.

**भाऊ –** पण हे सर्व ठरवणारा मी नाही! त्यामुळे मला सांगून काय उपयोग आहे? (हशा...) आपण अशा बाबतीत प्रतिक्रिया फार पटकन देतो. आपण ज्या भावना व्यक्त केल्या, त्या हजारोंच्या कदाचित लाखोंच्याही मनात असतील; पण मनातले मनातच ठेवण्यात धन्यता मानणारे खूप असतात. एकतर आपला भारत देश प्रचंड मोठ्या लोकसंख्येचा देश आहे. एक अब्जच्या वर लोक इथे राहतात. त्यातील २०९५ व्यक्तींना आत्तापर्यंत 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले गेले. साठ-सत्तर वर्षांत ४१ व्यक्तींना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान मिळाला. एवढ्या मोठया लोकसंख्येत, इतक्या कमी व्यक्तींना, हा सन्मान मिळाला! आपण या पुरस्कारांच्या सन्मानाचा आदराने विचार करायचा, की वेगवेगळ्या पद्धतीने विचार करायचा हा ज्याचा त्याचा दृष्टिकोन आहे. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हा मी माझा सर्वोच्च पुरस्कार समजतो! (टाळ्या...)

**प्रश्न –** आपण आपल्या सहकाऱ्यांची मानसिकता घडवली. त्यामुळेच एकजुटीने सारे कामात सहभागी झाले. म्हणूनच एवढे यश आपली कंपनी मिळवू शकली. भाऊ, ही मानसिकता घडविण्याची हातोटी कोणती? ही किमया आपणास कशी साधली?

**भाऊ –** ही हातोटीही नाही, की किमयाही नाही. हा आम्ही परस्परांवर टाकलेला सार्थ विश्वास आहे! सहकारी परिश्रमावर आधारित कार्यसंस्कृतीची जोपासना करतात.

पहिले प्राधान्य कंपनीच्या हिताला, असे मनापासून मानतात. 'माझ्या कंपनीचा मला अभिमान आहे', ही श्रद्धा ते जोपासतात चुकीचे काम करून कंपनी पुढे आली नाही, तर कष्टाच्या बळावर एवढी प्रगती केली हे त्यांनी पाहिले आहे, अनुभवले आहे. सहकाऱ्यांशी आपुलकीचे वर्तन आम्ही करतो. इथल्यापेक्षा हजार-पाचशे जास्तही मिळण्याची शक्यता निर्माण झाली, तरी सहकारी कंपनी सोडून जात नाही. कारण इथे सहकारी घडले आहेत. 'आपण इथे अधिक संस्कारित झालो', याची त्यांना खोलवर जाणीव आहे. कंपनीचे संचालक, व्यवस्थापक सहकाऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. मागच्या वर्षीचे एक उदाहरण, आता बोलता बोलता अगदी सहज आठवले म्हणून देतो. थंडीचे दिवस होते. सकाळी मी नेहमीप्रमाणे फिरायला जात असताना, आमच्या कंपनी परिसरात टिश्युकल्चरच्या काही मुली कामावर येताना दिसल्या. एका मुलीचे हात थंडीने कुडकुडत होते. ती मुलगी आमच्या कंपनीत १० वर्षांपासून काम करते. मी दोन स्वेटर घातले होते. माझ्या मनात विचार आला, या मुलींना आपण स्वेटर घेऊन देऊ शकतो का? केवळ विचार मनात यायलाच अवकाश. अंमलबजावणी लगेच करायची असे ठरवले. सर्वांना स्वेटर द्यायचे ठरवले.

पाच हजार स्वेटर्सची ऑर्डर रेमंड कंपनीला दिली. १५-२० दिवसांत स्वेटर वाटलेही गेले. पंचवीस लाख रुपयांपर्यंत खर्च झाला. माझ्या घरातल्या व्यक्तीला मी विनास्वेटर कुडकुडू दिले असते का? मुळीच नाही, सहकाऱ्यांसाठी वेगळा निकष कशाला? मला जर त्यांना स्वेटर घेऊन देणे शक्य असेल, तरीही मी ते चांगले काम का करू नये? आयुष्यभरात मी कमावले तरी काय? सहकाऱ्यांना ही प्रेमाची ऊब इथे मिळते आहे, म्हणून काम करताना त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आहे. (टाळ्या....) उन्हाळ्यात तप्त धुळीतून येणाऱ्या सहकाऱ्यांना पाहिले, बससेवा सुरू केली. माझ्याकडे त्यांनी ना स्वेटर मागितले होते, ना बससेवा मागितली होती. संवेदनशीलपणे मी त्यांच्या रोजच्या जगण्याशी एकरूप झाल्यामुळे, मला त्यांच्या समस्या जाणवल्या होत्या. इतरांचा विचार यादृष्टीने आपण करीत राहिलो तर निश्चितच काही ना काही सकारात्मक परिवर्तन घडवून आणल्याचे समाधान आपल्याला लाभेल. आपल्या या सुसंवादाची सांगता करताना एक गोष्ट आवर्जून सांगेल, 'इतरांना आनंद द्या आणि स्वत:ही आनंदी राहा!'

धन्यवाद!



# थोर सांस्कृतिक परंपरेची अनुभूती!

'अनुभूती'स्कूल बाबत दैनिक 'लोकसत्ता'साठी मुलाखत - सुकदेव शिरसाळे - १७.०२.२००९

*या पृथ्वीतलावर प्राचीन महान संस्कृतीपैकी फक्त भारतीय संस्कृती तेवढीच टिकली. बाकी सर्व इतर संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाल्या. याचाच अर्थ कालातीत असणारी काहीतरी मूलतत्त्वे या संस्कृतीत असावीत. या मूलतत्त्वांचा शोध घेऊन, त्यांना जपत जपत, येणाऱ्या पिढ्यांचं शिक्षण जर त्याआधारे केले तरच ही संस्कृती चिरंतन होईल.*

*नेमका हाच ध्यास घेऊन भवरलालजी आता शिक्षणक्षेत्रात पदार्पण करते झाले आहेत. तीच त्यांची दूरदृष्टी आहे. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजाच्या ऋणातून मुक्त होण्याचा हा मार्ग खरोखरीच अलौकिक म्हटला जावा.*

**श्री. सुकदेव शिरसाळे** – ही शाळा सुरू करण्यामागची आपली भूमिका काय?


**भाऊ** – मला संपत्तीचा किंवा त्या अर्थाने बुद्धिमत्तेचा असा कोणताही वारसा मिळालेला नाही. आईकडून

शहाणपणाचा वारसा आणि वडिलांकडून प्रामाणिकपणाचा वारसा मिळालेला होता. दोन गोष्टी वेगळ्या आहेत. विद्वत्ता हा भाग वेगळा. शहाणपण हा भाग वेगळा. शहाणपणाचा समज-उमज असण्याशी अधिक संबंध आहे. समयसूचकता, भान कायम जागृत असणे, समतोलतेने निर्णय घेत राहणे अशा अनेक बाबी म्हणजे शहाणपण!

आपल्याला शहाणपण आनुवांशिक-रीत्या मिळालेलं आहे; परंतु विद्वत्ता मिळालेली नव्हती आणि संपत्तीही मिळाली नाही. जे काय झालंय ते त्यानंतर शून्यातून निर्माण झालं. शून्यातून जी सृष्टी निर्माण झाली त्याचं एकमेव कारण सरस्वती आहे असं मी मानतो.

सरस्वतीचा वरदहस्त नसता तर मी आयुष्यात जे काही साधू शकलो ते साधू शकलो नसतो. हे माझ्या जीवनाचं गुपित आहे असं मी मानतो. त्याला यशस्वी म्हणत असाल तर ते तशा प्रकारचं 'यश' आहे. जे मिळालं आहे ते संस्कार संचित आहे. शिक्षण हाही एक मोठा संस्कार आहे.

शिक्षणामार्फत इतर संस्कार-संस्कृती घडविण्यासाठी आवश्यक आहेत. केवळ संस्कृती नव्हे; तर माणसाला



आर्थिकदृष्ट्या सबळ करण्यासाठी जे काही आपल्याकडे कौशल्य आहे तेसुद्धा आपण शिक्षणाच्या मार्फत शिकू शकतो.

कसं जगायचं हेही शिकू शकतो आणि जगण्यासाठी काय कराव लागतं, हेही शिकू शकतो. दोन्ही गोष्टी करू शकतो आणि हे सर्व कुठं शक्य आहे? केवळ शाळेतच हे शक्य आहे. महाविद्यालयात गेल्यानंतर तुमची जडणघडण झालेली असते, संपलेली असते. आजही आपण थोडसं मागे वळून बघा आपल्याला शाळेतले शिक्षक जेवढ्या सहजपणे आणि ठळकपणे आठवतात तेवढे महाविद्यालयातले शिक्षक आठवत नाही, प्राध्यापक आठवत नाही, तर ती जी संस्कार घोटून घेण्याची पद्धत आहे ती शाळेत आहे.

आयुष्यात सामाजिक ऋणांची परतफेड करायची असेल तर ते करण्यासाठी सगळ्यात उत्तम मार्ग म्हणजे शिक्षणाची उपासना करायची. शिक्षणाची उपासना, संस्कारांची उपासना ज्या ठिकाणी होते त्यालाच आपण सरस्वती मंदिर किंवा विद्या मंदिर म्हणतो. तेव्हा गेली कित्येक वर्षे मी हे स्वप्न बाळगून आहे की आपण या समाजाकडून एवढं भरभरून घेतलं, घेत आहोत, घेत राहू; पण परत द्यायला जे काही मार्ग आपण आतापर्यंत स्वीकारले, अंगीकारले, अक्षरश: आपल्या जीवनात उतरवले त्यापेक्षाही अत्यंत ठोस रीतीने काळावर आपल्या पावलांची खूण सोडायची असेल तर एक काम करायला पाहिजे ते म्हणजे शिक्षण आपल्याला देता आलं पाहिजे.

आता असे सर्वांगीण शिक्षण देण्यासाठी केवळ सहा-आठ-दहा तास पुरत नाहीत, तर त्याला सकाळी सहा वाजेपासून दर रात्रीच्या नऊ वाजेपर्यंत तुम्हाला तो विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी उपलब्ध असली पाहिजे. त्याची जडणघडण करण्यासाठी जे काही मार्ग तुम्हाला अवलंबवायचे असतील ते शिक्षक, पालक यांच्या भागीदारीने आपण ठरवून राबविले पाहिजेत. हे करीत असताना आपण ते एका विशिष्ट क्लाससाठी करतो आहोत नाही? अशी एक कुठेतरी अपराधीपणाची भावना मनात असते. त्याचं कारण असं आहे, की दर महिन्याचे दहा-बारा हजार रुपये किंवा वर्षाचे लाख-दीड लाख रुपये एवढे पैसे भरायचे एका विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीसाठी असं शिक्षण किती लोकांना परवडू शकेल?

आजही समाजात फार कमी लोक असे आहेत, की ज्यांना हे परवडू शकेल.

ज्यांचं सात-आठ लाख रुपये वर्षाचं उत्पन्न असेल त्यांनाच हे परवडेल. इतरांसाठी काय करता येईल? त्यासाठी आम्ही असे एक स्वतंत्र विश्वस्त मंडळ स्थापन केले. त्यात आम्ही स्वत: आणि आमचे जे नातलग तसेच मित्रमंडळी आहेत, त्यांच्या आणि इतरांच्या आर्थिक सहभागासकट, इतर म्हणजे आमच्या औद्योगिक संस्थेत काम करणारे मोठे-मोठे लोकं आहेत ते त्यांनी पाच कोटी रुपये उभे केले.

शिष्यवृत्त्या त्या रकमेतून द्यायच्या. लायक विद्यार्थी असतील आणि पैशाअभावी शिक्षणाला मुकत असतील तर असं होता कामा नये, म्हणून जवळपास पंचवीस ते तीस टक्के विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना त्यांच्या योग्यतेनुसार आम्ही वीस ते १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती उपलब्ध करून देतो. विशेष म्हणजे आता तर मी या वर्षापासून नव्याने ॲडमिशन घेणाऱ्या ज्या विद्यार्थिनी आहेत, त्यांना सरळ-सरळ पंचवीस हजार रुपयांची आणखी वेगळी राहिलेल्या पैशातून शिष्यवृत्ती देण्याचीही आमची तयारी आहे. ज्या वर्षी जेवढं बसेल तेवढं विद्यार्थ्यांना दिलं जाईल. साधारणत: पाच कोटी रुपयांचं व्याज एक कोटी रुपये होईल.

एक कोटी रुपयांच्या शिष्यवृत्त्या वाटायच्या. असं आपण चार वर्षे ते पुरवू. आतापर्यंत दीड-दोन कोटी रुपये त्या विश्वस्त मंडळात जमा आहे. जवळजवळ पाच कोटी रुपयांपर्यंत जमवू. त्या रकमेच्या व्याजापोटी जे काही जमा होईल त्यातून एक कायमस्वरूपी शिष्यवृत्ती देता येईल. एवढंही करून समाधान नाही. गावामध्ये 'डे बोर्डिंग शाळा' सुरू करायची आणि साधारणत: हजार रुपयांपर्यंत एकवेळचं जेवण आणि संस्कारयुक्त शिक्षण देण्याचा तिथेही प्रयत्न करायचा; पण तिथे सकाळी सहा ते संध्याकाळी सहा अशी शाळा असेल. सर्वसाधारण माणसाला तेथील फी वगैरे परवडू शकेल.

**श्री. शिरसाळे –** पण ते करणार का? पुढची काही योजना आहे का?

**भाऊ –** योजना आहे. महानगरपालिकेने आपल्याला जागा दिलेली आहे. करार व्हायचा बाकी आहे.

**श्री. शिरसाळे –** म्हणजे पुढच्या शैक्षणिक वर्षी?

**भाऊ –** हो, पुढच्या शैक्षणिक वर्षी. आता याचं तात्त्विक अधिष्ठान काय? समाजाची, सामाजिक ऋणाची परतफेड, हे एक. याचा पाया काय? तर गांधीजींची जीवनशैली संस्कारित करण्याचा प्रयत्न करणे. इतकं ते सोप नाही हे खरं आहे, पण

अशक्य आहे असेही नाही. काळ जरी वेगळा असला तरी गांधी संस्कारांचा ठसा अजून कायम आहे. या संस्काराच मूल्य कमी झालेले नाही. त्यामुळे आदर्श आपण आपल्यासमोर ठेवलेला आहे तो उदात्तच आहे! शिक्षणावर आधारित महत्त्वाचे तीन भाग आम्ही केलेले आहेत. भारतीय संस्कृतीला जपून शिक्षण संस्कार करायचे आहे. याचा अर्थ इतर संस्कृतींशी आपण कोणत्याही प्रकारचं युद्ध करणार आहोत किंवा त्या रद्दबातल करणार आहोत किंवा त्यांच्याविरुद्ध काही कायदे करणार आहोत, असं नाही.

तौलनिकदृष्ट्या त्या सगळ्यांचा अभ्यास मुलांसमोर ठेवून सात-आठ हजार वर्षांपासून चालत आलेली भारतीय संस्कृती आहे, ती पुरातन असून तिचं अस्तित्व – तिचा संस्कार अजूनही टिकून आहे. अशी एकही पुरातन संस्कृती आता जिवंत नाही. मेसोपोटोमियात नाही, ग्रीकची नाही किंवा इतर ज्या काही पुरातन संस्कृती होत्या त्यापैकी एकही नाही. फक्त भारतीय संस्कृती ही सांस्कृतिकदृष्ट्या आपले अस्तित्व टिकवून आहे, महत्त्वाचं म्हणजे काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेली आहे. इक्बालचं कडवं पाहा. युनान ही एक जुनी संस्कृती आहे. मिस्र म्हणजे इजिप्तची,

होरोम सब मिल गये जहाँ से

या सगळ्या जुन्या संस्कृती होत्या म्हणजे चार-पाचच होत्या. त्या सगळ्या लयाला गेल्या.

अब तक मगर है बाकी नामोनिशान हमारा

अजूनही आमचेच लोक मात्र टिकून आहेत, आमचं नाव टिकून आहे.

कुछ बात है की हस्ति मिटती नहीं हमारी

कुछ बात है म्हणजे काहीतरी त्यात खास असं आहे की आपली संस्कृती लयाला जात नाही.

का नाही जात? मोहम्मद गझनीपासून आजपर्यंत एक हजार वर्षे झाली! स्वातंत्र्य मिळेपर्यंत एक हजार वर्षे झाली. आधी मुगलांचं राज्य होतं, नंतर इंग्रजांचं.

**श्री. शिरसाळे –** अकरा मुगल होते.

**भाऊ –** मुगलांनंतर पोर्तुगीज, डच, फ्रेंच नंतर इंग्रज आले. स्वाऱ्या, लुटालूट असा हा भारताचा हजार वर्षांचा इतिहास आहे. ख्रिश्चनांनी दीडशे वर्ष धुमाकूळ घातला, त्यात धर्मांतराच्याही विषयाचा समावेश आहे. मुस्लिमांनीही धर्मांतराबाबत

खूप प्रयत्न केले. ज्याच्या हाती सत्ता आली त्या प्रत्येकाने केले. असं सगळं असताना विचार करा. इतिहासाची हजार वर्षे असताना वीस ते पंचवीस टक्के जनता त्यात जबरदस्ती सामील होत राहिली. काहीही समजा तुम्ही! अजूनही ८० टक्के शाबूत आहे. जी आहे ती तशीच आहे. कसा हिशेब करता येईल? हजार वर्षे? एवढी गुलामी? कोणाच्याच नशिबी नाही आली हो! या पृथ्वीच्या पाठीवर एकही देश नाही, जो सतत एक हजार वर्षे गुलामगिरीत राहिला.

एकतर धार्मिक हाहाकाराला पुढे केलं किंवा परकीयांकडून दमन, परकियांची सत्ता किंवा सामाजिकरीत्या अस्थिरतेची परिस्थिती! अशा प्रकारची सतत हजार वर्षांची अस्थिर वस्तुस्थिती होती. असं असताना देखील आपला देश उभा आहे, ही संस्कृती उभी आहे. कसं घडलं? काहीतरी कारण आहे. ही कारणं शोधून पुढच्या पिढीला सांगायची आहेत. रस्त्यावर मुके घेण्याची, गळ्यात गळा घालण्याची पाश्चात्यांची संस्कृती चांगली आहे का? ती टिकेल का? ती चिरस्थायी होऊ शकेल कां?

आज अमेरिकेत काय होत आहे? विद्यार्थी महिला, म्हणजे ज्यांना पौगंडावस्थेतील महिला म्हणता येईल अशा, मोठ्या प्रमाणात महिला कुमारी माता आहेत. तेथील घटस्फोटाचा दरही दिवसेंदिवस वाढणाराच आहे. जर तेथील सामाजिक व्यवस्था असल्या प्रकारचा असंतोष निर्माण करीत असेल तर ती आपण स्वीकारायची का? सुरवात कुठेतरी कळत-नकळत होते ना! म्हणून आपल्याला पुढच्या पिढीसमोर तौलनिकदृष्ट्या अशा प्रकारच्या भूमिका ठेवल्या पाहिजे. आपल्याला अतिरेकी मत असलेले नागरिक तयार करायचे नाहीत. धर्मांध तर मुळीच नाही. सर्वांसमोर देशहिताचा, समाजहिताचाच विचार मांडायचा, जो विचार समतावादी आणि साकल्याचाच असेल, त्यात अतिरेकाला वाव नसेल.

आपल्या भारताचा विशाल पाया असल्यामुळे इथे इतर सगळ्या धर्मजातीपंथांच्या लोकांना उदार अंत:करणाने सहिष्णुतेची वागणूक दिली गेली आहे. आपण यातील जी विशेषता आहे ती बघायला पाहिजे. म्हणून एकतर त्याचा मूलभूत जो खांब आहे तो बघायला पाहिजे. दुसरं असं आहे की मला अनुभूतीच्या विद्यार्थ्यांना मुक्त स्वातंत्र्याऐवजी, मी पणा ऐवजी सहकार्य शिकवायचं आहे. परस्परांशी सहकार्य केल्याशिवाय तरणोपाय नाही. कालही नव्हता, आजही नाही, उद्याही राहणार नाही.

हे त्यांना समजावून सांगायचं, आणि त्यांना समजावून सांगायचं आहे की नोकऱ्या मागू नका, नोकऱ्या द्या. म्हणजे आपसात तुम्हाला सहकार्य करूनच जगाव लागतं म्हणून जन्मल्यापासून ते स्मशानात जाईपर्यंत माणूस अनेकांवर अवलंबून असतो, कुणाच्या ना-कुणाच्या मदतीने तो पुढे जात असतो हे विसरून चालता कामा नये.

जो माणूस हे विसरणार नाही तो माणूस निश्चितपणे कृतज्ञ राहील. समाजाचा, आईवडिलांचा, त्याच्या परिवाराचा कृतज्ञ राहील आणि जर तो कृतज्ञ राहिला तर तो त्याच्या आयुष्यात कधीच अपयशी होणार नाही, कारण प्रत्येक वेळा त्याच्या अंगात नम्रता येईल; आपोआपच येईल. त्याला सांगायची गरज पडणार नाही. उद्धटपणा त्याच्यात येणार नाही. हे केव्हा घडेल? त्यांना जर एकमेकांवर अवलंबून राहण्याचं जे तत्त्व आहे ते उमजलं तर! एकमेकांवर अवलंबून राहणे आणि उद्योजकता, अंगी बाळगा, धोका पत्करा, नोकरी करू नका, म्हणजे काय? धोका पत्करा ना, किराणाचं दुकान चालवा, फुलांचं, फळांचं दुकान चालवा, पण स्वतःच दुकान थाटा आणि दोन-चार होतकरू, कष्टाळू माणसांना नोकरी द्या. एखाद्याला बूटपॉलिश करावीशी वाटली तर त्यात काय हरकत आहे. पण बूटपॉलिश अशी करावी त्या ग्राहकाला पुन्हा तुमच्याकडेच यावसं वाटल पाहिजे. अतिउत्तम तेच करा, गुणवत्ता सांभाळा, गुणवत्तेला अत्युच्च प्राधान्य दिले तर चैतन्य त्यात येतेच. धोकाही पत्करता आला पाहिजे. या तीन मूलभूत मुद्यांवर ही कार्यपद्धत उभी राहिली पाहिजे, उभी राहते आहे. त्यासंबंधीचे शैक्षणिक अभ्यासक्रम वगैरे तयार करीत आहोत. संस्कृतीसंबंधीच्या वर्गात आम्ही ७६ तास त्यांना ही गुणवत्तावर्धक कार्यसंस्कृती शिकविणार आहोत. त्याचा सगळा गृहपाठ वगैरे एकमेकांवर अवलंबून राहण्याच्या पद्धतीने करणार आहोत. उद्योजकतेचे संस्कार पेरणे फार फार आवश्यक आहे. आतापासूनच त्याच्या मनात असे आले पाहिजे की आपल्याला काहीतरी वेगळे करायचे आहे.

उद्योजकतेशी बांधिलकी, एकमेकांवर अवलंबून राहून साह्य करण्याची बांधिलकी, भारतीय संस्कृतीशी बांधिलकी अशी ती तात्त्विक भूमिका आहे. तो उद्योजकच व्हावा, शिक्षणाने ज्ञानी झालेला उद्योजक व्हावे! म्हणजे सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून त्याने उद्योग-व्यवसाय करावा. समाजाशी माझा काय संबंध आहे? माझा माल एवढ्या एवढ्या भावात विकला जातो; मी विकेन. मला

दहा रुपये देणारे आहेत तर सात रुपयाला कशाला विकू? तीन रुपयांचा माल असेल तरी तो सात रुपयांना विकायचा, पाच रुपयांनी विकायचा की चार रुपयांनी विकायचा किंवा तुटवडा असेल तर दहा रुपयांना विकायचा हे त्याच्या हातात आहे. अनुभूतीच्या मुशीत तयार झालेला विद्यार्थी असे करणार नाही. अनेकान्त सिद्धान्त, अहिंसा ही त्याची मूल्यं राहतील. कारण, हा समाज अहिंसेवर उभा आहे.

गांधीजींनी अहिंसा शिकवली. त्या मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तो यशस्वी झाला. त्यांनी जगाला एक नवीन मंत्र दिला. तेव्हा या मूल्यांना धरून आपण या शाळेकडे बघत आहोत. केवळ पैसे आहेत म्हणून ५० कोटी रुपये त्यासाठी खर्च केले आहेत अशातलं काही भाग नाही. त्यामागे खूप अशी तपश्चर्या आहे.

**श्री. शिरसाळे –** दूरदृष्टी आहे.

**भाऊ –** नक्कीच तशी गोष्ट आहे. ईश्वरकृपेने सगळं चांगलं, यथायोग्य व्हावं अशी इच्छा आहे.

**श्री. शिरसाळे –** भाऊ, सर्वकाही छानच होईल, सुंदर होईल. आपला समाजासाठी सहभाग आहे. आपली जन्मभूमी वाकोदच्या विकासासाठी भाऊ आपण खूप प्रयत्न करत आहात याची आम्हाला कल्पना आहे.

**भाऊ –** वाकोदमध्ये ग्रामीण विकास पुंजी लावली आहे. तसंच येत्या पाच वर्षांमध्ये आपला उद्योग–व्यवसाय आणि कुटुंब हे जवळपास शंभर कोटी रुपये सामाजिक कार्यासाठी उपलब्ध करून देणार आहे. म्हणजे संस्कृती म्हणा किंवा ग्रामीण विकास म्हणा याचा एक पंचवार्षिक अर्थसंकल्प आम्ही बनवीत आहोत. दरवर्षी वीस–वीस कोटी रुपये या कामाला अशा प्रकारे खर्च होतील. आता यावर्षी शाळेसाठी फार म्हणजे, दोन–तीन वर्षांचे एकत्र पैसे लागून गेले.

**श्री. शिरसाळे –** शाळेसाठी ५० कोटी रुपये लागले ना?

**भाऊ –** जागेची आजची किंमत धरून ते बरोबर ठरेल. तीस कोटींच्या आसपास बांधकाला लागले. अडीच लाख स्वेअर फुटांचं बांधकाम आहे, तेही सगळं दगडांचं आहे. दगड आंध्र प्रदेशातून आणला. अनुभूती शाळेचा जर आत्मा पाहायचा असेल तर तुम्हाला माझी तीन तत्त्वं आहेत ती समजून घेतली पाहिजेत.


पहिलं तत्त्व – भारतीय संस्कृतीशी प्रबुद्ध आणि सुदृढ अशी बांधिलकी. दुसरं तत्त्व – सहकार्य आणि मिलनसार वृत्तीची जोपासना, आणि तिसरं तत्त्व – सामाजिक आणि पर्यावरणीक बांधिलकीला जपणारी उद्यमशीलता.

**श्री. शिरसाळे –** जळगावमधलं जे 'डे स्कूल' असणार आहे, त्याचं साधारणत: स्वरूप काय, कसं असेल?

**भाऊ –** साधारणत: पाचशे विद्यार्थिसंख्या ठेवायचा विचार आहे. म्हणजे निदान तेवढी माझी अपेक्षा आहे. त्याचे नियोजन मी केलेलं नाही. दोन पाळ्यांमध्ये चालवायचे असल्यास दोन पाळ्यात चालवू, पण जास्तीत–जास्त विद्यार्थ्यांना तिथे शिकवू. वाटल्यास आधी दोनच वर्ग चालवू. हळूहळू वाढवू. शिक्षक पाहिजेत ना!

धन्यवाद!





# कर्जमाफीचा धोंडा स्वत:च्याच पायावर!

'साम'–टीव्हीला दिलेली मुलाखत – मिलिंद वानखेडे – २०.०५.२००९

*नव्या सरकारपुढील नवी आव्हाने, यांचा विचार करताना भवरलालजी फक्त देशहितच डोळ्यापुढं ठेवतात. निवडणुका व त्यामार्गे येणारी सत्ता नजरेपुढं ठेवूनच राजकीय पक्ष लोकानुनय करणारी; परंतु देशविघातक धोरणं कशी आखू शकतात असा त्यांचा सवाल आहे, शेतकऱ्यांसाठी अंदाजपत्रकातील तरतूद अजूनही वाढायला हवी, असं एका बाजूनं म्हणताना कर्जमाफी हे नाटक पूर्ण बंद करा, असं ते ठणकावून सांगतात. कारण, शेतकऱ्यांची श्रमशक्तीवरील निष्ठा कमी होऊ नये, तो आळशी होऊ नये, हीच त्यांची तळमळ आहे!*

**श्री. मिलिंद वानखेडे** – भाऊ, शरद पवार यांना पुन्हा एकदा नव्याने कृषिमंत्रिपद देण्यात आलेलं आहे, यासंदर्भात आपली काय प्रतिक्रिया आहे आणि नव्या पर्वामध्ये त्यांच्याकडून आपण अपेक्षा काय करणार?

**भाऊ** – सर्वप्रथम, शरद पवारसाहेबांच्या कारकिर्दीत काय काय

घडलं याचा आढावा घ्यायला पाहिजे. शेतकऱ्याला तीन गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. त्यात कर्जाचा पुरवठा, पाणी आणि वीज. या तीन गोष्टी जर त्याला मिळाल्या, तरच त्याचा व्यवहार सुरळीतपणे चालू शकतो. यापैकी वीज त्यांच्या हातात नाही, पाणी हा त्यांचा विषय नाही. त्यामुळे कर्ज पुरवठा याबद्दल पवारसाहेब, बरंचसं काही करू शकत होते आणि त्यांनी ते केलेसुद्धा.

मला असे म्हणायचे आहे, की त्यांच्या कारकिर्दीत कर्जपुरवठा तीनपटींनी झाला म्हणजे आधी जो होत होता त्याच्या तीनपटींनी! एवढंच नव्हे; तर स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शेतकऱ्यांसाठी कधी न घडलेली अशा प्रकारची सुमारे ६५ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी योजना राबविण्यात आली, हीदेखील एक महत्त्वाची गोष्ट आहे.

त्यांच्याच काळात शेतीचं उत्पादन हे शिगेला पोहोचले. आजपर्यंत आपल्या देशाच्या इतिहासात एवढं धान्याचं उत्पादन साधारण २३० दशलक्ष टन असे झालेले आहे. यालाही सबळ कारणं आहेत. कृषिविकासाचा दर साधारणपणे ३.७ असा झाला. हाही यापूर्वी कधीच झाला नव्हता. या सर्वांची गोळा बेरीज म्हणून, साहेबांना परत हेच खातं देण्यात आले असे मला वाटते.





आपल्या देशाची जर गरज असेल आणि आपला जो आर्थिक विकास होत आहे, हा आर्थिक विकास सर्वांच्या हिताचा असा व्हायला हवा असेल तर शेतकरी त्यातला आद्य घटक आहे. या आद्य घटकाला आपण जर सांभाळून घेतलं, तर सर्वांना सांभाळून घेतल्यासारखे आहे आणि तेच नेमकं काम त्यांच्या या योजनेमुळे घडले आहे. म्हणूनच हे खाते त्यांना परत देण्यात आले.

नुकत्याच झालेल्या निवडणुकींचे निकाल अपेक्षितच होते. खरंतर या शासनापुढं आता मोठमोठी आव्हानं आहेत. काही आव्हानं तर त्यांनी स्वत:च निर्माण केलेली आहेत. त्यांच्या कारकिर्दीत म्हणजे पूर्वीच्या, आधीच्या कारर्किर्दीमध्ये त्यांनी जे काही कर्जमाफी आणि इतर पॉप्यूलर्स् अशा स्कीम राबवल्या त्याचा आर्थिक बोजा या शासनावर फार मोठा आला आहे आणि त्याचं योग्य ते प्रावधान त्यांना अंदाजपत्रकात करावं लागणार आहे. त्यादृष्टीने ते फार मोठं आव्हान आहे. दुसरं आव्हान जे केवळ आर्थिक आहे असं नव्हे; माझ्या दृष्टीने ते फार मोठं आव्हान आहे, ते म्हणजे आता होणारा हा जो विकास आहे हा विकास सर्वसमावेशक असा नाही.

समाजातल्या एका विशिष्ट वर्गाकरिता तो सीमित आहे. समाजातील वरच्या थरातील १० किंवा १५ जास्तीत जास्त २० टक्के लोक आपण सोडले, कंपन्या आपण सोडल्या, तर इतरांपर्यंत हा विकास अजून पोहोचलेला नाही. वस्तुत: ज्या मानाने आर्थिक विकास झाला, त्या तुलनेमध्ये तेवढी रोजगार निर्मिती झालेली नाही, ही रोजगारनिर्मिती झालेली नसल्यामुळे समाजात एक प्रकारचा असंतोष जणू उंबरठ्यावर उभा आहे. हा सामाजिक असंतोष टाळायचा असेल, तर हा क्रोध जो आहे हा ऑल इन्क्लूझीव म्हणजे सगळ्यांपर्यंत पोहोचेल अशा पद्धतीनेच आपली धोरणं त्यांना राबवावी लागतील. याचाच दुसरा अर्थ हा आहे की बहुजन समाज ज्याला आपण शेतकरीवर्ग म्हणतो, त्याच्याकडे पूर्णपणे लक्ष दिल्याशिवाय इतर क्षेत्रांकडे जरी दुर्लक्ष झालं तरी चालेल; परंतु शेतकरीवर्गाच्या उन्नतीचा कृतिशील विचार केल्याशिवाय तरणोपाय नाही. आत्तापर्यंत गेल्या ६० वर्षे त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचं निवारण होणं शक्य नाही.

मला असे वाटते, की सी. सुब्रह्मण्यम नंतर या खात्याला दिग्गज व्यक्तिमत्त्व किंवा हाडाचा शेतकरी म्हणून कोणी मिळालं असेल, तर शरद पवार साहेबच मिळाले! यापुढे त्यांच्याकडून अपेक्षाही वाढल्या आहेत. खरं म्हणजे कर्ज उपलब्ध

करून देणे हे एक काम आहे; परंतु कर्जाला जर चौदा आणि सोळा टक्के असे चढे व्याजदर लागणार असतील, तर निसर्गावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्याला तेवढ्या व्याजाने ते पैसे भरणे शक्यच नसते म्हणूनच तो थकबाकीदार होत असतो. म्हणूनच त्याला कर्जमाफीची योजना आपल्याला पुढे करावी लागते. मला असं वाटतं की, हे आता थांबलं पाहिजे. शेतकऱ्याला मिळणारं कर्ज हे पाच ते सात टक्क्यांपर्यंत मिळालं पाहिजे.

लहान शेतकरी असेल, तर त्याला चार-पाच टक्क्यांनी कर्ज मिळायला पाहिजे. मोठा शेतकरी असला, तर त्याला सहा-सात टक्क्यांपर्यंत मिळायला हरकत नाही. जसं साधारणत: बाजारामध्ये चांगल्यातले चांगले उद्योगपती आहेत, त्यांना आजही पाच-सात टक्क्यांमध्ये पैसे मिळतात. तसंच जे चांगले शेतकरी आहेत त्यांना ते कां मिळू नये? शेती हा एक कारखानदारीपेक्षाही जास्त उदात्त व्यवसाय नाही का? शेतकऱ्यांशिवाय कोणाचंच कधी धकले नाही. शेतकऱ्याला आपण संस्कृतीचा कणा म्हणतो ना? शेतकऱ्याकडे त्यादृष्टीने बघणेही आवश्यक आहे. त्याला कमीत कमी व्याजदरात कर्ज मिळायला पाहिजे. केवळ एवढेच नव्हे तर आता कोरडवाहू शेतकऱ्याकडेसुद्धा पहायला हवे. आतापर्यंत आपण जे काही केलं ते पुष्कळ केलं. ते बहुतांशी बागायती शेतकऱ्यांसाठी खूप काही केलं; परंतु कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी काहीतरी करण्याची गरज आहे.

आता कपाशीचं बियाणं चांगलं पाहिजे आहे. कपाशीच्या बियाणाची मुबलकता वाढवली पाहिजे. शेतकऱ्यांपर्यंत कमीतकमी किमतीत ते कसे पोहोचेल याची व्यवस्था करता आली पाहिजे. त्याला काही ना काही प्रोटेक्टिव्ह इरिगेशन म्हणून कमीतकमी आजच्या ज्या आधुनिक सिंचनपद्धत आणि तत्सम सुविधा त्याला त्याच्या शेतात उपलब्ध होण्याच्या दिशेने योग्य ती मदत करणे गरजेचे आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतावर त्याला नेणे शक्य झाले पाहिजे. म्हणजेच कोरडवाहू शेतकऱ्याला बागायती एक एकर का असेना, करायला हवं. असं जरी आपण अभिवचन दिलं तरी ते जमण्यासारखं आहे. त्यात दोन अडचणी आहेत, त्यांच्याकडे विजेचा पुरवठा नसतो. तेव्हा त्याला अपारंपरिक स्त्रोतांमधून आपण वीज उपलब्ध करून दिली पाहिजे.

सौरऊर्जेवर चालणारा पंप देऊ शकलो, तसेच चांगल्या प्रतीचं बियाणं जर

आपण देऊ शकलो तर ते खूपच योग्य ठरेल. मला असं वाटते की, कोरडवाहू शेतकऱ्याला त्याच्या शेतात तळं करून दिलं आणि त्यात सौर ऊर्जेचा सौर पंप बसवून दिला किमान दीड-दोन एकरापर्यंत त्या शेतीला पाणी मिळेल अशी व्यवस्था करून द्यायची. जरी बारमाही पाणी नसले, हंगामी पाणी मिळालं तरी चालेल. त्याला जास्तीचं दोनदा पाणी दिलं, तर जेव्हा पाऊस कधी कधी फार लांबतो तेव्हा किंवा बिलकूलच पाणी नसते तेव्हा तो दोन पाळ्या शेतीला पाणी देऊ शकला तरी त्याच्या उत्पादनात साधारणत: ३० ते ३५ टक्क्यांचा फरक पडतो! आपल्या रेकॉर्डवर हे आल्यामुळे आपल्याला याची कल्पना आहे. तेव्हा मला असे वाटते की, साहेब, कोरडवाहू शेतकऱ्यांपर्यंत या पद्धतीने जरी पोहोचू शकले, तर इतिहासात साहेबांचं नाव, जे यापूर्वीच नोंदले गेले आहे, पण ते सुवर्णाक्षरांनी लिहिल्यासारखं होईल!

**श्री. वानखेडे –** भाऊ, मला असे म्हणायचे आहे, की कर्जमाफीच्या ऐवजी जसे आपण आताच सांगितले, की शेतकऱ्याच्या शेतात तळे असले पाहिजे, त्याला सौरऊर्जेचा पंप उपलब्ध करून दिला पाहिजे, तर कर्जमाफीचा पर्याय म्हणून हे सर्व जर दिले, तर कितपत फायदेशीर ठरू शकेल? यासंदर्भात पवारसाहेबांकडून तुम्ही काय अपेक्षा करता?

**भाऊ –** एक स्पष्ट आहे, की कर्जमाफी ही मला न पटणारी गोष्ट आहे. कोणत्याही माणसाला कोणतीही गोष्ट फुकट उपलब्ध करून दिली, तर त्याच्या सवयी बिघडतात. आपली संस्कृती ही श्रमाधारित आहे. माझे असे म्हणणे आहे, की ६० हजार कोटी रुपये एवढी कर्जमाफी शेतकऱ्यांना देण्यापेक्षा तीनपट करून म्हणजे दोन लाख हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना द्यावेत, पण ते मी आताच सांगितलेल्या पद्धतीनं जर दिले म्हणजे त्याला त्याच्या शेतात विहीर खोदून दिली किंवा तळं करून दिलं, त्याला एक सौरऊर्जेचा पंप दिला, तर तो कायमस्वरूपी स्वावलंबी होईल आणि ती खरी आपली संस्कृती आहे.

आपण केवळ निवडणुकीकडे डोळे ठेवून वागलो तर या देशाचं भवितव्य उज्ज्वल होईल असं नाही. शासनाने शेतकऱ्याला एकसंघ राज्य करण्याची जी संधी प्राप्त करून दिली आहे, त्याचा पुरेपूर फायदा त्यांनी घ्यायला पाहिजे आणि पाच वर्षांपेक्षा एकदाच पन्नास वर्षांचं नियोजन करायला पाहिजे. शेतकरी स्वावलंबी कसा होईल? हे बघितले पाहिजे, कारण, त्यानेच आपला देश बलवत्तर होईल, महासत्ता

होईल असा माझा पूर्ण विश्वास आहे; परंतु शेतकऱ्यांना अशा वाईट सवयी लावता कामा नये.

**श्री. वानखेडे –** भाऊ, कर्जमाफीचा निर्णय एकंदरीत चुकला आहे, असे आपण म्हणू शकतो का?

**भाऊ –** शेतकऱ्याला जी काही मदत केली ती उत्तमच होती, ज्या पद्धतीने ती केली गेली ती पद्धत चुकीची आहे. ही पद्धत आपण जर बदलवली, त्याला कॅशच्या ऐवजी कधीतरी त्याचं खातं कोर केल्याशिवाय आपण पुढे जाऊ शकणार नाही. शासनाने एकवेळ असे केले तिथपर्यंत ठीक आहे; पण प्रत्येक वेळी असच करीत राहणे योग्य होणार नाही! अर्थात, शेतकऱ्याला बँका कर्जासाठी दारात उभंही करीत नाहीत हे सत्य आहे. कारण, तो मागच्या वेळी थकबाकीदार होता म्हणून, शेवटी शेतकऱ्यांचे प्रश्न त्यामुळे सुटतील किंवा सुटले का? हा प्रश्न उभाच आहे. यक्ष प्रश्न म्हणून आहे, जे झालं ते विसरुन, ज्या पद्धतीनं ते केले गेले ती पद्धत बरोबर नाही. जे झालं त्याच्याबद्दल माझे काही म्हणणं नाही. याच्या उलट मी जसं म्हणतो आहे तसं जर होऊ शकले तर हे प्रश्न कायमस्वरूपी सुटतील.

**श्री. वानखेडे –** याचा अर्थ शेतकऱ्याला कर्जमाफी करण्यापेक्षा त्याला कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे, त्यातल्या त्यात त्याला बियाणं चांगल्या गुणवत्तेचं आणि सहजतेनं मिळालं पाहिजे, त्याला शेतामध्ये शेततळं मिळालं पाहिजे आणि सौरऊर्जेच्या माध्यमातून जर त्याला ऊर्जा दिली तर तो प्रगतीकडे वाटचाल करू शकतो आणि नेमक्या याच अपेक्षा आपल्याला पवारसाहेबांकडून आहेत, असं आपल्याला म्हणायचे आहे?

**भाऊ –** निश्चितपणे.

**श्री. वानखेडे –** भाऊ, कृषी खात्यासंदर्भात शासनाने नेमके काय करणे आवश्यक आहे?

**भाऊ –** सर्वप्रथम मला असं वाटते, की जसे रेल्वेचं अंदाजपत्रक आहे तसं आपण कृषी खात्याचंसुद्धा स्वतंत्र अंदाजपत्रक करावं. कृषी खात्याशी संबंधित जेवढी काही खाती आहेत उदा. वॉटर रिसोर्सेस आहे, इरिगेशन खाते आहे, अजूनही काही खाती आहेत, त्या सर्व मंत्र्यांचं किंवा खात्यांचे एकत्रीकरण करून, त्या अंदाजपत्रकात त्याचे सर्वांचे प्रावधान झाले पाहिजे. आपण शेतकऱ्यांना आधी काय

आश्वासन दिले होते आणि मागच्या वर्षी आपण त्यांना काय दिलं? असा प्रत्येक वर्षाचा हिशोब हा कृषी खात्याला आपल्या देशाला देता आला पाहिजे. जर, आपण अशा पद्धतीने केले तर कृषी खाते दुसऱ्यांबरोबर त्या बास्केटमध्ये चाललं जातं. त्याच्याऐवजी आपल्याला प्रत्येक विषयाची स्वतंत्र माहिती मिळेल.

प्रत्येक विषयात आपल्याला काय बदल घडवून आणायला पाहिजे, हेही समजू शकेल. कृषी मंत्रालयाचे एक स्वतंत्र अंदाजपत्रक असावं. कृषी हा केवढा महत्त्वाचा विषय आहे! आजही देशाच्या एकूण उत्पादनाच्या २० टक्के तिथूनच उत्पन्न मिळत असते आणि आजही असलेल्या देशाच्या एकूण रोजगारामध्ये ६० टक्के रोजगार त्यातून मिळतो. असे असताना त्याला योग्य तो प्लॅटफॉर्म मिळत नाही याचं कारण या मोठ्या बजेटमध्ये सर्व लोक बोलताना शेतीबद्दल खूप काही चांगलं बोलतात; पण करायची वेळ आली, की त्या मोठ्या बजेटमध्ये ते लहानसं असं कुठंतरी बसून जातं.

साहेब आल्यापासून त्यात फरक पडला आहे. त्यांचं स्वत:चं वजन त्याला मिळालं. त्यामुळे ते काम जमते आहे. म्हणून जर साहेबांनी याला जरा रेटा लावला तर ते शक्य होईल. कृषीसाठी एक स्वतंत्र अंदाजपत्रक असणे अतिशय गरजेचेच आहे. त्यात थोडासा पाण्याचा भाग येईल, त्यानंतर थोडासा विजेचा भाग येईल, त्यानंतर ग्रामीण रस्त्यांचा भाग येईल, पण या सर्वांचे भाग जरी वेगवेगळे असले, तरी ते एकत्रीतपणे जर मांडता येतील. एकूण ग्रामीण विकासासाठी आपण काय करतो आहोत, हेही चित्र त्यामुळे समजेल.





# वाहत्या पाण्यानं काठावर पडणारं गदळ!

'ॲग्रोवन'ची व्हिडिओ कॉन्फरन्स

– श्रीमंत माने – ०१.०७.२००९

*परिस्थितीची खरी जाणीव, पैशांचं महत्त्व, तंत्रज्ञानाची आव्हानं, गलिच्छ राजकारणातले चढउतार असे अत्यंत ज्वलंत कंगोरे असणाऱ्या शेती, पिकं व पाणीपुरवठा या विषयांवरचा हा संवाद वाचण्यासारखा आहे. प्रश्न विचारणारे शेतकरी त्यांच्या स्वार्थ, त्यांच्या अडचणी, त्यांची असहायता मांडताना कोणताही संकोच करत नाहीत. एवढच नव्हे; तर वास्तविकतेच जहर पचवून श्री. भवरलालजींसारख्या मुरब्बी माणसालाही न सुचलेले मार्ग ते सुचवतात.*

*ग्रामीण भागातल्या राजकारणापासून तसं पाहायला गेल्यास ज्याप्रमाणे शेतकरी अलिप्त राहूच शकत नाहीत. तद्वतच कारखानदार वा उत्पादक म्हणजे भाऊही राहू शकत नाहीत. अतिशय रंगलेल्या या संवादातून या दोघांचीही अगतिकता त्या स्वच्छ पाण्याखालच्या तळासारखी वरूनही स्पष्ट दिसते.*

**श्री. श्रीमंत माने –** (कै.) वसंतराव नाईक यांचा जयंतीदिन आपण 'कृषी दिन' म्हणून साजरा करतो. या दिनाचं औचित्य साधून आदरणीय श्री. भवरलाल जैन तथा भाऊ यांच्याशी जलव्यवस्थापन किंवा पाण्याचा कार्यक्षम वापर यासंदर्भात राज्यभरातील शेतकऱ्यांचा आजच्या व्हीडीओ कॉन्फरन्स कार्यक्रमाद्वारे संवाद घडवून आणत आहोत. खरेतर, महाराष्ट्रातल्याच नव्हे; तर जगभरातल्या शेतकऱ्यांना भाऊंबद्दल वेगळं सांगण्याची गरज नाही.

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना तर यासंदर्भात अजिबात वेगळे सांगण्याची गरज नाही. गेल्या दीड-दोन वर्षांपासून संपूर्ण जग मंदीचा सामना करीत आहे. संपूर्ण जगातील उद्योग आज संकटात आल्याचं चित्र आपल्याला स्पष्टपणे दिसते आहे. अशा वेळी भाऊंचा जैन उद्योगसमूह मात्र जगातील वेगवेगळ्या कंपन्या आपल्या ताब्यात घेत आहे. आपल्या महाराष्ट्राचा झेंडा त्यामुळे जगभर फडकतो आहे.

एवढेच नव्हे; तर सातासमुद्रापल्याड आपला झेंडा फडकताना दिसतो. असं एक सुखावह चित्र आपल्याला विशेषत: गेल्या वर्ष-दोन वर्षांत म्हणजे २००७-०८ आणि २००९ मधल्या सहा महिन्यांपासून



दिसत आहे. या दोन वर्षांत जगातील प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या कंपन्या त्यांच्या पंखाखाली येत आहेत, असं हे चित्र आहे; पण आज हे जे यश आपल्याला दिसते आहे, त्यामागील मुख्य प्रेरणा आदरणीय मोठ्याभाऊंची आहे आणि ती अशी सहज साध्य होत नसते. त्यामागे त्यांचे अथक कष्ट आहेत, प्रचंड परिश्रम आहेत आणि त्याचबरोबर त्यांची दूरदृष्टी आहे.

आज आदरणीय श्री. भवरलालजी जैन हे ७२ वर्षांचे आहेत. चाळीस वर्षांपूर्वी जग एकविसाव्या शतकामध्ये कुठल्या प्रश्नांवर, समस्यांवर चिंताग्रस्त असेल, हे त्यांनी दूरदृष्टीने पाहिले आहे. पाण्याचा वापर या विषयावर त्यांनी काम सुरू केले. केवळ कामच नव्हे; तर प्रबोधनाबरोबरच त्याला एकूणच शेतीला आणि पाण्याच्या वापराला ज्याला एक व्यावसायिकतेचा स्पर्श म्हणता येईल, असा स्पर्श त्यांच्या सक्रिय कार्यातून मिळाला आहे. त्यानंतरची जी वाटचाल आहे, ती संपूर्ण महाराष्ट्राच्याच काय देशाच्या नजरेसमोर आहे! त्यांच्या या अनमोल कार्याबद्दल त्यांना गेल्या वर्षीचा 'पद्मश्री' पुरस्कार प्रदान झाला. त्यांना आतापर्यंत चार विद्यापीठांतील ऑननरी डॉक्टरेट पदव्याही प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

केवळ जळगावला किंवा खानदेशलाच नव्हे; तर संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटावा असा कामाचा वटवृक्ष त्यांनी उभा केलेला आहे. पुन्हा एकदा भाऊंचे 'सकाळ' परिवाराचे सदस्य असलेल्या शेतकऱ्यांमध्ये मी स्वागत करतो. आदरणीय भाऊंना विनंती करतो, की आपल्याला त्यांनी आपल्याला शेतीक्षेत्रातील पाणीवापराच्या समस्या, पाण्याच्या उपाययोजना, ठिबक सिंचनाचा वापर इ. विषयांवर मार्गदर्शन करावे. त्यांना नेहमीप्रमाणे शेतकरी आपल्या समस्यांवर प्रश्न विचारतील. अशा प्रकारे आपण प्रश्नोत्तराच्या रूपात ही व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित केली. त्याचा सर्व शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा. त्यांच्या कामाबद्दलची प्रेरणा, त्यांच्यासंदर्भातलं जगामधील पाण्याच्या वापरासंदर्भातील चित्र आणि एकूणच आपले शेतकरी आणि त्यांची शक्तिस्थळं कोणती आहेत? आपल्या शेतकऱ्यांमध्ये कोणत्या उणिवा आहेत? यासंदर्भात भाऊंनी प्रास्ताविकास सुरवात करावी, अशी मी त्यांना विनंती करतो. त्यानंतर आपण प्रश्नोत्तराचा तास घेऊ.

**भाऊ –** सर्वप्रथम वसंतराव नाईक यांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो. उपस्थित शेतकरी आणि इतर नागरिक बंधूंचे स्वागत करतो. खरंतर पाण्याला आपण

जीवन म्हणतो; पण जेवढे जिवाला जपतो तेवढे पाण्याला जपतो का? असा प्रश्न प्रत्येकाने स्वत:च्या मनाला जर विचारला, तर स्पष्ट होते, की पाणी महत्त्वाची बाब आहे, त्या अनुषंगाने आपल्यापैकी बऱ्याच लोकांनी अद्याप विचार केलेला नाही. पाणी एक ईश्वरदत्त देणगी आहे, याचाही आपल्याला बऱ्याच वेळा विसर पडतो. पृथ्वीच्या पाठीवर पडणारं पाणी गेल्या लाखो वर्षांपासून तेवढेच आहे आणि जगाची लोकसंख्या मात्र गेल्या १०० वर्षांत जवळजवळ वीसपट झाली आहे.

अशा परिस्थितीत पावसाचे पडणारे पाणी तेवढेच आणि वाढणारी लोकसंख्या जास्त आहे आणि वाढणाऱ्या लोकसंख्येला जे अन्नधान्य लागते, ते धान्य पिकवण्यासाठी लागणारे पाणी, आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारे पाणी, जे नवीन नवीन कारखाने उभारले जातात त्यासाठी लागणारे पाणी यावे तरी कुठून? आणि हे पुरेल तरी कसे? पाणी हे व्यवस्थित पडणाऱ्यापैकी बाब आहे. जिथे जेवढे पाहिजे तिथे तेवढे पडते. सगळ्या ठिकाणी एकसारखे पडते आहे. आपल्याला ४०० किंवा ५०० एम्.एम्. पाऊस लागतो आणि तेवढे पाणी बहुतांशी सर्व ठिकाणी पडते, असेही होते; पण नेमके होते असे, की सर्वसाधारणपणे २००० ते ३००० एम्.एम्.पर्यंत एका ठिकाणी पाऊस पडतो, तर दुसऱ्या ठिकाणी २०० एम.एम. देखील पडत नाही. त्यामुळे पडणाऱ्या पावसालासुद्धा कसे सामावून घ्यावे, ते कसे गोळा करावे, त्याचा वापर कसा करावा? ही आपल्यासमोर एक मोठी समस्या बनली आहे, ही एक बाब झाली.

दुसरी बाब म्हणजे, पडणारा पाऊस अशा पद्धतीने पडतो. पावसाळा साधारणत: १०० ते ११० दिवसच असतो असे आपण गृहीत धरतो; परंतु आश्चर्याची गोष्ट, की ९० टक्के पाऊस हा साधारणत: वीस दिवसांतच पडून जातो. त्यामुळे ज्या वेळी पडतो, धो.. धो..धो.. पडतो, त्या वेळी त्याला सामावून किंवा त्याचा जलसाठा करून ठेवणे हे जवळपास अशक्य असते. समजा, जिथे मोठे डोंगर असतील तिथे खूप पाऊस पडतो आणि समुद्र जवळच असल्यामुळे ते पाणी समुद्राला जाऊन मिळते, तिथे तो डोंगरच एवढा मोठा असतो, त्यामुळे त्याला इकडे आणायचे, हीदेखील फार खर्चाची बाब होते. ते आपल्याला अजून जमले नाही. इतर देशांनी डोंगरावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा जलसाठा करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याला तसे करता आले नाही.

केवळ पाऊस कमी पडतो एवढेच नव्हे; तर पडणारा पाऊस कशा पद्धतीने पडतो याचेही फार महत्त्व आहे. या पडणाऱ्या पावसाचा आणि पाण्याचा वापर आपण कसा करतो? हा त्यापुढचा प्रश्न आहे. आताच मी आकडेवारी पाहत होतो. त्यात असे नमूद आहे, की साधारणत: शेतीमध्ये आपण ज्या पाण्याचा वापर करतो, त्यातले ते ६० ते ६२ टक्के पाणी वाया घालवतो. याचाच अर्थ असा, की शेताला पाणी देतो, पण पिकाला द्यायला पाहिजे, पिकाला देत नाही, तर शेताला देतो. बरं, पिकलाही दिले तरी माझी हरकत नाही. खरं म्हणजे तेही चुकीचे आहे. पिकाच्या मुळाला आपण पाणी द्यावयास हवे, पण आपण आताच म्हटल्याप्रमाणे बरेच पाणी पिकाला देताना वाया घालवतो.

पिकाबरोबरच जास्तीत जास्त पाणी जमिनीवर देतो. त्यामुळे जमिनीपासून पिकाच्या मुळांपर्यंत पोहोचताना बरेचसे पाणी वाया जाते, पाणी कमी होते, त्यामुळे जलसाठा करूनही काहीच उपयोग होत नाही, अशा वाया जाणाऱ्या पाण्याचे बाष्पीभवन होते. साठ टक्के पाणी आपण चुकीच्या पद्धतीने वापरतो; पण ती पद्धत गृहीत धरली, तरी त्यातल्याही वेस्टेजचे प्रमाण ६० टक्के आहे आणि त्यानंतर ज्या पद्धतीने देतो, त्या पाणी देण्याच्या पद्धतीमध्येसुद्धा या चुका करतो. त्यामुळे जेवढे वापरायला पाहिजे, त्यात ७०-८० टक्के असेच आपण वापरतो. ते वेस्टेज पद्धतीने वापरतो, हाही भाग वेगळा.

पुढचा प्रश्न असा, की अशा पद्धतीने आपण जर पाणी वापरले, तर पाण्याचा कार्यक्षम पद्धतीने वापर होतो आहे का? 'वापरत नाही' हाच निष्कर्श त्यातून निघतो. पाण्याच्या आणखी समस्या यातून निर्माण होतात आणि याला केवळ शेती जबाबदार आहे असे नाही. घरगुती वापरामध्येसुद्धा आपण नेमके हेच करतो. त्या आकडेवारीप्रमाणे घरगुती वापराचे पाणी साधारणपणे १६ टक्के वाया जाते. पाणी असे वाया घालवून आपल्याला जगता येईल का? ज्या वेळी आपण स्नान करतो, त्या वेळी आपण बरेच पाणी वाया घालवतो.

पूर्वी निदान बादलीमध्ये पाणी घेऊन एक-एक तांब्या पाणी डोक्यावर ओतून घ्यायचे आणि हात दुखला तर थांबायचे. सधन शेतकरीसुद्धा शॉवरचा उपयोग करू लागले आहेत. आता काय बटन दाबले, की शॉवर सुरू होतो! साधारणत: एका शॉवरमध्ये साडेतीनशे लिटर पाणी वापरले जाते. अर्थात, जर नऊ ते अकरा मिनिटं

शॉवर चालला तर किंवा तो शॉवर कसा आहे यावरही बरेच अवलंबून आहे. त्यातही पॉवरफूल मोटार बसवलेली असली, तर आणखी जास्त चालेल. अशा परिस्थितीत घरगुती पाण्याच्या वापरातही सोळा टक्के पाणी आपण वाया घालवतो. कारखानदारही वीस टक्के पाणी अशा प्रकारे वाया घालवतात. जेवढे पाणी ते बाहेर काढतात तेवढं पाणी परत वापरायला जर मिळाले, तर किती छान! पण तो भाग आणखी वेगळाच आहे. हे सर्व मी पाण्याच्या कार्यक्षम वापराबद्दल बोलतो आहे.

आपण जे पाणी वापरतो ते गावंढळ पद्धतीने वापरतो. जेवढे पाणी वापरतो त्याचा पूर्ण उपयोग होत नाही. अशा पद्धतीने 'मॅनेजमेंट ऑफ वॉटर' हा खरा प्रश्न आहे. 'अॅव्हेलॅबिलिटी ऑफ वॉटर' हा तर दुसराच प्रश्न आहे. ते काहीअंशी निसर्गदत्त आहे, त्यापेक्षा जास्त नाहीच आहे.

महाराष्ट्रात एवढी धरणे, एवढ्या सगळ्या गोष्टी असतानासुद्धा आपण सोळा टक्क्यांच्या वर अजून ओलिताखाली आपली शेती नेऊ शकलो नाही. आपण असं ग्राह्य धरू, की आपण सोळा ते अठरा टक्क्यांवर ते नेऊ आणि इतर देशभर ते पन्नास टक्के आहे; पण सर्वांत जास्त धरणं आणि कालवे जर कुठे असतील तर महाराष्ट्रात आहेत. असे असूनही पाण्याचे नियोजन आपल्याला कसे जमत नाही? याचे सर्वांत महत्त्वाचे कारण हे आहे की, हे यशस्वी करण्याची कोणाची अंतःकरणापासून इच्छाच दिसत नाही!

पाणी फुकट आहे त्यामुळे पाण्याची खरी किंमत कळत नाही. जळगावसारख्या शहरात जर आपण ठरवले, की मीटरने मोजून पाणी देऊ तर लोकं अक्षरश: धरणे धरतात, आंदोलने छेडतात, काय नाही करत ते विचारा! मीटर फोडून टाकतात. मला तीन शहरांतून मागणी आली होती की, तुम्ही या शहराचे पाणीपुरवठ्याचे कॉन्ट्रॅक्ट तुमच्याकडे घ्या. आम्ही तुम्हाला सगळं देतो.

आता जगाच्या आकडेवारीत आणि भारताच्या आकडेवारीत फार तफावत नाही. म्हणजे साधारणत: तीस ते चाळीस वर्षांपूर्वी जेवढे लोक या डार्क झोनमध्ये होते, म्हणजे जिथं अजिबात पाणीच पडत नाही, असा जो भाग होता तो आकडा तीस वर्षात तीन पटींनी वाढला. म्हणजे आपला पूर्ण देश आता डार्क झोनमध्ये जावा का? याची वाट लागल्यानंतर खडबडून आपण जागे होणार आहात का? आपण स्वत:ला हा प्रश्न विचारायला पाहिजे. आपण त्याच्याकडे त्यादृष्टीने पाहायला

सुरवात केली, तर गोष्ट ठीक आहे. बरं यामध्ये खरं काय? की याला केवळ खाजगी व्यापारी किंवा संस्था याच जबाबदार आहेत असेही नाही.

शासनालासुद्धा असं वाटत असते, की हे व्हायला हवे आणि खासगीमध्ये तुम्ही बोलणार असाल कोणत्याही शासनकर्त्याशी तर तो अगदी १०० टक्के तुमच्या मताशी सहमत असतो, बाहेर आला म्हणजे अगदीच बदलून जातो. याचे कारण असे आहे, आत्ताच्या राजकारणामध्ये ही बाब बसणं अशक्य आहे. कारण शब्दात अडकून शेतकऱ्यांचा रोष कोण ओढवून घेईल? हा प्रश्न दिवसेंदिवस बिकटच होत राहील. शेवटी आपण पुढच्या पिढीसाठी काय सोडणार आहोत? हा प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो.

पाणीवापराचा प्रश्न केवळ आपल्या देशातच आहे असं नाही, तर जगभर गहन झाला आहे. इतर राष्ट्रांच्या मानाने तो आपल्या देशामध्ये बऱ्याच प्रमाणात कमी आहे. निसर्गाची आपल्यावर खूप मेहेरबानी आहे. त्याचा दुरुपयोग आपण करीत असल्याची चाड आपण कुठेतरी निश्चितच बाळगली पाहिजे. तसे जर आपण करू शकलो, तर मला असं वाटते, की लवकरच आपण प्रत्येक युनिव्हर्सिटीमध्ये 'वॉटर मॅनेजमेंट' हा विषय कम्पलसरी केला पाहिजे. इंजिनिअरिंग ह्यूमॅनिटीज किंवा सायन्स विभाग, विषय हवाच. बिनापाण्याची शेती अशी कल्पनाच करता येत नाही.

शेतकरी आयुष्यभर जशा पद्धतीनं जगतो तसाच तो जगणार आहे. आधीच शेतीचे अनेक ठिकाणी भीषण प्रश्न आहे. त्यात 'कोरडवाहू शेती'चा प्रश्न सर्वाधिक गंभीर आहे. कोरडवाहू शेतकऱ्याला निदान एक एकरासाठी का असेना पाणी देता आलं पाहिजे. आपलं राष्ट्रीय, नैतिक कर्तव्य ते आहे असं मी मानतो. तो दिवस केव्हा उजाडेल हे सांगता येत नाही. मी मात्र त्यासाठी खूप कसोशीने प्रयत्न करणार आहे आणि करतो आहे.

मुश्किलीने मिळालेले पाणी उपलब्ध असले तरी नेमके होते असे की, पाणी उपलब्ध असते तेव्हा वीज नसते. मग त्या पाण्याचा काय उपयोग? पूर्वीप्रमाणे विहिरीवर मोट लावून बैलांना जुपायचे दिवस आता गेलेत. परत दांड धरायचा, ते जमत नाही. कारण, दांड धरल्यानंतर निदान पिकापर्यंत पाणी तर पोहोचले पाहिजे. दांडच पाणी पिऊन जातो. जसे कुंपणच शेत खाऊ लागले आहे, तसे आता दांडही पाणी प्यायला लागले आहे. त्यामुळे तेही शक्य नाही. म्हणजे आपण परत आता

नांगरण्यासाठी बैलांचा वापर आणि मोट चालवायला पुन्हा सुरवात करू की काय?

झपाट्याने विकास करत असताना इतकी वर्षे मागे जाऊ शकत नाही. पुढे जायची आपली इच्छा नाही आणि परत 'पीक पद्धती' हा दुसरा विषय त्यात येतो. पाण्याच्या नियोजनात तेही महत्त्वाचं आहे. जिथे जास्त पाणीच उपलब्ध नाही, तिथे सर्वांत जास्त पाणी पिणारी पिकं आपण लावतो आणि जिथे खूप पाणी आहे, तिथे मात्र आंबे लावतो. (हशा...) अन् तिथून आंबे इथे आणतो. आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेशचे आंबे इथे येतात आणि आपली साखर तिकडे जाते किंवा तिथेही थोडीफार होते. खरंतर मी असं बोलू नये. कारण, मी सगळ्यांचाच रोष पत्करतो आहे; पण बोलणे गरजेचे आहे, असे मला वाटते. महाराष्ट्रामध्ये साखर आहे असे म्हणणे म्हणजे विरोधाभासच आहे. कारण महाराष्ट्रात पाणीच उपलब्ध नाही, तर सर्वात जास्त पाणी पिणारं पीक केळी म्हणा किंवा ऊस म्हणा, ते इथे असण्याचे कारणच नाही.

जिथे खूप पाऊस पडतो, ग्राउंड लेव्हल चांगली आहे, पाण्याचा उपयोग फार कमी खर्चात करता येईल, त्यांना का तो करता येऊ नये? पण असे आहे की, एवढे साखर कारखाने काय कामाचे? एवढे सगळे मजूर काय करतील? असा सगळा बागूलबुवा उभा करून आपण त्या विषयाकडे दुर्लक्ष करतो. या विषयाकडे जास्त दिवस दुर्लक्ष करून चालणार नाही. कधी ना कधी या विषयाला नाजूक रीतीने आपल्याला हाताळावेच लागणार आहे. 'पीक पद्धतीत' हा अत्यंत महत्त्वाचा विषय ठरणार आहे. 'पाण्याचं नियोजन' हा आपला आजचा खरा विषय आहे. जवाहरलाल नेहरूंचे एक वाक्य आठवते, की 'जगात आणि विशेषकरून देशात, सगळ्याच गोष्टी थांबू शकतात; परंतु शेती कधीच थांबू शकत नाही. Everything else can wait but not the agriculture.' हे त्या वेळी त्यांनी उच्चारलेलं वाक्य आहे. ते आजही त्यावेळपेक्षाही जास्त तीव्रतेने आपल्या सर्वांना लागू आहे.

**श्री. विश्वनाथ पाटील –** (अंबप, ता. हातकणंगले, कोल्हापूर) शेतीसाठी हा कायदाच झाला पाहिजे, की जर शेती करायची असेल, तर ठिबक किंवा स्प्रिंकलर बसवले तरच शेती करता येईल; अन्यथा शेती करता येणार नाही, असे होईल का?

**भाऊ –** हो. कोल्हापूरकरांनी एक सूचना दिली, की एक कायदाच करावा. आपले सामाजिक प्रश्न सर्वसाधारणपणे कायद्याने व्यवस्थितपणे सुटतातच, असा

आतापर्यंतचा अनुभव नाही. भारतात सगळ्याच गोष्टींसाठी कायदे अस्तित्त्वात आहेत. उदा. भ्रष्टाचार नसावा असा कायदा आहे, तरी भ्रष्टाचार बंद झाला आहे का? नाही झाला! त्याचप्रमाणे आपण पाण्यासाठी असा कायदा केला, तर त्यात आपला समाज आजच्या परिस्थितीत त्यातून काही ना काहीतरी पळवाटा काढेल. कायद्याची अंमलबजावणी आपल्याकडे करण्यासाठी जी यंत्रणा आहे, ती अजून आपण चांगल्या प्रकारे किंवा कार्यक्षमपणे राबवू शकलेलो नाही.

केवळ कायदा करून जर आपण थांबलो तर ते योग्य ठरत नाही, त्याची अंमलबजावणीही निर्धारित वेळेत व्हायला हवी. निकाल एक महिन्यात, तीन महिन्यांत, सहा महिन्यांत लागायलाच हवेत. बळी तो कानपिळी आणि ज्याच्या हातात लाठी आहे त्याचीच म्हैस तसे होते. म्हणजेच जो सत्तेत आहे, त्याचे सर्वस्व शासन आहे. आजही आपल्याकडे सगळ्या क्षेत्रासाठी कायदे आणि नियम आहेत. पाटाचे पाणी कसे वापरावे याबद्दल नियम आहेतच; परंतु किती लोक ते पाळतात? नियम न पाळणारे कोणते लोक आहेत? याचे जर आपण निरीक्षण केले? तर आपल्या स्पष्टपणे असे नजरेत येईल की आपण ज्याला प्रशासक किंवा पुढारी म्हणतो, त्यांच्यातील अनेकांपासून कायदे तोडण्यास सुरवात होते.

लाल दिव्याची गाडी असली तर तीच सिग्नल तोडू शकते, असा नियमच आहे. सिग्नल तोडू नये असा कायदा जरी असला, तरी त्या गाडीला सिग्नल तोडता येतो. ही जर वस्तु:स्थिती असेल, तर मित्रांनो विचार करा की कायदा पाळायचा नसेल, तर त्याच्या अंमलबजावणीसाठी त्याआधी सक्षम अशी व्यवस्था पाहिजे. अनेक कायदे देशांत आहेत; परंतु ज्या देशात काटेकोरपणे ते पाळले गेले त्या देशातील न्यायालयीन यंत्रणासुद्धा तेवढीच कार्यक्षम आहे, तेवढीच भ्रष्टाचार विरहीत आहे. मनाला येतील अशा तारखा न्यायालयाला वकील मागू शकत नाही अशी तेथील वस्तु:स्थिती आहे.

सहा महिन्यांमध्ये निर्णय लागेल असे कायद्यात बंधनकारक असल्यावर सहा महिन्यात तो निर्णय लागतोच. आपल्याकडे सहा महिन्यांत जो निकाल देता येणं शक्य आहे तो निकाल चाळीस वर्षांपर्यंत लागत नाही. वडिलांनी केलेली फिर्याद मुलाच्या आयुष्यात केव्हातरी निकाली निघते. न्याय मिळाला तरी पुरेसे आहे. अशी आपली आजची समाजरचना आहे म्हणून मला जरूर असे वाटते, की

कायदा असावा. कायदा असल्याने खूप मोठा फरक पडू शकेल निदान जी चांगली माणसं आहेत किंवा ज्यांना कायदा पाळायची नैतिक सवय अंगवळणी आहे, ते तरी निश्चितपणे कायदे पाळतील.

ज्यांना कायदे पाळणाऱ्यांच्या मालिकेत बसावयाचे असेल, तर त्यासाठी अंमल बजावणीचं तंत्रसुद्धा आपल्याला उभं करता आलं पाहिजे. कायदा करीत असताना या दोन्ही गोष्टी जर लक्षात घेतल्या. तर मला असे वाटते, की आपली जी सूचना केली आहे ती व्यवहार्य ठरेल. आज ती आदर्श आहे; परंतु व्यवहार्य असायला हवी. व्यवहार आणि आदर्शवाद या दोघांचा संगम जर करता आला, तरच हा प्रश्न आपण सोडवू शकू. साधारणत: अनुभव असा आहे, की जे सामाजिक प्रश्न असतात ते कायद्याच्या चौकटीत सुटतातच असं नाही.

**श्री. जयपाल फराटे –** (मौजे डिग्रज, ता.मिरज, सांगली) आमच्या दृष्टीने थोडंसं अनुदान वाढवून देण्याचा असा विचार होणार नाही का कधी?

**भाऊ –** आपण म्हटल्याप्रमाणे मला आठवते, की एकदा शरद पवार साहेबांनी नागपूरला तीन सचिवांची मिटिंग घेतली होती. त्यामध्ये इरिगेशनचे सचिव होते, ॲग्रीकल्चरचे, जलसंधारण विभागाचे सचिव होते. मला ते नेमके कोणते वर्ष होते ते आठवत नाही; पण त्या गोष्टीला साधारणत: पंचवीस वर्षे झाली असावीत. 'नो लिफ्ट विदाउट ड्रिप' असं महाराष्ट्र शासनाचं धोरण. त्यादिवशी साहेबांनी सर्वांच्या उपस्थितीत 'हा शासकीय निर्णय आहे', असे परिपत्रक काढावे अशा संबंधितांना आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या. परिपत्रक तर निघाले; परंतु 'नो लिफ्ट विदाउट ड्रिप' हा नियम अजूनपर्यंत पूर्णपणे पाळला गेला असे म्हणता येत नाही.

खरं म्हणजे जवळजवळ ६० टक्के तो पाळला गेला आणि ४० टक्के ज्या लिफ्टस् आहेत, त्या अजूनही विदाउट ड्रिपच आहे. त्यामुळे त्याची अंमलबजावणी जशी व्हायला पाहिजे तशी दुर्दैवाने झाली नाही. यासाठी कोण जबाबदार आहे? हा विषय चर्चेला येणार नाही. एक गोष्ट निश्चित आहे, की आपण जसे म्हणता त्याप्रमाणे या जमिनी क्षारपट होण्याचे एक कारण पाटाचे पाणी आहे. केवळ आपल्याकडेच असे झाले असेही नाही, जगभर तसे झाले आहे. पंजाब, हरियाणात, कॅलिफोर्नियातही असेच झाले आहे आणि त्यावर मार्ग म्हणून अगदी सुरवातीला १९८९ मध्ये अंकलखोपला आम्ही ५०० एकराचा प्रयोग केला होता. त्या वेळी क्षारपट जमिनी उत्पादित जमिनी म्हणून परिवर्तित झाल्या.

केवळ या ठिबक सिंचनामुळेच असे होऊ शकले. या तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ पाणी बचत करण्यासाठी नसून, त्याचबरोबर क्षारपट जमिनीमध्येही कसा बदल घडवून आणता येईल? याचा खूप विचार करून ते आपण करू शकतो. तेव्हा हाही प्रश्न आपण तशा पद्धतीने सोडवू शकतो. दुसरा मुद्दा आपण उपस्थित केला, की सर्वसाधारणपणे सबसिडी वाढवायला पाहिजे. या संदर्भात कोणाचेही दुमत असेल असे मला वाटत नाही. उत्तर महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त किती लाभ मिळू शकेल, हे आपण बघायला पाहिजे. सरकारजवळ अगणित पैसा असेल, तर सर्वांनीच त्याचा फायदा घ्यावा.

जास्तीत जास्त लोकांना सबसिडी द्यायची असेल, तर नियंत्रण ठेवावच लागेल. या सबसिडीचे प्रमाण ३० टक्के असो वा ५० टक्के. जर आपण काहीच नियंत्रण ठेवले नाही तर त्यामधूनही त्याला इतर जे फाटे फुटतात; तेही आपण लक्षात घ्या, अनेक शेतकरी ड्रिप न घेता खोट्या बिलावरून शासनाकडून पैसे वसूल करतात. अशा पद्धतीने सबसिडीचा एक प्रकारे दुरुपयोग सुरू होतो. काही राज्यात आपण ८०–९० टक्के सबसिडी दिली! त्यात आमचा असा अनुभव आहे की, तिथे ती पूर्ण योजनाच बारगळते. त्याचे कारण असं आहे, की शेतकरी आणि ठिबक उत्पादन करणारा किंवा वितरक हातमिळवणी करतात.

शासनाची योजना डब्यात जाते. असे तीन–चार राज्यांत घडलेले आहे. शासकीय योजना बंद पडलेल्या आहेत. महाराष्ट्रात हे फार कमी प्रमाणात घडलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अजूनही ती योजना फार जोरात सुरू आहे. आम्ही तशी हातमिळवणी होऊ देत नाही किंवा करू देण्याच्या विरुद्ध असतो. आमच्या वितरकांनाही ते करू देत नाही. आम्ही स्वत: तसे करण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे म्हणूनच ही योजना अजूनही सुरळीत सुरू आहे. हे लक्षात घ्या की, जर आपल्याला जास्तीतजास्त शेतकऱ्यांना सबसिडी द्यायची असेल, तर त्याचे प्रमाण ५०, ७०, ८०, ९० असे वाढवायचे असेल तर त्यात जे अनेक अनिष्ट प्रकार घडतात, ते घडण्याची शक्यता निर्माण होते.

पन्नास टक्क्यांवर जरी झाले तरी मला वाटते की ते पुरेसे झाले. आपण सर्व शेतकरी समजदार आहात आणि शासनाला सर्वांचा विचार करावा लागतो. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांचा विचार करायचा असेल, तर त्यादृष्टीने हे गरजेचे आहे. पण त्याही

पेक्षा महत्त्वाचे असे आहे की, आपल्याला जरी त्यांनी तीस टक्के अनुदान दिले. आणि निश्चितपणे वीज उपलब्ध करून दिली, तर ही तूट भरून येण्यासारखी आहे. मूळ प्रश्न विजेच्या उपलब्धतेचा आहे. आत्ताच देशाच्या पातळीवर जवळजवळ १५ ते १७ टक्क्यांनी ती कमी आहे. महाराष्ट्रात त्याही पेक्षा जास्त शॉर्टफॉल आहे. अशा परिस्थितीत आपल्याला वीज मुबलक होईल आणि पाहिजे तेव्हा आपण पाणी देऊ शकू असे होणे कठीण आहे.

आम्ही स्वत: तरी या निर्णयापर्यंत पोहोचलो आहोत, की सौरऊर्जेशिवाय पर्याय नाही; पण आजच्या सौरऊर्जेमध्ये फार मोठे प्रश्न आहेत. त्यात एक समस्या अशी आहे, की सर्वसाधारणपणे जर आपल्याला एक-दीड एकराला पाणी द्यायचे असेल आणि सौरऊर्जा वापरायची असेल, तर त्यासाठी तीन-साडेतीन लाखांचा खर्च आहे. शेतकऱ्याला आणि शासनालादेखील ते परवडण्यासारखे नाही; परंतु पाण्याचा विचार केला, तर शासनाला हे परवडू शकते. माझा प्रयत्न असा आहे, की प्रत्येक शेतकऱ्याने निदान दोन-तीन एकरासाठी किंवा जास्तीत जास्त पाच एकरासाठी सौरऊर्जेचा अवलंब केला पाहिजे.

शेतकऱ्याला पाच एकरासाठी पंधरा लाख खर्च येणार असेल तर कोणीही ते घेऊ शकणार नाही; परंतु हा पंधरा लाखांचा खर्च साडेसातपर्यंत कसा येईल? आणि त्या साडेसातमध्ये शासनाला पावणेचार लाख कसे देता येतील हे आम्ही पाहत आहोत. जेणेकरून शेवटी पावणेचार लाखांत शेतकऱ्याला अक्षय-ऊर्जा मिळू शकेल. सूर्याला काही झोप लागत नाही. निवडणूक झाली तरी सूर्याला कोणतीही आचारसंहिता लागू होत नाही. या सर्व बाबी आपल्याला लागू आहेत, त्याला काहीच लागू नसल्यामुळे आपण सूर्यावर निश्चितपणे भरोसा ठेऊ शकतो. शेतीचे काम चांगल्या पद्धतीने होऊ शकते. ही सौरऊर्जा मी पन्नास टक्के कमी किंमतीत महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून द्यावी, असे माझे स्वप्न आहे.

माझी आयुष्ययात्रा संपण्याआधी हे स्वप्न पूर्ण करण्याचा मी चंग बांधला आहे. त्यामुळे सौरपंपांबद्दल खूप जोरात संशोधन सुरू आहे. साधारणत: सहा महिन्यामध्ये पंप कमी भावात मिळेल. जो पंप आधी एक ते दीड लाख रुपयांमध्ये येत होता तो साधारणत: मी पन्नास हजारांपर्यंत देण्याच्या प्रयत्नात आहे. यश येईल अशी स्पष्ट चिन्हे दिसायला लागली आहेत. सौरऊर्जेसाठी लागणारे जे पॅनल असतात त्याचेही

भाव खूप जास्त असतात; पण आता जागतिक बाजारपेठेत हे भाव थोडे थोडे कमी होऊ लागलेत आणि त्यात आणखी काही सुधारणा करून किंवा संशोधन करून हे भाव निम्म्यावर आणता आले, तर उद्दिष्टाच्या जवळ पोहोचल्याचा आनंद मला घेता येईल.

दुसऱ्याने काय करावे किंवा शासनाने काय करावे, याबद्दल जास्त सांगण्यापेक्षा आपण स्वत: काय करू शकतो याचाच जास्त विचार करायचा. प्रत्येकानेच जर असाच विचार केला, की आपण स्वत: काय करू शकतो? तर आपल्या समस्येचे निराकरण आपण स्वतःच लवकर करू शकू. शासनाकडूनच प्रत्येक गोष्टीची अपेक्षा ठेवणं किंवा शासनावरच अवलंबून राहणे दिवसेंदिवस आता कठीण होणार आहे. शेतीला चांगले दिवस आले हे मात्र मी निश्चितपणे सांगू इच्छितो. त्याचे कारण असे आहे की, जमीन कमी होते आहे, पाणी कमी होते आहे. त्यामुळे शेतीमालाला भाव निश्चितच चांगले राहणार आहेत आणि शेतीमालाला जर भाव चांगले मिळाले तर शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार आहेत. केवळ तसे नव्हे; तुमच्या दाढीत हात घालावा लागेल अशी शासनावर परिस्थिती येणार आहे. त्यामुळे शासन हे करेल, करणार नाही असेही नाही.

आजच्या परिस्थितीत आपण लक्षात घेतलं पाहिजे, की आपल्या देशात असलेल्या सर्व शेतकऱ्यांना, म्हणजे विशेषकरून सर्व कोरडवाहू शेतकऱ्यांना जर त्यांना सांभाळायचे असेल, तर त्यांच्यासाठी सौरऊर्जा जेवढी आवश्यक आहे त्यापेक्षा जास्त तुमच्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे त्याचाही प्राधान्याने विचार करावा लागेल. त्यानंतर इतर घटकांकडे वळता येईल. अक्षय उर्जेचा मार्ग असा एक नवीन विषय आज आपल्यासमोर मांडतो आहे. आजपर्यंत महाराष्ट्रातही याबद्दल मी इतरत्र कुठेही बोललो नाही. बारा महिन्यांपासून मी सौर ऊर्जे संदर्भातलचं काम करतो आहे आणि त्या कामातून नवीन दिशा जर देता आली तर जशी १९८७ मध्ये पाणी नियोजनाबद्दल ठिबकच्या माध्यमातून आपण देशभर एक नवीन प्रयोग मांडला तसाच हाही एक नवीन प्रयोग होईल असे मला वाटते. तसे झाले, तर आपल्या समस्यांचे निराकरण होईल असे मला वाटते.

आपण सर्वांनी माझ्यासारखाच विचार करावा आणि आपण आणखी काय करू शकतो, याचा जर विचार केला तर आपण सोबतच आहोत. शेतकऱ्यांना

जास्तीत जास्त चांगली योजना कशी देता येईल? म्हणून आम्ही अमेरिकेतून तंत्रज्ञान येथे आणत आहोत. अमेरिका, इस्त्रायलमध्ये कंपन्या विकत घेत आहोत. जगातील सर्वात चांगले जे असेल, ते लवकरात लवकर शेतकरी बांधवांपर्यंत कसे पोहोचवता येईल याचा सातत्याने विचार करीत आहोत. तो ध्यासच घेतला असून, तो एकाने नव्हे; दोघांनी नव्हे; तर जवळपास आठ हजार लोक याच ध्यासाने प्रेरित होऊन हे काम करीत आहेत. त्यामुळे मला असे वाटते, की आपण आपल्या या समस्यांना काहीअंशी तरी सामोरे जाऊ शकतो.

**श्री. राम घोटे** (औरंगाबाद) – उपलब्ध जलसंपत्तीमधूनच मराठवाड्यात जास्तीतजास्त क्षेत्र सिंचनाखाली कसं आणता येईल?

**भाऊ** – पाटाचे पाणी असले तरी प्रश्न सुटत नाही खरं आहे. कारण, पंधरा दिवसांतून एक आवर्तन अशा पद्धतीनेच पाणी मिळते. पिकं त्या पद्धतीने पाणी घेत नाहीत. कारण, शेतीत तसे करता येत नाही. पिकांना तसे पाणी रोजच्या रोज हवं असतं. आपण पाणी पाट पद्धतीमध्ये देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून आपल्या देशातल्या कमीत कमी तीन राज्यांनी फार मोठा पुढाकार यासाठी घेतला आहे. फ्रान्स आणि स्पेनमध्ये सर्वात लोकप्रिय असलेली एक पद्धत आहे. त्या योजना आपल्याकडे राबवायला सुरवात केली आहे. विशेष म्हणजे हिमाचल प्रदेशात ही योजना राबविली जाते. त्या योजनेचे नाव आहे – ऑन डिमांड इरिगेशन.

हिमाचल प्रदेशात तर जवळजवळ सगळ्याच नद्या उगम पावतात. तिकडच्या भागात प्रचंड प्रमाणात पाउस पडतो. परंतु ज्या वेळी पावसाळा संपतो, त्या वेळी पिण्यासाठीसुद्धा पाणी तिथे नसते. ही वस्तु:स्थिती आहे, त्यांना या सर्व गोष्टींची गरज म्हणूनच भासली. हिमाचल प्रदेश सरकारने आंध्र प्रदेशानंतर पहिल्यांदा एवढा मोठा कार्यक्रम घेतला. त्यानंतर तामीळनाडूने घेतला. तामीळनाडूने आम्हाला पन्नास कोटी रुपयांची ऑर्डर दिली आहे, हिमाचल प्रदेशमधून साधारणत: १०० कोटी रुपयांची ऑर्डर आली आणि आता आंध्रप्रदेशातूनही १०० कोटी रुपयांची ऑर्डर आली आहे. त्यांचे म्हणणे असे आहे, की पन्नास-पन्नास एकराचा गट करून तिथे त्यांनी एक तळं निर्माण केलं, त्यात पाटाचे पाणी देऊन टाकतात आणि तिथल्या चार-पाच शेतकऱ्यांना सांगतात, की 'तुम्ही तुमच्या पद्धतीने वाटून घ्या. पाहिजे तेव्हा पाणी मिळेल.' अशी व्यवस्था ते करत आहेत आणि त्यामुळे ड्रिप इरिगेशनची कार्यक्षमतासुद्धा शंभर टक्क्यांनी वाढते.

पाणी देण्याची ती योजना किंवा संच नाही. जे उपलब्ध पाणी असते त्याचा वापर योग्य पद्धतीने किंवा जास्त कार्यक्षम पद्धतीने कसा करायचा, यासाठीचे ते तंत्रज्ञान आहे. मला आपल्याला अशी विनंती करायची आहे, की आपल्या शासनाकडे किंवा आपल्या पुढारी लोकांकडे हे असे साकडे घातलं पाहिजे. ज्या महाराष्ट्रात या कंपनीचा जन्म झाला आहे, अजूनही आम्ही ज्या राज्यात ४० टक्के माल विकतो आहोत, तिथे अजूनसुद्धा ऑन डिमांड इरिगेशनची सुरवात झालेली नाही. याची काय कारणे आहेत? याबद्दल आपण सर्वांनी विचार करण्यासारखा आहे. सर्वांत मोठे कारण म्हणजे सध्या निवडणूका एवढ्या जोरात असतात की, त्या जोरदार प्रवाहात सर्व मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असावे. पाटाचे पाणी जास्तीत जास्त कार्यक्षम पद्धतीने कसे वापरता येईल, हा एक प्रश्न आपण धसाला लावू या.

आपण दुसरा जो मुद्दा उपस्थित केला की, सर्व जमिनीसारख्या नसतात. त्यामुळे सर्व जमिनींमध्ये एकच ड्रिप इरिगेशन पद्धत चालण्यासारखी नाही. आम्ही तसे करीतच नाही. प्रत्येक शेताचा सर्वे करून, त्या शेताची जी गरज असेल, तशी योजना तयार करतो. जमिनीचा पोत, तिथे पडणारा पाऊस, तेथील तापमान आणि तिथल्या पाण्याचे परीक्षण या सर्वांचा विचार केल्यानंतरच आपण योजना राबवावी आणि जर असे होत नसेल, तर ते आपण करून घ्यावे. त्यासाठी प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी केंद्रे सुरू करण्यात आलेली आहे. आपण विचारले ते योग्यच आहे की, सर्व ठिकाणी एकच योजना राबवली तर चालेल का? असे होत नाही. आम्ही मात्र तसे करीत नाही; पण काही ठिबक उत्पादक करीत असतील, तर आपण त्यांना याची जाणीव करून द्यायला पाहिजे. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या जमिनीचा पोत आणि पाण्याचे परीक्षण करून घेतलेच पाहिजे. आपणही त्याप्रमाणेच योजना आखून दिली पाहिजे. सर्वांसाठी एकच माप हे चालण्यासारखे नाही, ही वस्तुस्थिती आहे.

**श्री. बाळासाहेब नन्नवरे** – पूर्ण जमिनीला आपण एकदम एकाच वेळी पाणी देऊ शकतो का? आणि त्या साठ-सत्तर एकरमध्ये एकदम सिंचन करू शकाल का?

**भाऊ** – साठ ते सत्तर एकरात आपल्याला एकाच वेळी पाणी द्यावयाचे असेल, तर दीडशे हॉर्सपॉवरचा पंप लावावा लागेल, असे करण्याची गरज आहे का? अर्ध्या किंवा एका तासात एक प्लॉट भरून झाला आणि त्यानंतर दुसऱ्या प्लॉटमध्ये गेलो, तर काय बिघडणार आहे? कारण चार तासांत सर्व बदलून जाते

असं होत नाही. तेव्हा आपण हा आग्रह धरायचा, की सर्व शेतकऱ्यांना एकाच वेळी पाणी मिळायची गरज काय आहे?

पहिल्या दहा एकराला, त्यानंतरच्या दहा एकराला ही टप्प्याटप्प्याने देण्याची पद्धत आहे. कारण ते कमी खर्चाचेही आहे आणि जास्त कार्यक्षमदेखील आहे. तांत्रिकदृष्ट्या त्यात अशक्य असे काहीच नाही. एकाच वेळी जास्तीत जास्त क्षेत्रात पाणीपुरवठा करता येईल, पण त्यासाठी तेवढा मोठा तलाव बांधला आहे. वीजेचेही प्रमाण भरपूर. म्हणजे दीडशे अश्वशक्ती चालले पाहिजे नाही तर त्यातच पुरेसा विद्युत दाब मिळाला पाहिजे, तिन्ही फेज मिळाले पाहिजेत. त्यातच जी वीज आपल्याला मिळते ती पूर्ण दाबाने नसल्यामुळे त्यावर पंपच चालत नाही. आपण जर एवढे मोठाले पंप लावले आणि ते चालले नाही, तर काय करणार? त्यामुळे माझा आपल्याला एक विचार असा सांगतो, की जमिनीला तीन किंवा चार भागात वाटून घ्यावे आणि प्रत्येक ब्लॉकमध्ये आपण एकावेळा पाणी देण्याची व्यवस्था करावी आणि एकानंतर दुसऱ्या ब्लॉकमध्ये पाणी जाईल, त्यानंतर तिसऱ्या ब्लॉकमध्ये पाणी जाईल अशी व्यवस्था मात्र करता येईल.

**प्रश्न –** आमच्या जमिनी ओबडधोबड अशा आहेत त्यांना पाणी कसे द्यावं?

**भाऊ –** ठिबक सिंचनपद्धतीत बदल करता येईल. एकप्रकारचे प्रेशर कॉम्पेनसेटिंग ड्रिपर्स असतात. ते कसलेही प्रेशर असले तरी चालतात. सव्वाशे फूट वर किंवा तेवढेच खाली असले तरी चालेल. प्लस-मायनसमध्ये पाच टक्के गृहीत धरा. जर वरच्या झाडाला पंचवीस लिटर्स पाणी मिळाले समजा, तर खालच्या झाडाला वीस लिटर मिळेल एवढाच फक्त फरक पडेल. यापेक्षा जास्त फरक पडणार नाही. वीस लिटर नाही तर बावीस लिटर मिळेल; पण त्यासाठी त्या वेळी ड्रिप सिस्टिम कोणी व्यवस्थित बसवली नसेल किंवा जर ती केली असेल, त्या वेळी प्रेशर कॉम्पेनसेटिंग हे तंत्र उपलब्ध नसेल, तर ते आपल्याला बदलवले पाहिजे. आता हे तंत्र उपलब्ध आहे आणि आपल्याला हे करता येईल. म्हणजे शेत खाली किंवा वर जरी असले तरी त्याला पाणी देता येईल.

**प्रश्न –** आमच्याकडे काही कोरडवाहू शेतकरी आहेत, तर अशा कोरडवाहू शेतीमध्ये आपण कोणत्या प्रकारच्या फुलांचे उत्पादन घ्यावे?

**भाऊ –** ज्या फुलांना चांगली बाजारपेठ उपलब्ध असेल, तशा प्रकारच्या

फुलांचे उत्पादन घेणे इष्ट आहे. मी तुम्हाला जर सांगितले, की गुलाबाची रोपे लावा. त्याला काही अर्थ आहे का? आधी त्यासाठी मार्केट पाहिजे. तिथे बाजारपेठ शोधायला पाहिजे आणि योग्य सोईस्कर बाजारपेठ असेल तरच शेतात लावलेली फुले उगवतात की नाही यावर विचार करायला पाहिजे. इथे काय येईल असा जर आपण नुसता वायफळ विचार करत बसलो तर त्याला काहीच अर्थ नाही.

वांग्याची एक जात मी लावली होती, त्याचं उत्पादन एवढं आलं की शेवटी ते उकिरड्यावर फेकावं लागलं. असे नुकसान झाले तर मनाला खंत वाटते. आपण या गोष्टीचे निरीक्षण केले पाहिजे की, जे मार्केटमध्ये जाणार आहे किंवा ज्या पिकाला बाजारभाव उत्तम मिळणार आहे, तेच फूल आपल्याला घेता येईल का? हा अचूक प्रश्न तुम्ही जर विचारला तर तिथल्या वातावरणाचा आणि जमिनीचा अभ्यास करून मी त्याचे उत्तर देऊ शकेल; परंतु तो प्रश्न तुम्हाला लिहूनच पाठवावा लागेल.

**प्रश्न –** नाशिक हा धरणांचा जिल्हा आहे. त्यामुळे पाणी धरण ते थेट शेतात नेता येईल का? शहरात जे पाणी वाया जाते ते शेतीला जमा करून देता येईल का?

**भाऊ –** आपण ज्या संदर्भात प्रश्न विचारला ते तांत्रिकदृष्ट्या करणे सहज शक्य आहे; पण त्यासाठी भांडवली गुंतवणूक फार मोठी आहे. धरणापासून साधारण ६-७ फूट रुंद असलेले प्लास्टिकचे पाइप आणून आपल्या शेतापर्यंत सोडावे लागतील. त्या पद्धतीने शेताला जर ड्रिप इरिगेशनने पाणी देऊ शकलो तर धरणाचे पाणी शेतावर आले, असा त्याचा अर्थ होईल आणि ही पद्धत नवीन नाही. आपल्या देशासाठी ती नवीन असू शकेल; परंतु आता प्रगत देशात असे कोणतेच धरण बांधले जात नाही, की ज्याचे पाणी अशा ओपन चॅनल पद्धतीने पाटाने शेतापर्यंत नेले जाते.

साहजिकच पाटाचे चाळीस ते साठ टक्के पाणी वाया जाते, आणि तसे आता कोणी करत नाही. आपल्याकडे मात्र तेच सुरू आहे. कारण, आपल्याकडे पाहिजे तेवढी भांडवली गुंतवणूक या विषयासाठी झालीच नाही. शेती आणि पाटबंधारे या सर्व विषयांवर पहिल्या पंचवार्षिक योजनेत पस्तीस कोटी खर्च झाला होता. दहाव्या पंचवार्षिक योजनेत तो आकडा सात कोटींवर आला आहे. तेव्हा शासनाची जेवढी गुंतवणूक शेतीसाठी आणि पाण्यासाठी व्हायला पाहिजे होती, त्या पद्धतीने ती सुरू झाली होती. ती आता हळूहळू कमी होत आली. शरद पवारसाहेब कृषिमंत्री झाल्यावर यात फार मोठा गुणात्मक असा फरक झाला आहे. त्यांच्या वजनामुळे

म्हणा किंवा काही कारणामुळे म्हणा, शेतीला चांगले दिवस आले आहेत. साताचा आकडा हा बारापर्यंत जाईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. या बजेटमध्ये आपण जो विषय प्रस्तुत केला आहे. – जुने पाटबंधारे आणि चाऱ्या यांचे नूतनीकरण करून त्यात मोठमोठे पीव्हीसी पाइप टाकणे खूप आवश्यक आहे, परिणामी दुपटीने पाणी उपलब्ध होईल.

शासनाच्या पूर्णपणे हे लक्षातही आलेले आहे; परंतु भांडवलाच्या गुंतवणुकीचा हा फार मोठा प्रश्न असल्यामुळे तिथे आता परदेशी गुंतवणूक व्हावी का? असे अनेक प्रश्न शासनाच्या समोर उभे आहेत. या बजेटमध्ये थोडंफार काहीतरी प्रावधान होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही. त्यादृष्टीने हालचाल सुरू आहे आणि आपण सर्व मिळून अशी प्रार्थना करू या की, शासन जे काही निवडणुकीच्या वेळेस आश्वासन देईल ते विसरणार नाही, ती सर्व आश्वासने पूर्ण होतील. त्यानंतर आपला प्रश्न सुटू शकेल; पण हे होऊ शकते हे नक्कीच! सर्व प्रगत देशात हे सुरू आहे.

**प्रश्न –** कमी पाण्यात येणारी पिके घ्यावीत. यासाठी कायदा करता येईल का?

**भाऊ –** होय, आपण जे म्हणत आहात त्यात सत्य आहे. धरण आणि त्याची उभारणी ही एक फार मोठी समस्या आहे. जेथून पाणी येते तिथे पाणी मिळत नाही आणि जर उंचवटा असेल, तर उजव्या बाजूला मिळते, डाव्या बाजूला मिळत नाही. हा धरणाच्या एकूण उभारणीचाच दोष आहे, त्यामध्ये खऱ्या अर्थाने काही चुकते आहे अशातला भाग नाही. जर आपल्याला त्याही स्थितीत पाणी द्यायचे असेल, तर त्यासाठी ठिबक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्यायोगे पाणी ज्या भागात द्यायला पाहिजे त्या भागात देऊ शकतो, हाही एक ठिबकचा फार मोठा फायदा आहे. यालाच इक्वीटेबल डिस्ट्रिब्यूशन म्हणतात.

जास्तीत जास्त योग्य आणि न्याय्य वाटप पाण्याचे करायचे असेल, तर आपण ठिबक सिंचन पद्धतीचा उपयोग त्या कामासाठी करू शकतो. असं घडलेलेही आहे, सर्व ठिकाणी घडलेले आहे. आपल्याकडेही ते घडावं, अशी तुमच्याचबरोबर माझीही इच्छा आहे एवढं मात्र नक्कीच सांगू शकतो. शासनाने काय करावे, हे मी सांगू शकणार नाही.

**प्रश्न –** दिलेल्या पाण्याच्या प्रमाणात पिकांचे भाव निश्चित करता येतील कां?

**भाऊ –** तुमची सूचना फार चांगली आहे. ती स्वीकारली जाईल, असे वाटत

नाही. कारण, सर्वांत जास्त पाणी ऊस या पिकाला लागते. ऊस म्हणजे साखर, आपण साखरच खायची नाही असे ठरवले तरच ते शक्य आहे. साखरेमुळे आपली तब्येत सुधारणार आहे, बिघडणार नाही; परंतु मी आयुष्यात कधी चहा प्यायलो नाही आणि साखरही खाल्ली नाही आणि विशेष म्हणजे साखर न खाताही मी गोड बोलू शकतो! (हशा...) याचाच अर्थ असा, की आपल्याला प्रत्येक वेळी हा विचार करण्याची गरज नाही, की साखरेचे उत्पादन अशा तऱ्हेने केलेच पाहिजे; परंतु दुर्दैवाने जर आपण पाण्यावर पिकाचं मूल्यमापन करायला लागलो, तर तुम्हाला सर्वात जास्त किंमत साखरेसाठी मोजावी लागेल. ती चांगली गोष्ट घडेल; पण तसे घडण्याची शक्यता कमी आहे.

आपण म्हणालात त्याप्रमाणे झाले तर फार उत्तम होईल. सर्वांत कमी पाणी लागते ते म्हणजे कापूस पिकाला. कॅशक्रॉप पिकापैकी ते एक आहे. त्या तुलनेत फळबागांनासुद्धा कमी लागते, तर त्या फळबागांनासुद्धा चांगले दिवस येतील. तेव्हा आपली सूचना फार चांगली आहे. मला तरी ही सूचना वाचायला किंवा ऐकायला मिळाली नव्हती; पण पाणी जेवढे जास्त जाईल, तेवढ्या भागावर त्याचे मूल्यमापन व्हावे आणि तशा किंमती ठरवाव्या ही तुमची सूचना आहे. मला असे वाटते की जरी ती व्यवहार्य वाटली, तरी ती अमलात आणणे जमेल असे वाटत नाही; पण जर तसे झाले तर मी तुमच्या आनंदात सहभागी आहे.

**प्रश्न –** ड्रिप इरिगेशन सिस्टिमच्या अनुदानासाठी ज्या वेळी सरकारी यंत्रणेकडे अर्ज केला, त्या वेळी ते भाडेपट्ट्यावर शेती करतात, म्हणून त्यांना अनुदान का नाकारण्यात आलेले आहे?

**भाऊ –** आजची जी शासकीय मार्गदर्शक तत्त्वे आहेत, त्यात भाडेपट्ट्यावर असणाऱ्या शेतीला किंवा शेतकऱ्याला अनुदान मिळत नाही, हे सत्य आहे. आपण शासनाकडे आग्रह धरला, की भाडेपट्ट्याच्या तत्त्वावरच्या शेतीला सबसिडी द्यावी तर ते मान्य होईल असे मला तरी वाटत नाही. कारण यू.पी., बिहार आणि उत्तराखंड वगैरे अशी मोठमोठाली राज्ये आहेत, की जिथे अजूनसुद्धा या ना त्या नात्याने, येनकेनप्रकारे जमीनदारी चालू आहे आणि त्यांच्याकडे प्रत्येकी सुमारे ७००- ते ८०० एकर जमिनी आहेत.

सबंध देशासाठी एकच नियम करावा लागेल. तो जर नियम आपण केला, तर भाडेपट्टयाने ज्यांच्याकडे जमिनी आहेत, त्यांनाही सबसिडी द्यायच्या ठरल्या, तर सबसिडीची रक्कम अमर्यादित असल्यामुळे तिथे कुठेतरी मर्यादा ही घालावीच लागेल. यात आपण दुर्दैवाने अधिक काही करू शकू असे वाटत नाही, एक मात्र करता येईल की निदान शासन दरबारी हा विषय असा मांडता येईल, जर भाडेपट्टा तीस वर्षांसाठीचा असेल आणि सर्वसाधारणपणे दहा एकराच्या आत शेती असेल, तर निदान दहा एकरासाठी नाही. पाच एकरासाठी का होईना त्यांच्या नियमात बसवून सबसिडी देण्याचा प्रयत्न करता येईल; पण ते घडेल की नाही याबद्दल मला शंका आहे. त्यात आणखी फाटे फुटून त्या सबसिडीचा दुरुपयोग होऊ शकतो. ही वस्तु:स्थिती आहे. त्यामुळे शासन अशा अनुदानास मान्यता देईल असे मला तरी वाटत नाही.

बरेच प्रश्न शासनासाठी गुंतागुंतीचे असतात. त्यामुळे आणखी एक गुंता वाढवायचा असे शासन करेल असे मला वाटत नाही. ही समस्या अगदी निकडीची आहे आणि थोडाफार प्रयत्न त्यादृष्टीने करायला हरकत नाही, असे माझ्या लक्षात आले आहे. मी तसा प्रयत्न माझ्यातर्फे करीन. सदिच्छा आणि प्रयत्न हेच माझ्या हाती आहे.

दुसरे असे, की आपण मल्चींगबद्दल बोललात ते तंत्र आहे. ते अत्यंत व्यवस्थित, साधंसुधं आणि खरं आहे. जर तुमच्याकडे पाणी नसेल, कोरडवाहू शेती असली, तर ते शक्य आहे. जर त्याचा आपण उपयोग केला, तर निदान काही दिवस का असेना, जेवढी आपल्या पिकांना गरज आहे, तेवढं मॉइश्चर प्रिझरवेशन होईल. त्यातली आर्द्रता आहे ती आपण थांबवू शकू. त्यातल्या त्यात वीस टक्के का होईना; परंतु चांगले उत्पादन घेता येईल ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा मल्चिंग ही पद्धत आजमावलीच पाहिजे. त्यासाठी आपण खूप प्रयत्न करून ते जमवायला पाहिजे. आपण पेपरबाबत जे बोललात त्या बाबतीत आम्ही फारसे लक्ष घातलेले नाही; परंतु त्याच्या संशोधनाची आजची स्थिती काय आहे किंवा खरंच ते जमते का? त्याअनुषंगाने स्वत:चे प्रयोग माझ्या संशोधन केंद्रावर सुरू आहेत.

सर्वसाधारणपणे दोन वर्षांपर्यंत एखाद्या उत्पादनाविषयी माझी स्वत:ची खात्री झाल्याशिवाय ते विकण्यासाठी आम्ही बाजारपेठेत आणत नाही. कारण त्यानंतर

जर  त्याच्या तक्रारी आल्या तर ते आमच्या जैन इरिगेशनसारख्या कंपनीला शोभत नाही. त्यादृष्टीने ते संशोधन पूर्ण झाले, तरच याबद्दल मी आपल्याला पक्क असं मत देऊ शकेल. आजच्या परिस्थितीत ते स्वीकृत करण्यासारखे एक तंत्र आहे, ते तंत्र म्हणून चांगले आहे एवढंच मी आपल्याला सांगू इच्छितो.

**श्री. रवी महाजन –** प्रोजेक्ट म्हणून पारोळा किंवा जामनेर, जे कोरडे तालुके म्हणतात ते दत्तक घेऊन, तुमच्या मनात जेवढ्या संकल्पना आहेत, त्या तुम्ही राबवू शकाल का? एक रोल मॉडेल तयार करण्याच्या दृष्टीने?

**भाऊ –** पहिली गोष्ट असे एखादे खेडे दत्तक घेऊ शकतो का, जिथे तिथे ते सगळे घडवून आणू शकू, ज्याला 'ठिबक खेडं' असं म्हणता येईल असे आपण करू शकतो का, या दिशेने आपण विचार करू. तसे करण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठी ज्या यंत्रणांची मदत अपेक्षित आहे, ती प्रत्येकवेळा उपलब्ध होतेच असे नाही उलट त्यात अनेक अडचणी निर्माण होतात, असा आतापर्यंतचा माझा अनुभव आहे. प्रत्येक जिल्ह्यात किंवा प्रदेशात आम्ही असे प्रयत्न केले आणि तशी बरीचशी खेडीसुद्धा निर्माण झाली. विशेषकरून अशा प्रकारचे संकल्प गुजराथमध्ये यशस्वी झाले आहेत. आपल्याकडे पक्षभेद वगैरे भानगडी असल्यामुळे, त्यात हे विशेष असे बसलेले नाही. असे सर्व घडवून आणण्याची गरज वाटत असेल, तर असे कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना सर्वतोपरी मदत करायला मी तयार आहे. एवढे मात्र मी आपल्याला आश्वासित करू शकतो, तरी संबंधितांनी तसा सकारात्मक विचार करावा.

**श्री. प्रशांत चौधरी –** टेंशीओमीटर हा ठिबक सिंचनाचाच भाग म्हणून नाही बसू शकत नाही का?

**भाऊ –** दुसरा प्रश्न असा विचारला गेला, की ठिबक सिंचनामध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश असावा? त्यात टेंशोमीटरचा समावेश नाही. टेंशोमीटर हे असं उपकरण आहे, की त्याद्वारे जमिनीमध्ये किती आर्द्रता आहे? म्हणजे किती ओलावा आहे? याचा अंदाज आपण घेऊ शकतो. त्या प्रमाणात किती पाणी द्यायला पाहिजे, हे ठरवू शकतो. टेंशोमीटरचा समावेश त्यात व्हावा. सध्या टेंशोमीटरची किंमत जास्त आहे; परंतु ते आता स्वस्त होण्याची शक्यता आहे. खरं म्हणजे टेंशोमीटरचा वापर सुरू करावा की नाही? यावर आपल्या कंपनीत विचार सुरू आहे. त्याचे भाव निश्चितपणे ३० टक्के तरी कमी व्हावेत असा प्रयत्नही आम्ही करीत आहोत.

जेणेकरून मोठ्या प्रमाणावर टेंशोमीटर सर्वसामान्य शेतकऱ्यांनाही वापरता येणे शक्य होईल. त्यापेक्षा महत्त्वाचे तंत्रज्ञान असे आहे, की आपण शेतात ठिकठिकाणी सेंसर ठेवावे आणि ते सेंसर तुम्हाला हे सांगत राहतील, की सर्वसाधारणपणे आता एकूण आर्द्रतेचे काय प्रमाण आहे? आणि तसे केले, तर ते आपल्यासाठी अधिकच फायद्याचे ठरू शकेल.

जगात आता असे तंत्र विकसित होण्यास सुरुवात झाली आहे; परंतु ते फारच महागडे आहे. प्रत्येक झाडाला एक एक जर सेंसर बसवायचे ठरविले तर आणि वायरचे जाळे करण्याचे ठरविले तर ते फार जिकीरीचे काम आहे. ते अजून जमलेलं नाही पण त्याबद्दलही आपले संशोधन सुरू आहे, त्यासाठी आपण इलेक्ट्रॉनिक लॅब सुरू केली पाहिजे. ही सर्व उपकरणे इलेक्ट्रॉनिक आहेत. यात भरमसाट नफा गृहीत धरला जाऊ शकतो. तोही आपल्याला टाळता येईल आणि हा विषय शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आणि जवळचा असल्यामुळे त्यासाठी कंपनीने सक्रिय कार्य करावे, असा प्रयत्न जोमाने सुरू आहे. जर या दोन्ही गोष्टी आपण करू शकलो तर मला असे वाटते, की त्यात आमूलाग्र असा बदल होईल. जरी शासनाने सर्व सबसिडीचे आयटम त्यात टाकले, तरी त्याची एक शेवटी मर्यादा शासन टाकणारच आहे. एका शेतकऱ्याला ते एक-दोन लाखांपेक्षा अधिक देणार नाहीत.

**प्रश्न –** पाच-सात वर्षांनंतर आपला ठिबक सिंचन संच खराब झाला तर नवीन संच बसविण्यासठी सबसिडी मिळत नाही. त्याबद्दल काही करता येईल का?

**भाऊ –** आपले मत जर असे असेल, की आमची पंचवीस एकर शेती आहे. त्या संपूर्ण शेतीवरच सबसिडी मिळाली पाहिजे. संपूर्ण देशालाच सबसिडाईज करायचे हे करणे व्यवहार्य नाही. त्यामुळे सर्व गोष्टींचा समावेश जरी शासनाकडून करून घेतला, तरी शेवटी कोणत्याही अनुदानाच्या योजनेस मर्यादा असते. उदा. मी जे अक्षय ऊर्जेबद्दल बोललो, सौरऊर्जेबद्दल बोललो, तो जर पंप सेट तेथे बसवायचा असेल, तर दीड-पावणेदोन लाख रुपये त्यासाठी लागतील. त्यात बाकीचा संच बसवावा लागेल.

शासनालादेखील काही मर्यादा आहेत आणि त्या आपण स्वीकारल्याच पाहिजे. जे सशक्त शेतकरी आहेत त्यांनी स्वत: याबद्दल काय करता येईल यावर विचार

केलाच पाहिजे. ज्यावेळी शासनाची सबसिडी मिळाली नाही आणि आपली पिके वाळून जाण्याची शक्यता होती, त्या वेळी सर्व शेतकऱ्यांनी रोख पैसे देऊन अॅडव्हान्स बुकिंग करून ठिबक सिंचन घेतलेले आहे. जर शेतकऱ्यांजवळ नगदी पैसे असतात, शेतीसाठी पैसा खर्च करू शकता, तर का करीत नाही? हा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. आपण आयुष्यभर अनुदानावरच जगणार आहोत, अशा प्रकारचा परावलंबित्वाचा चंग बांधणे योग्य वाटत नाही आणि हे भारतीय संस्कृतीला धरून नाही असे माझे मत आहे. मी अनुदानाच्याविरुद्ध नाही; परंतु अमर्यादित अनुदान किंवा प्रत्येक कामासाठी सदैव शासनाने अनुदानच द्यावे, अशा अपेक्षेतून शेतकरी आळशी होऊ शकतो. त्याने अशा शासकीय योजनांवरच अवलंबून राहावे, असे मला वाटत नाही. आपण स्वत: काय करू शकतो याचा चौफेर विचार शेतकऱ्याने केला पाहिजे.

**प्रश्न –** पूर्वीच्या ठिबक सिंचन संचाला खार किंवा ससा दाताने तोडू शकत नव्हते, आता ते खूप कोरत आहेत. नवीन ठिबक लावल्याबरोबर पाच-सहा महिन्यांतच जॉइंनर लावून ते जोडावे लागत आहेत, तर त्याबद्दल काही होऊ शकेल का?

**भाऊ –** ठिबकच्या संचाची पाच वर्षांची हमी दिलेली असते; परंतु सर्वसाधारणपणे दहा वर्षांनंतर तो जुना झाला असेल तर आम्ही तो टेस्ट करीत असतो. म्हणजे साधारणपणे दहा वर्षे ड्रिप इरिगेशनच्या संचास काहीच होत नाही. महानोर दादांना जो चाळीस वर्षांपूर्वी संच देण्यात आला, तो संच ते आजही वापरत आहेत; पण त्या वेळी देण्यात आलेली नळी जाड होती. जसजशी आता स्पर्धा वाढायला लागली आणि इतर उत्पादक कंपन्या अत्यंत कमी जाडी असलेल्या नळ्या देऊन शेतकऱ्यांना फसवायला लागले, ते असे म्हणतात, की कमीतकमी भावात आम्ही देत आहोत आणि आमचा संच चांगला आहे. शेतकऱ्यांनादेखील सकृतदर्शनी तसे दिसते. कारण, तो तिथे कॅलिपर घेऊन किंवा मीटर घेऊन बसत नाही. त्यामुळे तो बिचारा फसतो; पण याचा परिणामकारक इलाज म्हणून १६ एम.एम. ऐवजी १२ एम्.एम्. आहे. १२ एम्.एम्. ही व्यवस्थित चालण्यासारखी आहे.

कडक उन्हाळ्यात जेव्हा ४८ अंश सेल्सीअसपर्यंत तापमान जाते तेव्हा नळ्यांमधील पाणी गरम होईल, यात वादच नाही. अहो, माणूससुद्धा एवढ्या

उष्णतेमुळे तापतो, तिथे पाण्याची काय धडगत? आणि हे पाणी पिकांना किंवा त्यांच्या मुळांना दिल्यानंतर ते घातक ठरते, हेही मात्र खरे आहे. तेव्हा यावर आपण केळीसाठी जो संच घ्याल त्यात १२ एम्.एम्. आणि १६ एम्.एम्. किंवा जास्त जाडीच्या नळीचा विचार करणे प्रत्येक शेतकऱ्याला गरजेचे आहे. प्रत्येक ठिकाणी एवढे तापमान वाढेल असेही सांगता येत नाही. म्हणून आम्ही असा कुठलाही नियम कंपनीच्या माध्यमातून करू शकणार नाही. दहा वर्षांनंतर सबसिडीला ते शेतकरी पुन्हा पात्र व्हावेत, असा विचार शासनदरबारी सुरू आहे.

मला असे वाटते, की तसे होईलही. कारण, त्याच शेतकऱ्याला परत रिप्लेसमेंटसाठी निदान जास्त नाही; पण पन्नास टक्के किंवा काही ना काही तरी अनुदान द्यावे यासाठी सर्व उत्पादकांनी पाठपुरावा केला आहे. तो जर यशस्वी झाला तर आपली समस्या निश्चितच सुटेल.

ठिबक सिंचन संचाच्या जाड नळ्या घ्याव्यात, की न घ्याव्यात हे ग्राहकांनीच ठरवायचे. कंपनीजवळ दोन्ही प्रकारच्या ट्यूब्ज आहेत. कंपनी कधीच असे करणार नाही की, कमी थिकनेस असलेली नळीच जास्त थिकनेसची आहे असे सांगून देईल. असे कोणतीही कंपनी कदापि करणार नाही. पण याउपरही दोन प्रकारच्या नळ्या असतील, तर कोणती नळी घ्यावी हे शेवटी शेतकऱ्याच्याच मनावर अवलंबून आहे, त्यांनीच ठरवायला पाहिजे जाड नळी घेणे आवश्यक आहे. दुसरे स्पर्धक म्हणतात, की ''आमच्या उत्पादनाची विक्री व्यवस्थित चालली आहे आणि आम्ही जे विकत आहोत त्यात कुठे काय वाईट आहे?'' पाच वर्षांनंतरचा किंवा एवढा दूरचा विचार करायला, सर्वसाधारण शेतकरी तयार नसतो. त्याला आज काय आहे, तेवढेच दिसत असते. त्यामुळे तो तेवढाच विचार करतो, कृपा करून आपण या सर्व गोष्टींचा डोळसपणे विचार करा.

**श्री. देशमुख –** ज्याच्याकडे ड्रिप आहे त्यालाच शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळावा असे का नाही?

**भाऊ –** ज्यांनी ड्रिप संच शेतात वापरलेले आहेत, त्याच लोकांना सर्व शासकीय योजनांचा फायदा मिळाला पाहिजे, अशी आपली जी सूचना आहे, ती जरी चांगली असली तरी ती किती व्यवहार्य आहे हा प्रश्न आहे शासन ती स्वीकारेल असे मला वाटत नाही; पण आपण म्हणता तसे झालेच तर आपल्या तोंडात साखर

पडो, एवढंच मी म्हणू शकेल.

**प्रश्न –** ड्रिपचे अनुदान कंपन्यांना न देता थेट शेतकऱ्यांना उपलब्ध होऊ शकेल का?

**भाऊ –** थेट सबसिडीचा जो मुद्दा आपण मांडला, हा आधी अशा पद्धतीने महाराष्ट्रातही सुरू होता. शेतकरी आणि उत्पादक यांच्यात तंटे निर्माण झाले. काही उत्पादकांनी शेतकऱ्यांना काही ना काही कारणासाठी कमी जास्त संच देऊन किंवा खराब संच देऊन त्यांच्याकडून पूर्ण बिलाचे पैसे घेतल्याचे आढळले. त्यामुळे त्या कंपनीला जर थेट चेक दिला तर शेतकऱ्याशी जे त्याचे वाद असतात ते मिटत नाही. म्हणून शेतकऱ्याच्या नावाचा चेक उत्पादकाला दिला जातो, म्हणजे उत्पादक तो चेक वटवू शकत नाही. त्यातला व्हाया मीडिया हा काढला, की तिथे जर काही वाद असले तर किंवा त्यांचे प्रश्न असले तर ते आपसात त्यांनी मिटवावेत. त्यानंतरच त्यांना त्या सबसिडीचा उपयोग झाला पाहिजे.

आताची जी पद्धत आहे ती सुधारित आहे; परंतु जर आपण म्हणाल त्याप्रमाणे एक पर्याय काढता येईल, की ज्या कोण्या उत्पादकाला मागच्या वर्षी समजा ५० कोटी रुपये सबसिडीचे मिळालेले आहेत, त्याच्याकडून शासनाने एक पन्नास कोटी रुपयांची बँक गॅरंटी घ्यावी आणि त्याला तेवढे पन्नास कोटी रुपये द्यावेत. त्यानंतर त्यात काही गोंधळ झाला, तर त्या बँक गॅरंटीच्या पैशातून शासनाने ते पैसे वसूल करावेत; परंतु जर असे झाले, तर या सर्व ड्रिप संचाची किंमत सर्वसाधारणपणे १५ टक्क्यांनी कमी होऊ शकते, हे मात्र मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगू शकतो. कारण, कोणतेही सबसिडीचे प्रकरण हे सहा महिने ते दीड वर्षापर्यंत सुटत नाही आणि एका वर्षाचे असले त्यानुसार पंधरा टक्क्याचे जरी या पैशांवर व्याज धरले तरी पंधरा टक्के पैसे तुम्हीच भरता. तेव्हा अशा पद्धतीने पैसे थेट आधी कंपन्यांना मिळाले आणि त्याच्यासमोर जर बँक गॅरंटी कंपनीने दिली असेल, तर शासनाची बाजू भक्कम ठरते आणि शेतकऱ्यावर होणारा अन्याय टळतो. अशा पद्धतीने जर आपण व्यवस्था करू शकलो, तर तुमची जी सूचना आहे. ती स्वागतार्ह ठरेल.

मी असे मत दोन वेळा मांडलेलेही होते. सर्वसाधारणपणे जे लहान उत्पादक आहेत त्यांनी जगूच नये का? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांना बँक गॅरेंटी

देता येणार नाही. त्यांना गोंधळ-घोटाळाही करता येणार नाही. अशा अनेक समस्या त्यात निर्माण होतात. योग्य पद्धतीने सर्व झाले तर त्याच्या किमती मात्र मी १५ टक्क्यांनी कमी करेन, हा माझा शब्द आहे. मी जर किमती कमी केल्या, तर सर्वांना त्या कमी कराव्या लागतील. याचे कारण आजही एकूण बाजारपेठ ही ५५ ते ६० टक्के आमच्याकडे आहे. त्यामुळे आम्ही हे करू शकू. आम्हाला हे शक्यही आहे, की आम्ही तेवढी बँक गॅरंटी शासनाला देऊ शकू; पण सर्वसाधारणपणे जो लहान उत्पादक आहे, जो एखाद्या जिल्ह्यामध्येच काम करतो किंवा ज्याला बँकेची मान्यता मिळण्यामध्ये अडचण आहे, त्यात त्याची कुचंबणा होऊ शकते, हे मात्र सत्य आहे. आपण दुसऱ्या मार्गाने हा प्रश्न जर सोडवू शकलो, तर मला असे वाटते, की ही सिस्टिम जर केली तर चांगले होईल आणि लाल फितीच्या बाहेर ते जाईल, अशाही सर्व योजना आहेत. आणखी एक दोन प्रस्ताव आहेत; पण आपण हा सुचविलेला मार्ग मात्र चांगला आहे आणि या ड्रिप संचाची किंमत कमी होऊ शकते, हे मात्र मी तुम्हाला पुन्हा खात्रीपूर्वक सांगू शकतो.

**भाऊ –** कोरडवाहू पिकांना एक-दोन पाणी देता येतील, अशी काही ठिबक सिंचन पद्धत आपण आपल्याकडे विकसित केली आहे का?

**भाऊ –** होय! फारच कमी जाडी असलेली ट्यूब आपल्याकडे आहे आणि आता अमेरिकेत जी कंपनी आपण विकत घेतली आहे, त्यांचे हे कामच आहे, की सरासरी दोन हंगाम त्या ट्यूबचा उपयोग करतात आणि ते त्या गुंडाळून ठेवतात. आपल्यालासुद्धा तसं करता येईल. ती ट्यूब उपलब्ध आहे. ती स्वस्तही आहे आणि तेवढ्या कामासाठी ती पुरेशी आहे; परंतु आपण जर तो ठिबक सिंचनाला पर्याय आहे, असे समजून वापरणार असाल तर आणि त्यानंतर त्याची तक्रार करणार असाल तर जमण्यासारखे नाही. कारण, ती त्या विशिष्ट कामासाठीच आहे.

तुरी किंवा ज्वारी अशी जी पिके आहेत त्या पिकांना त्या पद्धतीची जर आपण व्यवस्था केली आणि तुमच्याजवळ शेततळं असेल आणि एक छोटी, मोठी विहीर असेल किंवा त्यात आपण पाणी साठवू शकाल अशी परिस्थिती असेल, तर त्यावर सौरऊर्जेची किंवा विजेची उपलब्धता असेल आणि त्या साठ्यातून ते पाणी वापरले तर त्यासाठी ठिबक सिंचन यंत्रणा मात्र उपलब्ध आहे. केवळ दोनशे लिटरचा एक ड्रम ठेवला आणि त्या ड्रममध्ये पाणी ठेवले, त्या ट्युबने पाणी द्यायचं ठरवले तरी

मला असे वाटते, की ते शक्य होते. त्याला 'बकेट इरिगेशन' असे म्हणतात, त्याचे प्रात्यक्षिक जळगावमध्ये किंवा सोलापूर, कोल्हापूरलासुद्धा तुम्ही सर्व बघू शकाल अशा पद्धतीने ते उपलब्ध करून ठेवलेले आहे, तेही तुम्ही बघू शकता.

**प्रश्न (पुणे) –** विजेचा अभाव असताना, दाबतंत्रासारखे कुठले ठिबक सिंचन आहे का? की ज्यामुळे खालच्या भागातून उंच भागावर पाणी जाऊ शकेल?

**भाऊ –** होय आहे. मी यापूर्वीही आपल्याला सांगितले, की प्रेशर कॉम्पेनसेटिंग हा संच असा आहे, की उंच भागातून खालच्या भागात म्हणजे सखल भागात समान पाणी मिळेल. तशी सिस्टिम उपलब्ध आहे. ते तुम्हाला अगदी सहज करता येईल, त्यात काही मोठ्या अडचणी नाहीत. खालून बिनाप्रेशरने पाणी वर उचलण्याची सिस्टिम आतापर्यंत तरी शक्य झालेली नाही, होण्याचीही शक्यता कमी आहे; परंतु लो प्रेशरवर चालतील असे ड्रिपर निघाले आहेत.

पूर्वी जे पाण्याचे प्रेशर लागायचे ते दीड केजीपर्यंतचे प्रेशर लागत होते. आता आमचा असा प्रयत्न आहे, की अर्ध्या केजी प्रेशरवर काम चालू शकावे. तेव्हा लो प्रेशर ड्रिपर आणि कॉम्पेनसेटिंग पण लो प्रेशर अशा नवीन ड्रिपरचे संच आलेले आहेत. त्याचे संशोधन पूर्ण होऊन मला वाटते, की त्यातील काहींचा परिचय करून दिलेला आहे. ती पूर्ण रेंजच आहे. त्या लो प्रेशर ड्रिपरमुळेच आपण हे सौरऊर्जेचे सांगत आहोत, ते शक्य होणार आहे. कारण, सौरऊर्जेसाठी जर आपल्याला कमीत कमी प्रेशरचा ड्रिपर देता आला, तरच कमीतकमी सौरऊर्जेच्या पॅनलमध्ये आपल्याला ही सिस्टिम बसवता येईल. त्यामुळे लो प्रेशर ड्रिपर इज पॉसिबिलिटी आमच्याकडेही ते आहे. आम्ही ते सुरू केलेले आहे. पाश्चिमात्य देशात ते अधिक प्रमाणात होतं. आता आम्ही जी कंपनी विकत घेतली, त्यांचे तंत्रज्ञान आणून उत्पादन सुरू केले आहे. त्यामुळे या दोन्ही गोष्टी शक्य आहेत; परंतु खालून वर नेण्यासाठी त्याला प्रेशर नको, हे तर आताचे जे तंत्रज्ञान आहे त्याच्या अगदीच विरुद्ध असल्यामुळे ते जमण्यास कठीण दिसते.

**प्रश्न –** क्षारयुक्त पाणी शुद्ध करण्यासाठी काही कंपन्यांनी यंत्रं काढली. त्यामुळे पाणी शुद्ध होते, त्याअनुषंगाने आपले काही संशोधन सुरू आहे का?

**भाऊ –** आतापर्यंत क्षारयुक्त पाणी दिल्याने नुकसान होते, हे सर्वांना माहिती आहे; परंतु क्षार कमी करण्यासाठी किंवा संपूर्ण घालविण्यासाठी सामान्य शेतकऱ्याला

परवडण्यासारखे, चालण्यासारखे काही तंत्रज्ञान उपलब्ध झालेले नव्हते. आता मात्र ते तंत्रज्ञान उपलब्ध होण्यास सुरवात झाली आहे. त्यात पहिले प्राधान्य आपण पिण्याच्या पाण्याला देणार आहोत. जिथे पाण्यात थोडाफारही दोष असेल, तिथे ते लागू करू. आताही ते एवढे स्वस्त नाही, की ते प्रत्येकाला शक्य आहे. काही प्रमाणात क्षार कमी करायचे आणि ते पिकाला हानीकारक ठरणार नाहीत इतके कमी करायचे, एवढा मात्र प्रयत्न दोन वर्षांपासून सुरू आहे.

मला असे वाटते, की साधारणत: चार-पाच पिकांना लागू करणे जमेल असे क्षारयुक्त जरी पाणी आपण दिले तरी पिकांचे उत्पादन हे सरासरी आज जे मिळते आहे. त्यापेक्षा दुपटीने मिळू शकेल इथपर्यंत आपण पोहोचलो आहोत. हे जे क्लेम करताहेत तसेच ते परवडणारे आहे किंवा नाही ते मी पडताळणी करूनच सांगू शकेन. आजच्या परिस्थितीत माझा अनुभव असा आहे, की ते अजून पूर्ण शक्य झालेले नाही.

धन्यवाद!



# शिक्षणाला अग्रस्थान म्हणजेच पुढच्या पिढ्यांचा सुदृढ विचार

'स्टार-माझा' साठी मुलाखत
- चंद्रशेखर नेवे - ०६.०७.२००९

*शेती, शेतकरी यांचा विचार संकुचित दृष्टीने नसावा, तर एकंदरीतच ग्रामीण जीवनाचा विचार देशाच्या प्रगतीच्या दृष्टीनं करणं गरजेचं आहे. २००९-२०१० च्या केंद्रीय अर्थसंकल्पाचं स्वागत करताना भाऊंचा हाच दृष्टिकोन आहे. ग्रामीण भागासाठी असलेली बिगरशेती विभागातली गुंतवणूकही अंतिमत: शेती-शेतकऱ्यांनाच फायद्याची होणार, असं ते ठामपणे म्हणतात. तरीही माध्यमिक व उच्चशिक्षणासाठी असलेल्या तुटपुंज्या प्रावधानाबद्दल ते चिंता व्यक्त करतात.*

*ही तरतूद दिवसेंदिवस, सालोंसाल कशी कमी होते आहे, तेही ते सांगतात. त्यामुळे पुढच्या पिढ्यांवर दुष्परिणाम होणार असं बजावताना ते चिंतित होतात. त्यासाठी ते जागतिक स्तरावरच्या अन्य महत्त्वाच्या देशांचीही तौलनिक आकडेवारीसह उदाहरणं देतात.*

**भाऊ –** मला असे वाटते, की हे बजेट मूलतः ग्रामीण भारताकडे बघून झालेले आहे. आरोग्याची, रोजगाराची, वीजपुरवठ्याबद्दलची किंवा विस्तारित सिंचनाबद्दलची योजना असो, शेती, शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवून, नॅशनल हॉर्टिकल्चरची, फूड सिक्युरिटीची योजना असो; या सगळ्या योजनांमध्ये जिथे जिथे आपल्याला शेती–शेतकरी, आणि ग्रामीण भाग दिसतो, तिथे तिथे हा विषय स्पष्ट होत जातो.

खरे पाहिले तर सबंध बजेटमध्ये तर हे सगळ्याच ठिकाणी पेरलेले आहे. याआधी कधीही तसा डायरेक्ट ज्याला आपण स्वतंत्र प्रावधान किंवा तरतूद म्हणतो तशी कमीच असायची. त्या मानाने ती या वेळेला फार जास्त आहे आणि मला निश्चितपणे असे वाटते, की पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे भारत आणि इंडिया यातली जी काही तफावत आहे, त्यात असणारे अंतर कमी करण्याचा प्रयत्न या बजेटमध्ये निश्चित केला जाणार आहे. अर्थात, केवळ हे आठ महिन्यांचे बजेट आहे. निश्चित आहे, की आपल्या खजिन्याची परिस्थिती तेवढी चांगली नाही. देशाचे जे एकूण उत्पन्न आहे त्यामध्ये १० टक्के डेफिसिट आहे.



आज जगाच्या तुलनेत अमेरिका एवढा बलाढ्य देश आहे की त्या राष्ट्राच्या एकूण उत्पन्नाच्या १२ टक्के ते अशा पद्धतीने खर्च करतात. त्यांचे डेफिसिट १२ टक्क्यांवर आहे. भारत जवळजवळ १० टक्क्यांवर आहे आणि या १० टक्क्यांमुळे जसा अमेरिका दिवाळखोरीच्या रस्त्यावर आहे असे मोठमोठाले अर्थतज्ज्ञ म्हणतात तसे भारताचेसुद्धा होईल का, ही भीती त्या बजेटच्यामागे कुठेतरी डोकावताना दिसते. आपण जर तौलनिक अभ्यास केला, तर चायनामध्ये हेच प्रमाण त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ तीन टक्के आहे. जागतिक मंदीचे सावट या बजेटवर आहे, सरकारची कोंडी झालेली आहे, हे आपल्याला निश्चितपणे दिसते आहे. त्यामुळे फार मोठ्या अपेक्षा या बजेटकडून करणे गैर होते आणि गैर आहे. आपला देश संक्रमणावस्थेतून जातो आहे. जागतिकस्तरावरही संक्रमण आहे त्यातल्या त्यात थोडी बरी स्थिती, असं म्हणून आपल्यालाच आपलं समाधान करून घ्याव लागेल.

**श्री. नेवे –** भाऊ, या बजेटमधील सर्वांत चांगल्या गोष्टी कोणत्या म्हणता येतील आणि त्यातील उणिवा कोणकोणत्या?

**भाऊ –** सर्वांत चांगली गोष्ट ग्रामीण क्षेत्राशी संबंधित शिक्षण, रस्ते, विद्युतीकरण, सिंचनाच्या योजना आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे रोजगाराची योजना यात सर्वप्रथम आणि भरघोस अशी वाढ दिसते आहे. चाळीस हजार कोटी रुपयांचे प्रावधान आहे. या सबंध बजेटमध्ये जवळपास दोन लाख कोटी रुपयांची रोजची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे. ती अत्यंत महत्त्वाची आहे आणि त्याचबरोबर 'न भूतो न भविष्यती' ॲग्रीकल्चरची क्रेडिट म्हणजे शेतीला उपलब्ध होणारे कर्ज हे दोन लाख ८७ कोटिंवरून तीन लाख ८५ कोटींवर जाईल, असा दावा केलेला आहे. जर तसे घडू शकले, तर शेतकऱ्यांच्या हातात तो पैसा मिळेल. सावकारावर त्याचे अवलंबून असणे किती भयानक असते हे आपण पाहिले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात, त्यासाठीसुद्धा एक टास्क फोर्स निर्माण केला आहे, हा प्रश्न एवढा महत्त्वाचा आहे. ग्रामीण रोजगार योजनेमार्फत आपल्याला वाटेल ते करता येईल, अशी परिस्थिती आहे.

ठिबक सिंचनासाठी आपल्याला जर असं दिसलं, की चारशे तीस कोटी रुपयांचाच प्रावधान आहे. या प्रत्येक योजनेत सडकेची, घरांची किंवा रोजगाराची योजना असो; या सगळ्या ठिकाणी पाइप, ठिबक म्हणजे शेती हे सर्व गृहीतच

धरलेले आहे. ग्रामीण आहे तर ते फक्त शेती आणि शेतकऱ्यांसाठीच आहे, असा त्याचा अर्थ आहे. तेव्हा त्यादृष्टीने जर बघितले तर ती सर्वांत चांगली घटना आहे.

भारताला महासत्ता बनवण्याच्या दृष्टीने माध्यमिक आणि उच्चशिक्षण पद्धतीत वास्तविक पाहता फार मोठा बदल होणे गरजेचे आहे. कारण, भारत हा सर्वांत जास्त युवापिढी असलेल्यांचा देश म्हणून जगात पुढे येतो आहे. अशा वेळी जर आपण तरुणांना शिक्षित करणार नसू, त्यांना विशेष असे तंत्रज्ञान देणार नसू, तर आपण मागे पडू. परिणामी तेच तरुण एक मोठं ओझं म्हणून आपल्यावर लादलं जाईल. त्यांना आपण शिक्षण आणि तंत्रज्ञान देऊ शकलो तर ते आपली मदत करू शकतील, अशी परिस्थिती आहे. मला निश्चितपणे असे वाटते, की शिक्षणाला जसं झुकतं माप मिळायला पाहिजे होतं तसं मिळालेले नाही आणि ती खटकणारी बाब आहे.

**श्री. नेवे –** मला असे म्हणायचे आहे, की आर्थिक मंदीच्या काळात हा जो अर्थसंकल्प जाहीर झालेला आहे, तो देशाला तारून नेणारा ठरणार आहे का?

**भाऊ –** देशाला तारून नेईल का नाही हे सांगता येत नाही; परंतु एक भयंकर असे चित्र निर्माण होत आहे, की संपूर्ण देशात केवळ शहरी श्रीमंत लोक आहेत, त्यांच्याकडेच सर्व पैसा जातो आहे, विदारक अशी स्थिती आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प देशाला तारून नेईल का नाही, हे सांगणे फार कठीण आहे. जागतिक आर्थिक मंदिच्या झळीपासून आपला देश आज थोडा लांब असला तरी, अशी परिस्थिती कायम राहील, याची खात्री देता येणार नाही.

**श्री. नेवे –** एकंदरीत आज जाहीर झालेला अर्थसंकल्प याबाबतीत तुम्ही समाधानी आहात का? किंवा यात तुमच्या काय अपेक्षा होत्या?

**भाऊ –** ग्रामीण भारताच्या विकासाच्या दृष्टीने जे बजेट आहे, ते सम ाधानकारक आहे; परंतु मोठमोठ्या समस्या आहेत त्या अनुषंगाने ज्या आर्थिक समस्या आहेत त्या देशाच्या समोर आहे. त्यातल्या त्यात एक चांगली बाब म्हणजे शेती आणि शेतकऱ्यांसाठी सात टक्क्यांनी पहिल्यांदा कर्ज मिळणार आहे. कर्जाचे हप्ते वेळच्या वेळी भरले तर सहा टक्क्यांवरसुद्धा जाऊ शकते. याचाच अर्थ असा, की सात टक्क्यांनी पहिल्यांदाच शेतकऱ्यांना साह्य होणार आहे. आतापर्यंत घरासाठी, आठ टक्क्यांनी, गाडी घ्यायची असेल तर सात-आठ टक्क्यांनी मिळत होते. त्याऐवजी पहिल्यांदाच आपल्या देशात एक धोरण म्हणून शेतकऱ्यांसाठी ते सात

टक्क्यांवर आले आहे. त्यात राज्य सरकारही मिळवतील. आणि हे सात टक्क्यांचे पाच टक्क्यांपर्यंत येतील. तसं जर झालं तर ग्रामीण भारताची प्रगती निश्चित आहे. सामाजिक शांततेच्या दृष्टीने ती अत्यंत महत्त्वाची घटना ठरेल असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**श्री. नेवे –** म्हणजे हा अर्थसंकल्प कृषिप्रधान किंवा शेतीप्रधान आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही?

**भाऊ –** शेतकऱ्यांच्या दृष्टीने हिताचा ठरेल, ग्रामीण भारताच्या दृष्टीने तो हिताचा ठरेल, एवढं मात्र मी म्हणू शकतो; परंतु त्यामुळे एक क्रांतिकारी असे घडले आहे असे म्हणणे मात्र माझ्या मनाला पटत नाही. कारण, आपल्यासमोर जी आर्थिक परिस्थिती आहे, त्यात काही क्रांती होण्यासारखी आहे, असेही काही वाटत नाही. दुसरी जी क्षेत्रं आहेत, त्यांनाही काही मोठं प्रोव्हिजन आहे, अशातला काही भाग नाही. त्यामुळे मला असे वाटते की प्राप्त परिस्थितीत ते योग्यच आहे.

**श्री. नेवे –** अशी कोणती अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, की जी व्हायला पाहिजे होती.

**भाऊ –** शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे. माध्यमिक, उच्च तांत्रिक शिक्षण, व्होकेशनल एज्युकेशन या संदर्भात अधिक विचार व्हायला हवा. 'उद्याच्या आकांक्षा' असे ज्यांना म्हणता येईल, 'देशाचे भविष्य' म्हणून ज्यांच्याकडे पाहता येईल, त्या सर्वांकडे थोडे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटते. विम्याबद्दल काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. आशादायी राहू या. शेतीसाठीही विम्याची योजना काही प्रमाणात का असेना लागू होईल.

धन्यवाद!





# महिलांमुळे संस्कृती जिवंत राहिली

'साम टी.व्ही.'साठी मुलाखत – १३.०८.२००९

*स्वातंत्र्याची साठ वर्षे पूर्ण झालेली आहेत. समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये आपलं स्थित्यंतर या कालावधीमध्ये अनुभवलं गेलं आहे. या साठ-बासष्ट वर्षांच्या कालखंडात आपण नेमकं काय कमावलं, काय गमावलं आहे आणि आपल्या समोरची आव्हानं कोणती आहेत? यासंदर्भात आपण जाणून घेणार आहोत जैन उद्योगसमूहाचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री भवरलालजी जैन यांच्याकडून...*

**प्रश्न –** भाऊ, साधारणपणे या साठ वर्षांत आपली वाटचाल नेमकी कोणत्या मार्गानं झालेली आहे?

**भाऊ –** मला असे वाटते, की हा सिंहावलोकनाचा प्रसंग आहे. माणसानं अंतर्मुख व्हावं असाच हा प्रसंग आहे. ६२-६३ वर्षांमध्ये देशाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती आपण स्वातंत्र्योत्तर काळात काय पाहत आहोत आणि स्वातंत्र्यापूर्वी ती कशी असावी याबद्दल आपली स्वप्नं काय होती, हे आपल्यासमोर आहे. हे स्पष्टपणे मांडावे

लागेल, की गांधीजींना, राष्ट्रपित्याला जो समाज, जी आर्थिक व्यवस्था आणि जी सांस्कृतिक स्थिती अभिप्रेत होती, ती मात्र आपण साध्य करू शकलेलो नाही.

त्यापेक्षा काही वेगळेच आपण साधले आहे. सगळंच गमावलं आहे असे मी म्हणणार नाही; पण वेगळे साधले एवढे मात्र म्हणावे लागेल. आपण काय साधलं आहे, तर उद्योगांची मुहूर्तमेढ रोवून आपण भारताला बलशाली करायच्या मार्गावर लावलं. एवढंच नव्हे; तर महासत्ता होण्याच्याही आपण मार्गावर आहोत. वस्तुत: उद्योग म्हटला म्हणजे आपण जरी काहीही करायचे ठरवले तरी शेवटी त्याची जी दशा होते किंवा शेवटी त्याला जी दिशा मिळते, ती परिस्थिती कशी असते. याचा अनुभव आपण घेतला आहे. आपण समाजवादाने सुरवात केली आणि सार्वजनिक उद्योगांना महत्त्वाचे स्थान असायला पाहिजे, असे आपण ठरवले; परंतु शेवटी झाले असे, की आज तर सर्व सार्वजनिक उद्योग मागे पडायला लागलेत, तोट्याने ग्रस्त झाले आहेत, ते आपण केव्हा एकदा विकून टाकू आणि त्यांचे खासगीकरण करून टाकू, जागतिकीकरण करून टाकू अशी आपल्याला जणू घाई झाली आहे.




२७४

एवढेच नव्हे; तर आपल्याला सर्वच गोष्टींची घाई झाली आहे, असे वाटायला लागले आहे. म्हणजे आता आपल्याला विकास हा ताबडतोब साधता आला पाहिजे. आपल्याला केवळ आर्थिक विकासच नव्हे; तर सर्व गोष्टींमध्ये आपली घोडदौड झाली पाहिजे असे आपण गृहीत धरून वागायला सुरवात केली आहे आणि तसं केवळ वागायला सुरवात केली आहे असे नाही, तर त्याचा प्रचार, प्रसारही आपण करतो आहोत. नेमके काय घडते आहे, की एकीकडे आपली औद्योगिक प्रगती खूप झपाट्याने झाली, आपण चांगला पाया निर्माण केला, त्यावर काही दिवसांसाठी का असेना, इतक्या वर्षांसाठी का असेना, आपण धनधान्याच्या दृष्टीने स्वावलंबी झालो. या कालावधित प्रत्येक वेळी दुष्काळाला सामोरे जावे लागले असे झाले नाही. ज्या गोष्टी झाल्या नाहीत, त्याची चर्चा करणे जास्त योग्य आहे असे मला वाटते. कारण, ज्या गोष्टी घडल्या त्या सर्वांच्या समोर आहेतच.

ज्या गोष्टी घडल्या नाहीत त्या कोणत्या? शेती आणि शेतकऱ्यांची, ग्रामीण विभागाची प्रगती व्हायला पाहिजे होती, तशी झाली नाही. झाली असेल तर किती लोकांची झाली? टक्येवारीने किती शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळाला? ज्यांना वीज आणि पाणी मिळालं, त्यांच्याकडे कारखानदारी आली, तिन्ही गोष्टी ज्यांना मिळाल्या. त्यांचा त्यांना खूप फायदा झाला. अशी ही टक्केवारी किती असेल? शेतकऱ्यांमध्ये ती केवळ १० टक्के आहे. म्हणजे सर्व जनतेमधील १० टक्के नव्हे. थोडक्यात म्हणजे सत्तर टक्क्यांचे दहा टक्के म्हणजे सात-आठ टक्के शेतकऱ्यांची त्यातून प्रगती झाली.

पूर्वी जमीनदार म्हणून पुढे होते. आता शेतकरी म्हणून ते पुढे आहेत. त्यांच्याकडे खूप सुबत्ता आहे. या सुबत्तेबरोबर त्यांचे काय झाले? तर त्यांच्यापैकी बहुतांशी लोक व्यसनाधीन झाले. जे शेतकरी सधन झाले त्यांच्यापैकी काहींच्या घरादारात व्यसन घुसले. जी औद्योगिक प्रगती झाली, त्यातही ठराविक घराण्यांची मक्तेदारी राहिली. ती संख्या त्या वेळी २५ होती, आता २५० झाली आहे म्हणजे आज तरी २५० आहे. त्यापेक्षाही अधिक आहे असे तरी दिसत नाही. अजूनसुद्धा सर्वसाधारणपणे 'माहिती आणि तंत्रज्ञान' ही एक इंडस्ट्री आहे. ती एक मिळकत आहे. ती सर्वदूर पसरलेली आहे. प्रत्येक माणसाच्या घरात ती पोहोचलेली आहे. हे संगणकाच्या क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात आणि गतीने अनेक बाबी घडल्या आहेत.

पंधरा ते पंचवीस लाख लोक खूप सधन झाले. तुम्ही बघता आहातच, की त्यांच्यातीलच काहींमध्ये 'रेव पार्टी' होते आहे. अनेक लोक व्यसनाधीन झाले आहेत. एवढंच नव्हे; तर ते बेढब झाले आहेत. त्यांना असे वाटते, की आयुष्य जरा वेगळ्या पद्धतीने जगायला हवे. 'मला आता तसे जगायचे नाही. आता मला केवळ शेती बघायची आहे.' आय. आय. टी. चा इंजिनिअर असे म्हणायला लागला आहे. म्हणजे तोसुद्धा आज जे काम करतो आहे त्या कामात सुखी नाही. इथे दोन गोष्टी मला प्रकर्षाने जाणवतात. औद्योगिक प्रगती झाली, उत्पादकता वाढली. आपण काही बाबतीत स्वावलंबी झालो, याचा अर्थ आपण सुखी आणि समाधानी झालो का? या प्रश्नाचे उत्तर यातून मिळत नाहीत.

**प्रश्न –** तुम्ही ज्या वेगवेगळ्या मुद्यांचे विवेचन केले, त्यात एक विचार महत्त्वाचा आहे, की आपली जरी बौद्धिक प्रगती होत असली तरीही तुम्ही सांगितल्याप्रमाणे आपण सुखी आणि समाधानी नाही. त्याचे कारण असे आहे, की तुमच्या एकूण प्रगतीला अधिष्ठान कशाचे आहे, हे महत्त्वाचे असते. आपल्या मूल्यांचे अध:पतन खूप मोठ्या प्रमाणावर झाले आहे, असे मला वाटते असा आपलाही समज आहे का?

**भाऊ –** 'अधःपतन झाले' हा केवळ समज नाही, ती वस्तुस्थिती आहे. मूल्यांचे अध:पतन झाले म्हणजे नेमके काय झाले आणि का झाले? पहिली गोष्ट जी श्रमाधारित संस्कृती अपेक्षित आहे त्या ऐवजी ते स्थान मशीनने घेतले, उत्पादकतेने घेतली. त्यामुळे उत्पादकता वाढली; त्याबरोबर येणारा वाढीव पैसा आपल्याला मिळाला. ती सुबत्तासुद्धा मिळाली. मोजक्या विशिष्ट लोकांना, वर्गाला ती सुबत्तासुद्धा मिळाली; परंतु हा सर्व पैसा त्या खेड्यांपर्यंत, सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचला का? असं विचारलं तर या प्रश्नाचे उत्तर नाही, असेच आहे. त्याचे कारणच आहे, की आजही ती परिस्थिती कायम आहे. एवढे कोट्यवधी रुपये कमावूनसुद्धा ती कायम आहे.

ज्या चांगल्या क्षेत्रात अनिष्ट प्रकार होण्याची शक्यता नव्हती, तिथेसुद्धा ते कसे होतील असा जणू अनेकांनी विडाच उचलला. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले अध:पतन झाले. आपण शेतकऱ्यांना असे सांगितले, की कर्जाचे पैसे भरायची गरज नाही. आम्ही कर्ज माफ करणार आहोत. शेतकऱ्यांना मदत करायची होती तर

कर्ज दहा ऐवजी वीस वर्षांनी भरा असे म्हणायला तर हरकत नव्हती? आपल्याला हळूहळू शेतकऱ्याच्या मालाच्या किमती वाढवता आल्या असत्या. त्याची उत्पादकता वाढवता आली असती. या दोन गोष्टी जर आपण वाढवू शकलो असतो; तर त्याला आपण सशक्त करू शकलो असतो आणि त्याने शासनाचे कर्ज नक्की भरले असते. पण तू पैसाच भरायचा नाही म्हटल्यानंतर त्याच्या नियतमध्ये खोट येते. पुढच्या वेळेलाही तो असाच विचार करतो, की आता जे कर्ज मी घेतो आहे ते परत करायची काय गरज आहे? ज्या शेतकरीवर्गाने ही सभ्य संस्कृती जपून ठेवली होती, त्या संस्कृतीलासुद्धा अशा रीतीने आपण धक्का द्यायला सुरवात केली.

ग्रामीण भागातील शेतकरी महिला तसेच शहरातील महिलांनी आपली संस्कृती सांभाळली, जपली. पाश्चात्त्य संस्कृतीचे बटबटीत प्रदर्शन दाखवून प्रसारमाध्यमांनी महिलावर्गामध्ये आकर्षण निर्माण केले. त्यातील काहींनी आपल्या संस्कृतीशीसुद्धा तडजोड करायला सुरवात केली. आतापर्यंत आपली संस्कृती जिवंत राहिली, हजारो वर्षे जिवंत राहिली, संस्कृतीची ही भिस्त आजही महिलांवर आहे आणि पुढेसुद्धा ती तशीच राहणार आहे. कारण, महिला आपल्या देशात संस्कृती जपायचे काम जास्त चांगल्या पद्धतीने करू शकतात, त्यांचाच नैतिक ऱ्हास सुरू झाला की फार मोठ्या समस्या निर्माण होतात. पुरुषांनी जगभरात कुठेही संस्कृती जतन करण्याचे काम केलेले नाही. पुरुष हा नेहमीच भ्रमंती करीत राहिला आहे.

जन्म देणे ही एक निर्मितीच आहे. सर्वश्रेष्ठ सृजनशीलता आहे. ही सृजनशीलता अतिशय पवित्र अशी बाब आहे. एखादा कारखाना आणि खूप मोठा व्यवसाय उभा करण्याच्या कामापेक्षा ही सृजनशीलता कमी प्रतीची आहे का? कारण हा जो व्यवसाय आहे तो चालविणारा कोण आहे शेवटी? आणि कोणासाठी आहे? म्हणजे शेवटी हे जे पुनरुत्पादनाचे काम आहे हे या समाजासाठी आहे. या जनतेसाठी आहे. हे जर खरे असेल आणि ती सृजनशील जनताच कमी करणार असाल, निर्मितीच होऊ देणार नसाल, भवितव्यच घडू देणार नसाल तर या समाजाचे काय होईल?

आज नाही तर उद्या हा विचार करणे क्रमप्राप्त होणार आहे. चीनमध्येसुद्धा पंचवीस वर्षांनंतर एवढी भयानक परिस्थिती होणार आहे, की जगणंच मुळी हे कोणासाठी? कारण खायलाच कोणी राहिले नाही, तर युद्ध करूनही काय करणार आहात? त्यामुळे आपण स्त्रियांना अधिकार देऊन त्यांना सशक्त करायला हवे

होते. त्याचप्रमाणे ज्या पद्धतीने त्यांची संस्कृतीआधीपासून होती तिची जपवणूक करायला प्रवृत्त करायला हवे होते, अशा मूलभूत बाबींकडे आपले दुर्लक्ष झाले आहे. शिक्षणक्षेत्राकडे आणि संस्कारसंवर्धनाकडेही आपले दुर्लक्ष होत आहे. ग्रामीण भागात ज्या शेतकऱ्याला सशक्त करणे गरजेचे होते. त्यांना आपण सशक्त करू शकलो नाही. त्यामुळे त्याच्या आपल्या विचारात एवढा मोठा फरक आपल्याला आढळतो.

मला असे वाटते की, इथे दुफळी निर्माण झाली आहे. शहर वेगळे, खेडे वेगळे! श्रीमंत वेगळे आणि गरीब वेगळे! केवढी मोठी दरी निर्माण झाली. खोलवर ती रूतून गेली आहे. एक माणूस चार हजार पाचशे कोटी खर्च करून घर बांधायचं ठरवू तरी कसं शकतो? लाखो, कोट्यवधी लोक आपल्या देशात असे असतील, की ज्यांना राहण्यासाठी साधी झोपडीदेखील असू शकत नाही. याला आपण या देशाची प्रगती म्हणू शकणार नाही. 'मेरा भारत महान' असे कसे म्हणणार का? माझ्यासमोरचा हा प्रश्न मला तरी अस्वस्थ करणारा आहे. इतरांना तो अस्वस्थ करतो की नाही, याची मला कल्पना नाही पण माझा ग्रामीण जीवनाशी रोजचा संबंध आहे आणि कायम राहील.

आपला हा भारत आणि त्यांचा तो इंडिया असे होऊ नये. गांधीजींच्या जीवनातील किंवा त्यांच्या विचारातील जो भारत होता तो खरच परवडला असता! जरी आपण थोडे मागासलेले राहिलो असतो तरी चालण्यासारखे होते. अजूनही वेळ गेलेली नाही. मला असे वाटते, की जिथपर्यंत आज आपण येऊन पोहोचलो आहोत, त्यापुढेही जाण्याची आपल्याला आतातरी संधी आहे. अजूनतरी शासनाने कमीत कमी जे आपल्या संविधानात लिहिलेले आहे, घटनेत लिहिलेले आहे, तेवढे तरी करावे.

एकूण अर्थसंकल्पाच्या पाच ते सात टक्के पैसे शिक्षणावर खर्च करायलाच हवेत. शिक्षण मूल्याधारित व्हायला हवे. केवळ कौशल्य देणारे शिक्षण नको, तर संस्कारसुद्धा शिक्षणातून पेरणे आवश्यक आहे. शिक्षणामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक झालीच पाहिजे आणि त्याचबरोबर ग्रामीण भागासाठी किमानपक्षी ठरलेली पन्नास टक्के गुंतवणूक होईल, असे पाहावे. तशी एक शपथच या स्वातंत्र्यदिनी आपण घेतली पाहिजे. धन्यवाद!

### डॉ. भवरलालजी जैन यांचे साहित्य

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | आवृत्ती क्र. | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|
| 1 | आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुनर्बांधणी | १ली | २००१ |
| 2 | कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटाची | १ली | २००४ |
| 3 | A Telling Tale | 1st | 2004 |
| | | 2nd | 2011 |
| 4 | ती आणि मी | १ली | २००९ |
| | | १५वी | २०१२ |
| 5 | हे बंध रेशमाचे | १ली | २०१० |
| 6 | Uniting Bond | 1st | 2010 |
| 7 | Then & Now | 1st | 2011 |

### डॉ. भवरलालजी जैन यांच्या मुलाखती व भाषणे

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | उमलले संवाद | १ली | २००६ |
| 2 | उमलले संवाद भाग - २ | १ली | २०१२ |
| 3 | An Enterpreneur Deciphered | 1st | 2009 |
| | | 2nd | 2011 |
| 4 | जैन हिल्सवरील जागरण | १ली | २०१२ |

| प्रकाशन | • लेखक<br>* अनुवादक<br>■ संकलक | विषय व आशय |
|---|---|---|
| ग्रंथाली ज्ञानयज्ञ, मुंबई | • डॉ. भवरलाल जैन | सामाजिक परिवर्तन, सज्जनशक्ती |
| जेआयएसएल, जळगाव | • Dr. Bhavarlal Jain | जलनियोजन, जल व मृद्संधारण |
| Jain Irrigation System Ltd | • Dr. Bhavarlal Jain | Water Management & Conservation |
| मॅजेस्टिक, मुंबई | • डॉ. भवरलाल जैन | समर्पित सहजीवनाचं, प्रेरणादायी, आत्मकथनपर चिंतन |
| बीकेजेएमएफ, जळगाव | • डॉ. भवरलाल जैन | अडीच दशकांचा दोन मित्र-परिवारांचा प्रवास |
| BKJMF, Jalgaon | • Dr. Bhavarlal Jain | 25 years of journey between two friendly families |
| JISL, Jalgaon | • Dr. Bhavarlal Jain | Transformation of Jain Hills |

| | | |
|---|---|---|
| रचना, नाशिक | ■ इंदरचंद दुधेडिया | प्रसार माध्यमांद्वारे प्रकाशित मुलाखतींचा संग्रह |
| बीकेजेएमएफ, जळगाव | ■ आनंद गुप्ते, ज्ञानेश्वर शेंडे | प्रसार माध्यमांद्वारे प्रकाशित मुलाखतींचा संग्रह |
| BKJMF, Jalgaon | I.L. Dudhedia, Gimi Farhad, B. Krishnakumar | Published interviews & articles |
| ग्रंथाली, मुंबई | ■ दिनकर गांगल | बहुविध विषयांवरील भाषणे |

## डॉ. भवरलालजी जैन यांचेवरील इतरांचे साहित्य

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | आवृत्ती क्र. | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|
| 1 | वाकोदचा वटवृक्ष | १ली | २००६ |
| | | २री | २००७ |
| 2 | वाघूरचं पाणी | १ली | २००६ |
| | | २री | २००७ |
| 3 | पाषाणातून पाझर | १ली | २००६ |
| 4 | सुजलाम् सुफलाम् | १ली | २००७ |
| 5 | थेंबभर पाणी अनंत आकाश | १ली | २०१० |
| 6 | अतिथी देवो भव (Remarks) | 1st | 2012 |
| 7 | मरुभूमीतून बाहेर... | १ली | २०१२ |
| 8 | Awards & Accolades | 1st | 2011 |

| प्रकाशन | • लेखक<br>* अनुवादक<br>■ संकलक | विषय व आशय |
|---|---|---|
| साकेत, औरंगाबाद | ■ आनंद गुप्ते | इतरांनी प्रसिद्ध केलेले लेख |
| रचना, नाशिक | इंदरचंद दुधेडिया, पांडुरंग चौगुले, सुभाष पवार | कर्तृत्वाविषयी प्रतिक्रिया-प्रतिसाद |
| रचना, नाशिक | ■ सुभाष पवार | रचलेल्या कविता |
| केशव भिकाजी ढवळे, मुंबई | • चिंतामणी नांदेडकर | कार्यकर्तृत्वाचा ललित आलेख |
| मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | • सुरेखा शहा | जीवनकार्यावर आधारित चरित्रात्मक कादंबरी |
| BKJMF, Jalgaon | ■ गिमी फरहाद,<br>बी. कृष्णकुमार,<br>मनीष शहा, ज्ञानेश्वर शेंडे,<br>डॉ. योगेंद्र यादव | जैन इरिगेशन कंपनीच्या विविध प्रकल्पांना तसेच अनुभूति स्कूल, वाकोद फार्म, गांधी रिसर्च फाऊंडेशनला भेट देणाऱ्या अतिथींचे अभिप्राय |
| पद्मगंधा, पुणे | ■ डॉ. श्रीनिवास साठे | डॉ. भवरलाल हिरालाल जैन यांच्या घराण्याचा इतिहास |
| Jain Irrigation System Ltd | | Awards & Accolades bestowed on B.H.Jain & JISL |



आदरणीय भाऊंच्या या संवादात्मक चिंतनाचा विशेषतः तरुण पिढीला उपयोग होईल. हे विचारांचे, संवादाचे उमलणे, तरुणाईसाठी आहे. या देशाचे भवितव्य ज्या पिढीच्या हाती आहे, तिच्यासाठी एका कर्मयोग्याने दिलेला हा प्रसाद आहे असे मानून तरुणांनी त्याचा स्वीकार केला पाहिजे. तरुणांबरोबर शेतकरी, उद्योजक आर्थिकक्षेत्रात काम करणारे, विज्ञाननिष्ठ नागरिक, महिला, शासनातील राज्यकर्ते व सनदी अधिकारी या सर्वांनी भाऊंच्या या विचारधनाचा स्वतःसाठी सढळपणे उपयोग करावा. बँकेतील धन फक्त या आयुष्यात उपयोगी पडेल, विचारधन शाश्वत असल्याने ते कित्येक भावी आयुष्यांसाठी प्रेरक, मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरेल. भाऊंनी म. गांधी, पं. जवाहरलालजी आणि जे.आर.डी. टाटा यांच्याकडून हे विचार-आचारधन घेतले व त्याचा आयुष्यभर सदुपयोग केला. भाऊंच्या या कृतिशील विचारधनाचा नव्या पिढीने लाभ घ्यावा.

– **मधु मंगेश कर्णिक** (प्रस्तावनेतून...)

**भवरलाल अँण्ड कांताबाई जैन**
**मल्टीपर्पज फाऊंडेशन**

9 788189 502065

मूल्य : ₹ १५०